चेखवच्या सात कथा

अनुवाद - सुमती कानिटकर

अन्तोन चेखव

एकोणिसाव्या शतकाच्या शेवटी होऊन गेलेल्या अन्तोन चेखवला आधुनिक - मॉडर्न - लघुकथेचा जनक मानले जाते. रशियन माणसांची सुखदु:खे आणि मने तळमने अत्यंत तरल, काव्यमय पण सडेतोड शैलीत चित्रित करणाऱ्या चेखवने लघुकथेला आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठा प्राप्त करून दिली, आणि तो विश्वविख्यात रशियन कवी पुष्कीन व कादंबरीकार दस्तयेवस्की, टॉलस्टॉय, गॉर्की यांच्या पंक्तीत जाऊन बसला.

त्याच्या पाचशे कथांतून निवडक कथांचे संग्रह तयार करायचे झाल्यास सात-आठ संग्रह तरी तयार करावे लागतील. त्यातलाच हा एक आहे असे समजावे. रशियन भाषेच्या व साहित्याच्या अभ्यासिका सुमती कानिटकरांचा हा प्रयत्न मराठी रसिक वाचकांना निश्चितच भावेल. रशियात क्रांती झाली, विसाव्या शतकात लाल महासत्तेचा उदय आणि अस्तही झाला. पण वाचकांना चेखवच्या अजरामर आणि नितान्त सुंदर कथा आजही एकविसाव्या शतकातही भुरळ घालतात. मराठीतील अनेक सुप्रसिद्ध कथाकारांवर चेखवचा सुस्पष्ट प्रभाव आहे, हेही लक्षात घेण्यासारखे आहे. या कथा सादर करणाऱ्या सुमती कानिटकरांचे चेखवच्या विख्यात नाटकांपैकी 'चेरीचा मळा' हे अनुवादित शोकनाट्यही यापूर्वी प्रकाशित झाले आहे.

कॉन्टिनेन्टल

म रा ठी तू न वि श्व वा ङ्म या क डे

चेखवच्या सात कथा

प्रा. सुमती कानिटकर

कॉन्टिनेन्टल प्रकाशन
विजयानगर, पुणे ३०

प्रकाशक : ऋतुपर्ण अनिरुद्ध कुलकर्णी
कॉन्टिनेन्टल प्रकाशन
विजयानगर, पुणे ४११०३०

मुद्रक : श्रीकांत मुद्रणालय
कुंटे चौक, सदाशिव पेठ,
पुणे ४११०३०

अक्षरजुळणी : रेखा कुलकर्णी
शब्दरेखा टाईपसेटर्स
१२०४/१७, शिवाजीनगर,
पुणे ४११००४

मुखपृष्ठ : अशोक बोकील
आंतील चित्रे : रादुगा पब्लिशर्स, मॉस्को
प्रकाशित इंग्रजी अनुवादाच्या आवृत्तीवरून

चेखवच्या सात कथा

प्रकाशन क्रमांक : १२७७
सर्व हक्क सुरक्षित
मराठी अनुवादाचे हक्क : सौ. सुमती कानिटकर

प्रथमावृत्ती : २००२

किंमत साठ रुपये

अनुवादिकेची प्रस्तावना

१९ व्या शतकातील रशियन साहित्यिकांतील चेखव हा शेवटचा महान साहित्यिक म्हणून मानला जातो. चेखवने लघुकथा ह्या एका नव्या आगळ्या वेगळ्या साहित्य प्रकाराची निर्मिती केली. 'शान ओ केसी' ह्या आयरिश नाटककाराने एके ठिकाणी चेखवविषयी कमीत कमी शब्दांत असे लिहिले आहे : दूरवरचा तारा जसा दीर्घ काळ लुकलुकत राहतो तसा चेखवच्या साहित्याचा प्रभाव वाचकांच्या मनावर दीर्घ काळ टिकून राहील.

१९ व्या शतकातील रशियन साहित्यावर कादंबरी ह्या वाङ्मय प्रकाराचा पगडा होता. दस्तयेवस्की, ल्येव तलस्तोय, तुर्ग्येनेव सारख्या महान लेखकांच्या छत्रछायेत वाचकांची, कादंबरीकारांची आणि टीकाकारांची सबंध पिढीच्या पिढी लहानाची मोठी झाली. पण ह्याच वेळी चेखवने मात्र पठडीबाहेर जाऊन लघुकथा, दीर्घ कथा आणि नाटके लिहिण्याचे धाडस केले. साहित्यातील दिग्गजांना त्यावेळी ते फारसे आवडले नाही. त्यांनी चेखवच्या लेखन कौशल्याची प्रशंसा केली पण त्याने लघुकथा लेखन थांबवावं असा सल्लाही दिला. त्यांच्या दृष्टीने त्याचा हा वाङ्मय प्रकार म्हणजे विटांवरची रंगरंगोटी होती, आणि लेखकाला तर विटांनी घर उभं करायचं असतं.

१८८० ते १९०४ हा चेखवच्या साहित्यनिर्मितीचा काळ म्हणून गणला जातो. चेखवने जवळजवळ पाचशे कथा लिहिल्या आहेत. त्याच्या कथांचे विषय मुख्यतः रशियन लोक, जन्मभूमी आणि निसर्गवर्णनं असे सर्वसामान्य माणसांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित असे होते.

चेखवच्या गद्य वाङ्मयात आपल्याला त्या काळात प्रत्यक्ष जगणाऱ्या अशा जवळजवळ आठ हजार व्यक्तिरेखा पाहायला मिळतात. त्या सर्वच्या सर्व त्यावेळच्या रशियन समाजजीवनातील वेगवेगळ्या स्तरातील लोकांचे प्रतिनिधित्व करतात. त्यातील प्रत्येक जण आपआपल्या गतानुगतिक, खडतर, एकसुरी जीवनाशी संघर्ष करीत असताना दिसतो. तरीपण सरकारी कायदेकानू, पिढ्यान् पिढ्या चालत आलेली वडीलधाऱ्यांची सनातनी वृत्ती आणि चर्चची लोकांवर असलेली नैतिक बंधनं या सर्व गोष्टींची जनमानसावरील पकड हळूहळू ढिली पडू

लागली होती. अशा संक्रमण काळात लोकांच्या मनात उद्याचा दिवस कसा उजाडेल ह्या विषयी संभ्रम निर्माण झाला होता.

अन्तोन चेखव हा लघुकथा ह्या वाङ्मयप्रकाराचा जनक मानला जातो. ह्या त्याच्या नवीन लेखन पद्धतीमुळे वाचकाला स्वत:भोवती घडणाऱ्या घटनांचा धावता आढावा घेता येऊ लागला. तसेच समाजजीवनाचं संपूर्ण चित्र त्याच्या डोळ्यांसमोर साकारलं गेलं. सर्वसामान्य माणसाचं धोपटमार्गी जीवन, त्यातील चढउतार, गुंतागुंत हे पण कथाविषय होऊ शकतात हे चेखवच्या दिव्य दृष्टीला सर्वप्रथम जाणवलं. त्याने आपल्या लिखाणात माणसाच्या बाह्य रूपाऐवजी त्याच्या वृत्तीचे वर्णन केले आहे. त्याच्या कथांमध्ये सर्व तऱ्हेची माणसे समाविष्ट झाली आहेत. फक्त व्यक्तीऐवजी समुदाय, चेहऱ्याऐवजी त्यावरील भाव आणि ‘मी’ऐवजी ‘आम्ही’ अशा पद्धतीने.

चेखवने आपल्या सभोवती वावरणाऱ्या वेगवेगळ्या तऱ्हेच्या माणसांचं नुसतं वर्णन केलं आहे असे नाही तर त्यांची मानसिक घडण, आत्मशोध आणि मनोव्यापार ह्यांचा वेध घेतला आहे. त्याच्या गोष्टींतील बहुतांशी माणसे अगदीच कवडीमोल, निष्क्रीय अशी नाहीत, ती सक्षम आणि कणखर मनाची असूनही कुठल्या ना कुठल्यातरी बंधनात आणि गुलामीत अडकलेली आणि अनामिक भीतीच्या सावटीत वावरताना दिसतात.

चेखवच्या एका समकालीन लेखकाने चेखवविषयी असे लिहून ठेवले आहे :

‘जगाच्या नकाशावर जर एखाद्या अद्‌भुत घटनेमुळे रशियाचे नामोनिशाण राहिले नाही तर चेखवच्या कथांच्या आधारे रशियातील त्या काळच्या सामाजिक जीवनाचे हुबेहूब चित्रण नव्याने सहज करता येईल.’

x x

चेखवच्या मूळकथा २ पानांपासून २० ते २५ पानांपर्यंत लहान मोठ्या अशा आहेत. मी मात्र वाचकांची उत्सुकता टिकवण्यासाठी मध्यम आकारमानाच्या अशाच कथा सादर केल्या आहेत. ह्यातील बहुतेक कथा चेखवच्या काळातील समाजाच्या वेगवेगळ्या स्तरातील लोकांचं आणि त्यांच्या जीवनाचं प्रतिनिधित्व करतात. मग त्यातील एकादी श्रीमंत जमीनदारीण असेल नाहीतर कलाकार असेल. चेखवच्या बहुतेक कथा रशियन समाज, त्याची मातृभूमी आणि तिथला निसर्ग ह्या तीन मूलभूत गोष्टींना प्राधान्य देऊन बेतलेल्या आहेत. ह्या पुस्तकात पण

अशाच प्रकारच्या गोष्टी वाचायला मिळतील. वाचकांना ह्या कथांकडून शहरी आणि ग्रामीण या दोन्हीही जीवनांची तोंडओळख व्हावी असा माझा हेतू आहे. ह्या कथासंग्रहातील बहुतेक कथा चेखव प्रतिथयश लेखक म्हणून मान्यता पावल्या नंतरच्या आहेत.

रशियामध्ये १९१७ पर्यंत झारची जुलमी एकाधिकारशाही होती. साधारणत: समाज दोन ठळक भागात विभागला गेला होता. सरदार, जमीनदारांचा उच्चभ्रू वर्ग आणि त्यांच्या तैनातीत असलेला सेवक वर्ग आणि शेतावरील वेठबिगार. अन्तोन चेखवचे आजोबा जमीनदाराच्या शेतावर कुटुंबासह आयुष्यभर गुलामी पत्करलेले असे वेठबिगारच होते. त्यामुळे गुलामगिरीचं जीवन म्हणजे काय हे त्याला पुसटसं आठवत होतं आणि त्याने मोठेपणी वरचेवर ऐकलं पण होतं. त्यावेळी सरदार, जमीनदारांना सार्वभौम अधिकार होते. त्यांच्या वाड्यातील सेवक-सेविका सुद्धा त्यांनी आपल्या वतनदारीतील व खेड्यांमधून उचलून आणलेले असेच असावयाचे. मालक मंडळींपुढे लांगूल चालन करणाऱ्यांना बढती, सवलती मिळत असत. त्यामुळे हे लोक खाऊन पिऊन उन्मत्त, उर्मट बनायचे. आणि उघडच आहे की त्यांच्या हाताखालच्या लोकांचा छळ करायचे. हे सरदार दरकदार म्हणजे छोटे छोटे राजेच! त्यांच्या राज्यातील गावप्रमुख, धर्मोपदेशक, पोलीस अधिकारी, डॉक्टर, शिक्षक सगळ्या सगळ्यांना त्यांच्यावर तालावर नाचावे लागे. दुसऱ्या कुणी चुगली केली तर त्यांची नोकरीतून हकालपट्टी केली जाई. उच्चभ्रू समाजातील मुलांपैकी काही लेखक होते. पण जुलमी राजवटी विरुद्ध कुणीही बंड पुकारले, विरोध दर्शवला, लोकजागृतीसाठी लेखणी हातात घेतली तर त्यांची सैबेरियात रवानगी होई. त्यामुळे सर्वसाधारण माणसं भीत भीत, गळचेपी सोसत जगत असायची. मला वाटतं झारशाहीतील रशिया आणि ब्रिटिश सत्तेखालील स्वातंत्र्य प्राप्तीपूर्वीच्या भारतामधील देशपरिस्थितीत खूपच साम्य आहे. आपल्याकडे पण स्वातंत्र्यवीर सावरकरांसारख्या क्रांतीकारकांना जन्मठेप काळेपाण्याची शिक्षा होत असे. लोकमान्य टिळकांसारख्या विचारवंताला सरकारविरुद्ध लेखन आणि भाषण केल्याबद्दल मंडालेला तुरुंगवास भोगावा लागत असे.

वरील पार्श्वभूमीवर 'राणीसरकार' ह्या कथेतील जमीनदारीण वेरा गवरीलवना आणि कारण न देता नोकरीवरून बडतर्फ केलेला डॉक्टर ह्यांच्यातील संवाद हे त्यावेळच्या जनसामान्यांच्या जीवनाचं बोलकं चित्र आहे. अवमानित डॉक्टर

जेव्हा संतापाच्या भरात मालकिणीला तिच्या राज्यातील अनागोंदी कारभाराचं कटु सत्य ऐकवतो. तेव्हा राणीला वाटतं की हा मनुष्य त्याच्या हातातील टोपीनं तिच्या डोक्यावर फटके मारतोय. पण हाच मनुष्य दुसऱ्या दिवशी राणीची माफी मागतो, राणी त्याला उदार मनानं माफ करते आणि आपण बग्गीतल्या मऊ गाद्यांवर हिंदकळत नाही तर ढगांच्या हिंदोळ्यावर डोलतोय अशा कल्पनाविलासात दंग होऊन पुढच्या प्रवासाला लागते.

त्या काळीं रशिया आणि भारतात पण बरेचदा जरठ-कुमारी विवाह होत असत. गरीबाची, कधी आईवडील सुद्धा नसलेल्या पण दिसायला सुंदर मुलीचं वयाने मोठ्या, श्रीमंत, हुद्देदार अशा माणसाशी लग्न लावून दिलं जाई. अशा विवाहाला मुलीचं मन कधीच तयार नसे पण आईवडिलांवर बोज पडायला नको, धाकट्या भावंडांची दुर्दशा व्हायला नको म्हणून ती आपल्या तारुण्यसुलभ भावनांची आहुती द्यायला आणि गळ्यात धोंड बांधून घ्यायला तयार होई. आपल्याकडे तर 'शारदा' नाटकापासून प्रभातच्या 'कुंकू'पर्यंत अशी कितीतरी उदाहरणं पाहायला मिळतात. 'सेंट आन्नाचे पदक' ह्या कथेतील आन्ना किंवा 'कुंकू' सिनेमातील नीरा सारख्या मुली तरुण होत्या, कर्तबगार होत्या, गुणी होत्या. त्यांना सुसंधी मिळताच आळीचं फुलपाखरू व्हावं आणि ते हवेत स्वैर उडू लागावं किंवा चेरीसारखं हिवाळ्यात निष्पर्ण झालेलं झाड वसंत ऋतूच्या चाहुलीनं एका रात्रीत मोहोरावं, भरभरून जावं तसं सुसंधी मिळताच या तरुण युवतींमधील सुप्त गुणांना धुमारे फुटले. त्यांच्या संपूर्ण व्यक्तिमत्त्वाला वेगळीच कलाटणी मिळाली. त्यांनी मानेवरचं जोखड झुगारून टाकलं आणि आयुष्यात परत मागे वळून पाहिलंच नाही.

माणसाच्या आयुष्यात सत्य आणि सौंदर्य यांचं अतूट नातं असावं असं चेखवचं स्वप्न होतं. हा विचार त्याने काव्यात्मक शैलीत मोठ्या, कलात्मकतेने 'कुत्रेवाल्या बाईसाहेब' आणि 'पोटमजला असलेला बंगला' ह्या कथांमध्ये मांडलेला दिसतो. सौंदर्य आणि निरपेक्ष उत्कट प्रेमभावना यामध्ये गुरफटलेल्या माणसांना प्रस्थापित जगरहाटी आणि माणुसकीचा गळा घोटणारी फोल सामाजिक नैतिक मूल्ये यांच्याशी कसा सामना करावा लागतो हे ह्या दोन गोष्टींत दाखवलं आहे. ह्या दोन कथा वेगवेगळ्या परिस्थितीत जगणाऱ्या दोन प्रेमी युगुलांच्या आहेत. 'कुत्रेवाल्या बाईसाहेब' ह्या कथेतील गूरव आणि आन्ना सेरगेयेवना

अचानक एकमेकांच्या प्रेमात पडतात. स्वत:चा संसार, घरदार, समाजातील स्थान, सांपत्तिक सुस्थिती हे सर्व असूनही दोघांनाही दुहेरी जीवन जगावं लागतं. चेखवच्या म्हणण्याप्रमाणे 'स्थलांतर करणारे दोन पक्षी (नर आणि मादी) ज्यांना दोन वेगवेगळ्या पिंजऱ्यात राहणं भाग पडलंय.' ह्या गोष्टीतील एक वाक्य प्रत्येकाला विचार करायला लावणारं आहे. 'प्रत्येक माणसाच्या जीवनात महत्त्वाच्या आणि विशिष्ट आवडीच्या गोष्टी गुप्ततेच्या बुरख्याआड दडलेल्या असतात. गुप्तता ही प्रत्येक खाजगी जीवनाला पांघरूण घालत असते. कदाचित म्हणूनच सुसंस्कृत माणूस दुसऱ्याच्या खाजगी जीवनाचा उचित आदर करावा असा आग्रह धरीत असतो.'

'पोटमजला असलेला बंगला' ह्या दोन बहिणींच्या गोष्टीतील मोठी लीदा ही गरीबांसाठी काही करावं ह्या हेतूनं समाजसेवेच्या विविध उपक्रमात पूर्णत: गुंतलेली असते. अशी समाजसेवा म्हणजे तथाकथित उच्चभ्रू समाजातील स्त्रियांचा प्रतिष्ठेचा विषय असे. तिची धाकटी निरागस बहीण जेन्या ही उच्चभ्रू समाजातील चित्रकाराच्या प्रेमात पडते. हा चित्रकार लीदाच्या समाजसेवेच्या मताशी बिलकूल सहमत नसतो. केवळ ह्या एका कारणासाठी आपल्या शब्दाबाहेर नसलेल्या छोट्या बहिणीची लीदा रातोरात दूर रवानगी करते आणि त्यामुळे दोन प्रेमी जीवांची कायमची ताटातूट होते.

ह्या गोष्टीत चेखवच्या लेखनातलं आणखी एक वैशिष्ट्य पहायला मिळत. समाजसेवेच्या दोन वेगवेगळ्या विचारधारांचं सांगोपांग वर्णन दोन सुशिक्षित व्यक्तींच्या माध्यमातून जसंच्या तसं लोकांपुढे ठेवलं आहे. पण स्वत:ची टीका टिप्पणी लेखकाने कुठेही केलेली नाही.

'दुशेच्का' ह्या कथेत एका साध्या भोळ्या, निर्मळ मनाच्या, सर्वांवर निर्व्याज प्रेम करणाऱ्या अशा समर्पित स्त्रीचं वाचकांच्या मनाला भावणारं असं व्यक्तिचित्रण आहे. दुशेच्कासारख्या कितीतरी स्त्रिया आपल्या भोवताली पहायला मिळतात. त्या दुसऱ्या व्यक्तीशी इतक्या समरस झालेल्या असतात की त्यांना शेवटी स्वत:चे असे मतच राहत नाही. 'पानी तेरा रंग कैसा! जिसमे मिलाया वैसा' ह्या म्हणीप्रमाणे चेखवने तिच्या मनाचे, तिच्यात परिस्थितीनुरूप होणाऱ्या बदलांचे वर्णन मोठ्या कौशल्याने केले आहे. पण तिच्या रूपाविषयीचे वर्णन– तिची स्वच्छ नजर, गुलाबी गाल, मानेवरची जन्मखूण वगैरे वगैरे केवळ जाता

जाता अती औपचारिकपणे केले आहे. प्रसिद्ध लेखक ल्येव तलस्तोयने एके ठिकाणी कबुली दिली आहे, 'मी, दस्तयेवस्की, तुर्गेनेव आणि गंचारव यांपैकी कुणालाही दुशेच्काच्या स्वभावाचं इतकं अचूक वर्णन करता आलं नसतं.'

तिचा साधा सरळ स्वभाव दाखवणारं असं तिच्याच तोंडचं एक वाक्य आहे. गुरांचा डॉक्टर तिला रागवत असतो. 'तुला ज्या गोष्टीचं ज्ञान नाही त्यासंबंधी बोलत जाऊ नकोस. मला अगदी संकोचल्यासारखं होतं.'

तेव्हा ती काकुळतीला येऊन म्हणायची, 'वलोदिच्का, मग मी कशाविषयी बोलत जाऊ?'

चेखवच्या कथा सर्वकालीन आणि सार्वत्रिक अशा असतात. ह्याचे उत्तम उदाहरण म्हणजे 'कोषात गुरफटलेला' ही कथा. जगात जिथे जिथे जुलमी राजसत्ता असते तिथे तिथे समाजात तीन तऱ्हेची माणसं पाहायला मिळतात. पहिला वर्ग म्हणजे सत्ताधाऱ्यापुढं लांगूल चालन करून आणि तोंडपुजेपणा करून स्वतःचा सर्वतोपरी फायदा करून घेणारा. दुसरा वर्ग म्हणजे आपल्या विरुद्ध कोहीतरी होईल ह्या जीवघेण्या भीतीपायी स्वतःभोवती कोष करून व त्याच्या बंधनात स्वतःला अडकवून घेणारा. ह्यात कोषात गुरफटलेल्या अध्यापकासारखी माणसं मोडतात. तिसरा वर्ग म्हणजे परिणामाची पर्वा न करता रामशास्त्री बाण्यानं स्पष्ट बोलणारी आणि सत्याचा पाठपुरावा करणारी. आजमितीलासुद्धा जगात जिथे अनिर्बंध सत्ता आहे त्या ठिकाणी ह्या तिन्ही वर्गांचे लोक पाहायला मिळतात.

ह्या कथेत चेखवने बेलीकवच्या रंगरूपाचे, शरीरयष्टीचे वर्णन केलेले नाही तर त्याचे गॉगल्स, गमबूट, डोक्यावर कायम असलेली छत्री. पेटीसारखी बंद खोली, पलंगाला कायमची मच्छरदाणी लटकलेली, बंद खिडक्या अशी मनाई करणाऱ्या, बंधन घालणाऱ्या वस्तूंची लांबच लांब यादी दिली आहे. फक्त एकदाच म्हणजे मेल्यानंतर काचेच्या शवपेटीत त्याचा चेहरा बापुडवाणा पण उल्हसित दिसत होता, अगदी साई सुट्ट्यो झाल्यासारखा. तरी सुद्धा विरोधाभास असा की त्या दिवशी पावसाचं चिन्ह दिसल्यामुळे अंत्यसंस्कारासाठी आलेल्या सर्व अध्यापक मंडळींनी गमबूट घातले होते आणि छत्र्याही बरोबर आणल्या होत्या. अध्यापकाचा एरवीचा अवतार आणि शवपेटीतल्या हसऱ्या चेहऱ्याचं वर्णन वाचत असताना हसू येतं आणि नर्म आणि खुसखुशीत विनोदाचा आभास होत असला तरी विचारांती ही संपूर्ण गोष्टच चेखवच्या उपहासगर्भित विडंबनशैलीचा

उत्कृष्ट नमुना आहे याचा प्रत्यय येतो. मला तर पुढे जाऊन असं म्हणावसं वाटतं की ह्या व्यक्तिरेखेच्या माध्यमातून चेखवने पण विनोदाच्या बुरख्याआड जाऊन सामान्य माणसाच्या जीवनाच्या शोकांतिकेचे मनाला चटका लावणारे वर्णन केले आहे.

'कशतानका' ह्या कथेत कुत्र्यासारख्या मूक प्राण्याला बोलकं करून त्याच्या मनोव्यापाराचे वर्णन केलेले आहे. ह्या कथेत लेखकाच्या सूक्ष्म अवलोकनशक्तीचे जागोजागी दर्शन घडते. मनुष्यप्राण्याविषयी मूक प्राण्यांना काय वाटत असेल ह्याचा मनाला स्पर्शून जाणारा अनुभव मिळतो. माणसाच्या चेहऱ्याकडे पाहून आनंद, दुःख, राग यासारख्या मानवी भावभावना मूक प्राणी अचूक ओळखतो. सगळ्या मानवजातीची 'कशतानका'ने दोन भागात विभागणी केली होती, मालकमंडळी आणि त्यांची गिऱ्हाईकं. पहिल्या जातीच्या माणसांना तिला मारायचा हक्क पोहोचत होता आणि दुसऱ्या तऱ्हेच्या लोकांच्या तंगड्यांचा लचका तोडण्याचा तिला अधिकार होता. केवळ वासावरून रस्त्यावरून कोण गेलंय ते तिला कळतं, बँडच्या कर्कश आवाजाचा माणसं प्रतिकार कसा करीत नाही ह्याचं आश्चर्य वाटतं. मालकाचा मुलगा दोऱ्यात मासाचा तुकडा अडकवून कशतानकाच्या घशातून आत बाहेर काढतो, तिला तंबाखू हुंगायला देतो वगैरे प्रसंग म्हणजे मनुष्यप्राणी केवळ खेळ, मजा म्हणून मूक प्राण्यांना कशा शारीरिक यातना देतो हे दाखवतात. कशतानकाच्या दृष्टिकोनातून जुन्या आणि नव्या मालकाच्या घरातील वातावरणाचं फायद्या तोट्याचं तिनं केलेले मूल्यांकन आणि कथेच्या शेवटी जुन्या मालकाकडे जाण्याचा निर्णय घेऊन मारलेली मुसंडी म्हणजे मूक प्राण्याच्या बौद्धिक हुशारीची 'आय क्यू' टेस्टच म्हणायला हवी.

x x

माझे परमपूज्य आई-वडील म्हणजे आमचे आक्का-नाना यांनी लहानपणापासून माझ्या सर्वांगीण विकासासाठी केलेले प्रयत्न आणि वेळोवेळी दिलेली शाबासकी मी कधीच विसरू शकत नाही. तेव्हा सर्वप्रथम त्यांच्या स्मृतीला विनम्र अभिवादन!

'चेखवच्या सात कथा' हा मराठी अनुवाद वाचकांपुढे ठेवताना मला फार आनंद होतोय. पण खरं तर ह्या पुस्तकाच्या श्रेयात सिंहाचा वाटा प्रसिद्ध रशियन कथालेखक अन्तोन चेखवचा आणि मराठीत अनुवाद करण्याचा खारीचा वाटा

माझा असंच म्हणायला हवं. तेव्हा प्रथम ह्या महान लेखकाचा ऋणनिर्देश करणे अगत्याचे आहे.

माझी रशियन भाषेची शिक्षिका वालेंतिना सेरगेयवना कालीनीनाने आम्हाला रशियन साहित्याची ओळख करून दिली. तिचा आणि आमचा परिचय होऊन पंचवीस वर्षं झाली आहेत. तिनं नेहमीच मला येणाऱ्या शंकांचं निरसन केलं आणि मला प्रोत्साहन दिलं त्याबद्दल तिचे आभार मानावे तेवढे थोडेच आहेत.

आमचे मित्र श्री. अनिरुद्ध कुलकर्णी यांच्याशी बोलता बोलता मी सध्या चेखवच्या कथांचा अनुवाद करतेय असं मी म्हटलं. तेव्हा चेखवच्या कथा आणि तुमचा अनुवाद असेल तर तो छापणं मला नक्कीच आवडेल असं ते म्हणाले. मग मी जोमानं कामाला लागले. तेव्हा त्यांचे आभार मानणे अगत्याचे आहे.

पुस्तकाचे सुंदर मुखपृष्ठ करणारे श्री. अशोक बोकील, मुद्रक - श्रीकांत मुद्रणालयाचे श्री. सुनील जोग, शब्दरेखा टाईपसेटर्सच्या आमच्या स्नेही सौ. रेखा कुलकर्णी, मुद्रित शोधन करणाऱ्या श्रीमती सुमती धायगुडे ह्या सर्वांनी हे पुस्तक तयार करण्यासाठी मोलाचा हातभार लावला त्याबद्दल त्या सर्वांचे मनःपूर्वक आभार.

हे पुस्तक तयार करीत असताना मला लागणारे संदर्भ पुरवल्याबद्दल माझे एके काळचे विद्यार्थी आणि पुणे विद्यापीठातील रशियन भाषेचे प्राध्यापक डॉ. चैतन्य ठकार यांची मी आभारी आहे.

पुस्तकातील कथांसाठीची चित्रे अगदी थोड्या वेळात उपलब्ध करून देणारे आमचे मित्र श्री. रामेश्वर दयाळ आणि सौ. वृन्दा आणि श्री. आशिष कुवळेकर ह्या सर्वांचे मनःपूर्वक आभार.

घरच्या माणसांचा ऋणनिर्देश औपचारिक वाटला तरी तो आवश्यक पण आहे. माझे पती श्री. माधव कानिटकर स्वतः इंजिनिअर असले तरी वेगवेगळ्या भाषा शिकण्याचा त्यांना छंद आहे. त्यांचा रशियन भाषेचा पण अभ्यास असल्यामुळे पावलोपावली त्यांचा घेतलेला सल्ला अनमोल आहे.

सौ. सुमती कानिटकर

उमा बंगला २१७/६ गणेशवाडी,
फर्ग्युसन कॉलेज रस्ता,
डेक्कन जिमखाना, पुणे ४११००४

अनुक्रमणिका

१.	राणीसरकार	१
२.	सेंट आन्नाचे पदक	१८
३.	पोटमजला असलेला बंगला	३७
४.	कोषात गुरफटलेला	६१
५.	कुत्रेवाल्या बाईसाहेब	८०
६.	दुशेच्का	१०४
७.	कशतानका	१२२
	टीपा	१४९
	चेखव : जीवनरेखा	१५०

: १ :

राणीसरकार

'अेन्' चर्चच्या पुरुषांच्या पाठशाळेचा 'लाल दरवाजा' म्हणून प्रसिद्ध असलेल्या टोलेजंग दरवाज्यातून उमदे, खाऊन पिऊन मस्त असे घोडे जुंपलेली घोडागाडी आत शिरली. पाठशाळेतील धर्मोपदेशक आणि नवागत घोळक्याघोळक्याने स्वागत कक्षाजवळ उभे होते. लांबूनच घोडे आणि गाडीवान यांच्याकडे पाहिल्यावर ह्या गाडीत सर्वपरिचित लाडकी राणी 'वेरा गावरीलोवना' बसलेली असणार हे सर्वांनी ताबडतोब ताडलं.

दरबारी पोशाखातल्या म्हाताऱ्याने गाडीवानाजवळच्या आपल्या जागेवरून खाली उडी मारली आणि राणीसाहेबांना गाडीतून खाली उतरायला हात दिला. राणीसाहेबांनी आपला काळा जाळीदार बुरखा वर केला आणि हळूहळू धर्मोपदेशकांजवळ येऊन त्यांना अभिवादन केलं. नंतर मान वळवून नवागतांकडे प्रेमळ कटाक्ष टाकला आणि मगच त्या आपल्या खोलीकडे वळल्या.

'काय, आपल्या राणीची खूप आठवण येत होती ना?' तिचं सामान घेऊन येणाऱ्या धर्मोपदेशकांना राणी म्हणाली, 'गेला सबंध महिना मला तुमच्याकडे यायलाच झालं नाही. पण ही आता आले आहे बघा. डोळे भरून पाहून घ्या आपल्या राणीला. बिशपबाबा कुठे आहेत? मला तर त्यांना केव्हा भेटीन असं झालंय. प्रेमळ, किती प्रेमळ आहेत ते! असे बिशप आपल्याला लाभले म्हणून त्यांचा अभिमानच वाटायला हवा सर्वांना.'

बिशप जेव्हा राणीच्या खोलीत आले तेव्हा तिला अतिशय आनंद झाला. आपल्या दोन्ही हाताचा क्रॉस करून त्यांचा आशीर्वाद घेण्यासाठी ती त्यांच्याजवळ गेली.

'नाही, नाही. मला तुमच्या हाताचे चुंबन घेऊ द्या.' ती म्हणाली. तिने त्यांचा हात हातात घेतला आणि भराभरा तीन वेळा उत्कटतेने त्यांच्या हाताचे चुंबन

घेतले. ‘पूज्य बाबा, तुमची आणि माझी अखेर भेट झाली, ह्याचा मला केवढा आनंद झालाय म्हणून सांगू! तुम्ही तुमच्या राणीला विसरला ना? मला मात्र तुमच्या ह्या पाठशाळेत घालवलेला एकेक क्षण भरभरून सुख देऊन जातो. किती छान आहे इथं सगळं! पूज्य बाबा, निरर्थक आणि व्यर्थ अशा संसारी जीवनापासून दूर इथं देवाच्या दारी काहीतरी खास आकर्षक गोष्ट आहे, जी माझ्या हृदयाला स्पर्शून जाते. तो अनुभव शब्दांत वर्णन करायला मात्र मी असमर्थ आहे.’

राणीचे गाल लालबुंद झाले आणि डोळ्यांत अश्रू तरळले. ती भावनावेगाने अखंड बोलत होती. दिसायला सर्वसाधारण, लाजऱ्या संकोची स्वभावाचा, सत्तर वर्षांचा म्हातारा बिशप गप्पगप्पच होता. फक्त मधूनमधून एखाद्या आज्ञाधारक सैनिकाप्रमाणे तुटकपणे बोलायचा —

‘अगदी बरोबर, होय बाईसाहेब’... ‘ऐकतोय राणीसाहेब’ ‘समजलं बाईसाहेब’...

‘इथं बरेच दिवस मुक्काम करून आम्हाला उपकृत करणार ना?’ त्यानं विचारलं.

‘आजची रात्र मी इथे राहणार आहे, उद्या क्लावद्या निकोलायेवनाकडे जाण्याचा बेत आहे. खूप दिवसांत तिची भेट झाली नाहीये. परवा परत इथे येऊ आणि मग मात्र तीन-चार दिवस इथंच राहू. पूज्य बाबा, इथं मनसोक्त विश्रांती घ्यायचा विचार आहे आमचा...’

‘अेन्’ पाठशाळेत मुक्काम करायला राणीला फार आवडायचं. गेली दोन वर्षं विश्रांतीसाठी तिने हीच जागा निवडली होती. उन्हाळ्याच्या प्रत्येक महिन्यात दोन-तीन दिवस, कधीकधी तर आठवडाभरसुद्धा तिचा इथे मुक्काम होता. भित्रा नवागत विद्यार्थीगण, शांत वातावरण, कमी उंचीच्या तक्तपोशी, सायप्रसच्या झाडाचा दरवळलेला सुगंध, साधंसुधं जेवण, खिडक्यांचे स्वस्त कापडाचे पडदे, ह्या सगळ्याच गोष्टी तिच्या मनाला हेलावून टाकत नि त्याचबरोबर विचारप्रवृत्तही करत. तिथल्या शांत वातावरणात अर्धा तास घालवायला मिळाला तरी तिच्या दृष्टीने तो पुरेसा होता. कारण तिला आत्ताच असे वाटायला लागले होते, की ती पण भित्री, लाजरीबुजरी झाली आहे. तिच्या सर्वांगाला सायप्रसचा सुवास यायला लागलाय. तिचा भूतकाळ दूर दूर गेलाय आणि आपले महत्त्व गमावून बसलाय.

तिच्या मनात विचार आला की आपण आत्ता कुठे तिशीला पोहोचलो असलो तरीही म्हाताऱ्या बिशपात आणि आपल्यात खूपच साम्य आहे. आपला जन्म केवळ धनदौलत, भौतिक जगातील उत्तमोत्तम गोष्टी, आणि सर्वांचे प्रेम, यांचा सदासर्वकाळ भरभरून उपभोग घेण्यासाठी नसून संथ, संसारी जीवनापासून अलिप्त संध्यासमयासारखे शांत जीवन व्यतीत करण्यासाठीही आहे.

अशा काहीतरी घटना घडायच्या की, काळोख्या खिडकीत बसून देवाच्या प्रार्थनेत गढून गेलेल्या उपासकाला अकस्मात सूर्यकिरण दिसायचा किंवा त्याच्या कोनाड्याच्या खिडकीवर एखादा पक्षी बसायचा आणि आपले गाणे सुरू करायचा आणि तो गंभीर उपासक नकळत हसायचा. त्याच्या पापभावनेने जड झालेल्या अंत:करणातून, दगडाखालून अकस्मात निघणाऱ्या झऱ्याप्रमाणे, शांत, निर्मळ आनंद उफाळून यायचा. राणीला असं वाटायचं की तो सूर्यकिरण, तो पक्षी ज्या प्रकारचं सुख-समाधान इथं बाहेरून घेऊन येतात, तसंच सुख-समाधान तीही इकडे येताना आपल्याबरोबर घेऊन आली आहे. तिचं सौहार्दपूर्ण आनंदी हसणं, तिचा मार्दवशील दृष्टिक्षेप, तिचा आवाज, विनोदी स्वभाव इतकंच नाही तर तिची छोटीशी मूर्ती, सुंदर बांधा, साधे काळे कपडे या सर्वच दृष्टीनं ती परिपूर्ण अशीच होती. आपल्या येण्याने तिनं इथल्या साध्याभोळ्या श्रद्धाळू, पापभीरू लोकांमध्ये नक्कीच आनंदाची, सोज्वळतेची भावना स्फुल्लिंगित केली असणार. तिच्याकडे पाहिल्यावर प्रत्येकाला वाटत असणार की 'देवानंच हा दूत पाठवला आहे.' इथला प्रत्येकजण नकळत असाच विचार करतोय, ह्याची जेव्हा तिला प्रत्यक्ष अनुभूती यायची, तेव्हा ती अधिकच प्रेमळपणे हसायची आणि स्वत:ला एखाद्या पक्ष्याच्या निरागस पिल्लाप्रमाणे भासवायचा प्रयत्न करायची.

थोड्या विसाव्यानंतर चहा पिऊन झाल्यावर ती फेरफटका मारायला बाहेर पडली. ह्या वेळेपर्यंत सूर्य मावळला होता. पाठशाळेच्या बागेतील मॅग्नोनेटला नुकतंच पाणी घालण्यात आलं होतं. त्यातून निघणारे सुवासिक बाष्प राणीच्या सर्वांगावर फवारत होतं. चर्चमधून पुरुषी आवाजातले गाण्याचे शांत स्वर तिच्या कानावर पडत होते. त्यांच्यात गोडी होती आणि कारुण्यपण डोकावत होतं. चर्चमध्ये संध्याकाळची प्रार्थना चालली होती. सर्वदूर नीरव शांतता पसरली होती. अंधाऱ्या खिडक्यांत दिव्यांच्या छोट्या छोट्या ज्योती लवलवत होत्या. सावल्या

पसरल्या होत्या. पोर्चमध्ये ठेवलेल्या ख्रिस्ताच्या तसबिरीजवळच्या दानपेटीपाशी वृद्ध धर्मगुरू बसले होते. ह्या सर्व वातावरणामुळे का कोण जाणे राणीला एकदम रडूच आलं.

फाटकाच्या पलीकडे, भिंत आणि बिर्योझाच्या झाडांच्यामधून जाणाऱ्या वाटेवर, बाकं ठेवली होती. तिथे मात्र संध्याकाळ झालेली स्पष्ट दिसत होती. आणि हवा भराभर कुंद होत चालली होती ... राणी त्या वाटेवरून जाताजाता एका बाकावर बसली आणि आपल्याच विचारात गढून गेली.

राणीच्या मनात तऱ्हेतऱ्हेचे विचार येत होते. ह्या चर्चमधल्या उन्हाळ्यातील संध्येप्रमाणे शांत, उदात्त अशा वातावरणात सर्व आयुष्य घालवायला मिळालं असतं. व्यसनी राजा, एवढी मोठी राजप्रतिष्ठा, दररोज बेजार करणारे सावकार, इतकंच काय, दास-दासींच्या चेहऱ्यावर दिसणारी बेदरकारी, ह्या सर्व गोष्टी आपण विसरू शकलो असतो तर किती बरं झालं असतं!

सबंध आयुष्यभर इथल्या बाकावर असंच बसून बिर्योझाच्या झाडांच्या बुंध्यामधून डोंगराखालील चलत्चित्रे पाहता आली असती तर काय मजा आली असती. उदा., खाली डोंगराच्या पायथ्याशी संध्याकाळचं धुकं पुंजक्यापुंजक्यांनी सैरावैरा पळतंय. दूरदूरच्या, जंगलावरच्या बुरख्याप्रमाणे दिसणाऱ्या काळ्या ढगांवरून डोमकावळे रात्रीच्या आश्रयाला निघाले आहेत, दोन नवागत– एक अबलख घोड्यावरून चाललेला, दुसरा पायी चाललेला– घोड्यांना रात्रीच्या मुक्कामाकडे वळवून नेताना कामातून सुटका झाली म्हणून लहान मुलांप्रमाणे एकमेकांच्या खोड्या काढत चालले आहेत वगैरे वगैरे.

स्तब्ध पडलेल्या हवेत त्या मुलांचे किनरे आवाज कानावर पडत होते आणि त्यांचा शब्दन्‌शब्द स्पष्टपणे ध्वनित होत होता. इथे बसायचं आणि चिडीचूप शांततेचा अनुभव घ्यायचा ह्यासारखे सुख ते काय असणार? घटकेत वारा वाहायला लागतो आणि बिर्योझांच्या शेंड्यांना स्पर्शून जातोय. खारूताई मागच्या वर्षीच्या गळलेल्या पानांवरून सळसळ करतेय, भिंतीच्या पलीकडे चर्चची घंटा चाराचे टोले देते ... अगदी निश्चल बसायचं, कानावर पडेल ते ऐकायचं आणि विचार करायचा. नुसता विचार अन् विचार ...

तिच्या जवळून एक म्हातारी पाठीवर टोपली घेऊन चालली होती. राणीच्या

मनात विचार आला, ह्या म्हातारीला थांबवून प्रेमाच्या आणि सुखदु:खाच्या चार गोष्टी बोललो असतो. तिला थोडीफार मदत केली असती तर किती बरं झालं असतं. नाही... पण म्हातारीनं एकदासुद्धा वर मान करून पाहिलं नाही. कोपऱ्यावर वळून ती सरळ पुढे गेली.

थोड्या वेळानं त्याच वाटेवरून एक उंच, दाढी पांढरी झालेला, गवतीटोपी घातलेला मनुष्य दृष्टीस पडला. राणीच्या समोर आल्यावर त्यानं टोपी काढली आणि तिला वाकून अभिवादन केलं. त्याच्या मोठ्या टकलावरून आणि टोकदार नाकावरून राणीनं ओळखलं की हा मनुष्य म्हणजे पाच एक वर्षांपूर्वी 'दुबोवकी' मध्ये तिच्याकडे नोकरी करणारा डॉ. मिखाईल इवानविच आहे. मग तिला आठवलं की कोणीतरी मागल्या वर्षी तिला म्हणालं होतं, की ह्या डॉक्टरची बायको वारली. म्हणून तिला वाटलं की त्याची विचारपूस करावी आणि सांत्वन पण करावं.

'डॉक्टर, तुम्ही मला ओळखलं नाही बहुतेक.' त्याचं हसून स्वागत करत तिनं विचारलं.

'नाही, ओळखलं की राणीसाहेब' पुन्हा एकदा टोपी काढून अभिवादन करत डॉक्टर म्हणाला.

'मग ठीक आहे. आभारी आहे मी तुमची. नाही तर मी समजले की तुम्ही तुमच्या राणीला विसरला की काय? म्हणतात ना की माणसांना फक्त स्वत:च्या शत्रूची आठवण राहते आणि आप्तजनांचा विसर पडतो. तुम्ही इकडे प्रार्थनेसाठी आला होतात का?'

'माझा दर शनिवारी न चुकता रात्रीचा मुक्काम असतो इथे. इथेच मी निजतो.'

'मग कसं काय चाललंय तुमचं? उसासा टाकीत राणीनं विचारलं. मी ऐकलं होतं की तुमच्या पत्नीला देवाज्ञा झाली. काय दैवदुर्विलास नाही?'

'होय राणीसाहेब. माझ्यावर हा नशिबाचा मोठाच घाला होता म्हणायचा.'

'काय करायचं बाबा. आपल्या वाट्याला जे जे दु:ख येईल ते ते आपण मुकाट्यानं सहन करायला हवं. परमेश्वराच्या इच्छेशिवाय माणसाच्या डोक्यावरचा केससुद्धा गळू शकत नाही.'

'खरंय राणीसाहेब.'

राणीच्या त्या हळुवार प्रेमळ हसण्याला आणि तिच्या त्या उसाशांना डॉक्टरचा अगदी थंड, कोरडा प्रतिसाद मिळाला होता. आणि ' खरंय राणीसाहेब ' म्हणताना त्याच्या चेहऱ्यावरचे भाव पण थंड व शुष्कच होते.

आता ह्या विषयावर आणखी काय बोलायचं तरी ? राणीनं विचार केला.

' बरेच दिवस झाले नाही आपल्याला एकमेकांना भेटून ?' ती म्हणाली. पाच वर्षं ! ह्या एवढ्या काळात पुलाखालून किती पाणी वाहून गेलं असेल आणि किती तऱ्हेचे बदल झाले असतील. नुसता विचार आला तरी भीती वाटते. तुम्हाला माहीत आहे ना मी आता लग्न केलंय. सरदारणीची राणी झालेय. नवऱ्याला घटस्फोट देण्यात पण यशस्वी झालेय.

' हो, मी ऐकलंय.'

' देवानं मला कोणकोणत्या दिव्यांतून जायला लावलंय ! तुम्ही ऐकलंच असणार की मी संपूर्ण उद्ध्वस्त झालेय. माझ्या कमनशिबी नवऱ्याचं देणं फेडण्यासाठी मला ' दुबोवकी ', ' किर्याकोवा ' आणि ' सोफीनो 'च्या इस्टेटींवर पाणी सोडायला लागलं. आता माझ्याकडे फक्त ' वारानवा ' आणि ' मिखाल्त्सेवा ' ह्या इस्टेटी शिल्लक राहिल्या आहेत. पाठीमागे वळून पाहिलं ना की भयंकर मनस्ताप होतो. किती तऱ्हेचे बदल पाह्यले, हरतऱ्हेची दु:खं झेलली आणि चुकांची तर गणतीच नाही !'

' खरंच, चुका खूपच झाल्या राणीसाहेब !'

राणी जरा गोंधळली. तिला तिच्या चुकांची पूर्ण जाणीव होती. आणि तिला आणि तिलाच एकटीला त्यांच्याविषयी संपूर्ण माहिती होती. फक्त ती त्याविषयी विचार करू शकत होती आणि मतपण देऊ शकत होती. तिला राहवलं नाही आणि म्हणून तिनं विचारलं –

' तुम्ही कुठल्या चुकांसंबंधी म्हणताय ?'

' तुम्ही त्या विसरू शकत नाही, ह्याचाच अर्थ तुम्ही त्या जाणता ' – डॉक्टर उपरोधिक हसत उत्तरला. ' काय बोलणार तरी काय त्याविषयी !'

' नाही, डॉक्टर सांगा. मी आपली आभारी होईन ! कृपा करून माझ्याशी औपचारिकपणे वागू नका. मला सत्य ऐकायला आवडतं.'

' तुमच्या बाबतीत निवाडा करायला कोणी न्यायाधीश नाही राणीसाहेब मी.'

'न्यायाधीश नाही ? कशी भाषा वापरता आहात तुम्ही माझ्याशी बोलताना ? ह्याचा अर्थच असा की त्याविषयी तुम्ही थोडंफार जाणता.'

'सांगा, सांगा काय ते !'

'तुमची इच्छाच असेल तर मला सांगायची परवानगी द्या. फक्त दुर्दैवानं माझी जीभ जरा जड आहे त्यामुळे माझं बोलणं नेहमी समजेलच असं नाही.'

डॉक्टरनं थोडा विचार केला आणि बोलायला सुरुवात केली.

'चुका अगणित आहेत. पण माझ्या दृष्टीनं सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे सगळीकडे, नाही सगळ्यांशी वागण्याची तुमची पद्धतच चुकीची आहे. बघा मी म्हटलं ना, मला जे बोलायचं असतं ते नीट सांगता येत नाही म्हणून ? तर काय म्हणत होतो मी, सगळ्यांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे तुमच्या एकूण वागण्यात प्रेमाचा लवलेशही दिसत नाही कुठे, आणि लोकांविषयीचा तिरस्कार मात्र जागोजागी जाणवतो. ह्या द्वेषभावनेच्या पायावरच तुमची जीवनपद्धती बांधली गेली आहे. मनुष्यप्राण्याच्या आवाजाचा, चेहऱ्यांचा, डोक्याच्या मागल्या भागाचा, पावलांचा सर्वासर्वांचा तिरस्कार ! इथल्या सगळ्या दरवाज्यांपाशी, जिन्यावर गणवेष चढवलेले, खाऊन पिऊन मस्त, उर्मट, आळशी भालदार चोपदार उभे असतात आणि त्यांचं काम हेच की साध्या, अव्यवस्थित कपड्यातल्या माणसांना घरात प्रवेश करू द्यायचा नाही. बाहेरच्या खोलीत उंच उंच खुर्च्या ठेवलेल्या आहेत त्या अशासाठी की समारंभाच्या वेळी किंवा बॉल डान्सच्या वेळी नोकरचाकरांच्या डोक्याचे छप्पे वॉलपेपरवर पडू नयेत ! सगळ्या खोल्यांमधून जाडजाड गालिचे पसरलेले आहेत. त्यामुळे माणसांच्या पायांचा आवाज होत नाही. आत येणाऱ्या प्रत्येकाला आधीच कल्पना दिलेली असते की त्यानं हळू आवाजात आणि मुद्देसूद असंच बोलावं. म्हणजे ऐकणाऱ्याच्या कल्पनाशक्तीवर आणि आत्मबलावर विपरीत परिणाम होणार नाही. तुमच्या दिवाणखान्यात भेटायला आलेल्या माणसांशी हस्तांदोलन करीत नाहीत की कोणी त्यांना बसायची विनंती करीत नाहीत. जसं आत्ता आपण भेटलो तेव्हा तुम्ही आपला हात पुढे केला नाही आणि बसायला पण सांगितलं नाही ... '

'तुमची इच्छा असेल तर हा करते मी हात पुढे !' आपला हात पुढे करत राणी हसत म्हणाली – 'असल्या फालतू गोष्टींसाठी एवढं रागावणं बरोबर नाही हं ...'

'मी कुठं रागावलोय ? ' डॉक्टर हसला पण त्याच क्षणी लाल लाल झाला नुसता. त्यानं आपली टोपी काढून जोरजोरात हालवली आणि पोटतिडकीनं म्हणाला,

'स्पष्टपणे सांगायचं तर मी कितीतरी दिवसांपासून तुम्हाला हे सर्व सांगायची संधीच शोधत होतो... तर मला म्हणायचंय तुम्ही सगळ्या माणसांकडे नेपोलियनच्या रुबाबात पाहता. तो माणसांकडे नेहमी बंदुकीचं भक्ष्य म्हणून पाहायचा.

नेपोलियनच्या पुढे काही उद्दिष्ट तरी होतं पण तिरस्काराशिवाय तुम्ही काहीच जाणत नाही.'

'मला माणसांविषयी तिरस्कार ? ' आश्चर्यानं खांदे उडवत राणी म्हणाली– 'मला ! '

'हो, हो तुम्हाला ! तुम्हाला प्रत्यक्ष उदाहरण हवंय का ? ऐका तर मग ! – 'मिखाल्त्सेवा 'मध्ये पूर्वी तुमच्या नोकरीत असलेले तीन आचारी तुमच्या मेहेरबानीवर दिवस कंठताहेत. तुमच्या स्वयंपाकघरातील भट्ट्यांच्या धगीमुळेच ते आंधळे झाले आहेत. तुमच्या मालकीच्या हजारो एकर जमिनीमधून निघणारं जे जे सकस, पोषक, चांगलं-चुंगलं असतं ते सर्व तुम्ही आणि तुमच्यावर पोसणाऱ्या बांडगुळांनी आपल्या ताब्यात घेतलं आणि तुमचे ते डगलेवाले, नोकर-चाकर, गाडीवान यांना खायला घातलं. हे सर्व दोन पायांचे प्राणी तुमच्या आधिपत्याखाली वाढले, भरपेट खाल्ले, प्यायले, उर्मट बनले आणि आपलं मूळ रूप आणि इतरांबरोबर असलेले साम्य गमावून बसले... तरुण डॉक्टर, शेतीतज्ज्ञ, शिक्षकवर्ग थोडक्यात म्हणजे बुद्धिजीवी वर्गाची त्यांच्या कामातून सुट्टी केलीत आणि पोटाची खळगी भरण्यासाठी कठपुतळ्याप्रमाणे, लोकांना फसवण्यासाठी त्यांना हरप्रकारे नाचवलंत. हे करताना कुठल्याही सभ्य माणसाला शरम वाटते ! कुठलाही तरुण घ्या, तो तीन वर्षं देखील काम करत नाही की थोड्याच दिवसांत तोंडपुज्या, कंजूष, थापाड्या बनतो... हे चांगलं म्हणायचं ? तुमचं राज्य चालवणारे कारभारी आणि नीच गुप्तहेर, तुमचे सगळे खुषमस्करे रात्रंदिवस तुमची मर्जी सांभाळण्यासाठी केलेले प्रत्येक काम हजारोपट वाढवून सांगतात. रशियन म्हणीप्रमाणे एकाच बैलाची खाल तीनदा सोलल्याचं

भासवतात. क्षमा करा, माझं बोलणं मुद्देसूद, सुसूत्र होत नाहीये. पण ते जाऊ दे! तुमच्या राज्यात साध्याभोळ्या रांगड्या माणसाला नागरिक म्हणून मानावयास तयार नाही कोणी. इतकंच काय राजे, सरदार, धर्मगुरू यांनासुद्धा शोभेच्या वस्तू म्हणून समजलं जातं. जिवंत माणसं म्हणून नाही! सगळ्यांत महत्त्वाचे... सगळ्यांत महत्त्वाची गोष्ट जी मला अतिशय बेचैन करते, ती म्हणजे लाखो रुपयांची इस्टेट तुमच्याजवळ असूनही लोकांच्या कल्याणासाठी काहीही प्रयत्न केले जात नाहीत. अगदी कवडीचेही नाहीत!'

राणी आश्चर्यचकित होऊन, घाबरून आणि अपमानित होऊन जागीच खिळल्यासारखी बसून राहिली. तिला काय बोलावं आणि स्वत:ला कसं सावरावं तेच कळेना. ह्या पूर्वी तिच्याशी असल्या भाषेत बोलायचं धाडस कुणीच केलं नव्हतं. डॉक्टरचा अप्रिय, संतापलेला आवाज आणि तोतऱ्या अडखळत बोलण्यानं तिच्या कानात आणि डोक्यात घणाघात होत होता. मग तिला असं वाटायला लागलं की हातवारे करणारा तो डॉक्टर त्याच्या टोपीनं तिच्या डोक्यावर फटके मारीत आहे.

'हे खरं नाही.' शांतपणे आणि अजीजीच्या स्वरात ती म्हणाली. 'मी लोकांसाठी किती चांगल्या गोष्टी केल्या आहेत ते तुम्हीसुद्धा जाणता!'

'हो तर, अगदी शंभर टक्के बरोबर आहे ते!' डॉक्टर ओरडला. 'म्हणजे तुम्ही अजून तुमचा तो दानशूरपणा महत्त्वाचा आणि लोकोपयोगी समजता? कठपुतळीचा खेळ नाही वाटत तुम्हाला तो? खरं तर तो दानशूरपणा म्हणजे अथपासून इतिपर्यंत हास्यास्पद आहे. सर्व लोकांच्या भावनांशी चाललेला खेळ आहे नुसता. दुधखुळी बालकं आणि अशिक्षित बायकांना सुद्धा कळून येणारा. तुम्ही म्हणता ते घटकाभर खरं मानलं तर मग त्याचं काय? त्या अनाथ, निराधार लोकांना आश्रय देणाऱ्या वृद्धाश्रमाचं? तिथं मला मुख्य डॉक्टर म्हणून काम करायला लावलंत आणि तुम्ही झालात त्याच्या मानद पालक. वाहवा, खरंच कमालीचं सुंदर घर बांधलं होतं ते. इमारती लाकडांच्या पट्ट्यांची फरशी होती तिथली. छपरावर हवादर्शक कोंबडा बसवला होता. खेड्यातले दहा म्हातारे गोळा करून आणले. त्यांना फ्लॅनेलची ब्लँकेट्स दिली होती पांघरायला. अंथरुणावर हॉलंडच्या चादरी आणि खायला शुगर कॅन्डी!'

डॉक्टर टोपीत डोकं खुपसून आसुरी आनंदानं हसला आणि त्यानं आपलं तोतरं बोलणं पुढे सुरू केलं.

'सगळा दिखावा! खालच्या दर्जाच्या नोकरवर्गाने ब्लँकेट आणि पलंगपोस कुलुपात ठेवून दिले; का, तर म्हणे म्हाताऱ्यांनी त्यांना डाग पाडले तर? निजू देत त्या चोरांना नुसत्या जमिनीवर! म्हाताऱ्यांची पलंगावर बसायची, कोट घालायची किंवा लाकडी फरसबंदीवर चालायची काही हिंमत नव्हती. सगळ्या गोष्टी विशेष समारंभासाठी जपून ठेवण्यात आल्या होत्या. जसे काही ते सर्वजण चोरच होते! म्हातारी मंडळी येशूच्या कृपेने मुकाट्याने चार घास खात होती, असतील ते कपडे घालत होती. आणि दिवसरात्र ह्या तुरुंगातून, तसेच आत्मशांतीची भाषणबाजी करणाऱ्या, मस्तवाल, अधम व्यवस्थापकीय अधिकाऱ्यांपासून लवकरात लवकर आपली सुटका व्हावी म्हणून देवाची प्रार्थना करीत होती ती. आपल्या उच्च अधिकाऱ्याचा कारभार काय वर्णावा! आठवड्यातून दोनदा संध्याकाळी शेकडो निरोप्ये धावत पळत यायचे आणि बातमी देऊन जायचे की, राणीसाहेब, म्हणजे तुम्ही उद्या वृद्धाश्रमाला भेट देणार आहात. ह्याचाच अर्थ असा समजायचा की, दुसऱ्या दिवशी त्या वृद्ध म्हाताऱ्यांना इथं जमवायचं, चांगलेचुंगले कपडे घालायला सांगून रांगेत उभं करायला हवं. चला ठीक आहे! वृद्ध म्हातारे आंघोळीपांघोळी करून, नवे कपडे घालून रांगेत उभे राहून वाट पाहत बसायचे. त्यांच्या अवतीभोवती निवृत्त क्षेत्रीय पर्यवेक्षक तोंडावर उसनं गोड हास्य आणून फेऱ्या मारायचा. म्हातारे जांभया देत राणी आली का म्हणून वळून वळून पाहायचे. पण कुरकुर करायला धजत नव्हते. आम्ही सर्व बसलोय आपले वाट पाहत! एवढ्यात निम्न दर्जाचा अधिकारी, मग दुय्यम अधिकारी आणि शेवटी प्रमुख वित्त अधिकारी लगबगीनं यायचे. मग आणखी कोणी, मग आणखी कोणी ... अखंड धावपळ चालायची त्यांची. त्यांच्या चेहऱ्यावर गूढ पण समारंभाला साजेसा असा भाव असायचा. पाहतोय वाट, पाहतोय वाट, पायांची चाळवाचाळव करीत होतो. घड्याळाकडे पाहत होतो. पण सगळं कसं शिस्तशीर, शांतपणे. कारण तक्रार कोण कोणाकडे करणार? सगळेच जण एकमेकांचा द्वेष करीत होते आणि एकमेकांचे कट्टर शत्रू होते. एक तास जातो. दुसरा संपतो. शेवटी एकदाचं दूर कुठेतरी बग्गीचं दर्शन होतं. आणि ...' आणि डॉक्टरच्या चेहऱ्यावर हलकंसं हसू उमटलं आणि तो हळू आवाजात म्हणाला,

'तुम्ही खाली उतरता बग्गीतून आणि ते आज्ञाधारक म्हातारे गायला सुरुवात करतात. 'आमच्या 'सिओन'च्या राणीसरकारची अवर्णनीय कीर्ती सर्व दूर पसरो ...' ह्या सगळ्याला चांगलं म्हणायचं का ? '

डॉक्टर हातवारे करीत मोठमोठ्यानं हसायला लागला. जसं काही त्याला दाखवायचं होतं की हसण्यामुळे त्याला पुढे एक शब्दही बोलता येत नाहीय. दुष्ट माणसं हसतात तसं तो दात विचकून मोठमोठ्यानं कर्कश हसला. त्याच्या आवाजावरून, चेहऱ्यावरून, चमकणाऱ्या बेदरकार डोळ्यांवरून समजून येत होतं की त्यानं राणी, तिची वृद्धाश्रमाची भेट आणि वृद्धांची दयनीय अवस्था ह्या सर्वांवर कसं टीकास्त्र सोडलं होतं ते. तरीपण त्याच्या अडखळत आणि रासवट बोलण्याच्या ढबीमुळे त्याच्या बोलण्यात उपरोधिक छद्‌मीपणा जाणवत नव्हता. तो मनापासून हसत होता, जरा खूष होऊनच म्हणाना.

'आता तुमची ती शाळा ? ' हसून हसून दम लागलेला तो पुढे सांगू लागला.

'तुम्हाला आठवतंय, शेतकऱ्यांच्या मुलांना शिक्षण द्यायची तुमची केवढी इच्छा होती ? त्यांना नक्कीच चांगलं शिक्षण मिळालं असणार. कारण थोड्याच दिवसांत ती सगळी मुलं चारही दिशांना पळून गेली. ती शाळेत परत यावीत म्हणून त्यांना धाकदपटशा दाखवून नाहीतर पैशाची लालूच दाखवून परत आणायला लागलं. तुम्हाला माहीत आहे ना की शेतावर काम करणाऱ्या बायकांच्या स्तनपान करणाऱ्या मुलांना स्वत:च्या हातांनी बाटलीने दूध पाजावं असं तुम्हाला फार वाटत होतं. त्यासाठी तुम्ही खेड्यात गेलात, रडलात आणि म्हणालात की ती लहान बालकं काही तुमचे नोकर नाहीयेत तेव्हा सगळ्या आयांनी आपली मुलं शेतावर आणावीत. मग खेड्यातल्या गावच्या प्रमुखानं फतवा काढला की शेतावरील काम करणाऱ्या स्त्रियांनी आपली बालकं खेळवण्यासाठी तुमच्याकडे सोपवावीत. पण आश्चर्याची गोष्ट म्हणजे तुमच्या सत्कृत्याला दाद न देता उंदीर जसे मांजरापासून दूर पळतात तसे ते सगळेच पळून गेले. हे असं का झालं असावं ? अगदी सरळ अन् सोपं आहे ! ती माणसं अडाणी आहेत किंवा कृतघ्न आहेत असा याचा अर्थ नाही. अशाच तऱ्हेची विधानं तुम्हीसुद्धा नेहमी करत होतात. पण ती अशासाठी पळून गेली की तुमच्या प्रत्येक उपक्रमात, माझ्या सरळसोट बोलण्याबद्दल मला क्षमा करा. प्रेमाचा किंवा अंत:करणाच्या ओलाव्याचा लवलेशही नव्हता. तुमची

सजीव बाहुल्यांशी खेळून आपली करमणूक करून घ्यायची इच्छा होती फक्त, दुसरं काऽऽही नाही. ज्याला जिवंत माणूस आणि मांडीवर खेळणारा छोट्या जातीचा कुत्रा यांच्यातला फरक कळत नसेल त्यानं सत्कृत्य करायला जाऊ नये. तुम्हाला कळकळीनं सांगतो की माणसं आणि छोटी कुत्री– मोठा फरक आहे दोघांत!'

राणीच्या हृदयाचे ठोके जोरजोरात पडायला लागले. कानात टकटक आवाज यायला लागला आणि असंही वाटायला लागलं की डॉक्टर तिच्या डोक्यावर त्याच्या टोपीनं घणाघात करतोय. डॉक्टर भरभर, रागारागानं, असभ्यपणे, विदुषकी हावभाव करीत नेहमीप्रमाणे तोतरंच बोलत होता. तिला फक्त एवढंच समजत होतं की तिच्याशी एक उर्मट, असभ्य, दुष्ट, कृतघ्न मनुष्य बोलतोय. पण त्याला तिच्यापासून काय अपेक्षित आहे आणि कशासाठी तो असं बोलतोय ह्याचा उलगडा काही तिला होत नव्हता.

'चला निघा इथून.' त्याच्या टोपीपासून आपलं डोकं वाचवण्यासाठी दोन्ही हात वर उंच करून रडक्या सुरात ती म्हणाली, 'जा तुम्ही!'

'तुमच्या नोकराचाकरांशी तुम्ही कसं वागता ह्यासंबंधी न बोललेलंच बरं!' डॉक्टर कडाडत म्हणाला. 'तुम्ही त्यांना माणसे समजतच नाही तर डांबरट, फसवडे समजून त्यांचा अपमान करता. आता माझंच उदाहरण घ्या. तुम्ही माझी नोकरीवरून का हकालपट्टी केलीत? तुमच्या वडिलांकडे दहा वर्षं नोकरी केली मी, नंतर तुमच्याकडे केली. शपथेवर सांगतो, सण नाही, वार नाही की हक्काची रजा नाही, अशा तऱ्हेने काम करून भोवतालच्या जवळजवळ शंभर मैलांच्या परिसरातील लोकांचं मी प्रेम संपादन केलं होतं आणि अचानक एका शुभदिनी मला सांगण्यात आलं की त्या दिवसापासून मला सेवामुक्त करण्यात आलंय. असं का? ह्या 'का'चं उत्तर मला आजपर्यंत मिळालं नाहीय. मी मेडिसीनचा डॉक्टर, नोबलमन, मॉस्को विद्यापीठाचा विद्यार्थी होतो. पण माझ्या वडिलांचं कौटुंबिक जीवन गरिबीचं, अगदीच सर्वसाधारण होतं. तेव्हा माझ्यासारख्या क्षुल्लक माणसाला त्याची बाजू मांडण्याची संधीही न देता मानगुटीला धरून बाहेर फेकणं अगदीच सोपं होतं. हा कोण एवढा मोठा लागून गेलाय की त्याला का काढलं हे सांगणं जरुरीचं आहे, असंच तुम्हाला वाटलं ना? मला नंतर समजलं की माझ्या

नकळत माझी बायको गुप्तपणे तुमच्याकडे माझ्यासाठी शब्द टाकायला कमीत कमी तीन वेळा तरी येऊन गेली. पण तुम्ही मात्र एकदाही तिला भेटला नाहीत. लोक म्हणतात ती तुमच्या बाहेरच्या खोलीत खूप वेळ रडत होती. मी मात्र माझ्या कालवश पत्नीला याबद्दल कधीही क्षमा करणार नाही. अगदी कधीही नाही !'

असं अजून कितीतरी अप्रिय आणि मनात खदखदणारं सांगायचा पक्का निश्चय करून, दात ओठ घट्ट आवळून डॉक्टर थोडा वेळ गप्प बसला. त्याला एकदम काहीतरी आठवलं आणि त्या विचारानं त्याचा कडवट, भावनाशून्य चेहरा एकदम उजळला.

'आता तुमच्या ह्या पाठशाळेशी असलेल्या संबंधाचा विचार करू या हं. डॉक्टर पोटतिडकीनं बोलायला लागला. इथला एकही माणूस तुमच्या तडाख्यातून सुटला नाहीये. जितक्या पवित्र, उच्च स्थानावरचा धार्मिक अधिकारी असेल तितका त्याला तुमच्या तथाकथित मेहेरबानी आणि देवदूतासारखी दिसणारी पण मानभावी सहानुभूतीचा अधिक त्रास होण्याचा संभव जास्त. तुम्ही इथे कशाला वरचेवर येता ? ह्या धर्मोपदेशकांपासून तुम्हाला काय अपेक्षित आहे, हे मला सांगाल का ? पुन्हा आपला तोच उंदरामांजरांचा खेळ ! माणसाच्या अस्मितेवर घाला झालं, दुसरं काऽऽही नाही. अर्थात तुमचा चर्चमधल्या देवावर विश्वास नाहीच, तुमच्या हृदयात तुमचा स्वत:चा वेगळाच देव आहे. तुम्ही आपल्या ह्या देवाजवळ स्वत:च्या आध्यात्मिक अक्कल हुशारीनं पायरीपायरीनं पोहोचलात. चर्चमधल्या समारंभात तुम्ही अनिच्छेनंच भाग घेता. इथल्या प्रार्थनांना आणि सणांना तुम्ही हजर नसता. मध्यान्हीपर्यंत झकास झोपा काढता ... मग तुम्ही इथे येता तरी कशाला ? तुम्ही दुसऱ्याच्या प्रार्थनास्थळी आपला देव घेऊन जाता आणि तुमची अशी अपेक्षा असते की तुमच्या येण्यानं पाठशाळा उपकृत झाली आहे असं इथल्या लोकांना वाटावं. खरं की नाही ? तुम्ही असा विचार केला आहे का की तुमच्या या भेटींचा त्यांच्यावर किती बोजा पडत असेल ते ? तुम्ही आज संध्याकाळी इथे आलात पण तुमच्या कार्यालयातून तीन दिवसांपूर्वीच तुम्ही येण्याची बातमी घेऊन घोडेस्वार इथं येऊन पोहोचला होता. काल सबंध दिवस तुमची बडदास्त ठेवण्याची तयारी आणि तुमची प्रतीक्षा करीत होते सर्वजण. तुमचा बिनीचा निरोप्या येऊन पोहोचला, तुमची ती उद्धट दासी अंगणातून

नुसतीच फलकारे मारत इकडून तिकडे धावत होती. प्रश्नांचा भडिमार करीत होती. हुकूम सोडत होती. मला तर ते सर्व असह्य झालं होतं! आज सबंध दिवसभर धर्मोपदेशक जय्यत तयारीत होते. तुमचं समारंभपूर्वक स्वागत करता येईल की नाही ह्याची त्यांना चिंता होती. कारण ते जमलं नाही तर तुमच्याकडून मुख्य धर्मोपदेशकांकडे तक्रार होणार की, 'श्रेष्ठ, पूज्य धर्मोपदेशक, इथल्या धर्मगुरूंना मी आवडत नसावी. मला कळत नाही, मी राग येण्यासारखं काय केलंय. खरंच मी केवढं पाप केलं असणार! इतकी का मी दुर्दैवी म्हणायची!' मग इथल्या या पाठशाळेला तुमच्यामुळे वरून तंबी मिळाली असती. मुख्य धर्मगुरू कामात व्यस्त असतात. बुद्धिवान आहेत ते. त्यांना एका मिनिटाची फुरसत नसते. त्यांच्या विश्रांतीच्या वेळी त्यांनी सारखं तुमच्याकडे यावं असा तुमचा आग्रह असतो. त्यांच्या वयाचा आणि इथल्या पदाचा तुम्हाला थोडाही आदर नाही. बरं झालं म्हणायचं, की अनेक दानशूरांनी ह्या पाठशाळेला देणग्या दिल्या आहेत म्हणून इतकी दयनीय स्थिती नाहीये इथली. नाहीतर धर्मोपदेशकांना तुमच्याकडून नेमाने शंभर रुबल्स तरी मिळाले असते की नाही कोण जाणे!'

जेव्हा जेव्हा राणीला कोणी बेचैन केलं असेल, तिच्याविषयी कोणाचा गैरसमज झाला असेल, किंवा तिचा कोणी अपमान केला असेल तर प्रत्येकवेळी ती रडायला लागायची. निदान आज तरी तिनं आपलं तोंड झाकून घेतलं होतं आणि ती लहान मुलासारखी मुसमुसून रडत होती. डॉक्टर एकदम गप्प झाला, काळा ठिक्कर पडला आणि गंभीर झाला.

'राणीसाहेब, मला क्षमा करा.' तो घोगऱ्या आवाजात म्हणाला. 'दुष्ट प्रवृत्तींनी घेरल्यामुळे, स्वत:चंच भान राहिलं नाही मला.' जिवाची घालमेल झाल्यामुळे तो खोकला, टोपी घालायला विसरला आणि राणी बसली होती त्या जागेपासून तडक पुढे निघून गेला.

आकाशात तारे लुकलुकायला लागले होते. पाठशाळेच्या पलीकडल्या बाजूला नक्कीच चंद्र उगवला असणार. कारण आकाश स्वच्छ, निरभ्र आणि मोहक दिसत होतं. पाठशाळेच्या पांढऱ्या भिंतीच्या अवतीभवती वटवाघळं आवाज न करता भिरभिरत होती. घड्याळात पाऊण तासाचा ठोका पडला. बहुतेक पावणेनऊ वाजले असतील. राणी उठली आणि हळूहळू फाटकाच्या

दिशेनं जाऊ लागली. तिला फार अपमानित वाटत होतं. तिला असं वाटलं की झाडं, तारे, ही वटवाघळं सर्वांना तिची दया येतेय. घड्याळ देखील सहानुभूती दाखवण्यासाठी सुरेल आवाजात टोले देतेय. ती रडत होती तरी दुसरीकडे तिच्या डोक्यात विचारचक्र फिरतच होतं. सबंध आयुष्यभर जर ह्या पाठशाळेत राहता आलं असतं तर किती बरं झालं असतं. उन्हाळ्यातल्या शांत संध्याकाळच्या वेळी एकटी, तिरस्कारित, अपमानित, लोकांना न समजलेली अशी ती राईमधून भटकली असती. फक्त देव आणि तारांकित आकाशाने या दु:खितेचे अश्रू पाहिले असते. चर्चमध्ये अजून सणाची उपासना चालली होती. राणी थांबली आणि चर्चमधल्या गाण्याचे सूर लक्षपूर्वक ऐकू लागली. निश्चल, अंधाऱ्या वातावरणात ही गाणी किती कर्णमधुर वाटत होती! ह्या गाण्यांच्या सुरेल आवाजाच्या पार्श्वभूमीवर रडण्यात किंवा सोसण्यात देखील केवढं समाधान लाभत होतं!

राणी आपल्या खोलीत विश्रांती घ्यायला आली तेव्हा आरशात तिला आपला रडवेला चेहरा दिसला. तिनं पावडर लावली आणि मगच ती जेवायला बसली. तिथल्या धर्मगुरूंना ठाऊक होतं की तिला छोटी अळिंबी, शॅम्पेन आणि मध घालून केलेला केक आणि ती खाल्ल्यावर तोंडाला येणारा सायप्रसचा वास पण फार आवडतो. म्हणून तिच्यासाठी त्यांनी ह्या सर्व गोष्टी मुद्दाम करवून घेतल्या होत्या. अळिंबी आणि शॅम्पेनचा आस्वाद घेता घेता ती दिवास्वप्न पाहण्यात गढून गेली. सर्वजण तिला वाळीत टाकणार आहेत आणि तिचा सर्वनाश करायचे मनसुबे करताहेत. सर्व कारभारी, दास-दासी, कार्यालयातील सेवकवर्ग, मोलकरणी ह्यांच्यासाठी तिनं काय काय नाही केलं, पण आज तेच तिचा विश्वासघात करायला निघाले आहेत, उलट उत्तरं द्यायला लागले आहेत. जगातील एकूण एक माणसं तिच्यावर तुटून पडली आहेत, दु:स्वास करताहेत तिचा, हसताहेत तिला. असं जर होणार असेल तर ती आपल्या राणीपदाचा, ऐषआरामाचा, उच्चभ्रू समाजाचा त्याग करायला तयार आहे. मग ती ह्या मोनेस्ट्रीमध्ये दाखल होईल, कोणालाही घालून पाडून, टोचून बोलणार नाही. शत्रूसाठी सुद्धा ईश्वराची प्रार्थना करील. मग सगळेजण तिचा स्वीकार करतील. तिची माफी मागायला तिच्याकडे येतील. पण आता हे सर्व करायची वेळ निघून गेलीय. खूप उशीर झालाय ...

राणी जेवणानंतर कोपऱ्यातल्या ख्रिस्ताच्या प्रतिमेसमोर गुडघे टेकून बसली

आणि 'इवान्जेली' मधल्या दोन प्रकरणांचं तिनं पठण केलं. दासीनं तिचं अंथरुण तयार केल्यावर ती आडवी झाली आणि पांढऱ्या शुभ्र चादरीखाली विसावली. अश्रूंचा ओघ ओसरल्यावर मनुष्य जसा समाधानाचा निःश्वास टाकतो तसा तिनं एक दीर्घ, परिपूर्ण, निःश्वास सोडला, डोळे मिटले आणि ती झोपेच्या आधीन झाली.

सकाळी जाग आली तेव्हा राणीनं घड्याळाकडे पाहिलं. साडेनऊ वाजले होते. तिच्या पलंगाखालच्या गालिचावर खिडकीतून लख्ख सूर्यप्रकाशाची तिरीप दिसत होती. त्यामुळे खोली उजळायला लागली होती. खिडकीच्या काळ्या पडद्यापलीकडे माश्या घोंघावण्याचा आवाज येत होता.

खूप अवकाश आहे अजून! तिनं विचार केला आणि डोळे मिटून घेतले.

आळोखेपिळोखे देऊन ती बिछान्यावर आळसावली तेव्हा तिला डॉक्टरबरोबरची कालची मुलाखत आणि झोपण्यापूर्वी तिच्या मनात उठलेलं वादळ, यांची आठवण झाली. नंतर पीटरबुर्गमध्ये राहणारा तिचा नवरा, कारभारी, डॉक्टर्स, शेजारीपाजारी, नोकरचाकर सगळं सगळं आठवलं तिला... तिच्या परिचयाच्या पुरुषवर्गाचा ताफाच्या ताफा तिच्या डोळ्यापुढून सरकला. तिला हसू आलं आणि मनात विचार येऊन गेला की ह्या सर्वजणांनी तिच्या अंतःकरणात डोकावण्याचा आणि तिला समजून घेण्याचा प्रयत्न केला असता तर त्यांनी तिच्या पायाशी लोटांगणच घातलं असतं.

सव्वाअकराला तिनं दासीला आवाज दिला. 'चल दाशा, कपडे आण माझे' ती आळसुडेपणानं म्हणाली. 'आधी बाहेर जाऊन बग्गीला घोडे जोडायला सांग. क्लावद्या निकोलायेवनाकडे जायला निघायला हवं.'

प्रवासाला निघायची वेळ झाली होती म्हणून तिनं आळस झाडला. दिवसाच्या तळपत्या सूर्यप्रकाशात तिचे डोळे दिपले. ती समाधानानं हसली. आज दिवस फारच चांगला उगवलाय! तिला निरोप देण्यासाठी प्रवेशद्वाराजवळ जमलेल्या धर्मगुरूंच्या त्रासिक डोळ्यांकडे तिनं पाहिलं तरी शुभचिंतन करण्यासाठी डोकं वाकवलं आणि म्हणाली,

'माझ्या मित्रांनो, मला निरोप द्या! परवा मी येतेच आहे. तुम्हाला माझ्या शुभेच्छा.'

दारापाशी जमलेल्या धर्मगुरूंच्या घोळक्यात डॉक्टरला पाहून तिला गोडसा धक्काच बसला. त्याचा चेहरा उतरलेला होता आणि भयानक दिसत होता.

'राणीसाहेब,' टोपी काढून आणि अपराध्यासारखं हसून तो म्हणाला, 'मी इथं तुमची केव्हापासून वाट पाहतोय. क्षमा करा. देव तुमचे कल्याण करो ... अगदी घाणेरड्या, बदल्याच्या भावनेनं ग्रासलं होतं मला काल. मी तुम्हाला नाही नाही ते बोललो. सगळाच मूर्खपणा. थोडक्यात सांगायचं तर मी तुमची क्षमा मागतोय.'

राणी प्रेमळपणे हसली आणि तिनं आपला हात डॉक्टरच्या ओठांजवळ नेला. त्यानं त्याचं चुंबन घेतलं आणि तो गोरामोरा झाला.

ती तरातरा आपल्या जागेवर स्थानापन्न झाली आणि चारी दिशांना डोकं वाकवून तिनं सगळ्यांना अभिवादन केलं. तिचं मन उल्हसित, मोकळं मोकळं आणि प्रेमानं उचंबळून आलं होतं. तिला वाटलं तिचं आजचं हसणं अभूतपूर्व, प्रेमळ, मार्दवपूर्ण असं होतं. तिचा लवाजमा मोठ्या फाटकापर्यंत पोहोचला. मग धुळीच्या रस्त्यावरून, झोपड्यांजवळून, बागेजवळून, धुळीनं माखलेल्या बैलगाड्यांच्या लांबच लांब रांगांना ओलांडून, रांगेनं चर्चमध्ये प्रार्थनेला निघालेल्या उपासकांना मागे टाकून जाताना तिचे डोळे सगळीकडे भिरभिरत होते. चेहऱ्यावर गोडसं हास्य विलसत होतं. तिच्या मनात विचार आला की स्वत:बरोबर सगळीकडे प्रेमाची ऊब, प्रकाश, आनंद आणायचा, दुसऱ्याच्या गुन्ह्याला माफी करायची, शत्रूशीही प्रेमानं हातमिळवणी करायची ह्यापेक्षा परमोच्च सुख ते कुठलं! रस्त्यात भेटणारा शेतकरी तिला वाकून अभिवादन करीत होता. तिची बग्गी हळूवारपणे सपसप आवाज करत चालली होती. गाडीखालून धुळीचे ढग उठत होते आणि वाऱ्याबरोबर रायच्या सोनेरी पिकावर पोहोचत होते. राणीला भास होत होता, तिचं शरीर बग्गीतल्या मऊ गाद्या उशांवर हिंदकळत नाहीये तर ढगाच्या हिंदोळ्यावर डोलतंय. आणि ती स्वत: हलक्या फुलक्या पारदर्शक ढगासारखी दिसतेय ...

मी किती भाग्यवान आहे! ती डोळे मिटून पुटपुटली. किती मी भाग्यवान!

: २ :
सेंट आन्नाचे पदक

लग्नसोहळ्यानंतर साधा अल्पोपहारही नव्हता. नवदांपत्यानं ग्लास ग्लास मद्य घेतलं, कपडे बदलले आणि ते तडक रेल्वेस्थानकाकडे गेले. धुंद करणारा लग्नानंतरचा बॉलडान्स, आणि त्यानंतर मेजवानी, मग गाणं बजावणं, नाच इत्यादी कार्यक्रमांना फाटा देऊन त्यांनी दोनशे कोसांवर असलेल्या तीर्थस्थळाला भेट देण्याचा बेत आखला होता. बऱ्याच जणांनी या बेताला पुष्टी दिली होती आणि म्हटलं होतं, मद्येस्त अलेक्सेइच एक उच्चपदस्थ अधिकारी आहे पण तो वयस्क आहे. तेव्हा धूमधडाक्याचं असं लग्न त्याला शोभून दिसलं नसतं. इतकंच नाही तर बावन्न वर्षांचा बडा अधिकारी नुकतंच कुठं अठरा वर्षं ओलांडलेल्या युवतीशी लग्न करतोय, अशावेळी नाचगाण्यात कोणाचं तरी मन लागलं असतं का? लोक तर असंही म्हणत होते की शिस्तशीर अशा मद्येस्त अलेक्सेइचने तीर्थस्थळाला भेट द्यायचा बेत मुद्दामच ठरविला असणार. त्याला त्याच्या तरुण पत्नीच्या मनावर ठसवायचं होतं की त्यांच्या या विवाहसंबंधात धर्म आणि नीतिमत्ता या दोन गोष्टींनाच प्राधान्य असणार आहे.

प्रवासाला निघालेल्या जोडप्याला निरोप देण्यात आला. अधिकारी वर्ग आणि नातेवाईक मंडळींचा घोळका हातात ग्लास घेऊन गाडी सुटायची प्रतीक्षा करीत होता. म्हणजे मग त्यांना 'हुरा' असा जोशपूर्ण आवाज काढता आला असता. मुलीच्या वडिलांनी, प्योतर लिओन्तीजनी टॉप हॅट आणि शिक्षकाचा ड्रेसकोट घातला होता. त्यांचा चेहरा पांढराफटक पडला होता. मद्य पिऊन तर्र झालेल्या अवस्थेत ते होते. एका हातात मद्याचा ग्लास पकडून, दुसऱ्या हातात खिडकीला पकडण्याचा प्रयत्न करीत ते अजीजीनं म्हणत होते, 'अन्यूता! आन्या! आन्या! हे बघ मी काय म्हणतोय ते!'

आन्या गाडीच्या खिडकीतून वाकली तेव्हा ते तिच्या कानात काहीतरी पुटपुटले, आणि तिथे एकदम मद्याचा भपकारा आला. पण त्यांना काय म्हणायचं

होतं ते कळणं जवळजवळ अशक्यप्रायच होतं. त्यांनी तिचा चेहरा, छाती, हात सगळ्याला भराभरा स्पर्श केला व आपल्या हातांचा क्रॉस करून आशीर्वाद दिले. पण एवढ्यातच त्यांना दम लागला आणि त्यांच्या डोळ्यांत अश्रुबिंदू चमकले. माध्यमिक शाळेत शिकणारे तिचे भाऊ 'पेत्या' आणि 'आन्द्रुश्या' वडिलांच्या लांब कोटाला धरून त्यांना मागे खेचत होते. आणि शरमिंदे होऊन त्यांना हळूच सांगत होते, 'बाबा, पुरे, पुरे. असं काय करता, पुरे आता ...'

गाडी हलली तेव्हा आन्याला तिच्या डब्यापाठोपाठ भेलकांडत, हातातले मद्य इकडेतिकडे हिंदकळवत, थोडावेळ पळतपळत येणारे वडील दिसत होते. दिसत होता त्यांचा केविलवाणा, अपराधी पण प्रेमळ चेहरा. 'हु-रा-आ-आ-' ते ओरडले.

नवदांपत्य डब्यात एकटेच राहिले होते आता. मद्येस्त अलेक्सेइचनं एकदा आपल्या स्वतंत्र डब्याचं निरीक्षण केलं, सामान वरच्या बर्थवर टाकलं आणि हसत हसत तो आपल्या नववधूच्या समोर जाऊन बसला. तो एक मध्यम उंचीचा, चांगलाच लठ्ठ, थुलथुलीत, खाऊनपिऊन सुस्त असा उच्चपदस्थ अधिकारी होता. त्याचे कल्ले लांब होते. मिशांचा मागमूसही नव्हता आणि त्याने घोटून घोटून दाढी केली होती. त्याची गोल आणि रेखीव हनुवटी पायाच्या टाचेसारखी दिसत होती. त्याच्या चेहऱ्यातील वैशिष्ट्यपूर्ण गोष्ट म्हणजे मिशा नसलेली, दाढी करताना नुकतीच घोटलेली मोकळी जागा, जी हळूहळू, मांसल, जेलीप्रमाणे हलणाऱ्या गोबऱ्या अशा गालात मिसळून गेली होती. तो होता तसा ठणठणीत, तरी शरीराची हालचाल संथ होती. त्याचं वागणं मात्र सोज्वळ होतं.

'आज एका गोष्टीची आठवण झाल्याशिवाय राहत नाही.' तो हसून म्हणाला. पाच वर्षांपूर्वी कसरोवला पवित्र आन्नाच्या नावाचं दुसऱ्या दर्जाचं गौरव पदक* बहाल करण्यात आलं. आभारप्रदर्शन करण्यासाठी तो राजेसाहेबांकडे गेला होता तेव्हा त्यांनी असे उद्गार काढले होते. 'म्हणजे तुझ्याजवळ आता तीन आन्ना झाल्या म्हणायच्या. एक कोटाच्या बटणावर आणि दोन गळ्यात!' 'तुला हा पण खुलासा करायला हवा की ह्याच सुमारास कसरोवची चांगलीच भांडखोर आणि उठवळ अशी आन्ना नावाची बायको परत नांदायला आली होती. मला खात्री आहे की पवित्र आन्नाच्या नावाचं दुसऱ्या दर्जाचं पदक जेव्हा मला मिळेल तेव्हा

राजेसाहेबांना माझ्या बाबतीत तसा उल्लेख करायचं प्रयोजन नसेल.'

आपल्या टुकटुकीत डोळ्यांनी तो हसला, तशी ती पण हसली. हा माणूस आता मिनिटामिनिटांनी आपल्या जाडजाड ओलसर ओठांनी आपलं चुंबन घेणार आणि त्याला नकार देण्याचा कुठलाच अधिकार आपल्याला नसणार, ह्या विचारांनी ती बेचैन झाली होती. त्याच्या गुबगुबीत शरीराच्या हळुवार हालचाली तिला घाबरवत होत्या. तिचा उत्साह मावळला होता व कुठल्यातरी भीतीनं तिला ग्रासलं होतं. तो उठला, अगदी सावकाशपणे त्यानं गळ्यातून पदक काढलं, कोट आणि जाकीट काढलं आणि गाऊन चढवला. 'चला सुटलो एकदाचा' तिच्याशेजारी बसत तो म्हणाला.

तिला आठवलं की लग्नविधी चालू असताना तिच्या मनाला कसल्या वेदना होत होत्या ते! तिला वाटलं की पाद्री काय, पाहुणेमंडळी काय, इतकंच नाही तर चर्चमध्ये उपस्थित असलेला प्रत्येक मनुष्य तिची कीव करत तिच्याकडे पाहतोय नि म्हणतोय, 'कशासाठी, कशासाठी ही इतकी गोड अन् सुंदर मुलगी या वयस्क आणि अगदीच साधारण गृहस्थाशी लग्न करायला निघालीय?'

आज सकाळपर्यंत ती तशी आनंदात होती. नि आतापर्यंत सगळं कसं व्यवस्थित पार पडलंय. पण लग्नसमारंभ चालू असताना आणि नंतर आगगाडीच्या डब्यात बसल्यावर मात्र तिला वाटायला लागलं की आपण अपराधी आहोत. आपली फसवणूक झाली आहे आणि आपण एक चेष्टेचा विषय झालो आहोत. आता हेच बघा ना, ती एका श्रीमंत माणसाशी लग्न करायला तयार झाली. पण आज तिच्याजवळ थोडेसुद्धा पैसे नाहीयेत. लग्नाचे कपडेपण कर्ज काढून शिवून घेतले. आज तिचे वडील आणि दोघे भाऊ जेव्हा तिला निरोप द्यायला आले होते तेव्हा त्यांचे चेहरेच सांगत होते की त्यांच्याजवळ एक कोपेकसुद्धा शिल्लक नसणार. आज रात्री त्यांना जेवण तरी मिळणार का? आणि उद्याचं काय? आणि ही दोन्ही मुलं आपण नसल्यामुळे यापुढे अर्धपोटीच राहणार. आई गेल्यावर तिचे अंत्यविधी संपल्यानंतर, संध्याकाळी आम्हा सर्वांची जशी केविलवाणी, पोरकी अशी अवस्था झाली होती, त्याचा पुनर्प्रत्यय त्यांना आज येणार आहे. 'अरेरे, मी किती कमनशिबी नाही?' तिच्या मनात विचार आला. 'पण का म्हणून माझंच नशीब असं फुटकं?'

आपल्या लठ्ठपणामुळं हालचालीत जडत्व आलेल्या आणि बायकांशी बोलण्याचालण्याच्या बाबतीत अननुभवी असा मद्येस्त अलेक्सेइच तिच्या कमरेभोवती हातानं विळखा घालीत होता नि तिच्या दंडाला थोपटल्यासारखं करीत होता. आणि त्याचवेळी ती मात्र पैशासंबंधी, आईसंबंधी, आईच्या मृत्यूविषयी विचार करीत होती. आईच्या निधनानंतर हस्ताक्षर आणि चित्रकलेचे शिक्षक असलेल्या तिच्या वडिलांना दारूचं व्यसन लागलं, गरिबी आली, मुलं बूटमोज्याशिवाय अनवाणी हिंडू लागली. वडिलांना बेलिफाकडे नेण्यात आलं, वॉरंट निघालं, कर्जाच्या तारणापोटी घरातलं फर्निचर द्यावं लागलं... केवढी नाचक्की!

आन्याला दारूड्या बापाची देखभाल करावी लागे. भावांच्या पायमोज्यांना ठिगळं लावावी लागत. बाजारहाट करायला लागायचा. लोक तिच्या सौंदर्याची, तारुण्याची, वागण्यातल्या शालीनतेची तोंडभरून तारीफ करायचे. पण तिला वाटायचं, सगळं जग तिच्या स्वस्त टोपीकडे आणि शाईनं चकचकीत केलेल्या, भोकं पडलेल्या बुटाकडे पाहतंय. रात्र रात्र ती अश्रू ढाळायची आणि बेचैनी आणणारा, खोलवर घर करून राहिलेला एकच विचार तिच्या मनात यायचा की अगदी थोड्याच दिवसांत अशक्तपणाचं कारण देऊन वडिलांची शाळेतून हकालपट्टी होईल, त्याचं दु:ख त्यांना सहन होणार नाही आणि आईप्रमाणेच तेही हे जग सोडून जातील. पण एवढ्यात ओळखीच्या स्त्रियांनी, या सगळ्या गोष्टींचा बागुलबुवा करून, आन्यासाठी चांगल्या वराचा शोध सुरू केला. थोड्याच दिवसांत, वयस्क, दिसायला बेताचाच पण पैसेवाला असा हा मद्येस्त अलेक्सेइच त्यांना सापडला. त्याच्या नावानं बँकेत कितीतरी हजार रुबल्स जमा होते. शिवाय त्यानं खंडानं दिलेली वडिलोपार्जित जमीनपण होती. तो तत्त्वनिष्ठ असा मनुष्य होता आणि राजेसाहेबांच्या खास मर्जीतला होता. तिला सांगण्यात आलं होतं की शाळेच्या मुख्याध्यापकाला किंवा जिल्ह्यातल्या शिक्षणप्रमुखाला, तिच्या वडिलांना कामावरून काढून न टाकण्याविषयी चिठ्ठी राजेसाहेबांकडून घेणं त्याला सहज शक्य होतं...

ह्या सगळ्या बारीकसारीक गोष्टींच्या आठवणीत ती दंग होती. एवढ्यात गाण्याच्या आणि लोकांच्या आरडाओरडीचा आवाज भसकन खिडकीतून घुसून

तिच्या कानावर आदळला. एका छोट्याशा स्टेशनवर गाडी थांबली होती. फलाटाच्या पलीकडे लोकांचा एक घोळका दिसत होता. जोरजोरात बाजाची पेटी वाजत होती. मोडकळीस आलेल्या व्हायोलिनचा चिरका आवाज ऐकू येत होता. उंच उंच बिर्योझाच्या आणि पॉपलर वृक्षांच्या पाठीमागून आणि चंद्रप्रकाशात झळाळलेल्या, उन्हाळ्यासाठी मुद्दाम बनविलेल्या टुमदार घरकुलांमागून सैनिकी वाद्यवृंदाचे सूर ऐकायला येत होते. नक्कीच इथे राहण्यासाठी आलेल्या लोकांसाठी नृत्यसंध्या आयोजित केली असावी. फलाटावर, इथल्या थंड हवेत आणि स्वच्छ वातावरणात थारेपालट करण्यासाठी या घरकुलात राहणारी आणि इतर शहरी मंडळी पाय मोकळे करायला आली होती. त्यांच्यातच या सगळ्या इस्टेटीचा श्रीमंत मालक, उंचापुरा, चक्क काळ्या केसाचा, अर्मेनियन माणसासारखा दिसणारा, गरगरीत डोळ्यांचा आणि चित्रविचित्र पोशाखातला 'अरतीनव' पण होता. त्याने छातीवरच्या बटणांचा शर्ट घातला होता. बुटाला टाचा मारलेल्या होत्या त्याच्या. खांद्यावरून सोडलेला काळ्या रंगाचा कोट जमीन झाडीत होता. त्याच्यामागून डोळ्यांत भरतील असे तीक्ष्ण सुळे असलेली दोन रशियन शिकारी कुत्री चालत होती.

आन्याच्या डोळ्यांत अजून अश्रू तरळत होते पण याक्षणी ती आईचा, पैशाअडक्याचा, स्वत:च्या लग्नाचा, कशाकशाचा विचार करीत नव्हती. तर फलाटावरच्या आपल्या ओळखीच्या सहाध्यायींशी, अधिकाऱ्यांशी हस्तांदोलन करीत होती. आनंदानं हसत होती, भरभर भरभर बोलत होती. 'नमस्कार, काय कसं काय ? सगळं ठीक ना ?' ती खाली फलाटावर उतरली आणि आपला नवीन भारी किंमतीचा ड्रेस आणि टोपीसकट सर्वांना आपण नीट दिसू अशा तऱ्हेने चांदण्यात उभी राहिली. 'आपली गाडी इथे का थांबली ?' तिनं विचारलं. 'इथं गाडीचा थांबा आहे.' तिला उत्तर मिळालं. 'टपाल नेणाऱ्या गाडीच्या येण्याची वाट पाहताहेत.'

आपल्याकडे अरतीनव टक लावून पाहत आहे हे लक्षात आल्यावर तिनं पण डोळ्यांची मिष्कील हालचाल केली आणि मोठमोठ्यानं फ्रेंचमध्ये बोलायला सुरुवात केली. तिच्या स्वत:च्या आवाजात जात्याच असलेली मिठ्ठास, कानावर पडणारे सुस्वर संगीत, जवळच्या तलावात चंद्राचं पडलेलं प्रतिबिंब, आणि

शिवाय ह्या 'दोन जुआन' म्हणून प्रसिद्ध असलेल्या मिष्कील अरतीनवचे तिच्याकडे एकटक व भेदक नजरेनं डोळे लावून बसणं, सगळ्यांच्या आनंदाला आलेलं उधाण या सर्व गोष्टींमुळे ती पण उल्हसित झाली. गाडी हालली आणि ओळखीच्या अधिकारी लोकांनी तिला निरोप देण्यासाठी सलाम ठोकला. तेव्हा दूरवर झाडीच्या पाठीमागे घुमणारे आणि सैनिकी वाद्यवृंदाने तिच्यापर्यंत पोहोचवलेले 'पोलका'चे सूर ती गुणगुणू लागली.

ती आपल्या कूपेमध्ये जेव्हा परतली तेव्हा अगदी भारावून गेली होती. तिला वाटलं की या छोट्याशा स्टेशनवरच्या या प्रसंगाने तिला एक प्रकारचं पाठबळ मिळालं होतं, की तू पुढच्या आयुष्यात कुठल्याही परिस्थितीला सामोरी जाशील आणि अखेर नक्कीच भाग्यवान ठरशील!

दोन दिवस धर्मस्थळी राहून नवीन जोडपं आपल्या गावाला परत आलं. त्यांचं बिऱ्हाड सरकारी निवासस्थानात होतं. मद्येस्त अलेक्सेइच कामावर गेल्यावर आन्या पियानो वाजवायची, सोफ्यावर लोळत कादंबऱ्या वाचायची, नाहीतर कपड्यांच्या फॅशनची मासिकं चाळायची. कधीकधी एकटीला कंटाळा आल्यामुळे तिला रडूच यायचं. जेवणाच्या वेळी मद्येस्त अलेक्सेइच भरपेट खायचा, राजकारणावर बोलायचा. कोणाची कुठे नेमणूक झाली ते सांगायचा. म्हणायचा, 'प्रत्येकानं काहीतरी काम केलं पाहिजे. कौटुंबिक जीवन म्हणजे काही नुसती मजा करणं नाही, तर ते माणसानं फेडायचं कर्ज आहे. एकएक वाचवलेली कोपेक रुबलची काळजी घेत असते.'

त्याच्या दृष्टीनं जगात सगळ्यांत श्रेष्ठ काय असेल तर ते म्हणजे धर्म आणि चारित्र्य. मुठीत सुरी तलवारीसारखी धरून तो म्हणायचा, 'प्रत्येक माणसाला स्वतःची अशी काही बांधिलकी असायलाच हवी!'

आन्या त्याचं हे सगळं बोलणं ऐकायची आणि तिला एक प्रकारचं दडपणच यायचं. मग तिला धड जेवण जायचं नाही आणि बहुतेक वेळा ती टेबलावरून उपाशीपोटीच उठायची. जेवणानंतर नवरा मोठमोठ्यांदा घोरत पडायचा आणि ती माहेरी निघून जायची.

वडील आणि भावंडं तिच्याकडे अशा नजरेनं पाहायची की जणू ती येण्यापूर्वी त्यांची तिच्याविषयीच चर्चा चालली होती की, ती केवळ पैशासाठी तिला न

आवडणाऱ्या, कंटाळवाण्या आणि उबग येणाऱ्या माणसाशी लग्न करून बसलीय. तिचे सुळसुळीत तलम भारी कपडे, ब्रेसलेट्स आणि विशेषत: एखाद्या गर्भश्रीमंत बाईसारखा तिचा दिमाख पाहून त्यांना संकोच व्हायचा. अपमानित झाल्यासारखं वाटायचं. तिच्या उपस्थितीत त्यांना भांबावल्यासारखं व्हायचं आणि तिच्याशी काय बोलावं हेही त्यांना कळत नसे. तरीही ते तिच्यावर पहिल्याइतकंच प्रेम करायचे. तिच्याशिवाय जेवायची त्यांना अजून सवय व्हायची होती. तिनं त्यांच्याशेजारी बसून कोबीचं सूप, रव्याची खीर, मटणाच्या चरबीत परतलेले बटाटे खाल्ले. पण त्या बटाट्यांना मेणबत्तीचा वास लागला होता. प्योतर लिओन्तिचनं थरथरत्या हातांनी बुधल्यातील दारू पेल्यात ओतली, आधाशासारखी पण तोंड वेडंवाकडं करीत ढोसली. मग दुसरा पेला, नंतर तिसरा... अशक्त आणि किडकिडीत आणि मोठ्या डोळ्यांच्या पेत्या आणि अन्युष्कानं बुधली हिसकावून घेतली आणि ते काकुळतीनं म्हणाले, 'नका हो बाबा, पुष्कळ झाली आता!'

आन्याला पण त्यांची काळजी वाटत होतीच म्हणून तिनं आता आणखी घेऊ नका म्हणून हरतऱ्हेनं विनवणी केली, पण ते एकदम भडकले आणि मुठी टेबलावर आपटू लागले. 'मी कोणालाही माझ्यावर टीका करण्याचा अधिकार दिला नाहीये!' ते ओरडले. 'पोरांनो, आणि ए मुली, तूही, मी तुम्हाला सगळ्यांना हाकलून लावीन आत्ताच्या आत्ता!' पण त्यांच्या आवाजात फारसा दम नव्हता. उलट एक प्रकारची व्याकुळता होती. त्यामुळे कोणालाच त्यांची भीती वाटत नव्हती. जेवणानंतर ते नेहमी कपडे चढवायचे, त्यांची पांढरीफटक हनुवटी दाढी करताना जागोजागी कापलेली असायची. मान बारीक पण ताणल्यासारखी लांब वाटायची. अर्धाअर्धा तास ते आरशापुढे उभे राहायचे. स्वत:ला ठाकठीक करणं, अधूनमधून केस विंचरणं, आपल्या काळ्या मिशांना पीळ देणं, सेंटचे फवारे मारणं, असं चालायचं. नंतर टायची गाठ बांधायचे, हातमोजे घालायचे, डोक्यावर टॉपहॅट ठेवायचे आणि आपल्या खाजगी शिकवण्या घ्यायला बाहेर पडायचे. सुट्टीच्या दिवशी ते घरीच चित्रं रंगवत बसायचे. नाहीतर खरखरणारी भसाड्या आवाजाची बाजाची पेटी वाजवायचे. तिच्यातून सुरेल, कर्णमधुर आवाज काढायचा त्यांचा प्रयत्न असायचा. मधूनच पेटीबरोबर गायला लागायचे, नाहीतर मुलांवर ओरडायला सुरुवात करायचे. 'गाढवांनो, मठ्ठ आहात नुसते! माझ्या

पेटीचा नुसता सत्यानाश केलाय!'

संध्याकाळी आन्याचा नवरा एकाच छताखाली राहणाऱ्या आपल्या सहकाऱ्यांबरोबर पत्ते खेळायचा. पत्त्यांचा डाव रंगलेला असताना हुद्देदार मंडळींच्या दिसायला बेतासबात, रंग ना ढंग असे कपडे घातलेल्या, एखाद्या स्वयंपाकीणबाईसारख्या अडाणी दिसणाऱ्या अशा बायका यायच्या आणि मग त्या ठिकाणी त्यांच्यात कुचाळक्या चालायच्या. त्यांच्या बोलण्याची पातळी त्यांना साजेशीच गावंढळ आणि शिवराळ असायची. एकदा काय झालं, मद्येस्त अलेक्सेइच आन्याला घेऊन नाटकाला गेला होता. मध्यंतरात एक मिनिटभरसुद्धा तो तिला एकटीला सोडत नव्हता. तिच्या हातात हात अडकवून बाल्कनीतून आणि स्वागतकक्षातून फेऱ्या मारत होता. तो कोणालातरी आदरपूर्वक वाकून अभिवादन करायचा आणि लागलीच आन्याच्या कानामध्ये पुटपुटायचा, 'हा राज्याचा मुख्य सल्लागार हं! बडं प्रस्थ आहे... किंवा मोठा पैसेवाला आहे... स्वतःचं घर आहे त्यांचं...' ते बुफेजवळून चालले होते तेव्हा काहीतरी गोड खावं असं आन्याला वाटत होतं. तिला चॉकलेट आणि सफरचंदाचा केक खूप आवडायचा. पण तिच्याजवळ पैसे नव्हते आणि नवऱ्याजवळ मागायचाही संकोच वाटत होता. त्यानं एक पेअर उचललं, बोटानी साफसूफ केलं आणि उगाचच विचारलं, 'केवढ्याला हे? बारा कपेअेक? अस्सं!' म्हणून त्यानं पेअर जागच्या जागी ठेवलं. पण काहीच न घेता तिथून पुढं जाणं पण बरं वाटेना म्हणून मग एक सोडावॉटरची बाटली मागवली आणि एकट्यानंच आख्खी बाटली अशा तऱ्हेनं रिचवली की त्याच्या डोळ्यांतून पाणी यायला लागलं. आन्याला मात्र त्याचा तिरस्कारच वाटला तेव्हा. एकदा तर तो अगदी लालबुंद झाला आणि घाईघाईत म्हणाला, 'या वयस्क बाई येताहेत ना त्यांना वाकून नमस्कार कर!' 'पण माझी आणि त्यांची काहीच ओळख नाही.' 'नसली म्हणून काय झालं? ती आपल्या राज्याच्या वित्तमंत्र्यांची बायको आहे! कर नमस्कार, मी सांगतोय ना!' तो अगदी ठासून म्हणाला. 'वाकलीस तर तुझं डोकं काही धडापासून वेगळं होणार नाही!' त्याच्या म्हणण्याप्रमाणे आन्या त्या बाईपुढे आदरानं वाकली आणि तिचं डोकं काही धडापासून वेगळं झालं नाही, पण तिला अपमानास्पद मात्र वाटलं. नवरा म्हणेल ते ते ती करीत होती पण ती वेडपटातील वेडपट आहे असं समजून तिची जी फसवणूक तो करीत होता, त्यामुळे तिचा नुसता तिळपापड

व्हायचा. तिनं फक्त पैशासाठी त्याच्याशी लग्न केलं होतं. पण तसं पाहिलं तर लग्नाच्या आधी तिच्याजवळ जेवढे पैसे होते तेवढेदेखील आज तिच्याजवळ नव्हते. तेव्हा तिला वडील २० कोपेकचं नाणं देत असत. आणि आता अर्धी कोपेकपण नव्हती तिच्याजवळ. नवऱ्याच्या नकळत त्याचे पैसे ढापणं किंवा पैशासाठी त्याच्यापुढे हात पसरणं तिला मान्य नव्हतं. तिला नवऱ्याची भीती वाटायची. ती नुसती कापायची त्याच्यासमोर. तिला वाटायचं की अशा प्रकारच्या माणसाविषयीची भीती आजच नाही तर कितीतरी दिवसांपासून तिच्या मनात घर करून राहिली आहे. बालपणी एका ढगाच्या गडगडाटाप्रमाणे किंवा आगगाडीच्या खडखडाटाप्रमाणे आपल्या जबरदस्त शक्तीनिशी तिच्या भावनांचा कोणी चक्काचूर केला असेल, असा विचार ती करायची तेव्हा प्रथम तिच्या डोळ्यांसमोर शाळेचे मुख्याध्यापक यायचे. दुसरी शक्तिमान व्यक्ती जर कोणती असेल तर ते राजेसाहेब, त्यांच्याविषयी कुटुंबात नेहमीच चर्चा व्हायची, आणि सगळ्यांना कशामुळे माहीत नाही, त्यांची खूप भीती वाटायची. ह्यापेक्षा थोडी कमीअधिक शक्तिमान अशी कितीतरी भिववणारी माणसं होती. तिचे मिशाछाट, दयामाया नसलेले कडक शिस्तीचे वर्गशिक्षक आणि त्यानंतर शेवटी हा शिस्तीचा भोक्ता मद्येस्त अलेक्सेइच. त्याचा चेहरासुद्धा तिला शाळेच्या मुख्याध्यापकांसारखाच दिसायचा. आन्याच्या कल्पनाविलासात ह्या सर्व शक्ती शेवटी एकाच शक्तीत विलीन व्हायच्या. ती म्हणजे भयानक अवाढव्य असे पांढरे अस्वल! ह्या सर्व शक्ती दुबळ्या आणि स्वत:ला अपराधी समजणाऱ्या जीवांवर तुटून पडायच्या. उदा. तिचे वडील. पण नवऱ्याविरुद्ध आवाज उठवायची तिला भीती वाटायची. आणि मग मनात नसतानासुद्धा ती हसायची. तिच्यावर अमानुषपणे प्रेमाचा वर्षाव व्हायचा. तिला घट्ट मिठीत चुरगळलं जायचं. तेव्हा खरं तर ती भयभीत व्हायची. पण वरून मात्र आनंदात असल्याचं नाटक करायची.

फक्त एकदाच प्योतर लिओन्तिचनं गळ्याशी आलेलं कुठलंतरी कर्ज फेडण्यासाठी म्हणून ५० रुबल्स तिच्या नवऱ्याजवळ उधार मागण्याचं धाडस केलं होतं. पण मग त्याला केवढी मानहानी ऐकायला लागली त्यासाठी! 'ठीक आहे, देतो मी तुम्हाला ५० रूबल्स.' मद्येस्त अलेक्सेइच विचार करून म्हणाला. 'पण तुम्हाला आधीच सांगून ठेवतो की तुम्ही जोपर्यंत दारू पिणं सोडत नाही तोपर्यंत मी तुम्हाला मदत करणार नाही. सरकारी नोकरीत असलेल्या माणसाला असली

व्यसनाधीनता असणं ही शरमेची गोष्ट आहे. जगजाहीर अशा एका गोष्टीची आठवण तुम्हाला करून दिल्याशिवाय मला राहवत नाहीये की ह्या व्यसनानं कित्येकांचा सत्यानाश केलाय. ते लोक जर ह्या व्यसनापासून दूर राहिले असते तर नक्कीच काही काळानंतर वरच्या स्थानावर पोचले असते.' मग त्यापाठोपाठ म्हणी, वाक्प्रचार यांचा उपयोग करून भाषणबाजी सुरू व्हायची. 'आजपर्यंत काय झालं... आपला जो समज असतो त्याची फलनिष्पत्ती काय होते? आत्ता म्हटलेल्या गोष्टी विचारात घेतल्या तर काय होतं...' वगैरे वगैरे. बिचाऱ्या प्योतर लिओन्तिचला ही मानहानी असह्य झाली, आणि त्याला दारू पिण्याची तीव्र इच्छा मात्र झाली.

कधीकधी आन्याला भेटायला तिचे भाऊ यायचे. त्यांचे हातमोजे फाटलेले असायचे. पायमोज्यांना ठिगळं असायची. त्यांनासुद्धा उपदेशाचे घुटके प्यायला लागायचे. 'प्रत्येक माणसाला स्वत:चं असं ध्येय असायलाच पाहिजे.' मद्येस्त अलेक्सेइच त्यांना ऐकवायचा. पैसे कोणाला कधी द्यायचा नाही पण आन्यासाठी मात्र अंगठी, ब्रेसलेट, ब्रूचसारख्या गोष्टी भेट म्हणून आणायचा आणि म्हणायचा की याच गोष्टी अडीअडचणीच्या वेळी उपयोगाला येतात. मधूनमधून लाकडी कपाटाचं कुलूप उघडून दिलेल्या सर्व गोष्टी जागेवर आहेत की नाही याची खात्री करून घ्यायचा.

एवढ्यात हिवाळा आला. नाताळच्या आधी कितीतरी दिवस स्थानिक वर्तमानपत्रात निवेदन येत होतं की २९ डिसेंबरला नववर्षाच्या दरबारी समारंभाच्या वेळी बॉलडान्सचं आयोजन केलं जाणार आहे. दररोज संध्याकाळी पत्त्यांच्या मैफलीनंतर मद्येस्त अलेक्सेइच बेचैन दिसायचा. अधिकाऱ्यांच्या बायकांशी हळूच काहीतरी बोलायचा, आन्याकडे सचिंत नजरेने पाहायचा आणि कसल्यातरी विचारात असल्यासारखा या टोकापासून त्या टोकापर्यंत फेऱ्या मारायचा. शेवटी एक दिवस अगदी उशिरा तो आन्याजवळ आला नि म्हणाला, 'तुला बॉलडान्ससाठी कपडे शिवून घ्यायला हवेत. कळलं ना! फक्त एवढंच कर की मारिया ग्रीगेरेवना आणि नतालिया कुझमिनिश्ताचा सल्ला घेऊनच शिवून घे!' त्यानं आन्याला १०० रूबल्स दिले. तिने ते घेतले आणि कुणाचा सल्लाबिल्ला

न घेता बॉलडान्ससाठी ड्रेस शिवायला टाकला. फक्त याविषयी वडिलांजवळ ती बोलली होती. तिची आई बॉल नृत्यासाठी ज्या तऱ्हेचे कपडे घालायची तसेच कपडे घालायचा आपण प्रयत्न करायचा असं तिनं ठरवलं होतं. तिची स्वर्गवासी आई फक्त अत्याधुनिक फॅशनचे कपडे घालायची. आन्यासाठी पण ती खूप कष्ट घ्यायची. एखाद्या बाहुलीला सजवावं तसे भारी भारी कपडे ती आन्यासाठी शिवायची. आन्याला तिनं फ्रेंच बोलायला शिकवलं होतं. 'माझुर्का' नाच करण्यात निपुण केलं होतं. लग्नाआधी पाच वर्षं तिच्या आईनं गव्हर्नेस म्हणून नोकरी केली होती. आन्याला आपल्या आईप्रमाणे जुन्या कपड्याचे नवे कपडे करता येत होते. स्पिरीटमध्ये मोजे धुता येत होते. दागदागिने कुठून भाड्याने आणायचे ते माहीत होतं. इतकंच काय तर आईप्रमाणे डोळे मिचकवायचे, नाकात बोलायचं, शरीराच्या आकर्षक हालचाली करायच्या, जरूर भासेल तेव्हा अगदी तोऱ्यात चालायचं. कधी चेहरा केविलवाणा तर कधी गूढ रहस्यमय असा करायचा हे पण सगळं ती आईकडून शिकली होती. आणि आपल्या वडिलांकडून तिला मिळाला होता केसांचा आणि डोळ्यांचा काळा रंग आणि करारी बाणा. ती या सर्व गोष्टींची जाणीवपूर्वक जपणूक करीत असे.

बॉल नृत्यासाठी जाण्याच्या अर्धा तास अगोदर मद्येस्त अलेक्सेइच गळ्यात पदक घालण्यासाठी तिच्या खोलीत आला आणि आरशासमोर उभा राहिला. त्याचवेळी तिच्या सौंदर्यानं, कोऱ्या करकरीत झगमगीत आणि परीसारख्या हलक्याफुलक्या पोशाखानं त्याला अगदी मोहून टाकलं. खुशीत येऊन आपले कल्ले विंचरत तो म्हणाला, 'किती सुंदर दिसतेस तू आन्युता! किती गोड आहेस गं...' आणि एकदम हर्षोल्हसित सुरात पुढे म्हणाला, 'मी तुला भाग्यशाली बनवलं, आज तू पण माझं भाग्य उजळू शकणार आहेस. राजेसाहेबांच्या पत्नीला तुझ्यातला वेगळेपणा दाखवून दे अशी माझी तुला विनंती आहे. परमेश्वराची इच्छा असेल तर तिच्या मध्यस्थीनं मला ज्येष्ठ सल्लागार सचिवाचं पद मिळेल!'

ते दोघे बॉलडान्सला जाण्यासाठी निघाले. आज या संमेलनात सरदार दरकदार मंडळी उपस्थित होणार होती. प्रवेशद्वारापाशी भालदार चोपदार उभे होते. हॉलला लागून सेवकांनी अधिकारी वर्गाच्या अंगावरून उतरवलेले ग्रेट कोट टांगण्याची वेगळी जागा होती. हॉलमध्ये मोठ्या गळ्याचे ड्रेस घातलेल्या आणि वाऱ्याच्या

झोतापासून आपला बचाव करण्यासाठी हातात बंद पंखे धरलेल्या उमरावांच्या बायका मिरवत होत्या. सैनिकी अधिकारी होते. गॅसबत्त्यांचा वास जिकडेतिकडे पसरला होता. नवऱ्याच्या हाताला धरून जिन्यावरून खाली येतानाच संगीताचे सूर आन्याच्या कानावर पडले. जाताजाता दिव्यांच्या झगमगाटात भल्यामोठ्या आरशात तिने स्वत:ला पायांपासून डोक्यापर्यंत न्याहाळले तेव्हा तिच्या आनंदाला पारावार राहिला नाही. तिला आपलं भाग्य उजळल्याची जणू चाहूल लागली. अशाच प्रकारची अनुभूती त्या छोट्या रेल्वे स्थानकावर चांदण्या रात्री तिला आली होती. ती अगदी ऐटीत आणि आत्मविश्वासानं पावलं टाकीत होती. आणि त्या क्षणी आयुष्यात पहिल्यांदाच आपण आता लहान मुलगी राहिलो नसून एक उच्चभ्रू नवयौवना झालो आहोत असं तिला जाणवलं. आणि अजाणतेपणी ती आपल्या दिवंगत आईच्या चालण्यावागण्याची हुबेहूब नक्कल करू लागली. इतकंच नाहीतर आयुष्यात पहिल्यांदा आपण आता श्रीमंत आणि स्वतंत्र असल्याची ग्वाही तिच्या मनानं तिला दिली. नवऱ्याच्या अस्तित्वानं तिला अवघडल्यासारखं पण वाटलं नाही. हॉलचा उंबरठा ओलांडताच तिच्यात एक नवचैतन्य स्फुरल्यामुळे अशा नवऱ्यामुळे आपल्या व्यक्तिमत्त्वात किंचितही न्यूनता येत नाही अशी तिची खात्री झाली. उलट तिच्या चेहऱ्यावर एक विलोभनीय गूढ भाव उमटला. असा भाव सहसा पुरुषांना आकर्षित करतो.

आपल्या सरकारी निवासातून बाहेर पडून हॉलमध्ये प्रवेश केल्यानंतर तिथे जमलेला उच्चभ्रू लोकांचा समुदाय, झगमगाट, संगीत, कोलाहल या सगळ्याच गोष्टींच्या अनुभूतीमुळे ती अगदी दिङ्मूढ झाली. सगळीकडे दृष्टिक्षेप टाकल्यानंतर तिच्या मनात विचार आला 'आहाहा, किती सुंदर! आणि तत्क्षणीच तिथे जमलेल्या मंडळीतील तिच्या ओळखीच्या माणसांना तिनं नजरेनं टिपलं. त्यावेळी वेगवेगळ्या नृत्यसन्ध्यामध्ये, बाहेरगावच्या कार्यक्रमांमध्ये यापूर्वी तिला भेटलेले लोक होते, तसेच बरेच सरकारी अधिकारी, शिक्षक, वकील, सरकारी चाकरमाने, जमीनदार मंडळी, खुद्द राजेसाहेब आणि अरतीनव पण होता. तिथे विविधरंगी कपडे केलेल्या खूपच मोठ्या गळ्यांचे फ्रॉक घातलेल्या काही सुंदर तर काही बेतासबात दिसणाऱ्या उच्चभ्रू समाजातील स्त्रियाही होत्या. त्या सर्वजणी मीनाबाजारातील झोपड्यांच्या आकारात बनवलेल्या स्टॉल्सवर आणि दालनांमध्ये आपापल्या जागांवर स्थानापन्न झाल्या होत्या. कारण त्या ठिकाणी होणाऱ्या

विक्रीतूनच गरिबांच्या मदतीसाठी फंड जमा करायचा होता. उंचापुरा, स्कंधपट्ट्या असलेला कोट घातलेला, ती हायस्कूलमध्ये शिकत असताना 'पुराण्या किएव'च्या रस्त्यावर ओळख झालेला, पण ज्याचं नाव तिला आत्ता आठवत नव्हतं, असा एक सरकारी अधिकारी, नुकत्याच जमिनीतून तरारून बाहेर पडलेल्या कोंबासारखा तिच्यासमोर अचानक येऊन ठाकला. तो तिला बॉलडान्स करण्यासाठी बोलावत होता. तिनं लागलीच आपल्या नवऱ्याचा हात सोडला आणि हवेत तरंगत जावं तशी त्याच्याबरोबर जायला निघाली. त्यावेळी तिच्या मनाला एक विचार चाटून गेला की ती जोराच्या वादळात शिडाच्या बोटीवरून प्रवासाला निघालीय आणि तिचा नवरा लांब किनाऱ्यावरच मागे राहिलाय ... ती बेहोष होऊन हपापल्यासारखी वॉल्स्, पोलका, काद्रिल अशा सर्व प्रकारच्या नृत्याचे पदन्यास करीत होती. तिनं एका माणसाचा हात सोडला तर लागलीच दुसरा तिचा हात हिसकावून हातात घेत होता. गाण्याची आणि हलकल्लोळाची एक प्रकारची धुंदी चढली होती तिला. ती रशियन आणि फ्रेंच भाषांचं सफाईदार मिश्रण करून बोलत होती. गुणगुणत होती, हसत होती आणि सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे ती या क्षणी नवऱ्याचा, दुसऱ्या कोणाचा आणि कश्श्या कश्श्याचा विचार करीत नव्हती. पुरुष मंडळींवर तिनं चांगलीच छाप पाडली होती. असं होणं पण स्वाभाविकच होतं म्हणा. अती उत्तेजित झाल्यामुळे तिला श्वास घेणं जड जात होतं. खसकन् पंखा बाहेर काढून ती जोरजोरात वारा घ्यायला लागली. काहीतरी पेय घ्यायची तिला इच्छा झाली. सुरकुतलेला, स्पिरीटचा वास येणारा कोट घातलेले तिचे वडील प्योतर लिओन्तीच तिच्याजवळ आले आणि गुलाबी रंगाच्या आईस्क्रीमची बशी तिच्यापुढे करीत म्हणाले, 'किती गोड दिसते आहेस तू आज.' मग ते तिच्याकडे अभिमानानं पाहत म्हणाले, 'पण मला आजच्याइतकं तुझ्या लग्नाची घाई केल्याचं दुःख कधीच झालं नव्हतं. कशाला तू असं केलंस? मला माहीत आहे की केवळ आमच्यासाठीच पण ...' त्यांनी थरथरत्या हातांनी पैशाचं छोटं पाकीट बाहेर काढलं आणि ते म्हणाले, 'आजच माझ्या शिकवण्याचे पैसे मला मिळाले आहेत. मी ते सर्व तुझ्या नवऱ्याला उधार देऊ शकतो. तिनं वडिलांच्या हातात बशी पटकली. एवढ्यात कुणीतरी तिला पकडलं आणि लांब नेलं. आपल्या जोडीदाराच्या खांद्याखालून तिला अस्पष्ट दिसलं की तिचे वडील एका बाईला कवेत घेऊन गिरक्या मारत तक्तपोशीवरून

हॉलभर नाचत होते. सोज्वळपणानं वागतात तेव्हा किती छान दिसतात ते! तिच्या मनात विचार आला. तिनं माझुर्का नाच त्या गलेलठ्ठ अधिकाऱ्याबरोबर केला. तो एक भारदस्त आणि जाडच जाड मनुष्य होता. वर्दी चढवलेला वळूच जणू! आपले खांदे उडवत, धापा टाकत आणि पायांचे टपटप आवाज करीत तो कसाबसा नाचत होता. त्याला नाचावं असं मुळीसुद्धा वाटत नसावं. ती मात्र त्याच्या भोवताली फडफड करीत होती. आपल्या सौंदर्यानं आणि उघड्या मानेनं त्याला खिजवत होती. तिच्या हालचालीत एक प्रकारची मस्ती होती. तिच्या डोळ्यांतून स्फुल्लिंग उडत होते. तो मात्र अधिकच निर्विकार होत चालला होता आणि एखाद्या राजाला शोभेल अशा शालीनतेनं आपले हात तिच्या हातात देत होता. 'वाहवा! सुंदर ...!' लोकांमधून आवाज उठत होते.

हळूहळू त्या धिप्पाड अधिकाऱ्याची मरगळ नाहीशी झाली. त्याच्या अंगात पण चैतन्य संचारलं. तो उत्तेजित झाला नि तिच्या मोहकपणानं भारावून गेला, आणि पूर्णपणे वाहवत गेला. त्याच्या तारुण्यपूर्ण अशा हालचाली व्हायला लागल्या. ती मात्र फक्त खांदे उडवीत होती. चोरटे कटाक्ष टाकीत होती. ती म्हणजे जणू एखादी राणी शोभत होती आणि तो तिचा गुलाम. त्या क्षणीच तिला दिसलं की सगळ्या हॉलचं लक्ष त्या दोघांच्या जोडीवर केन्द्रित झालंय. सगळी माणसं रोमहर्षित झाली आहेत आणि त्यांचा हेवा करताहेत. त्या अधिकाऱ्यानं तिचे आभार मानले. एवढ्यात का कोण जाणे, सगळी माणसं पांगायला लागली. पुरुषमंडळी माना उंचावून भांबावल्यासारखी पाहत होती. त्यांचे हात नकळत खाली आले होते... अरे! हे पहा दोन तारकांनी सुशोभित असा कोट घातलेले खुद्द राजेसाहेब तिच्याकडे येत आहेत. हो! राजेसाहेबच तिच्याकडे येत होते, तिच्या नजरेला नजर भिडवीत होते आणि त्याचवेळी आपल्या ओठावर ओठ आवळत होते. सुंदर बायकांना पाहिलं की असं करण्याची त्यांची एक लकब होती.

'आम्ही खूष आहोत, बेहद्द खूष आहोत!' त्यांनी तिच्याशी बोलायला सुरुवात केली. तुमच्या यजमानांना गजाआड करण्याची आम्ही आज्ञा देत आहोत, कारण त्यांच्याजवळ असलं मौल्यवान रत्न आहे हे त्यांनी आमच्यापासून लपवून ठेवलं. आत्ता आम्ही तुमच्याकडे माझ्या बायकोनं सोपविलेल्या

कामगिरीवर आलो आहोत.' तिचा हात हातात घेऊन ते पुढे म्हणाले, 'तुम्ही आम्हाला मदत करायला हवी ... खरं म्हणजे तुम्हाला सौंदर्यासाठीचं पारितोषिक प्रदान करायला हवं ... जसं अमेरिकेत असतं ... म्ह-ण-जे अमेरिकन लोक ... माझी पत्नी तुमची अगदी आतुरतेनं वाट पाहत आहे.'

ते तिला तेथे उभारलेल्या झोपडीत एका वयस्क अशा बाईकडे घेऊन गेले. त्या बाईचा चेहऱ्याचा खालचा भाग प्रमाणाबाहेर मोठ्ठाड होता. त्यामुळे असं वाटत होतं की तिनं आपल्या तोंडात मोठी गोटी धरली आहे. 'या आम्हाला मदत करायला या!' त्या बाई मंजुळ आणि अनुनासिक आवाजात म्हणाल्या. 'सगळ्या सुंदर सुंदर स्त्रिया मीनाबाजारात काम करताहेत आणि तुम्हीच फक्त कशा कोण जाणे त्यातून सुटून इकडे तिकडे हिंडत मजा मारताहात. तुम्ही का नाही येत आम्हाला मदत करायला ?'

त्या बाई तिथून निघून गेल्या आणि चांदीचा सामोवार आणि तसेच कप असलेली टेबलाजवळची जागा आन्यानं घेतली. मग काय! तिथल्या विक्रीला एकदम तेजी आली. एका चहाच्या कपाला आन्यानं एक रुबलपेक्षा कमी पैसे घेतले नाहीत. त्या लठ्ठ अधिकाऱ्याला तर तिनं तीन कप प्यायला लावले. गटाण्या डोळ्याचा, धापा टाकणारा गडगंज अरतीनव तिच्या झोपडीकडे आला. उन्हाळ्यात त्यांची भेट झाली होती. तेव्हाचा त्याचा चित्रविचित्र वेष आज अंगावर नव्हता. तर इतरांसारखाच तोही आज कोटात होता. तिच्याकडे एकटक पाहत तो एक ग्लास शॅम्पेन प्यायला आणि त्यानं शंभर रुबल्स देऊ केले. त्याच्यावर त्याने चहा घेतला आणि आणखी शंभर रुबल्स दिले. हे सगळं त्याला दम्याचा त्रास होत असल्यामुळे मुकाट्यामुकाट्यानं चाललं होतं ... आन्या लोकांना आग्रह करकरून बोलवीत होती आणि त्यांना चक्क लुटत होती. तरीही तिला पक्की खात्री होती की तिचा हास्यविलास आणि दृष्टिक्षेप या दोन्ही गोष्टींमुळे त्या लोकांच्या पदरात निखळ आनंदाशिवाय काहीच पडणार नव्हतं. तिला समजून चुकलं होतं, तिला देवानं जन्माला घातली आहे ते फक्त या झगमगाटी आणि हसऱ्या जीवनाचा आस्वाद घेण्यासाठीच. ज्यामध्ये संगीत, नृत्य आणि तुम्हाला चाहणाऱ्या लोकांची वाण नाहीये. बलदांडग्या लोकांचं तिला लहानपणापासूनच भय वाटायचं. असले लोक धमक्या देऊन तुम्हाला चिरडून टाकण्यासाठी जणू तुमच्याजवळ येत

असतात असं आजपावेतो तिला वाटायचं. पण आत्ता तिला ही भीती अनाठायी आणि हास्यास्पद वाटत होती. ती आता कुणालाही भिणार नव्हती. फक्त तिला एकाच गोष्टीचं वाईट वाटत होतं की तिच्या आजच्या यशाच्या आनंदात सहभागी व्हायला तिची आई नव्हती.

तिचे वडील प्योतर लिओन्तिच अगदी पांढरेफटक पडले होते. पाय जमिनीवर रोवत रोवत ते तिच्या झोपडीपाशी आले. आणि एक ग्लास ' कन्याक ' देण्याची विनंती करू लागले. ते आता काहीतरी अचकट विचकट बोलणार ह्या भीतीनं ती अगदी लालबुंद झाली. तिला आपल्या अशा गरीब, विक्षिप्त वडिलांची लाज वाटत होती. पण त्यांनी आपला ग्लास संपवला. आपल्या छोट्या पाकिटातून दहा रुबल्स काढून तिच्याकडे भिरकावले आणि तोंडातून चकार शब्द न काढता ते तिथून ऐटीत निघून गेले. थोड्या वेळानं तिनं पाहिलं तर जोडीदारणीबरोबर ' ग्रॅन्ड राऊंड ' या गोल साखळी नाचात ते सामील झाले होते. त्यावेळी पहिल्यापासूनच ते अडखळत होते. आरडाओरडा करीत होते आणि जोडीदारणीला शरमिंदी करीत होते. आन्याला आठवलं की तीन वर्षांपूर्वी अशाच एका बॉलडान्समध्ये ते अशीच अडमडत पावलं टाकीत होते, आरडाओरडा करीत होते. त्यावेळी या सगळ्या गोष्टीचं पर्यवसान म्हणजे एका पोलिस अधिकाऱ्यानं त्यांना घरी नेऊन झोपवलं आणि दुसऱ्या दिवशी शिक्षणाधिकाऱ्याकडून ' नोकरीवरून काढून का टाकू नये ' असं धमकीवजा पत्र त्यांच्या हातात पडलं. ' भलत्याच वेळी कसली ही आठवण ', तिच्या मनात आलं.

जेव्हा सर्व झोपड्यांमधील सामोवारांखालील विस्तव कोळपला आणि काम करून करून दमलेल्या मीनाबाजारातील स्त्रियांनी तोंडात गोटी धरलेल्या वयस्क बाईकडे आपला कारभार दिला तेव्हा अरतीनवनं तिचा हात पकडला आणि तिला तो एका दालनात घेऊन गेला. या ठिकाणी मीनाबाजारात सहभागी होणाऱ्या सर्वांसाठी जेवायची व्यवस्था केली होती. तिथे जेवायला वीस एक लोकांपेक्षा जास्त लोक नव्हते पण आरडाओरड मात्र खूप चालली होती.

राजेसाहेबांनी आपल्या शुभेच्छा प्रकट केल्या. ' स्वस्त जेवणघरात आमूलाग्र बदल घडवून आणण्यासाठीचे उद्दिष्ट डोळ्यांपुढे ठेवून मीनाबाजाराचं आयोजन केले होते. ' ह्या शोभिवंत जेवणगृहात या उद्दिष्टांची पूर्ती होवो,' ही इच्छा प्रकट

करण्यासाठी पेयाचा एक प्याला घेणं अनुचित ठरणार नाही,' ब्रिगेडियर जनरलनी त्या दिव्य शक्तीला अभिवादन करून शुभेच्छा प्रकट केल्या जिच्यापुढे तोफखानादेखील निष्प्रभ ठरतो! मग सगळ्या पुरुषवर्गानं आपले पेले स्त्रियांच्या पेल्यांशी भिडवून किणकिण झंकार केला. उत्साहाला नुसतं उधाण आलं होतं.

आन्याला जेव्हा घरी आणून सोडलं तेव्हा चक्क उजाडलं होतं आणि स्वयंपाकीणबाई बाजारात जायला निघाल्या होत्या. आनंदात दंग, नशेत धुंद आणि नवीन अनुभवानं उत्फुल्लित झालेल्या आन्यानं जेमतेम कपडे बदलले आणि ती अंथरुणात शिरली नि क्षणार्धात निद्राधीन झाली.

दुपारी एकच्या सुमारास घरकामाच्या बाईनं तिला जागं केलं आणि अरतीनव तिला भेटायला आल्याची बातमी दिली. आन्यानं झटकन कपडे केले आणि ती दिवाणखान्यात आली. अरतीनवनंतर लगेचच मीनाबाजारातील तिच्या सक्रिय सहभागाबद्दल तिचे आभार मानण्यासाठी खुद्द राजेसाहेब आले. आपले ओठ चावत तिच्याकडे मधाळपणे बघत त्यांनी तिच्या कोमल हाताचं चुंबन घेतलं आणि तिनं परत भेटण्याची परवानगी द्यावी अशी विनंती करून निघून गेले. ती मात्र अचंबा करीत भारावून गेल्यासारखी दिवाणखान्याच्या मध्यभागी उभीच राहिली. तिच्या आयुष्यात आलेलं हे परिवर्तन – आश्चर्यकारक परिवर्तन – इतक्या झपाट्यानं होईल ह्यावर तिचा विश्वासच बसेना आणि त्याचवेळी तिचा नवरा मद्येस्त अलेक्सेइच दिवाणखान्यात प्रवेश करता झाला ... शोधक, लाडीगोडीचे, आदरयुक्त असे भाव त्याच्या चेहऱ्यावर दिसत होते. बलशाली किंवा प्रतिष्ठित व्यक्तींच्या उपस्थितीतच त्याच्या चेहऱ्यावरचे तसे भाव पाहण्याची तिला सवय झाली होती. पण आज धुंदी चढलेल्या तिला, त्याच्याविषयी तुच्छता प्रदर्शित करून, त्याला नगण्य मानून आपले काही वाकडे होणार नाही, याची खात्री झाली होती. म्हणूनच प्रत्येक शब्द ठासून उच्चारत ती त्याला म्हणाली, 'मूर्ख माणसा, जा, निघून जा इथून!'

या प्रसंगानंतर आन्याचा एकही दिवस रिकामटेकडा गेला नाही. कारण दररोजच तिचा कुठे ना कुठे बाहेर जाण्याचा कार्यक्रम असायचा. कधी पिकनिक, कधी कुठलीतरी सहल नाहीतर नाटकबिटक. पहाटे-पहाटे ती बाहेरून घरी परतायची. दिवाणखान्यातच लोळण घ्यायची. आपण सध्या कसे प्रकाशझोतात

आहोत त्याचं रसभरीत वर्णन ती सगळ्यांना ऐकवायची. पैसे तिला सारखेच लागायचे पण आता तिला मद्येस्त अलेक्सेइचची यत्किंचितही भीती वाटायची नाही. आपले आणि त्याचे पैसे काही वेगळे नाहीत असं समजूनच ती नुसती उधळपट्टी करायची. तिनं पैशासाठी कधी हात पसरले नाहीत की जबरदस्ती केली नाही. ती फक्त बिलं पाठवायची, नाहीतर चिठ्ठ्या. 'चिठ्ठी घेऊन येणाऱ्या माणसाबरोबर २०० रुबल्स द्यावे' किंवा 'ताबडतोब १०० रुबल्स देण्याची व्यवस्था करावी' वगैरे वगैरे.

इस्टरमध्ये मद्येस्त अलेक्सेइचला 'सेंट आन्ना'च्या नावाचा दुसऱ्या दर्जाचा किताब मिळाला. त्याबद्दल राजेसाहेबांपुढे तो गेला होता तेव्हा राजेसाहेबांनी हातातलं वर्तमानपत्र बाजूला केलं आणि ते आरामखुर्चीत मागे रेलून बसले. 'याचा अर्थ तू आता तीन तीन आन्नांचा धनी झालास!' आपल्या गुलाबीसर नखं असलेल्या गोऱ्या हाताचं निरीक्षण करीत ते म्हणाले, 'एक बटनहोलमध्ये आणि दोन गळ्यात!'

खदखदून आलेलं हसू बाहेर पडू नये म्हणून मद्येस्त अलेक्सेइचनं आपली दोन बोटं ओठावर ठेवली आणि तो म्हणाला, 'आता फक्त 'सेंट व्लदीमीर'च्या नावाचा किताब मिळण्याची वाट पाहायची आणि त्यासाठी आपणच माझा गॉडफादर व्हावं असं म्हणण्याचं मी धाडस करतोय!' त्यानं 'सेंट व्लदीमीर' नावाच्या चवथ्या दर्जाच्या किताबाचा नामनिर्देश केला आणि आपण हे यश कसं स्वतःच्या हिमतीवर मिळवलं याचं रसभरित वर्णन सगळीकडे कसं सांगणार आहोत, हे त्यांना आधीच सांगून टाकलं. अशाच तऱ्हेचं समयोचित अजून काहीतरी सांगण्याचा त्याचा बेत होता पण तेवढ्यात राजेसाहेबांनी वर्तमानपत्रात डोकं खुपसलं आणि मान फिरवली.

इकडे आन्या सारखी तीन घोड्यांच्या बग्गीतून हिंडत होती, अरतीनवबरोबर शिकारीला जात होती, एकांकिकांमधून काम करत होती, मध्यरात्रीपर्यंत मेजवान्या झोडत होती आणि घरच्यांबरोबर कमीत कमी वेळ घालवत होती. तिच्या पंक्तीचा लाभ त्यांना कधीच मिळत नव्हता. तिचे वडील प्योतर लिओन्तिच पहिल्यापेक्षा जास्तच मद्यपान करायला लागले होते. पैशाची त्यांना चणचण होतीच आणि कर्जापोटी ऑर्गनसुद्धा कधीच गहाण पडला होता. तिचे

धाकटे भाऊ, आता वडिलांना एकटं रस्त्यावर जाऊ देत नसत. ते पडू नयेत म्हणून त्यांची पाठ सोडत नसत. असेच ते एकदा जुन्या किएवस्कीय रस्त्यावरून फेरफटका मारायला निघाले असताना त्यांना आन्या 'त्रोयका'मधून जाताना दिसली. गाडीवानाच्या जागेवर अरतीनव चालक म्हणून बसला होता. तेव्हा प्योतर लिओन्तिचनं आपला डगला हातावर घेतला आणि ते तिच्या दिशेनं काहीतरी ओरडत सांगायचा प्रयत्न करू लागले. पण पेत्या आणि आन्द्रुष्कानं त्यांना पकडून धरलं नि त्यांची विनवणी ते करू लागले –

'नको ... नको बाबा ... बस झालं.'



: ३ :

पोटमजला असलेला बंगला

सहासात वर्षं लोटली असतील त्या गोष्टीला. तेव्हा मी 'टी' परगण्यातील एका जिल्ह्यात बेलकुरव नावाच्या एका तरुण जहागिरदाराच्या बंगल्यामध्ये राहत होतो. हा मनुष्य सकाळी भल्या पहाटे उठायचा, कमरेशी चुण्या असलेला हलकासा, पण अंगासरशी बसणारा असा कोट घालून फिरायला जायचा, संध्याकाळी बिअर प्यायचा आणि माझ्याजवळ सारखा कुरकुरायचा की त्याला आपलं मन मोकळं करता येईल असं कुठलंही ठिकाण किंवा माणूस नव्हता. तो बागेतल्या बंगलीत राहायचा. मी जुन्या वाड्यातील भले मोठे खांब असलेल्या हॉलमध्ये राहत होतो. माझ्या घरात मी झोपत होतो तो दिवाण सोडून कुठलंही फर्निचर नव्हतं. आणि हो! एक टेबल होतं ज्याच्यावर मी पत्त्यांचा पेशन्सचा डाव लावून ठेवायचो. बाहेर वारा पडला असला तरी माझ्या या घरातल्या शेगड्यांमधून कसलातरी घूँ घूँ आवाज यायचा. वादळ झालं तर सगळं घर थरथरायचं आणि वाटायचं की कोसळणार हे बहुतेक आता खाली! विशेषत: रात्रीच्या वेळी एकूण एक दहा मोठ्या खिडक्या विजेच्या लखलखाटाने प्रकाशित व्हायच्या तेव्हा तर भयच वाटायचं.

माझ्या फुटक्या नशिबानं माझ्या अंगी कायमचा आळशीपणा आला होता आणि मी काहीच काम करत नव्हतो. तासन्तास मी खिडकीतून बाहेर आकाशाकडे, पक्ष्यांकडे, झाडांच्या राईकडे पाहत बसायचो. पोस्टातून माझ्या नावावर येईल ते ते अथपासून इतिपर्यंत वाचायचो आणि झोपायचो. कधीकधी मी घराबाहेर पडून संध्याकाळी उशिरापर्यंत भटकंती करायचो.

एकदा फिरून घरी येत असताना अचानक मी अनोळखी अशा इस्टेटीत येऊन पोहोचलो. सूर्य नुकताच मावळला होता. फुलोऱ्यानं डवरलेल्या ओटच्या शेतावर सावल्या पसरल्या होत्या. पूर्ण वाढ झालेल्या, एकमेकाला खेटून लागलेल्या ऊंचच ऊंच फर वृक्षाच्या दोन रांगा उभ्या होत्या. जणू दोन भरभक्कम भिंतीच.

त्यांच्यामुळे एक सुंदर शांत पथ तयार झाला होता. मी शिताफीनं कुंपणात घुसून याच रस्त्यानं फरच्या सुयांवरून घसरत चाललो होतो. ह्या सुयांच्या दोन इंच जाडीच्या थरांनी जमीन पूर्ण झाकून गेली होती. सगळीकडे अंधार आणि शांतता होती. फक्त मधूनमधून झाडांच्या शेंड्यांवर चमचमणारा सोनेरी प्रकाश झिळमिळत होता, जणू कोळ्याच्या जाळ्यामध्ये झिरमिळणारं इंद्रधनुष्य !

फरच्या सूच्यांचा घमघमाट सुटला होता. मग मी लिंबाच्या झाडांच्या लांबच लांब राईकडे वळलो. तिथेपण तेच दृश्य होते. दूरवस्था आणि जीर्णता. पायाखाली मागल्या वर्षीची पानं चुरचुरत होती. आणि संधिप्रकाशात झाडांच्या मधून सावल्यांचा लपंडाव चालला होता. उजव्या हाताच्या फळांच्या बागेत ओरिओल पक्षी, तो सुद्धा म्हातारा, अनिच्छेनंच किनऱ्या आवाजात गात होता. आता ह्या इथं लिंबाची झाडं संपली होती. आणि मी माळा आणि गच्ची असलेल्या एका पांढऱ्या रंगाच्या घरापाशी येऊन पोचलो होतो. अचानक मला जमीनदाराच्या घराच्या प्रांगणाचा, पोहण्याच्या रुंद तलावाचा देखावा दिसला. ह्या तलावाभोवती हिरवीगार दाट लव्हाळी होती. समोरच्या काठापलीकडे एक खेडं होतं. उंच आणि अरुंद असा चर्चच्या घंटेचा मिनार दिसत होता. ह्या मिनारावर मावळतीच्या सूर्यकिरणामुळे प्रकाशित झालेला क्रूस चमकत होता. एक क्षण हा मनमोहक देखावा मला माझ्या घरच्या ओळखीचा असा वाटू लागला. जणू काही हाच निसर्गपट मी माझ्या बालपणी केव्हातरी पाहिला होता !

मी शेताकडून पुढे जात असताना मला दोन्ही बाजूंना सिंहमूर्ती असलेलं जुनं भक्कम प्रवेशद्वार लागलं. त्यातून आत गेल्यावर लांबवर मला पांढऱ्या दगडाचे खांब असलेलं दुसरं दार दिसलं. त्यापाशी दोन तरुणी उभ्या होत्या. त्यांच्यातली मोठी सडपातळ, गोरी, अतिशय देखणी, तांबूस कुरळ्या केसांची, लहान उभ्या चेहऱ्याची, करारी मुद्रेची होती. तिनं माझी जरासुद्धा दखल घेतली नाही. दुसरी अजून अगदीच लहान होती. फारतर सतरा-अठरा वर्षांची असेल. ती पण सडसडीत, फिकट चेहऱ्याची, मोठ्या जिवणीची, मोठाल्या डोळ्यांची होती. ती माझ्याकडे कुतूहलानं पाहत होती. मी जेव्हा तिच्याजवळ पोहोचलो, तेव्हा ती इंग्रजीमध्ये काहीतरी बोलली आणि लाजली. मला वाटून गेलं की या दोन सुंदर मोहक चेहऱ्यांची आणि आपली खूप जुनी ओळख असावी. एखादं सुंदर स्वप्न

पडावं ना, तसंच काहीतरी ह्या दोघींना पाहिल्यावर मला वाटलं आणि मी घरी परतलो.

ह्या प्रसंगानंतर बेलकुरवबरोबर घराच्या आसपास भटकत होतो तेव्हा अचानक स्प्रिंग लावलेली एक घोडागाडी झुणझुण करीत आमच्या अंगणात शिरली. त्या गाडीमध्ये त्या दोघी बहिणींतली मोठी बहीण बसलेली होती. ती, आगीसारख्या मोठ्या संकटात सापडलेल्या लोकांच्या मदतीसाठी, वर्गणी गोळा करण्यासाठी आली होती. आमच्या नजरेला नजर न भिडवता अगदी गंभीरपणं तिनं 'सीपानव' खेड्यातली किती घरं जळून खाक झाली, किती पुरुष, बायकामुलं, बेकार झाली याबद्दलची सविस्तर माहिती आम्हाला सांगितली. ह्या आपद्ग्रस्त लोकांसाठी वर्गणी जमवणारी समिती कोणती तातडीची उपाययोजना करणार आहे, तेही तिनं सांगितलं. कमिटीची ती पण एक सदस्य होती. आम्हाला मदतीचा आकडा टाकायला सांगून तिनं यादी लपविली. आणि त्याक्षणी ती आमचा निरोप घ्यायला लागली. 'आमचा तुम्हाला विसर पडलेला दिसतोय प्योतर पित्रोविच.' आपला हात हस्तांदोलनासाठी पुढे करत ती म्हणाली. 'जर मिस्टर 'एन' (तिनं माझ्या आडनावाचे लघुरूप केले.) ची त्यांच्या चित्रकलेची जाण असणाऱ्या लोकांना भेटायची इच्छा असेल तर त्यांनी आमच्याकडे जरूर यावं, मम्माला आणि मला खूप आनंद होईल.' यावर मी वाकून आनंद प्रदर्शित केला. ती गेल्यावर प्योतर पित्रोविच मला त्या कुटुंबाविषयी माहिती सांगू लागला. त्याच्या सांगण्यावरून ही मुलगी एका सुशिक्षित घराण्यातली होती. तिचं नाव होतं लीदा वलचानिनवा. ती, तिची आई आणि बहीण ज्या घरात राहत होत्या ती मिळकत आणि तलावाच्या दुसऱ्या टोकाला असलेलं खेडं या दोन्हींचंही नाव होतं एकच. 'शिलकोवका.' त्यांचे वडील पूर्वी मॉस्कोमध्ये महत्त्वाच्या हुद्द्यावर काम करायचे. ते जेव्हा वारले तेव्हा ते विधिमंडळाचे सदस्य होते. त्यांची सांपत्तिक स्थिती उत्तम असूनसुद्धा वलचानिनोवी, उन्हाळा असू दे, हिवाळा असू दे, बारा महिने अठराकाळ ह्या खेड्याच्या बाहेर कुठेच जात नसत. लीदा शिलकोवकामधल्याच सरकारी शाळेत शिक्षिका होती. तिला महिना पंचवीस रुबल्स पगार होता. आपल्या स्वत:साठीचा सर्व खर्च ती याच पैशांतून करायची. आपल्या पायांवर आपण उभे आहोत, ह्याचा तिला अभिमान वाटायचा. 'मजेशीर आहे त्यांचं कुटुंब.' बेलकुरव म्हणाला. 'जाऊया आपण त्यांच्याकडे

बेलकुरव म्हणाला आणि त्यानं एक सुस्कारा सोडला. 'छान बुद्धिजीवी कुटुंब आहे ते. मी अशा चांगल्या लोकांपासून आजपर्यंत दूर राहिलो, खरंच उगीचच मी दूर राहिलो त्यांच्यापासून! काय करणार, माझ्यामागे कामाचा तगादा होता ना सारखा! मी काम, काम नि कामच करीत बसलो.' 'एखाद्याला सुशिक्षित, आदर्श जमीनदार व्हायची इच्छा असेल तर त्यासाठी खूप कष्ट करायला लागतात.' बेलकुरव सांगत होता. त्याचवेळी माझ्या मनात विचार आला, कसला आदर्श जमीनदार नि काय ? हा तर सदैव द्विधा मन:स्थितीत असलेला मुलखाचा आळशी मनुष्य! तो एखाद्या गंभीर विषयावर बोलायला लागला तर किती आटापिटा करत ... अं .. अं ... अं ... असं करत लांबण लावतो. मात्र तो 'बोले तैसा चाले' असाच होता हं. दिलेली वेळ टळून गेल्यावर, सावकाशपणे कुठलंही सोपवलेलं काम करायचा तो. त्याच्या कामाच्या उरकाविषयी मला शंकाच होती. कारण काय, मी त्याला पोस्टात टाकायला म्हणून पत्रं द्यायचो ना, आठवडाभर तरी ती त्याच्या खिशातच पडून असायची. 'सगळ्यांत दु:खाची गोष्ट म्हणजे,' माझ्याबरोबर चालत जाताना तो पुटपुटला, 'तू मर मर मरतोस आणि कोणाला त्याची काहीच किंमत नाहीये. कुणाला तुमच्याशी घेणं देणं नाही!'

२

आता मी वलचानिनोवींकडे वरचेवर जाऊ लागलो होतो. मी साधारणपणे त्यांच्या व्हरांड्याच्या पायरीवर बसत असे. स्वत:च्या नाखुशीची टोचणी माझ्या मनात सतत सलत असायची. मला स्वत:च्या जीवनाची कीव यायची. आतापर्यंतचं माझं आयुष्य वेगात पण तितकंच निरर्थक गेलं होतं. मला नेहमी वाटायचं हे भार वाहणारं माझं हृदय मला छाती फोडून बाहेर काढून टाकता आलं असतं तर किती बरं झालं असतं. अगदी त्याचवेळी व्हरांड्यात गप्पा चाललेल्या असायच्या, कपड्यांची सळसळ ऐकू यायची. पुस्तकाची पानं उलटल्याचा आवाज कानावर पडायचा. थोड्याच दिवसांत माझ्या लक्षात आलं होतं की लीदा दुपारच्या वेळी आजारी लोकांना तपासायची, त्यांना पुस्तकं वाचायला द्यायची. आणि नंतर बऱ्याचदा डोक्याला रुमाल न बांधता छत्री घेऊन खेड्यात निघून जायची. मग संध्याकाळी घरी आल्यावर झेमूस्त्वाच्या कारभारावर, शाळेविषयी

मोठमोठ्यांदा बोलत असायची. ही मुलगी नाजूक, सुंदर पण त्याचबरोबर शिस्तीची अशी होती. तिचा चेहरा छोटासा पण रेखीव होता. आमच्या तिच्याशी जेव्हा तिच्या कामाविषयी गप्पा व्हायच्या तेव्हा अगदी शुष्कपणे ती मला म्हणायची, 'तुम्हाला आमचं हे सगळं काम अगदी नीरस वाटत असणार! मी एक निसर्ग चित्रकार आहे आणि मी माझ्या चित्रांतून सर्वसाधारण लोकांच्या अपेक्षांचं चित्रण करीत नाही म्हणून तिचा माझ्यावर राग होता असं नव्हे तर तिची ज्या गोष्टींवर असीम निष्ठा होती त्या गोष्टींत मला रस नव्हता म्हणून मी तिला आवडायचो नाही. मला आठवतंय की मी सैबेरियातील बायकाल सरोवर पाहायला गेलो होतो तेव्हा मला एक मंगोलियन चेहऱ्याची 'बुऱ्यात' मुलगी भेटली होती. तिनं चायना कॉटनची निळ्या रंगाची शर्ट पँट घातली होती आणि ती घोड्यावर बसून चालली होती. मी तिला तिची चिलीम मला देशील का म्हणून विचारले. आम्ही बोलत होतो तितका वेळ ती माझ्या युरोपियन चेहऱ्याकडे, माझ्या सुबक टोपीकडे, तुच्छतेने पाहत होती. एकाएकी तिला माझ्याशी बोलू नये असं वाटलं. ती मोठ्यांदा किंचाळली आणि टपटप करीत निघून गेली. अगदी तशीच लीदा पण मला परका समजत होती आणि माझा तिरस्कार करीत होती. बाह्यत: तिनं कधीच माझ्याबद्दल नाराजी दर्शविली नाही, पण मला ते नेहमी जाणवायचं. गप्पा मारता मारता माझं डोकं एकदम भडकायचं आणि मी म्हणायचो, 'आपण डॉक्टर नसताना शेतकऱ्यांवर औषधोपचार करणं म्हणजे त्यांना फसवणं आहे. तसंच स्वत:ची हजारो एकर जमीन असताना गरिबांविषयी कळवळा दाखवणं पण सोपंच आहे!'

लीदाची बहीण मिस्यूसवर कुठलीच जबाबदारी नव्हती. ती तिचं आयुष्य माझ्याप्रमाणेच पूर्णपणे आळशीपणात मन मानेल तसं घालवीत होती. सकाळी उठल्यावर ती हातात पुस्तक घेऊन व्हरांड्याच्या गुबगुबीत आरामखुर्चीत बसायची. त्यामुळे तिचे पाय जमिनीला कधीतरीच लागायचे. कधीतरी लिंबाच्या झाडांच्या राईत पुस्तकात डोकं खुपसून बसलेली दिसायची, नाहीतर गेटपलीकडील शेतात जायची. दिवसभर अधाशीपणे वाचन केल्यामुळेच तिचे डोळे बरेचदा थकलेले आणि झापड आल्यासारखे वाटायचे. तिचा चेहरा पण निस्तेज दिसायचा. तिच्या स्नायूंवर किती ताण पडतोय, हे तिच्या चेहऱ्यावरून कुणालाही कळायचं. मी जेव्हा त्यांच्याकडे जायचो तेव्हा मला पाहिल्यावर तिचा

चेहरा प्रफुल्लित व्हायचा. ती पुस्तक बाजूला सारायची, आपल्या मोठ्ठाल्या नि खेळकर डोळ्यांनी माझ्याकडे पाहत मला दिवसभरात काय काय घडलं, ते मोकळेपणानं सांगायची. उदा. नोकरांच्या चाळीत जिकडे तिकडे काजळी धरलीय, नाहीतर नोकराला आज एक मोठ्ठा मासा सापडला वगैरे वगैरे. सुट्टीचा दिवस सोडून ती बहुधा पांढरा ब्लाऊज आणि गडद निळा स्कर्ट घालून हिंडायची. आम्ही दोघं मिळून खूप भटकायचो, मुरंबा बनवण्यासाठी चेरी तोडायचो, नौकानयन करायचो. चेरी हाताला लागाव्यात म्हणून ती जेव्हा उडी मारायची किंवा वल्हं वल्हवायची तेव्हा तिच्या रुंद बाह्यांतून तिचे नाजूक, अशक्त हात दिसायचे. मी जेव्हा स्केचेस् काढायचो तेव्हा ती न्याहाळत कुतूहलानं माझ्याशेजारी उभी राहायची. जुलै महिन्याच्या शेवटल्या रविवारी दहा वाजण्याच्या सुमारास मी वलचानिनवींकडे गेलो होतो. घरापासून बऱ्याच अंतरावरच्या बागेत आम्ही अळिंबी शोधत हिंडत होतो. त्या वर्षी उन्हाळ्यात अळिंब्या खूप आल्या होत्या. जेनीबरोबर अळिंब्या गोळा करायला सोपं जावं म्हणून मी प्रत्येक अळिंबीजवळ काहीतरी खूण ठेवत होतो. गरम वारा वाहत होता. जेन्या आणि तिची आई दोघींनीही सणासुदीला घालावे तसे फिकट रंगाचे नवीन कपडे घातले होते. त्या दोघी चर्चमधून घरी परत येत होत्या. जेन्यानं आपली टोपी वाऱ्यानं उडून जाऊ नये म्हणून घट्ट धरून ठेवली होती. मग व्हरांड्यात बसून त्या चहा पीत असाव्या असं मला त्यांच्या आवाजावरून वाटलं. माझ्यासारख्या निष्काळजी आणि सदासर्वकाळच्या आपल्या आळसुडेपणाला पुष्टी मिळवण्याच्या शोधात असणाऱ्या माणसाला आमच्या या परिसरातील सुट्टीच्या दिवशीची उन्हाळ्यातील सकाळ अफलातून वाटायची. त्यामुळे अजून ओलसर असणारा हिरवागार बगीचा सूर्यकिरणात न्हाऊन निघालाय आणि मनाला सुखावून जातोय, घराभोवती 'मिग्नोनेट' आणि 'ओलिआंद्रो'चा सुवास दरवळतोय, चर्चमधून नुकतीच परतलेली तरुण मंडळी बागेत चहा पीत बसली आहेत, चांगले कपडे घातलेले, आनंदाने बेहोष झालेले लोक अवतीभोवती दिसताहेत. आपल्याला माहीत आहे की ही सर्व सुदृढ, खाऊनपिऊन सुखी, सुंदरसुंदर माणसं मोठा झालेला हा दिवस काहीही न करता मजेत घालविणार आहेत. अशावेळी वाटायला लागतं की सबंध आयुष्यच असं असतं तर! आज मीही तोच अनुभव घेत होतो, बागेत भटकत होतो आणि काहीही न करता संपूर्ण

दिवस, इतकंच नाही तर आख्खा उन्हाळा असाच रिकामटेकडेपणात घालवायची माझी तयारी होती.

टोपली हातात घेऊन जेन्या येऊन पोहोचली. तिच्या चेहऱ्यावरचे भाव सांगत होते की मी बागेत असणार, हे तिला माहीतच होते. आम्ही गप्पा मारतामारता अळिंब्या गोळा करीत होतो. ती जेव्हा जेव्हा मला प्रश्न विचारायची तेव्हा तेव्हा माझं तोंड दिसावं म्हणून चक्क माझ्यासमोर येऊन उभी राहायची. 'काल आमच्या खेड्यात एक चमत्कारच झाला,' जेन्या म्हणाली. 'लंगडी पिलागेया गेलं वर्षभर आजारी होती. कुठलाही डॉक्टर आणि कुठल्याही औषधाचा तिला काही उपयोग झाला नाही. पण काल एक म्हातारी तिच्या कानात काहीतरी पुटपुटली आणि ती एकदम खडखडीत बरी झाली!' 'हे काही महत्त्वाचं नाही!' मी म्हणालो. 'चमत्कार काही फक्त आजारी आणि म्हाताऱ्या माणसांच्या बाबतीत घडतो असं नाही. 'धडधाकट माणसं' हा सुद्धा एक चमत्कारच नाही का? प्रत्यक्ष माणसाचं जीवन? समजतं का आपल्याला त्याची कशी वाट लागणार आहे ते. मग तोही एक चमत्कारच म्हणायचा!' 'न उलगडणाऱ्या गोष्टींची तुम्हाला भीती नाही वाटत?' जेन्यानं विचारलं. 'नाही, निसर्गातील न उलगडणारी कोडी, ज्यांचं गूढ मला कळत नाही त्यांना मी आनंदानं सामोरा जातो, पण त्यांच्यापुढे शरणागती पत्करत नाही. मी स्वतःला त्यांच्यापेक्षा श्रेष्ठ समजतो. माणसानं स्वतःला सिंहापेक्षा, वाघापेक्षा, ताऱ्यांपेक्षा त्याचप्रमाणे निसर्गातल्या प्रत्येक गोष्टीपेक्षा श्रेष्ठ समजायला हवं. इतकंच नाही तर जे अनाकलनीय आहे, चमत्कार वाटणारं आहे त्याच्यापेक्षाही आपली विचारशक्ती प्रगल्भ आहे असं माणसाला वाटायला हवं. नाहीतर तो माणूस कसला? तो प्रत्येक गोष्टीला भिणारा उंदीरच म्हणायचा!' जेन्याला वाटायचं की मी एक चित्रकार आहे तेव्हा मला खूप काही माहीत असणार आणि जे मला माहीत नाही त्याविषयी तर्क करण्याची क्षमता माझ्यात निश्चितच असणार.

तिची अशी इच्छा होती की, मी तिला अती सुंदर अशा अनंताकडे, परलोकाकडे पोहोचण्यासाठी मार्गदर्शन करावं. तिच्या मते ह्या बाबतीत माझा गाढा अभ्यास आहे. ती माझ्याशी देवाच्या अस्तित्वाविषयी, इथं घडणाऱ्या चमत्कारांविषयी, अतीताविषयी बोलत बसायची. मी आणि माझा कलाविष्कार

यांचा कधीही अंत होणार नाही याबद्दल ठाम असणारा मी तिला म्हणालो, 'हो, माणसं अमर आहेत. हो, अमर्त्य जीवन आम्हाला त्या मार्गाकडे येण्यासाठी खुणावत आहे.' ती माझं बोलणं लक्षपूर्वक ऐकायची आणि ह्या तुमच्या बोलण्याला आधार काय ते सांगा असा आग्रहही तिनं कधी धरला नाही. मी जेव्हा घराकडे जायला निघालो तेव्हा ती एकदम थांबली आणि म्हणाली, 'आमची लीदा म्हणजे एक आदर्श तरुणी आहे, खरं की नाही! माझं तिच्यावर जीवापाड प्रेम आहे. तिच्यासाठी स्वत:ला सदैव समर्पित करण्याची माझी तयारी आहे. पण मला असं सांगा,' माझ्या बाहीवर बोट फिरवत तिनं विचारलं. 'तुम्ही तिच्याबरोबर का वाद घालत असता एकसारखा? तुम्ही इतका रागीटपणा का करता?' 'कारण ती जे बोलते ते बरोबर नसतं.' जेन्यानं नाराज होऊन डोकं हलवलं. तिच्या डोळ्यांत अश्रू उभे राहिले. 'मला तर काही कळतच नाही.' ती म्हणाली.

त्याचवेळी लीदा कुठूनतरी घरी परतत होती. शिडशिडीत, सुंदर, सूर्यकिरणात न्हाऊन निघालेली, हातात चाबूक धरलेली लीदा गड्याला काहीतरी काम सांगत होती. शांतपणे पण मोठ्या आवाजात विचारपूस करत तिनं दोनतीन रोग्यांना तपासलं. कामासाठी आलेल्यांची चौकशी केली, नंतर कसलीतरी काळजी लागल्यासारखी ती एका खोलीतून दुसऱ्या खोलीत जात होती. कपाटांची उघडझाप करीत होती. मग ती मेझोनिनमध्ये पोटमजल्यावर निघून गेली. जेवणासाठी कितीतरी वेळ सर्वजण तिला शोधत होते. हाका मारीत होते. पण आमचं सूप पिऊन झालं तेव्हा कुठं ती जेवणघरात आली. ह्या सर्व बारीकसारीक गोष्टी का कोण जाणे मला खडान्‌खडा आठवतात, आणि आठवायला आवडतात. पण! तो सबंध दिवस मला जसाच्या तसा आठवतो. तसं म्हणाल तर त्या दिवशी विशेष असं काहीच घडलं नव्हतं. जेवणानंतर जेन्या आरामखुर्चीत वाचत बसली. आणि मी व्हरांड्यात खाली पायरीवर बसलो. आम्ही काहीच बोलत नव्हतो. आकाश ढगाळ झालं होतं. आणि पावसाचे हलकेसे शिंतोडे पडायला लागले होते. हवेत गरमी होती. वारा केव्हाच पडला होता. असं वाटत होतं की हा दिवस कधी संपायचाच नाही. अेकातिरीना पावलोवना जास्त झोपेमुळे सुस्तावलेली पंखा हालवत आमच्याकडे व्हरांड्यात आली. 'ओ ममा,' जेन्या तिच्या हाताचं चुंबन घेत म्हणाली. 'दिवसा झोपणं तुला मना आहे!'

त्या दोघींची चांगली गट्टी होती. एकजण बागेत गेली तर दुसरी व्हरांड्यात उभी राहून झाडाकडे पाहत आवाज द्यायची. 'जेन्या कुठे आहेस तू?' नाहीतर दुसरी म्हणायची, 'मामका, काय करतेस गं?' त्या दोघी मिळून देवाची प्रार्थना करायच्या. दोघींचा एकमेकींवर विश्वास होता. त्या गप्प बसल्या असल्या तरी दुसरीच्या मनात काय चाललंय ते त्यांना बरोबर कळायचं. इतकंच नाही तर इतरांशीही त्यांचं वागणं एकाच तऱ्हेचं होतं. थोड्याच दिवसांचा सहवास असूनसुद्धा एकातरीना पावलवनाला माझ्याविषयी आपुलकी वाटू लागली होती. आमचे सूर चांगले जमले होते. मी जर दोन तीन दिवस त्यांच्याकडे गेलो नाही तर मी आजारी तर पडलो नाही ना अशी काळजी वाटून ती कुणालातरी माझी चौकशी करायला पाठवायची. माझ्या स्केचेस्‌कडे आईपण तितक्याच कुतूहलानं पाहायची. आणि मिस्यूसइतकीच बडबड करीत अगदी मोकळेपणानं काय काय घडलं ते मला सांगायची. पुष्कळदा घरातल्या खाजगी गोष्टीपण मला विश्वासानं सांगायची. एकातरीना पावलोवनाला आपल्या मोठ्या मुलीची थोडी भीतीच वाटायची. लीदा आपल्या आईशी कधी लाडात यायची नाही. नेहमी गंभीर गोष्टीवरच बोलायची. तिचं स्वतःचं असं वेगळं विश्व होतं. आई आणि छोट्या बहिणीच्या दृष्टीनं ती अगदी आदरणीय होती. त्याचबरोबर आपल्या स्वतःच्या मनाचा थांगपत्ता लागू न देणारी अशी वाटायची. बोटीवरच्या खलाशांना केबिनमध्ये बसलेल्या ॲडमिरलविषयी जसं गूढ असतं ना तसाच भाव लीदाविषयी त्या दोघींच्या मनात होता. 'आमची लीदा म्हणजे एक गुणी मुलगी आहे.' आई नेहमी म्हणायची. खरं की नाही? आत्तासुद्धा जोपर्यंत पाऊस पडत होता तोपर्यंत आम्ही लीदाविषयीच बोलत होतो. 'ती एक आदर्श व्यक्ती आहे.' आई म्हणाली. आणि एखाद्या कारस्थानी स्त्रीसारखी हळू आवाजात पुढे म्हणाली– 'अशी दुसरी मुलगी दिवसा दिवा लावूनसुद्धा पाहायला मिळायची नाही. पण तुम्हाला माहितेय, तिची मला थोडीशी काळजीच वाटते. शाळा, दवाखाने, पुस्तक हे सर्व ठीक आहे पण त्यात एवढी टोकाची भूमिका कशाला घ्यायला हवी? तिची आता पंचविशी आली. स्वतःविषयी गंभीरपणे विचार करण्याची वेळ आली आहे आता. जगाचा सतत विचार करायचा आणि जीवनातला महत्त्वाचा टप्पा हातातून निसटून जातोय त्याकडे लक्ष द्यायचं नाही... लग्न करायला हवंय तिनं आता!'

वाचनात शिणलेल्या, केस विसकटलेल्या जेन्यानं पुस्तकातून डोकं वर केलं आणि आईकडे पाहत आपल्याशीच बोलल्याप्रमाणे म्हणाली, 'देवाच्या मर्जीनं सर्व गोष्टी होत असतात!' आणि पुन्हा तिचं वाचन सुरू झालं. इतक्यात बेल्कुरव आपला कशिदा काढलेला शर्ट आणि चुणीदार, कमरेशी घट्ट असा कोट घालून त्यांच्याकडे आला. मग आम्ही क्रोकेट खेळलो, लॉन टेनिस खेळलो. अंधार पडल्यानंतर बराच वेळ आमचं जेवणच चाललं होतं. लीदा नेहमीप्रमाणे शाळेविषयी, सर्वेसर्वा अशा बलागिनविषयी बोलत होती. त्या दिवशी वलचानिनोवींकडून मी बाहेर पडलो तेव्हा सुस्तावलेपणात मजेत घालविलेल्या दिवसभराच्या गोड आठवणी मनात साठवूनच! त्याचबरोबर माझ्या मनाला एक दु:खद जाणीवपण होत होती की या जगात कुठलीही गोष्ट किती का लांब, आनंददायक असेना, तिला अंत हा आहेच. फाटकापर्यंत जेन्या आम्हाला पोचवायला आली होती. मी तिच्याबरोबर सबंध दिवस, सकाळपासून संध्याकाळपर्यंत घालविला होता. आणि का ते माहीत नाही पण आता हिच्याशिवाय आपल्याला करमायचं नाही असं वाटायला लागलं. हे सगळंच प्रेमळ कुटुंब मला जवळचं वाटायला लागलं होतं. सबंध उन्हाळ्यात आजच मला पहिल्यांदा चित्रं रंगवावंसं वाटत होतं. 'मला अजून कळलं नाही की असं कंटाळवाणं, नीरस जीवन घालवावं, असं तुम्हाला का वाटतं?' बेल्कुरवबरोबर घरी पोचताच मी त्याला विचारलं: 'माझं आयुष्य कंटाळवाणं, खडतर एकाच चाकोरीतून जाणारं आहे, कारण मी एक कलाकार आहे. विक्षिप्त आहे, परावलंबित्वामुळे तरुणपणातच खंगलेला, स्वत:बद्दल असमाधानी, आत्मविश्वास गमावलेला, दारिद्र्य पाचवीला पुजलेला, भटकंती करणारा असा आहे. पण तुम्ही! तुम्ही तर निरोगी, सरळमार्गी जमीनदार, वतनदार, मग तुम्ही असं नीरस आयुष्य का घालविता? जीवनातील आनंद का लुटत नाही? उदाहरणच द्यायचं झालं तर आजपर्यंत तुम्ही लीदा किंवा जेन्या या दोघींपैकी कोणाच्याच प्रेमात कसे पडला नाही?' 'तुम्ही विसरता आहात की माझं दुसऱ्या एका बाईवर प्रेम आहे!' बेल्कुरव उत्तरला. हे तो त्याच्या मैत्रिणीविषयी – ल्युबव इवानवनाविषयी बोलत असावा. ही लठ्ठ, गुटगुटीत, टेचात राहणारी, एखाद्या गुबगुबीत बदकाप्रमाणे दिसणारी, रशियन पेहराव केलेली, गळ्यात मण्यांच्या माळा घातलेली, डोक्यावर

कायम छत्री असलेली बाई मला दररोज बागेत हिंडताना दिसायची. तिची मोलकरीण तिला चहा प्यायला नाहीतर खायला बोलवीत असायची. तीन वर्षांपूर्वी तिनं या इस्टेटीतली एक खोली भाड्यानं घेतली होती. तेव्हापासून ती बेलकुरवबरोबरच राहत होती, आणि यापुढेही कायमच ती इथे राहील असं दिसत होतं. ती त्याच्यापेक्षा दहा वर्षांनी मोठी आहे, ती त्याला अगदी धाकात ठेवत असते. इथपर्यंत की घरातून बाहेर पडताना त्याला तिची परवानगी घ्यावी लागे. ती नेहमी आपल्या पुरुषी आवाजात हुंदके द्यायची ना तेव्हा मी तिला निरोप पाठवायचो की तिनं हुंदके देणं थांबवलं नाही तर मी हे घर सोडून जाईन, तेव्हा कुठं तिचं ते हुंदके देणं थांबायचं.

आम्ही घरी आल्यावर बेलकुरव, तंद्री लागल्यासारखा आपल्याच विचारात मग्न दिवाणवर बसला होता. मी प्रेमात पडलेल्या, हलक्याफुलक्या अवस्थेत दिवाणखान्यात फेऱ्या मारीत होतो. मला वलचानिनोवींविषयी बोलावंसं वाटत होतं. 'ही लीदा, शाळा, दवाखाने ह्यांच्यातच रस घेणाऱ्या, झेमूस्त्वामध्ये काम करणाऱ्या तिच्यासारख्या कार्यकर्त्यांवरच प्रेम करणार असं दिसतंय!' मी म्हणालो. 'खरं तर तिच्यासारख्या मुलीनं झेमूस्त्वाची कार्यकर्ती होण्यातच कृतकृत्यता मानायला नको तर आपल्या रशियन परिकथेतील नायिकेप्रमाणे पोलादी बूट झिजवत दूरवरच्या प्रियकराचा शोध घ्यायला हवा. आणि दुसरी ही मिस्यूस! काय लोभसवाणी मुलगी आहे ती!' बेलकुरव पाल्हाळ लावत, अं ... अं ... करत 'निराशावाद' हा या शतकातील माणसाला जडलेला असाध्य रोग आहे, हे सांगण्याचा प्रयास करीत होता. तो अगदी विश्वासानं अशा आवाजात बोलत होता की जणू मीच हा विषय काढून त्याच्याशी भांडण सुरू केलंय. एखादा माणूस आपलीच टकळी चालवत बसलाय, बोल बोल बोलतोय आणि त्याची ही चर्पटमंजरी केव्हा एकदा संपेल याच्या प्रतीक्षेत माणसाचं धैर्य एवढं खचून जातं की वैराण अशा दग्धभूकडे पाहूनसुद्धा खचणार नाही.' 'प्रश्न आशावाद वा निराशावाद हा नसून,' मी चिडून म्हणालो, 'आपल्या देशात शेकडा नव्व्याण्णव लोक निर्बुद्ध आहेत, हा खरा प्रश्न आहे!' बेलकुरवनं माझं हे बोलणं आपल्यावर ओढवून घेतलं, आणि स्वतःचा अपमान झाला असं वाटून तो तिथून निघून गेला.

३

'मालझ्योमवामध्ये राजेसाहेबांचा मुक्काम आहे. त्यांनी तुझी विचारपूस केलीय.' बाहेरून येऊन मोजे काढत काढतच लीदा म्हणाली. 'त्यांनी खूप बातम्या सांगितल्या .... येत्या प्रांतीय बैठकीत मालझ्योमवामध्ये एक प्रथमोपचार केंद्र उघडायचा प्रश्न आपण उपस्थित करणार आहोत. पण तो मान्य व्हायची फारशी आशा नाही असं ते म्हणत होते. आणि माझ्याकडे वळून ती म्हणाली, 'क्षमा करा, तुम्हाला या गोष्टीत रस नाही याचा मला सारखा विसरच पडतो.' मला तिचा खूप राग आला. 'का नसेल मला रस त्यात?' मी खांदे उडवून विचारलं. 'तुम्हालाच माझं म्हणणं ऐकून घ्यायची इच्छा नाहीये, पण मी खात्रीपूर्वक सांगतो की हा प्रश्न मला तुमच्याइतकाच महत्त्वाचा वाटतो! हो, हो, माझ्या मते मालझ्योमवामध्ये प्रथमोपचार केंद्राची मुळीच गरज नाहीये.' 'मग कशाची गरज आहे? लॅन्डस्केपची?' 'लॅन्डस्केप्सची नाही, तिथं असलं काहीच नकोय!' तिनं आपले मोजे काढले आणि नुकतंच डाकेतून येऊन पडलेलं वर्तमानपत्र उघडलं. थोड्या वेळानं संयम राखायचा आटोकाट प्रयत्न करीत ती म्हणाली, 'गेल्या आठवड्यात मुलाला जन्म देताना एका बाईचं मरण ओढवलं, हेच जर प्रथमोपचार केंद्र जवळ असतं तर ती माता जगली असती. आणि कलावंत महाशय, मला असं वाटतं की प्रत्येकाला भलं-बुरं पण स्वत:चं असं मत असायला हवं!'

'ह्याविषयी माझं अगदी नि:संदिग्ध असं मत आहे, तुम्हाला विश्वासानं सांगतोय मी –' मी म्हणालो. आणि तिनं मात्र आपली पुढे काही ऐकण्याची इच्छा नाही असं तोंडावर दर्शवीत वर्तमानपत्रात डोकं खुपसलं. 'माझ्या मते प्रथमोपचार केंद्र, पाठशाळा, वाचनालय, दवाखाने, ह्या गोष्टी सद्य:स्थितीत माणसांची गुलामगिरी वाढवितात. माणसं आधीच एका मोठ्या साखळदंडात अडकली आहेत, त्यात आणखी नव्या नव्या साखळ्यांची भर घालण्यापेक्षा पहिल्याच साखळ्या तोडायला हव्यात. घ्या! हा माझा निष्कर्ष आहे.' तिनं डोकं वर करून माझ्याकडे पाहत एक छद्मी हास्य केलं. मी माझ्या मूळ मुद्द्यापासून दूर न जाण्याचा प्रयत्न करत पुढे बोलत राहिलो.

'आन्ना बाळंतपणात मेली हे महत्त्वाचं नसून या सगळ्या आन्ना, मावरा, पेलगेया सकाळपासून संध्याकाळपर्यंत कामाच्या जोखडाखाली वाकलेल्या असतात. पाठदुखीमुळे आजारी पडतात. त्यांचं सबंध आयुष्य अर्धपोटी आणि आजारी मुलांच्या काळजीत जातं. दुखण्याच्या आणि मरणाच्या भीतीत जातं. त्यांच्या चेहऱ्यावरचं तेज वेळी-अवेळी ओसरायला लागतं. लवकर म्हाताऱ्या होतात त्या. आणि शेवटी घाणीत आणि दुर्गंधीतच मरण येतं त्यांना हे अधिक महत्त्वाचं आहे. त्यांची मुलं त्यांच्याच पावलावर पाऊल ठेवून वाढत असतात. शतकानुशतकं हे असंच चाललेलं आहे आणि लाखोंनी माणसं जनावरांपेक्षाही खालच्या पातळीवरचं आयुष्य कंठीत असतात. फक्त भाकरीच्या एका तुकड्यासाठी भीतीनं होणारा जीवाचा थरकाप अनुभवतात. सर्वात चिंतेची बाब जर कोणती असेल तर त्यांना आत्म्याचा विचार करण्यास संधीच नसते आणि करायला वेळ पण नसतो. ते पण परमेश्वराची एक प्रतिकृती म्हणून जन्माला आले आहेत. भूक, कडाक्याची थंडी, जनावरांचं भय, ढिगावारी कामाचा रगाडा, अशा दैन्यावस्थेत त्यांना राहावं लागतं. हिमवादळामुळे जसे बाहेर पडायचे सगळे मार्ग बंद होतात, तसंच ह्या लोकांच्या आत्म्याच्या शोध घेण्याच्या सर्व वाटा बंद झालेल्या असतात. विशेषकरून त्या लक्ष्याकडे पोहोचण्यापासूनही माणसं वंचित झालेली असतात, जिथे मनुष्य इतर प्राण्यांपेक्षा श्रेष्ठ ठरत असतो, आणि ज्या एका गोष्टीमुळे माणसाचं आयुष्य जगण्यालायक होतं. तुम्ही दवाखाने, शाळा यांच्या माध्यमातून मदतीचा हात पुढे करता, पण त्यामुळे त्यांचा मार्ग खुला होत नाही. तर तुम्ही त्यांच्या आयुष्यात नवनवीन दडपणं आणून त्यांच्या जबाबदाऱ्यांत भर घालता. त्यांना आधी कल्पना दिलेली नसते की, त्या औषधांसाठी, पुस्तकांसाठी झेमूस्त्वाला पैसे द्यावे लागतील. म्हणजेच त्यांना आर्थिक भार पण उचलावा लागेल.' 'तुमच्याशी मी वाद घालणार नाही.' लीदा वर्तमानपत्र बाजूला सारत म्हणाली. 'मी तुमचा सर्व युक्तिवाद लक्षपूर्वक ऐकला. मला तुम्हाला एकच सांगायचंय की, काहीच प्रयत्न न करता बसून राहणं योग्य नाही. खरंय की आम्ही मनुष्यमात्राला संसाराच्या जंजाळातून मुक्ती मिळवून देऊ शकत नाही. कदाचित बऱ्याच वेळा आमच्या हातून चुका होत असतीलही, परंतु आम्हाला त्यांच्यासाठी जे जे म्हणून करता येण्यासारखं आहे ते ते आम्ही करतो आणि आमचा हा मार्ग योग्यच आहे. सुशिक्षित माणसांपुढे सगळ्यांत भव्य, पवित्र असं आव्हान आहे

की त्यांनी आपल्या अल्पमतीप्रमाणे आपल्या जवळच्यांची सेवा करावी. तुम्हाला ते कबूल नाही पण काय करणार, सगळ्यांना खूष करणं कधीतरी शक्य आहे का?' 'बरोबर लीदा, तुझं म्हणणं अगदी बरोबर आहे.' तिच्या आईनं दुजोरा दिला.

लीदासमोर तिची आई अगदीच घाबरलेली असायची. बोलताना तिच्याकडे पाहत पाहत प्रत्येक शब्द ती काळजीपूर्वक वापरायची. आपण गरजेपेक्षा जास्त, अनावश्यक तर बोलत नाही ना, अशी तिला सारखी भीती वाटत असायची. तिनं लीदाला कधीच विरोध केला नाही, तर ती नेहमी 'बरोबर, लीदा बरोबर आहे, असं हो ला हो म्हणत असायची. 'शेतकऱ्यांची साक्षरता, केविलवाणा उपदेश, आणि मनोरंजक म्हणी असलेली पुस्तकं, प्रथमोपचार केंद्रे ह्या गोष्टी, ज्याप्रमाणे तुमच्या खिडकीतून येणारा प्रकाश, एवढा मोठा बगीचा प्रकाशित करू शकत नाही, त्याप्रमाणे त्यांचं अज्ञान कमी करू शकत नाहीत किंवा मृत्यूची टक्केवारी पण घटवू शकत नाहीत.' मी म्हणालो, 'तुम्ही त्यांना काहीही देत नसता, उलट त्यांच्या आयुष्यात तुम्ही केलेल्या ढवळाढवळीमुळे नवनवीन गरजा निर्माण होतात आणि कामाची नवी आव्हानं उभी राहतात.' 'अरे देवा, पण आपण काही केलं पाहिजे की नाही?' लीदा हळहळून म्हणाली.' तिच्या एकंदर सुरावरून माझं बोलणं तिला अगदीच निरर्थक आणि क्षुल्लक वाटत असावं.

'लोकांना शारीरिक कष्टातून मुक्त करण्याची गरज आहे,' मी म्हटलं. 'त्यांच्या खांद्यावरचं ओझं हलकं करायला हवं. म्हणजे मग त्यांना आयुष्यभर चुली फुंकायला आणि शेतात राबायला लागलं नसतं, त्यांना आत्म्याविषयी, परमेश्वराविषयी विचार करायला वेळ मिळाला असता आणि आपलं आत्मबळ अधिक वाढवता आलं असतं. प्रत्येक माणसानं आत्मोन्नतीसाठी घेतलेले परिश्रम म्हणजे सत्याचा सततचा पाठपुरावा आणि मानवी जीवनाचा गर्भितार्थ होय. इतके काबाडकष्ट करण्याची त्यांची अगतिकताच नष्ट करा म्हणजेच आपण स्वतंत्र आहोत असं त्यांना वाटेल, अशी परिस्थिती निर्माण करा तेव्हा तुम्हाला कळेल की ती पुस्तकं, दवाखाने ह्या किती हास्यास्पद गोष्टी आहेत ते. एकदा त्यांना त्यांच्या कामाची खरी किंमत कळली की मग धर्म, शास्त्र, कला ह्या गोष्टीत त्यांना समाधान मिळू लागेल. ह्या तुमच्या वरवरच्या मलमपट्ट्या काही नाही देणार त्यांना मन:शांती!'

'कामातून त्यांची सुटका करायची! शक्य तरी आहे का ते?' लीदा उपहासानं म्हणाली. 'हो आहे ते शक्य. त्यांच्या कामाचा काही वाटा तुम्ही आपल्याकडे घ्या. जर गावातला आणि शहरातला एकूण एक रहिवासी सर्वसाधारणपणे माणसाला त्याच्या शारीरिक योगदानासाठी समाधान देणाऱ्या कामाची आपापसांत वाटणी करायला तयार झाला तर कदाचित प्रत्येकाला आपल्या वाट्याचं काम करायला दिवसाकाठी दोनतीन तासच द्यावे लागतील. कल्पना करा आपल्या सर्वांना, श्रीमंत त्याचप्रमाणे गरीब माणसांना फक्त तीन तास काम करायला लागलं तर उरलेला वेळ आपण काहीही करायला मोकळे राहू. आणखी असासुद्धा विचार करा की आपण जर आपलं शरीर आणि कष्ट यावर विसंबून राहायला नको म्हणून शारीरिक कामाची जागा घेणारी नवनवीन यंत्रं शोधून काढली तर आपण आपल्या कामातला सहभाग कमीतकमी करण्याचा प्रयत्न करणार आहोत, आपल्या मुलांनी मनाशी पक्की खूणगाठ बांधायला हवी. आपल्याला उपासमार आणि थंडीवादळ ह्यांना भ्यायचं कारण नाही. आणि आपल्या मुलांच्या शारीरिक स्वास्थ्यासाठी आन्ना, मावरा, पिलागेया यांच्याप्रमाणे आपल्याला भयभीत व्हायला नको. आपल्याला जर उपचारच करून घ्यावे लागले नाहीत, दवाखाने, सिगरेटचे कारखाने, दारू गाळण्याचे कारखाने चालवायला लागले नाहीत तर आपल्याला कितीतरी रिकामा वेळ मिळेल बघा. आपण हा फुरसतीचा वेळ शास्त्र आणि कला यांच्यासाठी देऊ शकू. बरेचवेळा शेतकरी स्वत: सामुदायिक श्रमदानाने रस्ता करण्याचं काम आनंदानं करतात. तसंच जर सहकार्यानं, सर्वांनी मिळून सत्याचा आणि जीवनाचा अर्थ शोधून काढला – आणि आपण तसं करू अशी मला खात्री आहे – तर लवकरच सत्यच आपल्यापुढे येऊन ठाकेल, आणि मग मनुष्यप्राणी कायम सलणाऱ्या, सतत मरणाचं दडपण आणणाऱ्या भीतीपासून आपली सोडवणूक करून घेईल. इतकंच नाही तर प्रत्यक्ष मरणापासून त्याला मुक्ती मिळेल!'

'तुम्ही स्वत:चीच मतं खोडून काढताय' लीदा म्हणाली. 'तुम्हीच एकीकडे सारखं शास्त्र, शास्त्राचा अभ्यास असं म्हणताय आणि दुसरीकडे साक्षरतेला विरोध करताय!' 'माणसाला टपरीवर रंगवलेल्या पाट्या वाचता येणं, कधीतरी पुस्तक वाचणं की ज्यामधलं ओ की ठो कळत नाही. त्यालाच साक्षरता म्हणायचं का? अशा प्रकारची साक्षरता रशियाचा पहिला काल्पनिक राजपुत्र युरिकच्या

वेळेपासून, गोगलच्या कादंबरीतील नायक ' पित्रूष्का ' पासून ऐकत आलो आहोत आपण. इतकंच नव्हे तर गोगलच्या पुस्तकातील खेडं आणि आजचं खेडं यांत काडीचा फरक झाला नाहीये. आपल्याला साक्षरता नव्हे तर आत्मबलाच्या भव्य प्रदर्शनासाठी स्वातंत्र्य हवंय. आपल्याला शाळा नव्हे तर विद्यापीठं हवी आहेत. 'तुम्हीच तर वैद्यकशास्त्राला विरोध करीत होतात.' 'हो, रोगांचा अभ्यास करण्यासाठी आपल्याला वैद्यकशास्त्रांची गरज आहे. जशी निसर्गातील उद्भव समजण्याची आवश्यकता आपल्याला असते. रोग बरे करण्यासाठी ती आपल्याला नको आहेत. रोग बरा करायचा असेल तर रोगावर उपचार करायचे नाहीत तर रोगाचं मूळच आपल्याला उखडून टाकायचे आहे. त्यांच्या रोगाचं महत्त्वाचं कारण म्हणजे शारीरिक श्रम. तेच नाहीसे करा म्हणजे रोगाचा प्रादुर्भावच होणार नाही. जी शास्त्रं रोग्याला बरा करतात त्यांना माझा विरोध नाही.' मी उत्तेजित होऊन म्हणालो. 'शुद्ध स्वरूपातील शास्त्रं आणि कला यांचा उद्देश तात्पुरता आणि सीमित नसतो, तर ती सर्वांसाठी आणि सर्वकालीन असतात. त्यांना सत्याचा आणि जीवनाच्या अंतिम ध्येयाचा शोध अभिप्रेत असतो. ती परमेश्वराचा आणि आत्म्याचा शोध घेत असतात. सार्वजनिक आपत्तीच्या वेळी जेव्हा त्यांना गरजेपोटी दवाखान्याच्या किंवा वाचनालयाच्या स्वरूपात वेठीला धरतात तेव्हा शास्त्र आणि कला माणसाचं जीवन अधिक क्लिष्ट आणि संकुचित करतात. आपल्याकडे डॉक्टर्स, फार्मासिस्ट आणि वकील यांची कमतरता नाही, पुष्कळसे लोक साक्षर पण आहेत, पण जीवशास्त्रज्ञ, गणिती, तत्त्वज्ञानी यांचा अभाव आहे. सगळी बुद्धी, आत्मिक शक्ती, तत्कालीन समस्यांवर खर्ची पडते... शास्त्रज्ञ, लेखक, कलाकार यांच्यापुढे कामाचा डोंगर असतो पण त्यांच्याच कृपेमुळे सुखासीनता दिवसेंदिवस वाढत असते आणि शेवटी अंतिम सत्याकडे जाण्याची वाट दूरच राहते आणि मनुष्य पूर्वीप्रमाणेच निर्दय आणि कर्दमातील हिंस्र पशूप्रमाणे खालच्या पातळीवर राहतो. या सगळ्याचं पर्यवसान अशात होतं की बहुधा माणुसकीचं स्खलन होतं आणि त्यांच्या जीवनातील जोश कायमचा नष्ट होतो. अशा वातावरणात कलाकाराचं जीवन निरर्थक बनतं. जसजशी त्या कलाकारातील कौशल्ये उंचावतात तसतशी त्याची वर्तणूक अनाकलनीय आणि विक्षिप्त बनते. प्रचलित जीवनशैलीला अनुसरूनही तो हिंस्र आणि रौरवात लोळणाऱ्या पशुवृत्तीचं चित्रण करतो. मला स्वत:ला हे आवडत नाही, आणि मी

ते कदापि करणार नाही. होऊ दे जगाचा नायनाट, मला त्याच्याशी काही देणं घेणं नाही!' 'मिस्यूस, तू नको थांबूस इथं. जा बाहेर.' माझं बोलणं तिच्यासारख्या तरुण कोवळ्या मुलीवर चांगला परिणाम करणार नाही, असं वाटून लीदा आपल्या बहिणीला म्हणाली. जेन्यानं बहीण आणि आईकडे नाखुषीनं पाहिलं आणि तिनं तिथून काढता पाय घेतला. 'आपल्या निरिच्छ निराकार वृत्तीचं समर्थन करण्यासाठी सहसा अशा तऱ्हेची साखरपेरणी केली जाते.' लीदा म्हणाली. 'माणसांना रोगमुक्त करणं किंवा सुशिक्षित करणं ह्यापेक्षा दवाखाने आणि शिक्षणसंस्था यांना विरोध करणं केव्हाही सोपंच आहे!' 'अगदी खरंय, अगदी बरोबर आहे तुझं म्हणणं, लीदा.' आईनं सहमती दर्शविली. 'तुम्ही धाक दाखवता आहात की तुम्ही काऽऽही करणार नाही.' लीदा पुढे म्हणाली, 'याचा अर्थ स्पष्टच आहे की, तुम्ही तुमच्या कामाला अवास्तव महत्त्व देता. आपली ही चर्चा इथेच थांबवलेली बरी. आपल्याला एका सुरात कधीच गाता येणार नाहीय. ही सगळी वाचनालयं आणि दवाखाने त्यांच्यामधील तुटींसह माझ्या दृष्टीनं जगातील सर्वोत्कृष्ट चित्रापेक्षाही महत्त्वाची आहेत.' त्याच क्षणी ती आईला उद्देशून वेगळ्याच सुरात म्हणाली, 'राजेसाहेब, पूर्वी इथे होते त्यापेक्षा खूप अशक्त झाले आहेत, खूप बदलले पण आहेत. त्यांना उपचारासाठी फ्रान्समध्ये वीचीला पाठवताहेत.' माझ्याशी बोलायला नको म्हणून लीदा आईशी राजेसाहेबांबद्दल बोलायला लागली. तिचा चेहरा लालबुंद झाला होता. आणि आपली बेचैनी लपविण्यासाठी लघुदृष्टी असलेल्या माणसासारखी टेबलावर डोकं खूप वाकवून ती वर्तमानपत्र वाचण्याचा बहाणा करत होती. माझं तिथलं अस्तित्व मोठंसं आनंददायक राहिलं नव्हतं. मी त्यांचा निरोप घेऊन घरी परतलो.

अवतीभोवती शांतता पसरली होती. तलावाच्या काठावरचं खेडं झोपलं होतं. सगळ्या घरातील चुली विझल्या होत्या. फक्त तलावाच्या पाण्यावर तुरळक ताऱ्यांची फिकट प्रतिबिंबं लुकलुकत होती. सिंहमुखे बसविलेल्या फाटकाजवळ जेन्या मला निरोप देण्यासाठी माझी वाट पाहत मुकाट्यानं उभी होती. 'समोरच्या खेड्यातील सगळी माणसं गाढ झोपली आहेत!' अंधारात तिचा चेहरा पाहण्याचा प्रयत्न करीत मी म्हणालो. तेव्हा मला तिचे रडवेले डोळे माझ्यावर स्थिर झालेले दिसले. 'विश्रामगृहातील चौकीदार आणि घोडेस्वार देखील शांत झोपेत आहेत. आपण सुशिक्षित, सभ्य लोक मात्र चिडचिड करीत आणि वादंग घालीत बसतो.'

ऑगस्ट महिन्यातील कुंद रात्र होती ती. मी कुंद अशासाठी म्हणतोय की शिशिर ऋतूचा वास यायला लागला होता, किरमिजी रंगाच्या ढगांनी झाकलेला चंद्र बाहेर पडत होता आणि अधूनमधून रस्ता आणि थंडीतली अंधारात बुडलेली शेतं प्रकाशित करीत होता. आकाशातून एकापाठोपाठ एक उल्कापात होत होता. जेन्या माझ्याबरोबर रस्त्यानं चालली होती. आकाशाकडे पाहायचं नाही असा तिचा प्रयत्न होता. म्हणजे मग तिला निखळणाऱ्या उल्का पाहायला लागल्या नसत्या. का कोण जाणे त्यांची तिला भीती वाटत होती. 'मला वाटतं, तुम्ही जे आज बोलत होतात ते अगदी बरोबर आहे!' रात्रीच्या दमटपणामुळे थरकाप उडून ती म्हणाली, 'सर्वच माणसं जर एकत्र मिळून आपआपली आत्मिक क्षमता उपयोगात आणू शकली तर थोड्याच दिवसांत त्यांची सारासार विचारशक्ती वाढेल!' 'अगदी बरोबर. मनुष्य हा इतर प्राणिमात्रांपेक्षा उच्च कोटीतील प्राणी आहे. आपण जर आपल्या आत्मबळाचा उपयोग करून घेण्याच्या बाबतीत जागृत राहिलो आणि उच्चतम ध्येय साध्य करण्यासाठी आपलं आयुष्य वेचलं तर सरतेशेवटी आपण देवत्वापर्यंत पोहोचू, पण हे होणे नाही. माणुसकीला उतरती कळा लागेल आणि प्रगल्भतेचा मागमूसही राहणार नाही.' फाटक जेव्हा दिसेनासं झालं तेव्हा जेन्या थांबली आणि घाईघाईनं तिनं माझा हात हातात घेतला. 'गुड नाईट.' ती कचरतच म्हणाली. तिनं अंगात फक्त ब्लाऊजच घातला होता आणि ती थंडीत कुडकुडत होती. 'उद्या याल ना?'

ती गेल्यावर आपल्या स्वतःच्या व लोकांच्या बाबतीतही असमाधानी आणि चिडलेलो असे आपण आता एकटे राहू असं मला वाटलं. कारण माझीसुद्धा आता निखळणाऱ्या ताऱ्यांकडे पाहायची हिंमत होत नव्हती. 'थोडावेळ थांबा ना माझ्यापाशी.' मी म्हणालो. 'मी विनंती करतो तुम्हाला.' मी जेन्यावर प्रेम करत होतो. ती मला वरचेवर भेटायची. मला पोहोचवायला यायची. इतकंच नव्हे तर ती माझ्याकडे स्नेहार्द्रतेनं आणि आदराने पाहायची. म्हणूनच मला ती आवडत असणार. तिचा गोरा, मधुर, मनाला स्पर्शून जाणारा चेहरा, नाजूक मान, नाजुकसे हात, तिचा हळुवारपणा, मार्दव, तिचा आळसटलेपणा, वाचनाची आवड, सगळंच कसं मनाला भुरळ पाडणार होतं! पण तिची बुद्धिमत्ता, तिच्या हुशारीविषयी मला जरा शंका होती. तिच्या प्रगल्भ विचारांचा मी आदर करीत होतो. कदाचित असंही असेल की शिस्तप्रिय, देखण्या पण माझ्याशी तुटकपणे

वागणाऱ्या लीदाच्या तुलनेत जेन्याचा जगाकडे पाहण्याचा दृष्टिकोण वेगळा होता म्हणूनही ती मला आवडत असेल. जेन्याला माझ्यातला कलावंत आवडला होता. माझ्यातील कलागुणांनी तिचं हृदय जिंकून घेतलं होतं. मला फक्त तिच्यासाठीच चित्रं काढावीशी वाटायची. तिचीच स्वप्नं पडायची मला. ती माझी छोटीशी राणी आहे, जी माझ्याबरोबर ह्या झाडावर, शेतांवर, धुक्यावर, सूर्यप्रकाशावर, इथल्या विलोभनीय आणि मोहक निसर्गावर आधिपत्य गाजवणार आहे. आणि ह्याच निसर्गाच्या सान्निध्यात इतके दिवस राहूनही मी स्वत:ला अगदी एकटा, निरुपयोगी समजत होतो. 'एक मिनिट थांबाल का अजून ?' मी तिला विनवणीच्या स्वरात विचारलं. मी माझा ओव्हरकोट काढला आणि तिच्या गारठलेल्या खांद्याभोवती लपेटला. तो ढगळ, पुरुषी, विदूषकी ओव्हरकोट घालून स्वत:चा अवतार दाखविण्याची तिला भीती वाटली. ती हसली आणि तिनं कोट अंगावरून काढून दूर भिरकावून दिला. अगदी ह्याचवेळी मी तिला मिठीत घेतलं आणि तिचं तोंड, खांदे, हात या सगळ्यांची पटापट चुंबनं घ्यायला लागलो. 'उद्या भेटूया.' ती हळूच म्हणाली. आणि रात्रीच्या नीरवतेचा भंग होईल म्हणून की काय तिनं हळुवारपणे मला मिठी मारली. 'आम्ही सर्वजण एकमेकांपासून काही लपवून ठेवीत नाही, मला आत्ताच्या आत्ता ममा आणि लीदाला सर्व काही सांगायला हवं ! किती भयंकर आहे ते ... ममाचं काही नाही हो, तिला तुम्ही आवडता. पण लीदा ! तिचं काय ?' म्हणत तिनं फाटकाकडे पळ काढला. 'बाय, बाय !' ती ओरडली.

त्यानंतर पळत जाणाऱ्या तिच्या पाठमोऱ्या आकृतीकडे मी पाहत राहिलो. मला घरी जावंसं वाटेना. घरी जायचं काही कारणच उरलं नव्हतं. मी जरा विचार करीत तसाच उभा राहिलो काही वेळ. आणि मग ज्या घरात ती राहत होती ते घर पुन्हा एकदा पाहावं म्हणून मी मागे फिरलो. ते टुमदार जुनं घर मेझोनिनमधल्या आपल्या खिडक्यांनी माझ्याकडे पाहत होतं. त्या खिडक्या म्हणजे जणू काही त्या घराचे डोळेच होते, आणि त्याला सर्व काही कळून चुकलं होतं. मी पायऱ्यांजवळून पुढे गेलो. आणि लॉन टेनिस कोर्टाच्या जवळच्या एका एल्म वृक्षाखाली अंधाऱ्या बाकावर बसून घराचे निरीक्षण करू लागलो. मिस्यूस राहत होती त्या भागातल्या मेझोनिनच्या पोटमजल्याच्या खिडक्या आतील झगमगाटामुळे एकदम स्वच्छ प्रकाशित झाल्या. मग त्यातून शांत हिरवा प्रकाश

बाहेर पडला. हिरवी लँपशेड असलेला दिवा होता हा. त्यातून सावल्या हालत होत्या... हळू कोमल भावना, सभोवतालची शांतता, झाल्या प्रसंगातून एक प्रकारचं वाटणारं समाधान ह्या सर्व गोष्टींनी मी अगदी भारावून गेलो होतो. समाधान अशासाठी वाटत होतं की, आपण पण कोणाशी जवळीक करू शकलो आणि त्या व्यक्तीच्या प्रेमात पण पडलो, पण बरोबर त्याच क्षणी काही पावलांच्याच अंतरावर त्या घरातील एका खोलीत माझ्याविषयी दु:स्वास किंवा द्वेषच करणारी लीदा राहतेय असा विचार मनात आल्यामुळे मी जरा बेचैनही झालो होतो. जेन्या केव्हातरी बाहेर डोकावेल ह्या वेड्या आशेनं मी कान टवकारून तेथेच बसून राहिलो. मला असा भास झाला की पोटमजल्यावर कोणीतरी बोलतंय. असाच एक तास उलटून गेला. हिरवा दिवा मालवला. आणि सावल्यापण दिसेनाशा झाल्या. चंद्र घराच्या छपरावर पोहोचला होता आणि झोपलेली बाग, त्यातील पाऊलवाट प्रकाशित करत होता. फुलांच्या वाफ्यातील डेलिया, गुलाबाची फुलं स्पष्ट दिसत होती. ती दोन्हीही एकाच रंगाची वाटत होती. हवेत चांगलाच गारवा आला होता. मी बागेतून बाहेर पडलो. जाताजाता माझा ओव्हरकोट धुंडाळला आणि सावकाशपणे घरी आलो. दुसऱ्या दिवशी जेवल्यानंतर मी वलचानिनोवींकडे गेलो तेव्हा बागेकडचा काचेच्या फ्रेमचा दरवाजा सताड उघडा होता. मी एवढ्यात फुलांच्या वाफ्यामागून चौकात नाहीतर एखाद्या पाऊलवाटेवर जेन्या दिसेल या आशेनं पायऱ्यावर बसून राहिलो. घरातल्या एखाद्या खोलीतून तरी तिचा आवाज ऐकू येईल असं मला वाटत होतं. नंतर मी बैठकीच्या खोलीतून, जेवणघरातून फेरी मारली. कुठेही माणसांची चाहूल येत नव्हती. जेवणघरातून लांबच लांब कॉरीडॉर पार करून माजघरातून मी पलीकडे गेलो. कॉरीडॉरमध्ये बऱ्याच खोल्यांची दारं उघडत असत. त्यातल्या एका खोलीतून लीदाचा आवाज माझ्या कानावर पडला. 'कावळ्याला... कुठंतरी... देत...' ती म्हणाली. ती थांबत थांबत मोठ्या आवाजात बोलत होती. ती कोणाला तरी शुद्धलेखन घालत असावी. 'देवानं चीजचा तुकडा पाठवला... कावळ्याला कुठेतरी... कोण आहे तिकडे?' माझ्या पावलांचा आवाज ऐकून तिनं लगेच प्रतिसाद दिला... 'मी आलोय!' 'हं, हं. माफ करा मी आता तुमच्याकडे येऊ शकत नाही. कारण मी दाशाचा अभ्यास घेतेय.' 'एकातेरीना पावलोवना बागेत आहे का?' 'ती आजच माझ्या बहिणीला घेऊन पेन्झा जिल्ह्यात आत्याकडे गेलीय आणि हिवाळ्यात

त्यांचा तिथूनच परदेशी जायचा बेत आहे...' ती शांतपणे पुढे म्हणाली. 'कावळ्याला... देवानं.... कुठंतरी चीजचा... तुकडा पाठविला.' मी हॉलमध्ये आलो आणि सुन्नपणे उभा राहिलो, तिथूनच तलावाकडे, पलीकडील खेड्याकडे पाहत राहिलो. माझ्या कानावर लीदाचे शब्द पडतच होते. 'चीजचा ... तुकडा ... कावळ्याला कुठेतरी ... देवानं.' मी त्या इस्टेटीतून ज्या वाटेनं पहिल्यांदा आलो होतो त्याच वाटेनं बाहेर पडलो. फक्त उलट क्रमानं, पहिल्यांदा अंगणातून घराजवळून बागेत नंतर लिंबाच्या राईतून ... तिथंच मला एका लहान मुलानं गाठलं आणि माझ्या हातात एक चिठ्ठी दिली. 'मी बहिणीला सर्व इत्थंभूत सांगितलं. तिची आज्ञा आहे की मी तुमच्यापासून दूर जावं.' मी चिठ्ठी पुढे वाचू लागलो. 'तिच्या आज्ञेचं उल्लंघन करून तिला दु:खी करायची माझी हिम्मत नव्हती. देव तुमचं भलं करो. मला क्षमा करा. मी आणि ममा काल किती ओक्साबोक्शी रडलो याची तुम्हाला कल्पना असती तर!'

मी परत पुढे चालू लागलो. कुंपणाला झाकून टाकणाऱ्या फरच्या रांगा... त्याच शेतांमध्ये तेव्हा बार्लीला बहर आला होता. आणि जंगली कोंबडा ओरडत होता तिथे. गाई चरत होत्या आणि घोडे अडखळत पळत होते. टेकड्यांवर कुठे कुठे हिरवेगार रब्बी पिकांचे शेत तरारत होते. मी खिन्न झालो होतो. वलचानिनोवींशी केलेल्या जवळिकेची मलाच आता शरम वाटू लागली, आणि मी पूर्ववत निराशावादी झालो. घरी जाऊन मी थोडी विश्रांती घेतली आणि संध्याकाळी पीटरबुर्गचा रस्ता धरला.

त्यानंतर मी वलचानिनोवींना कधीही भेटलो नाही.

असंच एकदा क्रिमियाला जाताना गाडीत मला बेलकुरव भेटला. पहिल्याप्रमाणेच त्यानं कमरेशी चुण्या असलेला कोट आणि भरतकाम केलेला शर्ट घातला होता. मी जेव्हा त्याच्या प्रकृतीची चौकशी केली तेव्हा तो उत्तरला, 'आपल्या कृपेनं ठीक आहे.' आम्ही बऱ्याच गप्पा मारल्या. त्यानं स्वत:ची इस्टेट विकून दुसरी थोडी लहान इस्टेट ल्यूबोवा इवानवाच्या नावानं खरीदली होती. वलचानिनोवी संबंधी तो फारसं बोलला नाही. त्याच्या सांगण्याप्रमाणे लीदा पूर्वीप्रमाणेच शेलकोवामध्ये शिक्षिकेचं काम करत होती. तिच्याशी समविचारी

अशा लोकांचं एक मंडळ स्थापण्यात तिनं हळूहळू यश मिळवलं होतं. त्यांनी सगळ्यांनी मिळून एका मजबूत पक्षाची स्थापना केली होती. झेमूस्त्वाच्या गेल्या निवडणुकीत त्यांच्या पक्षानं आत्तापर्यंत सगळ्या प्रांताची सत्ता बळकावून बसलेल्या बलागीनला धूळ चारली होती. बेलकुरवनं सांगितलं, जेन्या आता तिथल्या घरात राहत नाही. आणि कुठे राहते त्याचा त्याला पत्ता नाही.

आता मला पोटमजल्याच्या त्या घराचा जवळजवळ विसर पडू लागला आहे. मी जेव्हा चित्रं काढीत असतो किंवा वाचत असतो तेव्हा क्वचितच एखादेवेळेस मला खिडकीतून दिसणाऱ्या हिरव्या नाईटलॅम्पची नाहीतर प्रेमाच्या धुंदीत शेतातून परतताना येणाऱ्या पायरवाची किंवा थंडीमुळे गारठलेल्या माझ्या हातांची आठवण येते. जेव्हा मला एकटेपणा खायला उठतो आणि मी खिन्न, विमनस्क होतो, तेव्हा मला अंधुकशा आठवणी येतात. आणि का कोण जाणे मला विश्वास वाटायला लागतो की जेन्या आणि तिची आई माझीसुद्धा आठवण काढत असणार, आणि आम्ही कुठेतरी निश्चित परत भेटणार ...

'मिस्यूस, कुठे आहेस ग तू?'

: ४ :

कोषात गुरफटलेला

शिकारीहून परतायला उशीर झाल्यामुळे दोन शिकारी, मिरोनसीत्सकी गावाच्या मुखिया प्रकोफियाच्या वेशीजवळच्या शेतावरील झोपडीमध्ये रात्री मुक्कामाला थांबले. जनावरांचा डॉक्टर इवान इवानिच आणि जिम्नाझियामधला अध्यापक बुरकिन. इवान इवानिचचं आडनाव फारच मजेशीर होतं. चिमिशा गिमालायस्की. त्याला ते मुळीच शोभत नव्हतं. त्यामुळे सगळ्या परगण्यात त्याला त्याच्या आणि त्याच्या वडिलांच्या नावानेच संबोधत होते, इवान इवानिच म्हणून. तो शहरापासून जवळच असलेल्या अश्वपैदास केंद्रापाशी राहत होता. स्वच्छ, मोकळ्या जागी हवा खायला म्हणून तो जंगलात शिकारीला गेला होता. जिम्नाझियातील शिक्षक बुरकिनचा दरवर्षी उन्हाळ्यात सरदार 'पी'च्या कडे येण्याचा परिपाठ होता. त्यामुळे ह्या गावातील लोकांशी चांगलीच ओळख होती त्याची.

रात्री ती दोघं झोपलीच नाहीत. उंच, हडकुळा, लांब मिशावाला, वयस्क इवान इवानिच दारातच बसून चिलीम ओढत होता. त्याच्या अंगावर चांदणं पडलं होतं. बुरकिन झोपडीच्या आतल्या बाजूला आडवा झाला होता. अंधारात त्याचा चेहरा दिसत नव्हता. वेगवेगळ्या विषयांवरच्या त्यांच्या गप्पा ऐन रंगात आल्या होत्या. बोलता बोलता मुखियाची बायको मावराचा विषय निघाला. मावरा एक निकोप, हुशार बाई होती म्हणे. पण आयुष्यात कधीही तिनं आपल्या गावाची वेस ओलांडली नव्हती. कधी शहर पाहिलं नव्हतं की कधी आगगाडी. गेली दहा वर्षे तर ती चुलीजवळच बसलेली असायची. फक्त अंधार पडल्यावर रात्री बाहेर रस्त्यावर यायची.

'ह्यात एवढं आश्चर्य वाटण्यासारखं काय आहे?' बुरकिन म्हणाला. एकलकोंड्या माणसांची ह्या जगात कमतरता कुठं आहे? ही माणसं खेकडे, नाहीतर गोगलगायीप्रमाणे स्वत:च स्वत:साठी तयार केलेल्या कोषात दडून

बसण्याचा प्रयत्न करीत असतात. हा माणसाच्या सुप्तावस्थेतील गुणसूत्राचा पुनर्भवच म्हणायचा. जेव्हा मनुष्यप्राणी समूह करून राहण्याच्या अवस्थेपर्यंत पोहोचला नव्हता, आपल्याच गुहेत एकटा राहायचा. किंवा माणसाच्या स्वभावातील विविध छटांपैकी ही एक छटा असेल. कोणाला माहीत काय आहे ते! मी काही शास्त्रज्ञ नाही त्यामुळे ह्या विषयावर मत मांडण्याचा माझा अधिकार पण नाही. मला फक्त इतकंच म्हणायचंय की मावरासारख्या व्यक्ती अभावानंच दिसतात असं नाही. अशा लोकांना शोधायला कुठे लांब जायला नको. दोन महिन्यांपूर्वीच आमच्या गावातला माझा मित्र बेलीकोव स्वर्गवासी झाला. तो ग्रीक भाषेचा शिक्षक होता. तुम्ही नक्कीच त्याच्याविषयी ऐकलं असणार. त्याची प्रसिद्धीच तशी होती. कुठल्याही हवामानात तो गमबूट आणि छत्री घेतल्याशिवाय घराबाहेर पडायचा नाही. इतकंच नाही तर त्याच्या अंगावर रजईसारखा, कापूस भरलेला ओव्हरकोट असायचा. त्याच्या छत्रीला नेहमी कव्हर घातलेलं असायचं. त्याचं घड्याळ करड्या रंगाच्या कातडी पिशवीत असायचं. आणि पेन्सिलीला टोक करायला जेव्हा तो चाकू बाहेर काढायचा, तो चाकूसुद्धा बारक्याशा पाकिटात ठेवलेला असायचा. इतकंच काय, त्याचा चेहरासुद्धा झाकलेला असायचा. कारण तो आपला चेहरा ऊंच कॉलरमध्ये लपवून ठेवायचा. तो काळे गॉगल्स घालायचा आणि बारा महिने अठरा काळ स्वेटरपण घालायचा. कानात कापसाचे बोळे कोंबायचा. घोडागाडीत बसला की लागलीच टप बंद करून घ्यायला सांगायचा. एकंदरीत काय, ह्या माणसाला सदैव, न कंटाळता स्वतःला गवसणीत गुरफटून घ्यायची प्रबळ इच्छा असे. आपल्याभोवती एक कवच निर्माण करावंसं वाटे. त्यामुळे तो लोकांपासून कायम अलग राही आणि बाह्य गोष्टींच्या प्रभावापासून त्याचं संरक्षण होई. वास्तवता त्याला हादरून सोडायची, घाबरवायची, कायमच्या खिन्नतेत बुडवून टाकायची आणि कदाचित आपल्या या भित्रेपणाचं आणि वर्तमानकाळाविषयी वाटणाऱ्या तिरस्काराचं समर्थन करण्यासाठी तो भूतकाळाचे आणि प्रत्यक्षात कधी नव्हत्याच अशा गोष्टींचे गोडवे गायचा. तो शिकवत असलेल्या प्राचीन भाषा त्याच्या दृष्टीने गमबूट आणि छत्रीसारख्याच होत्या. त्यांच्या बुरख्याआड तो प्रत्यक्ष जीवनापासून स्वतःला झाकून घ्यायचा.



'ओ, किती ओघवती, सुरेल आहे ही ग्रीक भाषा.' गोड गोड शब्दात, डोळे मिचकवत त्यानं आपली भावना व्यक्त केली. आणि एक बोट वर करीत म्हणाला, 'आंत्रोपोस!'*

आपले विचार लपवायचा प्रयत्न असायचा त्याचा. त्याला सरकारी निवेदनं आणि वर्तमानपत्रातले स्तंभलेखन आवडायचं. कारण त्यात काहीतरी करू नये असं मनाईवजा लिखाण असायचं. एखाद्या निवेदनामध्ये विद्यार्थ्यांना संध्याकाळी नऊ वाजल्यानंतर बाहेर पडायला मनाई केली गेली असेल, किंवा एखाद्या वर्तमानपत्राच्या संपादकीयात दिखाऊ, आचरट प्रेमचाळ्यांवर कडक टीका केलेली असेल तर ते त्याला एकदम पसंत पडायचं. योग्य वाटायचं. 'मनाई, बंदी - एकदम छान!' एखाद्या ठरावामध्ये जाहीर केलेल्या सवलतींमध्ये सुद्धा त्याला काहीतरी गूढ, खोचक असं वाटायचं. काहीतरी अस्पष्ट, संशयास्पद असं वाटायचं. गावामध्ये हौशी नाटक मंडळी स्थापायचं ठरवलं, वाचनालय काढायचं ठरवलं किंवा साधी चहापार्टी आयोजित केली तरी तो डोकं हालवायचा आणि शांतपणे म्हणायचा, 'करताहेत मंडळी ते ठीकच आहे. कल्पना चांगली आहे. पण त्याच्यातून काही भानगड उपटली नाही म्हणजे झालं!'

कुठल्याही स्वरूपातील विध्वंसक वृत्ती, फसवाफसवी, कायदेभंग अशा गोष्टी आमच्याकडे नेहमीच चालायच्या आणि तसं पाहिलं तर बेलीकोवचा त्याच्याशी दूरान्वयानं सुद्धा संबंध नसायचा. आणि हे माहीत असूनही तो विमनस्क व्हायचा. त्याच्या मित्रांपैकी कुणाला चर्चमध्ये प्रार्थनेला यायला उशीर झाला, जिम्नाझियात कोणी काही खोडसाळपणा केला, अशी कुणकुण कानावर आली, किंवा विद्यार्थिनींवर देखरेख करणाऱ्या मेट्रनला रात्री उशिरा एखाद्या अधिकाऱ्याबरोबर कुणी पाहिलं तर तो अगदी बेचैन व्हायचा आणि सारखं म्हणायचा की, 'ह्यातून काही राईचा पर्वत नाही झाला म्हणजे मिळवली.' भाषाशास्त्राच्या अध्यापकांच्या सभांमध्ये तो आपल्या सावधानतेच्या इशाऱ्यांनी, निखालस कोषांतर्गत कार्यकारण भावामुळे, काळजीच्या सुरांनी आम्हाला अक्षरशः भंडावून सोडायचा. उदा. जिम्नाझियामधल्या विद्यार्थी-विद्यार्थिनींचं चालचलन असभ्यपणाचं झालं आहे. मुलं वर्गामध्ये फारच दंगाधोपा करतात, आता ही बातमी मुख्याध्यापकांपर्यंत पोहोचली नाही म्हणजे मिळवलं. त्याच्यापेक्षा तिसरीतल्या

प्येत्रोवची आणि चवथ्या वर्गातल्या इगोरची जिम्नाझियामधून हकालपट्टीच केलेली बरी. त्याच्या त्या गंभीर उसाश्यांनी, कुरकुरींनी, त्याच्या त्या दीनवाण्या उदमांजरासारख्या दिसणाऱ्या छोट्या चेहऱ्यानं, काळ्या गॉगल्सनी आमच्यावर इतकं दडपण आलं की आम्ही सपशेल शरणागती पत्करली. प्येत्रोव आणि इंगोरवर ठेवलेला ठपका मान्य केला, त्यांना पकडलं आणि सरतेशेवटी दोघांनाही जिम्नाझियामधून काढून टाकण्यात आलं. त्याला एक घाणेरडी सवय होती. दुसऱ्या शिक्षकांच्या घरी वरचेवर फेरफटका मारायची. तो आमच्या घरी यायचा. कुठंतरी तंद्री लावून मूकस्तंभासारखा तास, दोन तास बसायचा आणि निघून जायचा. सहकाऱ्यांबरोबरचे स्नेहसंबंध दृढ व्हावेत म्हणून तो असं करायचा म्हणे. याचा अर्थ आमच्याकडे येणं आणि असं बसून राहणं त्याला आवडत होतं असं नाही. तर सहाध्यायींच्या बाबतीतील त्याचं ते कर्तव्य आहे अशी त्यामागची त्याची भावना होती. आम्हा शिक्षकमंडळींना तर त्याचं भयच वाटायचं. इतकंच काय आमचे डायरेक्टर देखील त्याला मनातून भ्यायचे. कल्पना करा आम्ही शिक्षकमंडळी कमालीची व्यवस्थित, विचारवंत, तुर्गेनिव, शेद्रीन सारख्या महान लेखकांनी खतपाणी घालून वाढविलेल्या पिढीतली पण दुसरं टोक म्हणजे हा सदैव गमबूटातला, छत्री घेतलेला फडतुस मनुष्य गेली पंधरा वर्षे अख्ख्या जिम्नाझियाला आपल्या मुठीत ठेवून होता! अहो, जिम्नाझियाचं काय घेऊन बसलाय, सगळ्या गावाला त्यानं वेठीस धरलं होतं. आमच्या बायका सुट्टीच्या दिवशी एखाद्या नाटकाचं आयोजन करू शकत नव्हत्या. त्या बेलीकोवला कळलं तर होईल नसती भानगड म्हणून भीती वाटायची त्यांना. पाद्री लोकांना त्याच्यासमोर अभक्ष्य भक्षण करायला किंवा साधे पत्ते खेळायला संकोच वाटायचा. बेलीकोवच्या प्रभावाखाली येऊन गेली दहा पंधरा वर्षे गावातले सर्व लोक भयभीत झाल्यासारखे वाटायचे. मोठ्यांदा बोलायला, पत्र पाठवायला, ओळख करून घ्यायला, पुस्तक वाचायला, गरिबांना मदत करायला, साक्षरता वर्ग चालवायला. थोडक्यात म्हणजे जरा वेगळ्या वाटेनं जायला कचरायचे.

इवान इवानिचला काहीतरी बोलायचं होतं म्हणून तो खाकरला. चिलीम पेटवली त्यानं, चंद्राकडे एक दृष्टिक्षेप टाकला आणि शब्दांची जुळवाजुळव करून बोलायला सुरुवात केली.

'खरंय तुमचं म्हणणं. विचारवंत, बुद्धिवादी, सुसंस्कृत माणसं शेद्रीन, तुर्गेनेवचं वाङ्मय वाचतात. ब्रिटिश इतिहासाचार्य, समाजशास्त्रज्ञ बोकले आणि त्याच्याचसारख्या आणखी कितीतरी विद्वानांचे ग्रंथ वाचतात. आणि अखेर कोणाच्यातरी ताटाखालचं मांजर बनून राहतात. परिणामी आपल्याच कर्माची फळं भोगीत बसतात. असं आहे हे सगळं दुष्टचक्र!'

'मी ज्या घरात राहत होतो त्यातच बेलीकोवपण राहायचा.' बुरकिन पुढे सांगू लागला. त्याच मजल्यावर माझ्या दारासमोर त्याचं दार होतं, आमची सारखीच दृष्टभेट व्हायची. त्यामुळे त्याचं खाजगी जीवन मी अगदी जवळून पाहत होतो. घरीपण इतिहासाची पुनरावृत्ती पाहायला मिळायची. गाऊन, कानटोपी, बंद शटर्स, बोल्ट लावलेले दरवाजे अशी लांबलचक यादी मनाई करणाऱ्या आणि बंधन घालणाऱ्या गोष्टींची करता येईल. आणि एवढं करूनसुद्धा काहीतरी नको ते होईल का अशी मनाला सारखी धास्ती, खाण्यावर संयम, उपासतापास करणं, अपायकारक आणि भरपेट खाणं अयोग्य, असं होतं त्याचं. लोक बोलायचे की बेलीकोव उपासतापासाच्या विरुद्ध आहे. म्हणून तो मासे गाईच्या तुपात तळून खातो! म्हणजे त्याच्या संयमी आहाराला निकृष्ट म्हणण्याचं धाडस कोणी केलं नसतं. नोकर म्हणून एखादी स्त्री ठेवायला त्यांच्याकडे मज्जाव होता. कारण मग लोक काहीतरी वेडंवाकडं, भलबुरं बोलतील ही भीती! त्याच्याकडे आफानासी नावाचा वेडसर, दारूड्या, साठ वर्षे उलटलेला असा एक म्हातारा नोकर होता. हा कोणा एका सरकारी अधिकाऱ्याकडे स्वयंपाकी म्हणून कामाला होता म्हणे. तो बेलीकोवला कसेबसे दोन घास शिजवून घालायचा. तो सदैव हाताची घडी घालून दारात उभा असायचा. मोठमोठे उसासे टाकायचा आणि मनाशीच काहीतरी बडबडत असायचा.

बेलीकोवची निजायची खोली अगदीच लहान होती, जणू एखादी पेटीच. पलंगाला मच्छरदाणी लावलेली असायची. झोपताना तो कानटोपी घालायचा. खूप उकाडा असायचा. घुसमट होत असायची. वारा बंद, दरवाजा करकरायचा, भिंतीतल्या शेगडीतून सूं-सूं आवाज यायचा. स्वयंपाकघरातून आफानासीचे उसासे कानावर पडायचे, अपशकुनी उसासे...

अंगाला लपेटून घेतलेल्या रजईखाली त्याचा जीव घुसमटायचा. त्याला सारखी भीती असायची की काही भलतंच तर घडणार नाही ना? आफानासी

आपल्या छातीत सुरी तर खुपसणार नाही ना? चोर तर नाही ना घरात शिरणार? वगैरे वगैरे. मग रात्रभर भयानक स्वप्नं पडायची त्याला. सकाळी जेव्हा आम्ही बरोबर जिम्नाझियामध्ये जायला निघायचो तेव्हा तो अवघडल्यासारखा, चेहरा पडलेला असा असायचा. असं वाटायचं की खूप लोक असलेला जिम्नाझिया त्याच्यासारख्या माणसाला भयानक, नकोसा वाटत असावा. त्याच्यासारख्या एकांड्या शिलेदाराला माझ्याबरोबर जाणं हे सुद्धा एक संकटच होतं.

'आमच्या वर्गात मुले फारच गोंधळ घालीत असतात.' तो म्हणायचा, आपल्या विमनस्क मन:स्थितीचं स्पष्टीकरण शोधण्याचा जणू त्याचा हा प्रयत्न असावा. 'असा गोंधळ जगात कुठेही पाहायला मिळायचा नाही.'

अशा या ग्रीक भाषेच्या प्राध्यापकाचं, कोषात अडकलेल्या माणसाचं लग्न झालं नव्हतं, ह्यात आश्चर्य ते कसलं?

इवान इवानिच झोपडीच्या आतल्या बाजूला डोकावून म्हणाला,

'काय थट्टा करता तरी! लग्नच झालं नाही त्याचं?'

हो, लग्न होता होता मोडलं, आहे की नाही विचित्र वाटण्यासारखं? आमच्याकडे इतिहास-भूगोल या विषयांसाठी खोखलोव गावच्या मिखाईल, साव्वीच कवालेन्को या नव्या शिक्षकाची नेमणूक झाली होती. तो एकटा नव्हता. त्याच्याबरोबर त्याची बहीण वारेन्कापण आली होती. तो तरुण, उंच, काळ्या वर्णाचा, आजानुबाहू असा होता. त्याचा चेहराच सांगत होता की हा मनुष्य खर्जात बोलत असावा. म्हणजे अगदी रिकाम्या ड्रममधून आवाज काढावा तसा. बू... बू... बू... बहीण वयस्क म्हणजे तिशीतली असावी. ती पण उंच, सणसणीत, काळ्या भुवयांची, आणि लाल लाल गालांची होती. एका शब्दात वर्णन करायचं झालं तर ती युवती नव्हती तर प्रमदा होती. ती खूप हुशार, गडबडी, सदा रशियन नाटकातली गाणी गाणारी आणि सात मजली हसणारी अशी होती. ती अवतीभवती असली की सारखे हास्याचे फवारे उडत असायचे. खा-खा-खा! कवालेन्को मंडळींबरोबर आमची औपचारिक भेट माझ्या आठवणीप्रमाणे आमच्या डायरेक्टरच्या इस्टेटीवर झाली होती. आमच्यासारख्या गंभीर, लांब चेहऱ्याच्या, डायरेक्टरसमोर अवघडलेल्या शिक्षकांमध्ये वारेन्का जणू समुद्रातील फेसातून बाहेर आलेल्या परीकथेतल्या प्रेमदेवता अप्रोदितेसारखी दिसत होती.

कमरेवर हात ठेवून चालणारी, खळखळ हसणारी, गाणारी, नाचणारी. 'वियूत वित्री' हे गाणं तर ती अगदी तल्लीन होऊन गात होती. त्यानंतर दुसरं कुठलंतरी गाणं म्हटलं तिनं. आम्हालाच नव्हे तर बेलीकोवलासुद्धा भुरळ घातली होती तिनं. तो तिच्याजवळ जाऊन बसला. आणि गोडसं हसून म्हणाला,

'तुमचं रशियन बोलीभाषेतलं तरल आवाजातलं कर्णमधुर सुरेल गाणं ऐकताना मला पुरातन ग्रीक भाषेची आठवण होतेय.'

त्याच्या ह्या बोलण्यानं वारेन्का एकदम खूष झाली. आणि स्फुरण चढल्यासारखी ती त्याला तिच्या गावाविषयी खुलवून खुलवून सांगू लागली.

गाद्याचस्की जिल्ह्यात त्यांचं एक शेत आहे. त्या शेतावर तिची आई राहते. त्यांच्या शेतात ही एवढी पेअर्स, मोठमोठी टरबुजं, खरबुजं, खूप येतात! खोखलोव लोक दुधी भोपळ्याला 'कबाका' म्हणतात आणि कबाकाला 'शिनूका.' त्या भाज्यांचं लालसर निळसर असं सूप करतात. ते म्हणे इतकं चविष्ट असतं की कोणाच्याही तोंडाला पाणी सुटेल.

आम्ही सर्वजण तिची बडबड कितीतरी वेळ ऐकत होतो. कसं ते माहीत नाही. पण सगळ्यांच्या मनात एकाच वेळेस एकदम एक विचार आला.

'ह्या दोघांचं लग्न झालं तर छान होईल नाही?' डायरेक्टरीण बाई मला हळू आवाजात म्हणाली.

का कोण जाणे पण आज पहिल्यांदा आमच्या लक्षात आलं की आमच्या बेलीकोवचं अजून लग्न झालं नाहीये आणि एक प्रकारची चुटपूट लागून राहिली की त्याच्या जीवनातली एक महत्त्वाची गोष्ट आमच्या नजरेतून कशी निसटली? तो एरवी स्त्रियांशी कसा वागतो, त्याच्या लग्नाचा हा तातडीचा प्रश्न तो कसा सोडवील ह्या गोष्टीची आम्हाला आजपर्यंत साधी उत्सुकताही कशी वाटली नाही देव जाणे. बारा महिने अठरा काळ गमबूट घालणाऱ्या ह्या पडदानशीन माणसाचं कधी काळी लग्न होईल हा विचार आम्हाला शिवणार तरी कसा?

'त्याची चाळिशी उलटलीय आणि ती आहे तिशीतली.' आपला विचार स्पष्ट करून सांगताना डिरेक्टरीण म्हणाली, 'मला वाटतं तिनं त्याला होकार द्यावा.'

आमच्याकडे छोट्या गावातून केवळ आळसामुळे नाही नाही त्या गोष्टी होत असतात. कितीतरी अनावश्यक फालतू गोष्टींत वेळ घालवत बसतात लोक.

आणि त्याचं कारण म्हणजे अत्यावश्यक बाबींकडे कानाडोळा केला जातो. आता हेच बघा ना, हा बेलीकोव विवाहित आहे अशी कल्पना करणं सुद्धा आम्हाला आजपर्यंत प्रशस्त वाटत नव्हतं. आणि आजच असं काय झालं की बेलीकोवचं लग्न व्हायलाच हवं असं आम्हाला सर्वांनाच वाटू लागलंय? डिरेक्टरीण, इन्स्पेक्टरीण आणि जिम्नाझियामधल्या एकूण एक स्त्रियांची ह्या नुसत्या कल्पनेनं मरगळ नाहीशी होऊन त्यांच्यात एक वेगळाच उत्साह आलाय. जणू त्यांच्या आयुष्याचं ध्येय त्यांच्या पुढ्यात येऊन ठाकलंय.

डिरेक्टरीणबाईनं नाटकाची पुढच्या रांगेतली तिकिटं काढली. तिच्याच सोफ्यावर तिच्या शेजारी हातात पंखा घेतलेली, उजळलेल्या चेहऱ्याची, आनंदी अशी वारेन्का आम्ही पाहिली. तिच्या पलीकडे लहानखोरा, अवघडलेला, जणू कुणीतरी मुसक्या बांधून इथं आणून बसवलंय त्याला, असा बेलीकोव आम्हाला दिसला. असंच एकदा मी संध्याकाळी एक चहापार्टी द्यायचं ठरवलं. तर बायकांनी मला बेलीकोव आणि वारेन्काला न विसरता आमंत्रणं द्यायची गळच घातली. एका शब्दात सांगायचं म्हणजे चक्रं फिरायला लागली होती. सगळ्यांचा असा कयास होता की वारेन्काचा पण ह्या गोष्टीला विरोध नव्हता. भावाबरोबर राहणं तिला काही तितकंसं सुखाचं नव्हतं. नुकतंच ऐकलं होतं की बहीण-भावांत दिवसभर भांडाभांडी आणि रागवारागवी चाललेली असते. हे बघा, त्यांच्यामधल्या नाटकातलं एक दृश्य : ऊंच, सशक्त, लांबच लांब हाताचा, कशिदा काढलेला शर्ट घातलेला, टोपीमधून कपाळावर बटा लोंबणारा असा कवालेन्को रस्त्यावरून जातोय. त्याच्या एका हातात पुस्तकं आणि दुसऱ्या हातात जाड काठी आहे. त्याच्या पाठोपाठ बहीण चाललीय. तिच्यापण हातात पुस्तकाचा गठ्ठा आहे.

'मिखाईल, तू हे वाचलं नाहीयेस!' ती मोठमोठ्यानं वाद घालत होती. 'मी अगदी शपथेवर सांगते की तू ते पुस्तक वाचलं नाहीस.'

'मी म्हणतोय, मी वाचलंय ते!' फूटपाथवर काठी आपटत कवालेन्को ओरडतो.

'अरे देवा, मिनचिक, तू कशाला एवढ्या शिरा ताणतोयस? अरे आपलं हे बोलणं केवळ तात्त्विक मुद्द्यावर आहे.'

'मी पण तुला पुन्हा सांगतोय की मी ते वाचलंच आहे!' आणखी जोरानं कवालेन्को ओरडला.

ते घरी असले तरी कधी एकमेकांशी चकार शब्द बोलायचे नाहीत. तर कधी अगदी हमरीतुमरीवर येऊन तू-तू-मी-मी चालायची त्यांची. असल्या या जीवनाचा तिला बहुतेक वीट आला असावा. आपला स्वत:चा असा कुठेतरी एक कोपरा असावा असं वाटायला लागलं होतं तिला आणि स्वत:च्या वाढत्या वयाचा विचारही मनात यायला लागला असेल. आत्ताच काहीतरी निर्णय घ्यायला हवा, कुणाशीही लग्न कर, ह्या ग्रीक भाषेच्या अध्यापकाशी का होईना, नाहीतर आपलं लग्न होणं नाही असं वाटत असावं बहुतेक तिला. आणि खरं सांगायचं तर आमच्याकडे बहुतांशी जमीनदाराच्या मुलींच्या बाबतीत कोणाशीही कर पण लग्न कर अशीच नेहमी वेळ येते. का कोण जाणे वारेन्काला बेलीकोवविषयी ओढ वाटायला लागली आहे हे आम्हाला स्पष्ट दिसत होतं.

बेलीकोव आमच्याकडे जसा यायचा अगदी तसाच कवालेन्कोकडे पण जायला लागला होता. त्यांच्या घरी जायचा आणि एक शब्द बोलायचा नाही. वारेन्का त्याला गाणं ऐकवायची, नाहीतर विचारात पडल्यासारखी आपले काळेभोर डोळे त्याच्यावर स्थिर करायची. नाहीतर एकदम खो-खो करत हसायची. पण त्याच्या मख्ख चेहऱ्यावर काहीच फरक दिसायचा नाही.

प्रेमाच्या बाबतीत, विशेषकरून लग्नसंबंधात इतरांनी केलेलं संमोहन अहम भूमिका बजावत असतं. आमची मित्रमंडळी, त्यांच्या बायका, आपापल्या परीनं बेलीकोवला पटवण्याचा प्रयत्न करीत होते, की त्यानं आता लग्न करायला हवं. त्याच्या आयुष्यात लग्नाशिवाय दुसरी कुठलीही महत्त्वाची गोष्ट राहिलेली नाही. आम्ही सगळेजण त्याला शुभेच्छा देत होतो. गंभीर चेहरे करून हरतऱ्हेची प्रलोभने दाखवत होतो, म्हणजे अशी की, लग्न हे माणसाच्या आयुष्यातील महत्त्वाचं पाऊल आहे. वारेन्का दिसायला काही वाईट नाहीये, उत्सुक आहे, शिवाय ती एकेकाळच्या सरकारी सल्लागाराची मुलगी आहे. त्यांचं स्वत:चं घरदार आहे आणि मुख्य म्हणजे ही जगातली पहिली स्त्री आहे जी त्याच्याशी मायेनं, प्रेमानं वागतेय. परिणामी त्याच्या डोक्यात विचारचक्र सुरू झालं आणि त्यानं निर्णय घेतला की कुठल्याही परिस्थितीत त्याला लग्न करायलाच हवं.'

'त्याचे गमबूट आणि छत्री हिसकावून घेण्याची हीच वेळ योग्य होती.' इवान इवानिच मध्येच म्हणाला.

'अरे हो, पण तसं करणं कुणाच्याही हातात नव्हतं. त्यानं आपल्या टेबलावर वारेन्काचा फोटो ठेवला होता. माझ्याकडे आला की सारखा वारेन्काविषयी बोलायचा. वैवाहिक जीवनाविषयी चौकश्या करायचा. लग्न हे महत्त्वाचं पाऊल आहे असं बडबडायचा. कवालेन्कोकडे पण वरचेवर जायचा. पण त्याच्या बाह्य अवतारात मात्र त्यानं यत्किंचितही बदल केला नव्हता. उलट लग्नाचा निर्णय घेतल्यावर त्याला दुखणं आल्यासारखं वाटायला लागलं. तो किंचित वाळल्यासारखा वाटत होता. त्याचा चेहरा निस्तेज दिसायला लागला होता आणि भीती वाटत होती की आपल्या कोषात तो आणखीनंच खोल गुरफटला जातोय की काय!'

'वारवारा साव्वीशना मला आवडते.' तोंड थोडं वाकडं करून, स्मित हास्य करत तो म्हणाला. 'प्रत्येक माणसाच्या बाबतीत लग्न ही एक आवश्यक बाब आहे, हे पण मला पटतंय, पण ... पण तुम्हाला माहीत आहे ना हे सगळं कसं अचानक घडलं ते ... जरा शांत डोक्यानं विचार करायला हवा.'

'काय विचार करण्यासारखं आहे त्यात?' मी त्याला म्हणालो. 'लग्न करा आणि मोकळे व्हा!'

'असं कसं, लग्न हे माणसाच्या आयुष्यातील विचारपूर्वक टाकलेलं पाऊल आहे. सर्वप्रथम आपली लग्नानंतरची कर्तव्यं, पडणाऱ्या जबाबदाऱ्या यांचा साधकबाधक विचार करायला हवा ... नंतर काही भानगड व्हायला नको. ह्या सर्व बारीकसारीक गोष्टी इतक्या बेचैन करताहेत की मी रात्र रात्र झोपू शकत नाही. सत्याला सामोरं जाण्याची मला भीती वाटते. ती आणि तिचा भाऊ यांचं एकमेकांशी वागणं वैचारिक ताणतणावाचं द्योतक वाटतं. वादविवाद करताना तुम्हाला माहीत आहे ना कसे सारखे एकेरीवर येत असतात ते! पण बुद्धिमान व्यक्तिमत्त्व आहे तिचं हं. एकदा लग्न करून बशीन, काहीतरी चांगलं करायला जाईन आणि एका नव्याच लफड्यात अडकून पडीन!'

अशा तऱ्हेनं साधकबाधक विचारांनी बेलीकोवनं वारेन्काला लग्नाची मागणी घातलीच नाही, सगळ्या गोष्टी तूर्तास जैसे थे करून टाकल्या. डिरेक्टरीणबाई

आणि इतर सर्वच बायकांचा रोष पत्करला. विचारमंथन चालू असताना दररोज वारेन्काबरोबर फिरायला मात्र जात होता तो. कदाचित त्यानं विचार केला असेल की सद्य:स्थितीत असंच वागणं बरोबर आहे. तो माझ्याकडे वैवाहिक जीवनातील फायद्यातोट्यासंबंधी चर्चा करायला यायचा. सर्व प्रकारे संभाव्य गोष्टी विचारात घेता, सरतेशेवटी त्याने जर तिला मागणी घातली असती तर बरं झालं असतं. त्यातून मग काही भानगड निर्माण झाली असती तरी हरकत नव्हती. कारण आमच्या या देशात हजारो लोक कंटाळा येऊन किंवा दुसरं काही करायला नाही म्हणून अनावश्यक आणि मूर्खासारखी लग्न करत असतातच की. इथं हे सांगणं जरुरीचं आहे की वारेन्काचा भाऊ कवालेन्को पहिल्या दिवसापासून बेलीकोवचा द्वेष करायचा आणि त्याच्या वाऱ्याला उभा राहायचा नाही.

'मला कळत नाही,' कवालेन्को खांदे उडवत आम्हाला म्हणायचा. 'तुम्ही असल्या लबाड, थापाड्या नि फालतू माणसांची एवढी वरवर कशी करता ? सभ्य माणसांनो, तुम्ही इथे जगता तरी कसे ? इथलं वातावरण अगदी गलिच्छ, घुसमटून टाकणारं आहे. तुम्ही कसले हो भाषातज्ज्ञ ? तुम्ही सगळे 'जी हुजूर' करणारे हुजरे आहात. तुमची संस्था म्हणजे ज्ञानदेवतेचं मंदिर नाहीये तर काहीतरी सत्कर्म केल्याचा देखावा आहे नुसता. पोलिसचौकीत येते तशी दुर्गंधी पसरली आहे सगळीकडे. नाही, माझ्या मित्रांनो, नाही. मी तुमच्या इथे फार दिवस राहणं शक्य नाही. काही दिवसांतच मी माझ्या शेतावर निघून जाईन. मी तिथे माश्यांचं जाळं टाकून बसेन नाहीतर केस उपटत बसेन. पण इथं राहणार नाही. तुम्ही बसा इथे तुमच्या ज्युडोईझमला कवटाळत ...'

कधीकधी तो आपल्या भसाड्या आवाजात डोळ्यांतून पाणी येईपर्यंत हसतच राहायचा. दुसऱ्या क्षणी केकाटत मला विचारायचा,

'कशाला माझ्याकडे येऊन बसतो तो तुमचा मित्र? काय पाहिजे असतं त्याला ? कुठे तरी टक लावून बसतो नुसता.' बेलीकोवचं त्यानं नामाभिधान पण केलं होतं. एका युक्रेनियन नाटकावरून. 'जाळ्यातला कोळी.'

ह्या जाळं विणणाऱ्या कोळ्याशीच लग्न करणार आहे त्याची बहीण वारेन्का, हे सांगायचं धाडस आम्हाला झालं नाही. आणि मग एक दिवस जेव्हा खुद्द डिरेक्टरीण बाईनंच त्याला सूचक शब्दांत सांगितलं की वारेन्कानं बेलीकोवसारखा

ठणठणीत, आदरणीय माणसाशी लग्न करायचं ठरवलंय, हे फार चांगलं झालंय. तेव्हा त्यानं तीव्र नापसंती दर्शविली आणि म्हणाला,

'माझा ह्या गोष्टीशी काही संबंध नाही. तिनं सापाशी लग्न केलं तरी माझी हरकत नाही. दुसऱ्यांच्या खाजगी बाबतीत लुडबूड करायला मला आवडत नाही.'

पुढे काय इतिहास घडला ते ऐका आता.

'एक दिवस एका खोडसाळ माणसानं एक व्यंगचित्र रेखाटलं : बेलीकोव गमबूट आणि दुमडलेली तुमान घालून आणि हातात छत्री घेऊन चाललाय. आणि त्याच्या हातात हात घालून वारेन्का चाललीय. खाली टीप होती : 'प्रेमात पडलेला आंत्रोपोस.' माहीत आहे, ते चित्र लोकांना एवढं आवडलं! त्या बहाद्दर कलाकारानं त्या चित्राच्या प्रती काढण्यासाठी किती रात्री जागून काढल्या असतील कोण जाणे. कारण जिम्नाझियमधील सर्व स्त्री-पुरुष प्राध्यापक, घंटाघरातील शाळेचे शिक्षक, ऑफिसमधले नोकरदार, सर्व जणांना चित्राची एक एक प्रत मिळाली होती. अर्थातच बेलीकोवलापण एक प्रत मिळाली. त्या व्यंगचित्राने त्याला अतिशय मनस्ताप झाला.

त्या दिवशी आम्ही सर्वजण बरोबरच घरातून बाहेर पडलो. एक मे आणि रविवार होता तो. जिम्नाझियातील शिक्षक आणि विद्यार्थी सर्व मंडळींनी प्रथम जिम्नाझियापाशी एकत्र जमायचं ठरवलं होतं आणि नंतर चालत चालत गावाबाहेर फळबागेत जायचं होतं. निघालो आम्ही जायला पण बेलीकोव पावसाळ्यातल्या ढगापेक्षाही काळानिळा पडला होता.

'कसली घाणेरडी दुष्ट माणसं असतात एकेक!' तो म्हणाला. त्याचे ओठ रागाने नुसते थरथरत होते.

मलासुद्धा त्याची कीव आली. आम्ही पुढे निघालो होतो, एवढ्यात कवालेन्को सायकलवरून येताना दिसला आणि त्याच्या पाठोपाठ लालबुंद चेहऱ्याची, दमलेली पण उत्साही आणि आनंदी अशी वारेन्का येत होती. ती पण सायकलवरच होती.

'आम्ही' ती ओरडून म्हणाली. 'पुढं निघालोय हं! किती सुंदर, कित्ती कित्ती सुंदर हवा पडलीय, धम्माल येईल नुसती!'

ती दोघं क्षणातच दिसेनाशी झाली. माझा मित्र बेलीकोवचा चेहरा निळ्याचा पांढरा फटफटीत अगदी गोठल्यासारखा दिसत होता. तो चालता चालता रस्त्यातच थांबला आणि माझ्या तोंडाकडे पाहायला लागला.

'क्षमा करा मला. पण हे काय चाललंय?' त्यानं विचारलं. 'का माझ्या दृष्टीनंच धोका दिलाय मला? जिम्नाझियामधल्या अध्यापकांना आणि स्त्रियांना असं सायकलवरून जाणं आपल्या संस्कृतीत बसणारं आहे का?'

'त्यांच्यात काय आहे एवढा सभ्य नि असभ्यपणा?' मी म्हणालो. आपल्याच धुंदीत जाईनात का ते सायकलवरून?'

'कसं शक्य आहे ते?' माझ्या थंडपणामुळे अचंबित होऊन तो म्हणाला. 'काय बोलताय हे तुम्ही?'

ह्या सगळ्या गोष्टींचा त्याला मोठाच धक्का बसला. पुढं जायची इच्छा उरली नाही जशी. तो सरळ घरी निघून गेला.

दुसऱ्या दिवशी हताश होऊन तो सारखा हात चोळत होता. अंगाचा नुसता थरकाप होत होता त्याच्या. आणि त्याच्या चेहऱ्यावरून स्पष्ट दिसत होतं की त्याला बरं वाटत नाहीये. तो वर्ग सोडून घरी निघून गेला. असं त्याच्या आयुष्यात कदाचित पहिल्यांदाच झालं असेल. त्या दिवशी दुपारी जेवलासुद्धा नाही तो. उन्हाळ्याचे दिवस असल्यामुळे बाहेर अंगणात गरम वारे वाहत होते तरी संध्याकाळी त्यानं गरम कपडे घातले आणि तो कवालेन्कोच्या घरी जाऊन धडकला. वारेन्का घरी नव्हती पण तिचा भाऊ घरी सापडला त्याला.

'कृपा करून बसून घ्या.' कवालेन्को डोळे मिचकावत थंडपणे म्हणाला. त्याचा चेहरा झोपमोड झाल्यासारखा दिसत होता. जेवण झाल्यावर नुकताच तो आडवा झाला असावा. त्यामुळे ह्याच्या येण्याने तो आणखीनच बिथरला.

बेलीकोव दहा एक मिनिटं मुकाट्यानं बसून राहिला आणि मग मात्र तो घडाघडा बोलायला लागला.

'माझ्या मनावरचं दडपण कमी करण्यासाठी मी तुमच्याकडे आलोय. मी फार फार बेचैन झालोय. एका बदनाम माणसानं माझं आणि आपल्या दोघांनाही जवळची असलेल्या एका विशिष्ट व्यक्तीचं हास्यास्पद असं चित्र रेखाटलंय. माझं कर्तव्य समजून माझा ह्याच्याशी काही संबंध नाही हे स्पष्ट करायला आलोय मी ...

मी आजपर्यंत कधीच असल्या पोरकट विनोदाला खतपाणी घातलं नाही, उलट मी आजपर्यंत अतिशय सभ्यपणानंच वागत आलोय ...'

कवालेन्को उसासे सोडत गप्प बसला होता. बेलीकोव थोडावेळ थांबला आणि मग शांत, धीरगंभीर आवाजात पुढे बोलू लागला.

'मला तुमच्याशी आणखीपण काही बोलायचंय. मी ह्या नोकरीत कितीतरी दिवसांपासून आहे. तुम्ही आत्ताच कुठं इथं आला आहात. मी एक अनुभवी सहाध्यायी म्हणून तुम्हाला सावध करणं हे माझं कर्तव्य समजतो. तुम्ही सायकलवरून भटकता ही काही गंमतीची गोष्ट नाहीये. तरुण पिढी उन्नत करण्याची जबाबदारी असलेल्या माणसांचं हे असलं वागणं मुळीच सर्वमान्य नाही!'

'का सर्वमान्य नाही?' कवालेन्कोनं खर्जात विचारलं.

'ह्यात स्पष्ट करण्यासारखं काही आहे तरी का मिखाईल साव्वीच, जसं काही हे तुम्हाला न समजणारंच आहे! अहो, शिक्षक जर सायकलवरून जायला लागला, तर विद्यार्थ्यांनी काय करायचं? त्यांना मग खाली डोकं वर पाय करूनच चालायला हवं! आणि एकदा जिम्नाझियाच्या कायद्यात ह्या गोष्टीला परवानगी नसेल तर ते कोणालाही करायला मनाईच असणार. काल तर मला आश्चर्याचा धक्काच बसला! तुमच्या बहिणीला जेव्हा मी सायकलवरून जाताना पाहिलं तेव्हा माझ्या डोळ्यांपुढे अंधेरीच आली. एखादी स्त्री किंवा तरुणी सायकल चालवतेय, ही भयंकरच गोष्ट झाली. तुम्हाला नाही असं वाटत?'

'मग स्त्रियांनी काय करणं तुमच्या दृष्टीनं योग्य आहे?'

'माझ्या मते आता एकच गोष्ट योग्य आहे – तुम्हाला सावध करणे मिखाईल साव्वीच.'

'तुम्ही तरुण आहात. सगळं आयुष्य तुमच्यापुढे उभं आहे. अगदी काळजीनं, सावधानपणे वागायला हवं तुम्हाला. तुम्ही तर अगदीच दुर्लक्ष करताहात या गोष्टींकडे. असा बेफिकीरपणा बरोबर नाही. भरतकाम केलेले शर्ट काय घालता तुम्ही, हातात ढीगभर पुस्तकं घेऊन रस्त्यानं जात असता आणि आता ही तुमची सायकल. तुम्ही आणि तुमची बहीण सायकलवरून हिंडत असता, हे जर आपल्या

डायरेक्टरला कळलं तर ते शिक्षणप्रमुखांपर्यंत पोहोचणार ... हे चांगलं आहे का ?'

'मी आणि माझी बहीण सायकलवरून हिंडतो, ह्याच्याशी कुणाचाही काही संबंध नाही ...!' कवालेन्को रागानं लाल होऊन म्हणाला. 'माझ्या खाजगी, कौटुंबिक जीवनात ढवळाढवळ केली तर तो गेला उडत !'

बेलीकोवचा चेहरा खरकन उतरला आणि तो ताडकन उठून उभा राहिला.

'तुम्ही जर माझ्याशी असल्या भाषेत आणि चढ्या आवाजात बोलणार असाल तर मला इथं थांबणं शक्यच होणार नाही.' बेलीकोव म्हणाला. 'माझी तुम्हाला विनंती आहे की आपल्या संस्थेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांविषयी माझ्यासमोर तरी असली भाषा वापरू नका. त्यांच्याविषयी तुम्ही आदरानंच बोलायला हवं !'

'अहो, पण वरिष्ठांविषयी काय अपशब्द वापरले हो मी ?' बेलीकोवकडे तुच्छतेनं पाहत कवालेन्कोनं विचारलं. कृपा करून माझा पिच्छा सोडा आणि मला एकट्याला शांतपणे राहू द्या. मी प्रामाणिक मनुष्य आहे आणि तुमच्यासारख्या माणसाशी बोलायची मला इच्छा नाहीये. मला तुमच्यासारखी भंकस माणसं आवडत नाहीत !'

बेलीकोवच्या अंगाचा नुसता तिळपापड झाला. चेहरा भयानक झाला आणि तो भराभर अंगावर कोट चढवायला लागला. आयुष्यात बहुधा पहिल्यांदाच असली उर्मट भाषा ऐकावी लागली असावी त्याला !

'बोला, बोला तुम्ही काय वाट्टेल ते!' खोलीच्या बाहेरच्या व्हरांड्यातून जिन्याच्या सज्जात येत तो म्हणाला. 'पण मला तुम्हाला सावधानीचा इशारा द्यायलाच हवा. कदाचित् आपलं बोलणं कोणाच्या तरी कानावर पडत असेल आणि आपल्या संभाषणाचा विपर्यास होऊन त्यातून आणखी काही भानगड व्हायला नको म्हणून मला आपल्या बोलण्याचा सारांश डायरेक्टरांपर्यंत कुठल्याही परिस्थितीत पोहोचवायलाच हवा. माझं ते कर्तव्यच आहे.'

'तक्रार करायची ना माझ्याविषयी, चला, निघा. खुश्शाल तक्रार करा तुम्ही !'

कवालेन्कोनं बेलीकोवची कॉलर मागून पकडली आणि दिलं त्याला ढकलून. बेलीकोव जिन्यावरून गडगडत, गमबुटांचा फटफट आवाज करीत खाली आला. जिना ऊंच आणि गोलगोल फिरत जाणारा होता. पण तो खालपर्यंत सुखरूप येऊन

पोहोचला. उठून उभा राहिला. आणि त्यानं आपलं नाक चाचपडून पाहिलं. चष्मा तर फुटला नाही ना त्याची खात्री करून घेतली त्यानं. बेलीकोव जिन्यावरून गडगडत खाली येत होता. अगदी त्याचवेळी वारेन्का तिथे पोहोचली. तिच्याबरोबर कुणीतरी दोन स्त्रियापण होत्या, त्या सर्वजणी त्याच्याकडे पाहत खालीच उभ्या होत्या. बेलीकोव आणखीनच घाबरून गेला. त्याच्या मनात विचार आला. असला हास्यास्पद प्रसंग येण्यापेक्षा आपली कुणी मान मुरगळली असती, नाहीतर पाय मोडले असते तरी बेहतर होतं. आता हे सगळ्या गावाला कळणार, डायरेक्टरांपर्यंत पोहोचणार, शिक्षण अधिकाऱ्यांना कळणार. अरे बापरे, आता काय होईल कोण जाणे! कुणीतरी आणखी एक व्यंगचित्र काढील. आणि परिणामी नोकरीवरून काढून टाकतील ...

तो उठून उभा राहिला तेव्हा वारेन्कानं त्याला ओळखलं. त्याचा तो हास्यास्पद चेहरा, चुरगळलेला ओव्हरकोट, गमबूट असा अवतार पाहिल्यावर काय झालं असेल ह्याचा अंदाज तिला येईना. तिला वाटलं, त्याचा तोच वेंधळेपणानं घसरला असणार. तिला हसू आवरेना. ती मोठमोठ्यांदा खो-खो-खो करत हसत सुटली.

तिच्या त्या आगीत तेल ओतणाऱ्या हास्यानं, खो-खो-खो करत खिदळण्यानं, बेलीकोवच्या पृथ्वीवरील अस्तित्वावर, त्यांच्या दोघांमधील लग्नसंबंधांवर, सर्वांवरच पाणी पडलं! त्यानंतर वारेन्का काय बोलली तेही त्याला कळलं नाही. त्याचं कुठेच लक्ष नव्हतं. तिथून तडक घरी आल्यावर पहिल्यांदा त्यानं जर काय केलं असेल, तर वारेन्काचा फोटो टेबलावरून हलवला आणि तो अंथरुणावर आडवा झाला तो परत उठलाच नाही. दोन तीन दिवसांनी आफानासी माझ्याकडे आला आणि मला विचारू लागला की, त्याच्या मालकांना बरं नाहीये तर डॉक्टरांना बोलवायला हवं ना? मी बेलीकोवकडे गेलो. तो मच्छरदाणीत रजई लपेटून शांत पडला होता. त्याच्याशी बोलायला गेलो तर तो 'हो,' 'नाही' शिवाय चकार शब्द बोलेना. तो झोपलेला आणि त्याच्याभोवती दुःखीकष्टी आंबट चेहरा केलेला आफानासी घुटमळत होता. दारूच्या गुत्त्यातल्यासारखा त्याच्या तोंडाला वोडकाचा वास येत होता.

एका महिन्याच्या आत बेलीकोव मरण पावला. जिम्नाझिया आणि सेमीनारीमधील सर्वांनी त्याला मूठमाती दिली. त्याला शवपेटीत ठेवलं तेव्हा

त्याचा चेहरा बापुडवाणा पण मोहक, उल्हसित दिसत होता. त्याला आनंद अशासाठी झाला असावा की सरतेशेवटीसुद्धा त्याला अशा पेटीत बंद करण्यात आलंय, जिच्यातून तो यापुढे कधीही बाहेर पडू शकणार नाही. हो, आज त्याचं ध्येय साध्य झालं! त्याला मानाचा मुजरा करण्यासाठीच की काय त्यावेळी कुंद, ढगाळ, पावसाची चाहूल देणारी हवा पडली होती. आम्ही सगळ्यांनी गमबूट घातले होते. आणि बरोबर छत्र्या आणल्या होत्या. अंत्यसंस्काराचे वेळी वारेन्कापण आली होती. त्याचं शव थडग्यात ठेवण्यात आलं तेव्हा तिला हुंदका आवरेना.

माझ्या असं लक्षात आलंय की मनमुराद हसणारी माणसं एक तर खो-खो हसतात नाहीतर ढसाढसा रडतात. ह्या दोहोंमधली मानसिक अवस्था त्यांना माहीतच नसते जणू!

मला असं कबूल करावंसं वाटतंय की बेलीकोवसारख्या माणसाला थडग्यात पुरल्यानंतर लोकांना खूपच हायसं वाटलं. आम्ही जेव्हा कबरस्तानातून घरी येत होतो तेव्हा आम्हाला कसं पवित्र, मनावरचं दडपण गेल्यासारखं, हलकंफुलकं वाटत होतं. आमच्यापैकी कोणीही चेहऱ्यावरचं हे समाधान दुसऱ्यापासून लपवू शकला नव्हता. अगदी असंच मनाचं समाधान खूप खूप वर्षांपूर्वी आमच्या बालपणी आम्ही अनुभवलं होतं, जेव्हा घरातली सर्व मंडळी बाहेर जाणार असायची आणि पुढचे तास दोन तास आम्हाला अगदी मनसोक्त हुंदडायला, स्वातंत्र्याचा आनंद लुटायला मिळणार असायचा! स्वातंत्र्य, बंधमुक्तता! स्वातंत्र्याची पुसटशी सूचना किंवा अस्पष्ट, धूसर आशासुद्धा माणसाच्या मनाला पंख देतात, खरं की नाही?

आम्ही कबरस्तानामधून सुखासमाधानानं परतलो होतो. पण जेमतेम एक आठवडा उलटला असेल नसेल, आमच्या जीवनाची गाडी परत मूळ पदावर आली. पहिल्यासारखाच भेडसावणारा, नीरस, धोपटमार्गी जीवनक्रम सुरू झाला. लिखित नियमांची बंधनं नव्हती तरी पूर्णत: बंधमुक्त म्हणता येईल असंही जीवन आम्ही जगत नव्हतो. कवडीचीही सुधारणा नव्हती. तसं पाहिलं तर आम्ही आमच्या बेलीकोवला मूठमाती दिली असली तरी त्याच्यासारखी स्वत:च निर्माण केलेल्या कोषात अडकून पडलेली कितीतरी माणसं आमच्या अवतीभोवती

आजही शिल्लक आहेत आणि भविष्यकाळात त्यांत आणखी कित्येकांची भर पडणार आहे देवच जाणे!'

'मग काय, असंच तर आहे हे सगळं!' इवान इवानिच म्हणाला आणि त्यानं चिलीम पेटवली.

'अजून कितीतरी जन्मणार आहेत?' बुरकिननं पुन्हा तेच विधान केलं.

बुरकिन झोपडीतून बाहेर आला. हा मनुष्य बुटका, लठ्ठ, अंगावर खूप लव असलेला, दाढी अजून काळी असलेला, जरा बेढब असाच होता. तो बरोबर दोन कुत्रीही घेऊन आला होता.

'चंद्र प्रकाशतोय आभाळात, चंद्राची सर दुसऱ्या कशाला येणार!' वर आकाशाकडे पाहत बुरकिन म्हणाला.

मध्यरात्र झाली होती. उजव्या बाजूला खेडं पसरलं होतं. लांबच लांब सडक जवळजवळ पाच कोस गेलेली होती. सगळीकडे स्वप्नवत् चिडीचूप होतं. कुठं हालचाल नाही की आवाज नाही. निसर्गात इतकी नीरव शांतता असू शकते यावर एरवी विश्वाससुद्धा बसला नसता. चांदण्या रात्री आपण जेव्हा खेड्यातली अरुंद सडक, दूरवर पसरलेल्या झोपड्या, गवतांच्या गंजी, वेताची वाकलेली बेटं पाहतो तेव्हा मनाला शांती लाभते. अशा मानसिक समाधानात आपला कामधंदा, जबाबदाऱ्या, दुःख यांच्यावर मनुष्य रात्रीच्या सावल्यांचं पांघरूण घालतो. तेव्हा ही निसर्गानुभूती सीमित, प्रलोभनीय पण क्षणभंगुर अशी भासते. आकाशातील तारे ह्या रात्रीच्या विलोभनीय निसर्गाकडे मायेने भारावून गेल्यासारखे पाहत असतात. पृथ्वीवरची इडापिडा नाहीशी झालेली असते आणि चौफेर सौख्य, समाधान नांदत असतं. खेड्याच्या डाव्या अंगाला शेत होतं. ते दूरवर अगदी क्षितिजाला भिडल्यासारखं वाटत होतं. चांदण्यानं न्हाऊन निघालं होतं. तिथेपण निःशब्द शांतता पसरलेली होती.

'हो, खरंच आहे. चंद्राची सर दुसऱ्या कोणाला येणार? इवान इवानिचनं बुरकिनच्या म्हणण्याला पुस्ती दिली. शहरात आपण सर्वजण घुसमटत, दाटीवाटीत राहत असतो. अनावश्यक कागदपत्रांची लिखापट्टी करीत असतो. पत्ते खेळत बसतो. हा तरी एका तऱ्हेनं कोषच की. आपण आपलं सारं आयुष्य रिकामटेकड्या माणसांत, कोर्टकचेऱ्यांत, मूर्ख, आळशी बायकोच्या सहवासात

घालवतो. फालतू गोष्टी मिटक्या मारत ऐकतो. हा पण एक कोषच नाहीतर काय! तुमची जर इच्छा असेल तर मी तुम्हाला वेगळ्याच प्रकारची अनुभूती देणारी हकीगत सांगू का?'

'नको, झोपायची वेळ केव्हाच होऊन गेलीय.' बुरकिन म्हणाला. 'शुभ रात्री.' नि दोघंही झोपडीत जाऊन अंथरुणावर आडवी झाली आणि झोपेची आराधना करू लागली. एवढ्यात पावलांचा हलकासा आवाज त्यांच्या कानावर पडला. टप, टप ... झोपडीच्या जवळून कुणीतरी चाललं होतं. थोडं पुढं जाऊन तो माणूस थांबला. थोड्या वेळानं परत टप टप आवाज आला... कुत्री ओरडायला लागली.

'ही मावरा जात असणार.' बुरकिन म्हणाला.

पावलांचा आवाज थांबला.

'लोकं किती खोटारडी असतात हे तू पाहत असतोस, ऐकत असतोस.' इवान इवानिच कुशी बदलून पुढं बोलू लागला.

'तू हा खोटेपणा मुकाट्यानं सहन करतोस म्हणून लोक तुलाच मूर्ख समजतात. तू अपमान, अवहेलना चालवून घेतोस, तू निःस्पृह आणि स्वतंत्र वृत्तीच्या लोकांच्या बाजूचा आहेस हे छातीठोकपणे सांगू शकत नाहीस. आणि हे सर्व कशासाठी करतोस तर भाकरीच्या एका तुकड्यासाठी, उबदार निवाऱ्यासाठी, छोट्याशा पदोन्नतीसाठी. ह्या सगळ्या गोष्टींची किंमत फुटक्या कवडीएवढी देखील नसते, नाही! अशा अवस्थेत ह्यापुढं जगणं शक्य नाही.'

'पण हे आता विषयांतर होतंय तुझं इवान इवानिच.' अध्यापक म्हणाला. 'चला झोपायला हवं आता.'

दहा मिनिटांच्या आत बुरकिन गाढ झोपला. इवान इवानिच मात्र सारखी कूस बदलत होता, उसासे टाकत होता. तो ताडकन उठला, दरवाज्याबाहेर गेला आणि चिलीम ओढू लागला.

: ५ :

कुत्रेवाल्या बाईसाहेब

सध्या बंदरावर एकच बोलबोला होता की 'याल्ता'मध्ये एक नवा चेहरा सर्वांच्या पाहण्यात येतोय. कुत्र्याचं पिल्लू घेऊन वावरणारी एक युवती. याल्ताला येऊन दोन आठवडे झालेल्या आणि तिथल्या लोकांच्या वागण्या-राहण्याशी समरस झालेल्या द्मीत्री द्मीत्रीच गूरवला पण नवनवीन चेहऱ्याविषयी कुतूहल वाटायला लागलं होतं. 'वेर्ने'जवळच्या पॅव्हीलियनमध्ये बसला असताना त्याला पण मध्यम उंचीची, भुऱ्या केसांची, डोक्यावर सैनिकी बेरेट घातलेली एक तरुणी बंदरावर फिरताना दिसली होती. तिच्या पाठीमागे पांढरा पोमेरियन कुत्रा पळत होता.

त्यानंतर दिवसातून कितीदातरी पालिकाबागेत नाहीतर चौकात ती त्याला भेटायची. तीच ती टोपी घालून आणि पांढऱ्या पोमेरियन कुत्र्याला हातात घेऊन हिंडत असायची ती. ती कोण, कुठली कुणालाच माहीत नव्हतं. त्यामुळे सर्वजण तिला कुत्रेवाली बाई असंच म्हणायचे!

'इथे तिच्याबरोबर जर तिचा नवरा आला नसला आणि इथे तिच्या परिचयाचं पण कोणी नसलं तर तिच्याशी ओळख करून घ्यायला काय हरकत आहे?' गूरवच्या मनात विचार आला.

तो अजून चाळिशीला पोहोचला नव्हता पण त्याला बारा वर्षांची एक मुलगी आणि जिम्नाझियामध्ये शिकणारे दोन मुलगे होते. विद्यालयाच्या दुसऱ्या वर्षात शिकत असतानाच त्याचं लग्न करून देण्यात आलं होतं. त्यामुळे सध्या त्याची बायको त्याच्यापेक्षा दीडपट वयस्क दिसायची. ती एक ऊंच, धिप्पाड, काळ्या भुवयांची, ताठ मानेची आणि तिनेच केलेल्या स्वतःच्या वर्णनाप्रमाणे विचारवंत अशी बाई होती. तिचं वाचन बरंच होतं. पत्रांतून कधी कठोर 'इ'चा वापर करायची नाही ती आणि नवऱ्याला कधी 'द्मीत्री' म्हणून हाक नाही मारायची. नेहमी 'दिमित्री' असंच म्हणायची. पण मनोमनी मात्र त्याला ती संकुचित

वृत्तीची, हिमटी, असंस्कृत वाटायची. त्याला तिचं जरा भयच वाटायचं. त्यामुळे घरात राहणं त्याला फारसं आवडायचं नाही. गेले कैक दिवस तो तिच्याशी एकनिष्ठ नव्हता. नेहमी तिला फसवायचा आणि म्हणूनच बायकांविषयी तो अपशब्द काढायचा. त्याच्या उपस्थितीत बायकांविषयी कोणी बोलत असलं तर तो स्त्रीजातीला ' खालच्या जातकुळीच्या ' म्हणून संबोधायचा !

त्याला वाटायचं की आयुष्यात आलेल्या कटू अनुभवांतून त्याला खूप काही शिकायला मिळालंय. आणि म्हणून स्त्रियांना वाटेल त्या नावानं संबोधण्याचा त्याला अधिकारच आहे. इतकं असूनही ह्या ' खालच्या जाती 'शिवाय तो दोन दिवससुद्धा राहू शकत नव्हता. पुरुषांच्या मेळाव्यात त्याला उबग यायचा. संकोचल्यासारखं वाटायचं. त्यांच्यात तो अबोल आणि स्थितप्रज्ञ वाटायचा. बायकांच्यात मात्र त्याला मोकळं मोकळं वाटायचं. त्यांच्याशी वागायचं कसं, कोणकोणत्या विषयांवर बोलायचं सगळं सगळं माहीत होतं त्याला. इतकंच काय, पण त्यांच्याशी न बोलणंही त्याला सहज जमायचं. त्याच्या बाह्य स्वरूपात, स्वभावात, व्यक्तिमत्त्वात असं काहीतरी आकर्षक, मनाचा ठाव न लागणारं होतं की स्त्रिया त्याच्यावर फिदा व्हायच्या आणि हेही तो जाणून होता. त्याच्या स्वत:च्यात पण अशी काही सुप्त शक्ती होती की जी त्याला स्त्रियांकडे खेचून न्यायची.

नानाविध अनुभवांनी विशेषत: कटू अनुभवांनी त्याला कधीच शिकवलं होतं की स्त्रियांशी कुठल्याही प्रकारची जवळीक सुरुवाती सुरुवातीला माणसाचं जीवन विविध पैलूंनी रंगतदार करते आणि गोड, सहजसुलभ, रोमांचक अनुभूतीचा आभास निर्माण करते. खासकरून सरळमार्गी, द्विधा मन:स्थितीच्या पण धीम्या प्रवृत्तीच्या मॉस्कोवासीयांच्या बाबतीत ही जवळीक अचूकपणे एक संपूर्ण प्रश्नचिन्ह आणि तेही गुंतागुंतीचं प्रश्नचिन्हं उभं करते. सरतेशेवटी परिस्थिती बिकट होऊन बसते. परंतु आपल्याला आकर्षित करणाऱ्या प्रत्येक नव्या स्त्रीच्या पहिल्या भेटीत हा पूर्वानुभव कसा कोण जाणे त्यांच्या आठवणीतून निसटून जातो. जगण्याची तीव्र इच्छा होते आणि सगळंच सोपं आणि मोहक भासू लागतं.

असाच एक दिवस संध्याकाळी गूरव बागेत जेवण घेत होता. एवढ्यात बेरेटमधली ती युवती अगदी धीम्या चालीनं त्याच्या दिशेनं येऊन शेजारच्या

टेबलावर बसली. तिच्या चेहऱ्यावरचे भाव, तिची चाल, पेहराव, केशरचना इत्यादी गोष्टी त्याला सांगत होत्या की ती उच्चभ्रू, विवाहित आणि याल्तामध्ये पहिल्यांदाच एकटी आली आहे आणि त्यामुळे साहजिकच जरा कंटाळलेली दिसतेय... इथल्या स्थानिक लोकांच्या याल्तातील स्वैर जीवनासंबंधीच्या गावगप्पांत पुष्कळदा काहीच तथ्य नसायचं. अशा थापेबाज लोकांची त्याला घृणा वाटायची. तसल्या प्रकारच्या अफवा बहुतेक करून संधी मिळाली तर कधीही पापाचे वाटेकरी होण्यास न कचरणाऱ्या लोकांनीच पसरवलेल्या असायच्या. पण जेव्हा ती तरुणी त्याच्यापासून तीन पावलांवर शेजारच्या टेबलावर येऊन बसली तेव्हा त्यालासुद्धा गप्पांमधील सहजपणे मिळविलेला विजय, डोंगरावरचे फेरफटके, मोहात पाडणारे निसटते क्षणिक संबंध, अपरिचित, साधे नावगावसुद्धा माहीत नसलेल्या स्त्रीबरोबरील प्रियाराधन इत्यादी मोहिनी घालणाऱ्या विचारांनी अचानक भारावून टाकलं.

त्यानं त्या पोमेरियन कुत्र्याच्या पिल्लाला खूष करून जवळ बोलावलं आणि बोटांनी त्याला चुचकारलं. पिल्लू गुरगुरलं, गूरवनं त्याला परत चुचकारलं.

त्या युवतीनं त्याच्याकडे पाहिलं मात्र, तिची नजर खाली झुकली.

'तो चावायचा नाही.' ती म्हणाली आणि लाजली.

'त्याला हाड दिलं तर चालेल?' आणि जेव्हा तिनं होकारार्थी डोकं हालवलं, तेव्हा त्यानं सौहार्दतेनं विचारलं, 'तुम्हाला याल्तात येऊन बरेच दिवस झाले का?'

'जवळजवळ पाच एक दिवस झाले असतील!' जरावेळ दोघंही काहीच बोलली नाहीत.

'वेळ जात असतो भराभर पण तरीसुद्धा इथं कंटाळा किती येतो?' त्याच्याकडे न पाहताच ती म्हणाली.

'इथं कंटाळा येतो असं बोलायची एक फॅशनच झाली आहे. इथं येणारा माणूस स्वतः राहत असतो 'बेल्येव' नाहीतर 'जिझद्रा'मध्ये आणि तिथं त्याला कंटाळा नाही येत. पण इथं येतो आणि म्हणतो, 'किती कंटाळवाणं वाटतं इथं! काय ही धूळ!' अशा थाटात बोलत असतो की स्पेनमधल्या 'ग्रेनादा'हूनच आलाय इथं.

तिनं स्मितहास्य केलं. नंतर दोघंही दोन अपरिचित माणसांप्रमाणे मुकाट्याने जेवायला लागले. जेवणानंतर बरोबर बाहेर पडले. विनोदी, हलक्या फुलक्या गप्पा सुरू झाल्या. गप्पांचा विषय होता कुठेही जावं, काहीही बोलावं अशा बिनधास्त, कशातही समाधान मानणाऱ्या लोकांचा. मग चालता चालता समुद्राला कशी वेगळीच झळाळी आलीय, पाण्याचा रंग लिलॅकच्या फुलासारखा कसा दिसतोय, आणि ते किती संथ आणि गरम आहे, शिवाय चंद्रप्रकाशाचा सोनेरी पट्टा पाण्यावरून कसा धावतोय ह्यासंबंधी बोलणं झालं. म्हणत होते की, दिवसभराच्या कडक उन्हाळ्यानंतर आता अगदी घुसमटल्यासारखं होतंय. मग गूरव स्वत:विषयी बोलायला लागला की तो मॉस्कोवासी आहे. फिलॉलॉजीचा पदवीधर आहे पण बँकेत नोकरी करतो. बऱ्याच दिवसांपूर्वी खाजगी ऑपेरा कंपनीत गायला मिळावं म्हणून गाण्याचे शिक्षण घेत होता. पण नंतर दिलं सर्व सोडून. मॉस्कोत त्याची दोन घरं आहेत... तिच्या बोलण्यावरून त्याला समजलं की ती पिटरबर्गमध्ये लहानाची मोठी झाली. पण दोन वर्षांपूर्वी तिचं 'C' बरोबर लग्न झालं. अजून एक महिना तरी याल्तामध्ये राहायचा तिचा बेत आहे. तिचा नवरा पण नंतर येणार आहे कारण त्याला पण विश्रांतीची गरज आहे. तिचा नवरा कुठे नोकरी करतो हे मात्र तिला काही सांगता आलं नाही. तो राज्य सरकारमध्ये नोकरी करतो की केंद्र सरकारमध्ये. आणि हे माहीत नाही हे तिला अवघड वाटत होतं. गूरवला तिच्या नावाचा पण पत्ता लागला. 'आन्ना सिरगेयेवना.'

आपल्या खोलीत आल्यावर तो तिचाच विचार करीत होता. उद्या ती आपल्याला बहुतेक भेटणार असंच धरून चालला होता तो. हो, नक्कीच भेटणार ती. अंथरुणात पडल्यापडल्या त्याला आठवलं की, आत्ताआत्तापर्यंत ती शाळकरी मुलगीच होती. म्हणजे आपल्या मुलीसारखीच की! तिच्या हसण्यात, अनोळखी माणसाशी बोलण्यात किती भीती आणि दडपण होतं. तिच्याभोवती लोक गोंडा घोळताहेत, तिच्याकडे टक लावून पाहताहेत आणि एक गुप्त हेतू मनात ठेवूनच तिच्याशी बोलताहेत याची तिला पुसटशीही कल्पना नसेल. इथल्या ह्या असल्या वातावरणात एकटं राहायची पाळी आयुष्यात पहिल्यांदाच आली असणार यात शंकाच नाही. तिची नाजूक बारीक मान, सुंदर पिंगे डोळे आठवत होते त्याला आत्ता. तिच्याविषयी दया यावी असं काहीतरी नक्कीच आहे तिच्यात, असा विचार करतच तो झोपेच्या आधीन झाला.

२

त्यांची दोघांची ओळख झाल्याला एक आठवडा उलटून गेला होता. तो सुट्टीचा दिवस होता. खोलीत घुसमटल्यासारखं वाटत होतं. आणि बाहेर रस्त्यावर चक्री वादळामुळे धुराचे लोट उठत होते. डोक्यावरच्या टोप्या उडून जात होत्या. दिवसभर घशाला नुसती कोरड पडत होती. गूरव सारखा पॅव्हीलियनमध्ये जा ये करीत होता. आन्ना सिरगेयेवनाला सरबत, थोड्या वेळानं आईस्क्रीम असं काहीतरी घेण्याचा आग्रह करीत होता. काय करावं तेच कळेनासं झालं होतं सगळ्यांना.

संध्याकाळी जेव्हा वादळ शमलं तेव्हा ती दोघं बंदरावर येणारी बोट पाहायला गेले. धक्क्यावर भटकायला पुष्कळच लोक जमले होते. काहीजण कोणाला तरी भेटायला हातात पुष्पगुच्छ घेऊन आले होते. एवढ्यात याल्ताचा वैशिष्ट्यपूर्ण पारंपरिक पोषाख केलेली दोन टोळकी एकदम लोकांच्या डोळ्यांत भरली. तरुण मुलींसारखे पोषाख करून नटलेल्या पोक्त स्त्रिया आणि बऱ्याच संख्येने उपस्थित असलेले लष्कर प्रमुख.

समुद्र खवळल्यामुळे आगबोट उशिराच आली. म्हणजे अगदी सूर्य मावळल्यावरच. धक्क्याला लागायच्या आधी बराच वेळ ती हेलकावे खात होती. आन्ना सेरगेयेवना दुर्बिणीतून बोटीकडे आणि प्रवाशांकडे पाहत होती. जणू काही आपल्या ओळखीचं कुणी दिसतंय का, त्याचा शोध घेत होती ती. गूरवशी बोलायला लागली तेव्हा त्याला तिच्या डोळ्यांत एक वेगळीच चमक दिसली. ती खूप बडबड करीत होती. प्रश्नांची नुसती सरबत्ती चालली होती तिची. पण आपण काय विचारत होतो, ह्याचासुद्धा तिला क्षणात विसर पडत होता. अशा धांदलीमुळं गर्दीत तिची दुर्बिण गहाळ झाली.

पारंपरिक पोषाखातला तो जमाव वेगवेगळ्या दिशांना निघून गेला. वारा पडला होता आणि माणसांचा मागमूसही नव्हता तिथं. पण गूरव आणि आन्ना बोटीवरून अजून कुणी उतरत तर नाही ना, हे पाहण्यासाठी तिथंच थांबले होते. आन्ना सेरगेयेवना आता अगदी गप्प गप्प झाली होती. गूरवकडे न पाहता फुलांचा सुगंध हुंगत होती.

'संध्याकाळपर्यंत तरी हवा बरी झाली म्हणायची,' तो म्हणाला. 'कुठं जायचं आपण आता? गाडी करून जायचं का फेरफटका मारायला?'

तिनं काहीच उत्तर दिलं नाही.

तो तिच्याकडे टक लावून पाहत होता. आणि अचानक त्यानं तिला आलिंगन दिलं आणि तिच्या ओठांचं चुंबन घेतलं. फुलांचा सुवास आणि दमटपणा त्याच्या नाकात भरला. त्याक्षणी त्यानं भीत भीत इकडे तिकडे नजर टाकली. पाहत तर नव्हतं ना कोणी?

'चला, तुमच्या खोलीवर जाऊया...' त्यानं हळू आवाजात बोलायला सुरुवात केली.

दोघंही भराभर जायला निघाली.

तिच्या खोलीतील हवा कुंद होती. सेंटचा घमघमाट सुटला होता. जपानी दुकानातली खरेदी होती ती तिची. तिच्याकडे पाहता पाहता गूरवच्या मनात विचार आला, 'माणसाचं आयुष्य किती तऱ्हेच्या आणि वेगवेगळे अनुभव देणाऱ्या भेटींनी भरलेलं असतं!' भूतकाळातल्या अशा कितीतरी आठवणींचा साठा त्यानं जपून ठेवला होता! त्यातील काही स्त्रिया सालस, निष्काळजी, प्रेमामुळे प्रफुल्लित झालेल्या, त्यानं दिलेल्या अगदी थोड्यावेळच्या सुखासाठी देखील त्याच्या सदैव ऋणात राहणाऱ्या अशा होत्या. आणि काहीजणी त्याच्या बायकोप्रमाणे होत्या. त्यांच्या प्रेमात बांधिलकी नसायची. बोलणं निरर्थक, अनाठायी वाटायचं. झपाटलेपणा असायचा. त्यांच्या प्रेमाचा आविर्भाव असा असायचा की ते साधंसुधं प्रेम नाही. नुसती उत्कटता नाही तर त्याहून उच्च पातळीवरचं काहीतरी आहे. दोन तीन अशाही स्त्रिया त्याच्या सहवासात आल्या की ज्या अतिशय सुंदर, थंड प्रवृत्तीच्या पण अचानक त्यांच्या चेहऱ्यावर लुटेरूपणाचा भाव तरळून जायचा. हिसकावून घेण्याची प्रबळ इच्छा होती त्यांच्यात. आणि आपण दुसऱ्याला देऊ शकू, त्यापेक्षा कितीतरी पटींनी जास्त ओरबाडून घेण्याची प्रवृत्ती होती त्यांची. बरं, ह्या काही अगदी नवयौवना नव्हत्या तर कावेबाज, सारासार विचारं नसणाऱ्या, आणि बेताचीच अक्कल असलेल्या अशा होत्या. अशा स्त्रियांचं त्याला आकर्षण वाटत नसे. त्यांचं सौंदर्य मनात तिटकारा निर्माण करायचं आणि त्यांच्या कपड्यांच्या सुंदर लेसला सुरकुत्या

पडल्या आहेत असं वाटायचं त्याला.

हिच्या बाबतीत मात्र धिटाईचा अभाव, नवयौवनातील अननुभवामुळे आलेला बुजरेपणा, अवघडलेपणा आणि कुणीतरी तेवढ्यात दारावर टकटक करणार ह्या भीतीमुळं मनाची कावरीबावरी अवस्था अनुभवाला येत होती. आन्ना सेरगेयेवना ह्या 'कुत्र्याच्या पिल्लूवाल्या' बाईनं जे घडलं ते काहीतरी भयानक, गंभीर आहे आणि त्यात आपली हार झाली आहे, अशी समजूत करून घेतली. पण ते विचित्र आणि अनाठायी असंच होतं. तिचा रसरशीत चेहरा पांढराफटक पडला आणि तिचे लांबसडक केस चेहऱ्याच्या दोन्ही बाजूला केविलवाणे लोंबत होते. हतबल आणि विचारात गढून गेलेली ती तंतोतंत जुन्या काळातील चित्रकाराने रेखाटलेल्या अपराधी स्त्रीच्या चित्रकृतीसारखी दिसत होती.

'हे चांगलं नाही झालं.' ती म्हणाली. 'यापुढे माझा तिरस्कार करणाऱ्यांमध्ये तुम्ही पहिले असणार.'

तिच्या खोलीत टेबलावर टरबूज ठेवलेलं होतं. त्यानं त्याचा एक तुकडा कापला आणि सावकाशपणे तो ते खात बसला. त्यामुळे अर्धा तास तरी न बोलता गेला.

आन्ना सेरगेयेवना हळवी होती. तिच्या चेहऱ्यावर शालीन, निष्कपट, अपरिपक्व स्त्रीच्या चेहऱ्यावरील निर्मळपणा विलसत होता. टेबलावर जळणाऱ्या एकमेव मेणबत्तीच्या प्रकाशात एरवी तिचा चेहरा झळाळला असता पण आत्ता मात्र तो मनावर दडपण आल्यासारखा दिसत होता.

'मी कशासाठी तुझा तिरस्कार करीन ?' गूरवनं विचारलं. 'तू काय बोलते आहेस ते तुझं तुलाच कळत नाहीये.'

'देव मला क्षमा करो!' ती म्हणाली. आणि तिचे डोळे अश्रूंनी डबडबले. 'भयंकर झालं हे आज.'

'तुझं वागणं अगदी बरोबरच आहे.'

'काय बरोबर आहे माझं? मी अगदी दुष्ट, नीतिमूल्यं झुगारून देणारी बाई आहे. मला स्वत:ची घृणा वाटतेय आणि माझं वागणं बरोबर आहे असं नाही वाटत मला. मी नुसतं माझ्या नवऱ्याला फसवलं नाही तर स्वत:लाही फसवलंय. केवळ आत्ताच फसवलंय असं नाही तर कधीपासून फसवत आलेय स्वत:ला.

माझा नवरा निष्कलंक, चांगला माणूस असेल कदाचित पण काही झालं तरी तो नोकरदार आहे! तो कसलं आणि काय काम करतो मला माहीत नाही. पण एवढं मात्र खरं की तो नोकरदार आहे एक. त्याच्याशी माझं लग्न झालं तेव्हा मी अवघी वीस वर्षांची होते. जिज्ञासेनं माझा छळ मांडला नुसता. आहे त्यापेक्षा काहीतरी जास्त मिळावं अशी प्रबळ इच्छा झाली. असणारच असं काही – मी स्वत:ला म्हटलं, – दुसऱ्या तऱ्हेचं जीवन पाहावं कसं असतं ते! अजून पाहावं, अजून अनुभवावं... त्या जिज्ञासेनं माझी राखरांगोळी केली... तुम्हाला ते नाही कळायचं. पण देवाला स्मरून सांगते. माझा माझ्यावरच ताबा राहिला नाही. झपाटल्यासारखी अवस्था झाली होती माझी. स्वत:ला अंकुश लावणं जवळजवळ अशक्यप्रायच होतं. नवऱ्याला मी आजारी आहे असं सांगितलं आणि इथे आले... दूषित वायूमुळे कोंडमारा झाल्यासारखी, वेड लागल्यासारखी भटकत होते नुसती... आणि आता ही अशी वाईट चालीची बाई झाली आहे मी, कुणीही यावं आणि अनैतिक म्हणून तिरस्कार करावा.'

गूरवला त्या बडबडीचा कंटाळा आला. तो साधाभोळा आवाज, पश्चात्ताप अशा अनपेक्षित आणि अप्राठायी गोष्टींची चीड आली त्याला. तिच्या डोळ्यांत ते अश्रू दिसले नसते तर ती विनोद करतेय किंवा नाटक करतेय असंच वाटलं असतं त्याला.

'काही कळत नाही तुझं बोलणं.' तो हळुवारपणे म्हणाला. 'तुला पाहिजेय तरी काय?'

तिनं त्याच्या छातीवर आपलं तोंड लपवलं आणि त्याला मिठी मारली.

'विश्वास ठेवा माझ्यावर, विश्वास ठेवा. माझी विनंती आहे तुम्हाला...' ती म्हणाली. 'मला निर्मळ, प्रामाणिक जीवन आवडतं आणि पापाची मला चीड आहे. मी काय करतेय, ते माझं मलाच कळत नाहीये. सर्वसामान्य माणसं म्हणतात, पिशाच्चाचं काम आहे हे. त्यामुळे मी पण म्हणू शकेन ना की माझ्या मानगुटीला पिशाच्च बसलं होतं म्हणून.'

'पुरे झालं, पुष्कळ झाला हा फार्स आता.' तो पुटपुटला.

तिच्या घाबरलेल्या, आपल्याच तारेत असलेल्या, कुठेतरी दृष्टी लावून बसलेल्या डोळ्यांत डोकावून पाहिलं त्यानं. तिचं चुंबन घेतलं. अगदी हळू, प्रेमानं

बोलत राहिला तिच्याशी. तेव्हा ती थोडीशी शांत झाली. पुन्हा उल्हसित झाली. दोघंही पुन्हा हसू लागली.

नंतर ते जेव्हा फेरफटका मारायला बाहेर पडले तेव्हा बंदरावर चिटपाखरूही नव्हतं. सुरूच्या झाडांमध्ये वसलेल्या गावाला मरणकळा आली होती. पण समुद्राची गाज ऐकू येत होती. आणि लाटा किनाऱ्यावर आपटत होत्या. एक मच्छीमार बोट लाटांवर हिंदकळत होती. आणि तिच्यावर टांगलेला कंदील लुकलुकत होता.

त्यांनी गाडीवानाला शोधलं आणि झारच्या राजवाड्याचे भग्न अवशेष असलेल्या 'ओरीआन्दा' ह्या याल्तामधल्या प्रेक्षणीय स्थळाकडे ते जायला निघाले.

'मला आत्ताच खालच्या मजल्यावरच्या हॉलमध्ये तुझ्या आडनावाचा पत्ता लागला. बोर्डवर 'फॉन डिडेरिल्स' असं लिहिलं होतं.' गूरव म्हणाला. 'तुझा नवरा जर्मन आहे का ?'

'नाही, त्याचा बाप जर्मन असावा. तो स्वत: मात्र कट्टर सनातनी आहे.'

ओरिआंदातल्या चर्चजवळच्या बाकावर बसून ती दोघं समुद्राकडे पाहत मुकाट्यानं बसली होती. सकाळच्या धुक्यातून याल्ताचं अस्पष्ट दर्शन होत होतं. टेकड्यांची शिखरं निश्चल पांढऱ्या ढगांनी आच्छादली होती. झाडांवरची पानं हालत नव्हती. त्सिकाडा पक्षी ओरडत होते. खालून वरपर्यंत पोहोचणारा समुद्राचा एकसुरी, धिम्मा आवाज शांतीचा, त्रिकालाबाधित स्वप्नांचा संदेश आमच्यापर्यंत पोहोचवीत होता. ह्या जागी 'याल्ता' नव्हता की 'ओरिआंदा' नव्हती, तेव्हापासून इथं खाली हाच समुद्रव होता आणि आत्तापण आहे. इतकंच नाही तर आपल्यानंतरही हा कालनिरपेक्ष आणि खोल आवाज असाच येत राहणार आहे. आपल्यातील प्रत्येक मनुष्याला ह्या कालबाधातीत अवस्थेचा त्याचप्रमाणे जन्ममरणाकडे त्रयस्थपणे पाहण्याचा एकच ध्यास असतो. न जाणो आपल्या इहलोकीच्या जीवनातील ही अविरत धडपड चिरमुक्ती आणि पूर्णत्वाकडे पोहोचण्यासाठी केलेली प्रतिज्ञा असावी. सूर्योदयाचे वेळी ह्या सौंदर्यवतीच्या सान्निध्यात, समुद्र, पर्वत, ढग, विशाल आकाश अशा जादुई परिसरात बसल्यामुळे समाधानी पण संमोहित दिसणाऱ्या गूरवच्या मनात विचार आला की,



'विचारांती असं वाटतं की ह्या जगात माणसाच्या प्रत्यक्ष जीवनात सगळं कसं सुंदर आहे. फक्त एकच गोष्ट खटकते की आयुष्यातील अंतिम ध्येय आणि माणसातील माणूसपण, ह्या गोष्टींचा आपल्या विचारसरणीत आणि वागणुकीत आपल्याला विसर पडलेला आहे.'

एवढ्यात कुणीतरी एक माणूस तिथं आला. नक्कीच तिथला चौकीदार असणार तो. त्यानं त्या दोघांकडे निरखून पाहिलं आणि निघून गेला. ह्या असल्या बारक्याशा गोष्टीमध्ये देखील कसलातरी गूढपणा पण त्याचबरोबर मनाला भावून जाणारं असं काहीतरी प्रत्ययास येत होतं. उगवतीच्या सूर्यकिरणांनी अग्नीशिवाय प्रकाशित झालेली 'फिअदोसिआ'हून येणारी आगबोट दृष्टिपथात यायला लागली होती.

'गवतावर दव पडलंय.' बऱ्याच वेळच्या मौनानंतर आन्ना सेरगेयेवना बोलती झाली.

'हो ना, घरी परतायची वेळ झाली.'

ती दोघं गावात परतली.

त्या दिवसानंतर ते दोघं समुद्रकिनाऱ्यावर एकमेकांना भेटायचे, बरोबर नाष्टा करायचे, जेवायचे, भटकायचे. समुद्राच्या सौंदर्याचा आस्वाद घ्यायचे. तिची सारखी तक्रार असायची की तिला झोप येत नाही. काळजीनं छातीत धडधड होते. ते नि तेच प्रश्न विचारायची. कधी तो तिच्याशी म्हणावं तशा आदरानं पाहत नाही याबद्दल मत्सर वाटून तर कधी भीतीनं विचलित व्हायची. चौकात किंवा बागेत जवळपास कोणी नाही असं पाहून तो तिला एकदम जवळ घ्यायचा आणि भावनावेगानं तिचं चुंबन घ्यायचा. मनसोक्त आळसुडलेपणा, इकडे तिकडे कुणी पाहत नाही ना, अशी भीती मनात धरून दिवसाढवळ्या घेतलेली ती चुंबनं, उकाडा, समुद्राचा दरवळणारा वास, डोळ्यांपुढून कायम सरकणारी आळशी तरी तरतरीत, खाऊनपिऊन सुखी असलेली ती तिथली माणसं, ह्या सर्व गोष्टींनी त्याला जणू नवजीवन दिलं. आन्ना सेरगेयेवना किती चांगली, मोहक दिसते, –

हे तो तिलाच ऐकवायचा आणि तिच्यापासून एक क्षणही दूर जायला तयार नसायचा. पण ती मात्र सारखी विचारमग्न असायची आणि त्याला सारखं पटवायची की तो तिचा आदर करीत नाही, त्याचं तिच्यावर मुळीच प्रेम नाहीये

आणि तिला तो एक अगदीच सामान्य स्त्री समजतो. जवळजवळ दररोज संध्याकाळी उशिरानं ती दोघं कुठेतरी गावाबाहेर, ओरीआन्दात नाहीतर धबधब्याकडे गाडी करून जायची. त्यांच्या ह्या सहली आनंददायक असायच्या. आणि प्रत्येक वेळचा अनुभव हमखास मस्त आणि अनमोल असाच असायचा.

आन्नाच्या नवऱ्याच्या येण्याची ती दोघं वाट पाहत होती. पण तो न येता त्याचं पत्रच आलं. त्याच्या डोळ्यांना दुखापत झाली होती आणि त्यानं आपल्या बायकोला लवकरात लवकर घरी येण्याची विनंती केली होती. आन्ना सेरगेयेवनाची नुसती धांदल उडाली.

'बरं झालं की मी आता इथून जाणार आहे.' ती गूरवला म्हणाली. 'नशिबाचाच खेळ म्हणायचा!'

तिला रेल्वेस्टेशनवर घोडागाडीतून जावं लागलं. गूरव तिला पोचवायला गेला होता. त्यांना हा घोडागाडीचा प्रवास दिवसभर करावा लागला. ती जेव्हा कूप्येरस्की एक्सप्रेसमध्ये चढली आणि दुसरी घंटा झाली तेव्हा ती गूरवला म्हणाली –

'या ना असे इकडे. मला तुम्हाला एकदा डोळे भरून पाहायचं आहे.'

ती जरी रडली नाही तरी दु:खीकष्टी दिसत होती. आजाऱ्यासारखी दिसत होती आणि चेहरा थरथरत होता तिचा.

'मी घरी गेले तरी माझ्या मनात तुमचा विचार येत राहणार... आठवणी काढीत बसेन मी.' ती म्हणाली. 'देव तुमचं भलं करो. मला विसरायचा प्रयत्न करा. माझा सहानुभूतीपूर्वक विचार करा. आपण आता एकमेकांचा कायमचा निरोप घेऊ या. तसंच व्हायला हवं. कारण असं एकमेकांना भेटणं ह्यापुढे कधीच शक्य होणार नाही. देव तुमच्या पाठीशी राहो हीच इच्छा!'

आगगाडी धाडधाड निघून गेली. तिचा धूर केव्हाच दिसेनासा झाला. आणि एका मिनिटात तिचा आवाजदेखील ऐकू येईनासा झाला. त्याचं ते भान हरपून जाणं, त्याचा तो खुळेपणा या सर्वांचा काही वेळाने मागमूसदेखील राहू नये यासाठीच हे सगळं जणू हेतुपुरस्सर घडत होतं. प्लॅटफॉर्मवर एकटा राहिल्यावर दूरवर अंधाराकडे पाहत गूरव गवतावरच्या टोळांची किरकिर आणि टेलिग्राफच्या तारांची किणकिण शांतपणे ऐकत होता. जसा काही आत्ता कुठे तो झोपेतून जागा

होत होता. त्याच्या मनात विचार आला की आपण आयुष्यात हे एक आणखी साहस आणि धिटाई केली म्हणायची. पण ती पण संपल्यातच जमा आहे. त्याच्या आठवणी तेवढ्या शिल्लक उरल्या आहेत. तो कासावीस झाला, दु:खी झाला आणि थोडा पश्चात्तापदग्धही. त्याला वाटत होतं की ह्यापुढे कधीही न भेटणारी ही तरुणी त्याच्या सहवासात सुखी नसावी. तो तिच्याकडे सौहार्दतेने, हळूवारपणे पाहत होता. तरीसुद्धा त्याच्या तिच्याशी वागण्यात, बोलण्यात, प्रेम करण्याच्या पद्धतीत एक प्रकारची उपहासाची छटा होती, नशीबवान पुरुषाला वाटते तशी घमेंड होती आणि हेसुद्धा तो वयानं तिच्या दुपटीनं असताना सुद्धा. ती त्याला नेहमी एक सभ्य, असाधारण विचारशक्तीचा माणूस म्हणून संबोधायची. याचाच अर्थ तो प्रत्यक्षात ज्या तऱ्हेचा माणूस होता तसा तो तिला कधी वाटला नाही. म्हणजेच त्यानं तिला जाणूनबुजून फसवलं नव्हतं ...

स्टेशनवर दरवळणाऱ्या सुगंधामुळे ग्रीष्माच्या आगमनाची चाहूल लागत होती. आणि संध्याकाळच्या वेळी गारठा पडू लागला होता.

'मला पण आता घरी जायला हवं.' प्लॅटफॉर्मवरून बाहेर पडताना गूरव स्वत:शी म्हणाला. 'घरी परतायची वेळ होऊन गेली.'

३

मॉस्कोला गूरवच्या घरी सगळ्या गोष्टी हिवाळ्याच्या आगमनानुसार सुरू झाल्या होत्या. सकाळी मुलं जिम्नाझियाला जायला तयार होऊन चहा प्यायला बसायची तर बाहेर अंधारच असायचा. आयाला थोडा वेळ दिवे लावावे लागत. बर्फ जमायला लागलं होतं. हिमवर्षावाच्या पहिल्या दिवशी बर्फावरून घसरणाऱ्या गाडीतून फेरफटका मारताना, पांढरीशुभ्र जमीन, घरांची पांढरी छपरं पाहताना आणि गोड हलका श्वासोच्छ्वास करताना फार मजा वाटते. आणि अशावेळी आपल्याला तारुण्यातील दिवस आठवतात. बर्फाने चितारलेल्या जुन्या पुराण्या लिंबाच्या आणि बिर्योझाच्या वृक्षांवर प्रसन्न भाव विलसत होता आणि सायप्रस आणि पाम वृक्षांपेक्षा तेच वृक्ष हृदयाला स्पर्शून जात होते. त्यांच्या सान्निध्यात डोंगर आणि समुद्र ह्यांचा विचारसुद्धा करावासा वाटत नाही.

गूरव मॉस्कोवासी होता. तो सुंदर, हिमशीत अशा दिवशी मॉस्कोला परतला

होता. फरकोट आणि लोकरीचे हातमोजे घालून 'पित्रोवका' रस्त्यावरून हिंडत असताना शनिवारी संध्याकाळी चर्चमधल्या घंटा त्याच्या कानावर पडल्या तेव्हा त्यानं नुकतीच केलेली सफर, तो राहिला होता ती जागा ह्या सगळ्या गोष्टींचं त्याला अप्रूप वाटेनासं झालं. हळूहळू तो मॉस्कोच्या जीवनाशी समरस व्हायला लागला. दिवसाला तीन तीन वर्तमानपत्रे पहिल्या पानापासून शेवटच्या पानापर्यंत अधाशीपणानं वाचून काढू लागला. रेस्टॉरंट्स, जेवणाच्या पार्ट्या, क्लब, वाढदिवस इत्यादी गोष्टींची त्याला ओढ वाटू लागली. आपल्याकडे वकील मंडळी, कलाकार येतात ह्यात त्याला फुशारकी वाटत होती. डॉक्टर्स क्लबमध्ये प्रोफेसर मंडळींबरोबर आपण पत्ते खेळायला जातो, ह्या गोष्टीचा त्याला मोठेपणा वाटत होता. गोल्डबीफचा सबंध तुकडा आणि कोबी आणि कांदा यांचा स्ट्यू आपण अगदी सहज फस्त करू शकतो ह्याचा त्याला गर्व होता ...

जेमतेम एक महिना झाला होता. त्याला वाटलं, आन्ना सेरगेयेवना त्याच्या आठवणीत धुक्यात दिसावी तशी अस्पष्ट दिसू लागलीय. फक्त मधून केव्हातरी दुसऱ्या बायकांसारखीच मोहक स्मितहास्य करीत स्वप्नात दिसेल पण एक महिन्यात कडक हिवाळ्याने आपले हातपाय पसरले आणि त्याच्या स्मृतींना उजाळा आला. कालपरवाच आपण जणू आन्ना सेरगेयेवनाचा निरोप घेतलाय असं वाटायला लागलं त्याला. आठवणी अधिक तीव्रपणे बोलक्या व्हायला लागल्या तिच्या. संध्याकाळच्या शांतवेळी तो आपल्या खोलीत बसलेला असायचा तेव्हा मुलांचा अभ्यासाबरोबरच चाललेला गोंगाट त्याच्या कानावर येत असायचा. रेस्टॉरंटमध्ये गाणं किंवा ऑरगनचा आवाज येत असायचा. हिमवादळामुळं फायरप्लेसमधून घों घों आवाज होत असे. पण तरीसुद्धा ह्या सगळ्या गडबड गोंगाटात त्याला एकदम याल्तामधल्या आठवणी यायच्या. धक्क्यावरचे प्रसंग, डोंगरातल्या धुक्यात बुडलेली पहाट, फिअदोसिआची ती आगबोट, ती चुंबनं, जे जे आणि जसं जसं घडलं ते ते सर्व त्याला लख्ख डोळ्यांपुढे दिसायचं. कितीतरी वेळा तो खोलीत फेऱ्या मारायचा. आठवणीत दंग व्हायचा आणि मनाशीच हसायचा. मग आठवणींचं स्वप्नात रूपांतर व्हायचं. आणि त्याच्या कल्पनाविलासात भूतकाळ भविष्यकाळात मिसळून जायचा. आन्ना सेरगेयेवना त्याच्या स्वप्नात येईनाशी झाली पण मग सावलीसारखी सगळीकडे त्याच्या मागे मागे येतेय, आपला पाठलाग करतेय असं वाटायचं त्याला. डोळे मिटल्यावर ती

प्रत्यक्ष त्याच्यासमोर उभी ठाकायची आणि अशावेळी होती त्यापेक्षा ती अधिक सुंदर, तरुण, नाजूक दिसायची. याल्तात आपण दिसायचो त्यापेक्षा आता जास्त रुबाबदार दिसतोय असं त्याला वाटायचं. संध्याकाळच्या कातरवेळी ती पुस्तकांच्या कपाटातून, कोपऱ्यांतून, फायरप्लेसमधून त्याच्याकडे पाहतेय, असा भास व्हायचा त्याला. त्याला तिचा श्वासोच्छ्वास ऐकू यायचा. तिच्या ड्रेसची भुरळ पाडणारी सळसळ जाणवायची. रस्त्यावरून जाणाऱ्या येणाऱ्या स्त्रियांकडे तो निरखून पाहायचा आणि तिच्यासारखी तर दिसत नाही ना ही बाई ते शोधायचा ...

आपल्या आठवणी कोणालातरी सांगायच्या ह्या तीव्र इच्छेनं त्याला बेजार केलं. घरात स्वत:च्या प्रेमप्रकरणाविषयी बोलणं अशक्यप्रायच होतं. आणि घराबाहेर कोणाला सांगावं असं कोणीच दिसत नव्हतं, ना शेजारी पाजारी, ना बँकेमध्ये. आणि बोलणार तरी काय होता तो ? त्यानं तेव्हा प्रेम केलं होतं का ? त्याच्या आणि आन्ना सेरगेयेवनाच्या संबंधात सुंदर, काव्यमय, सूचक असं काही होतं तरी का ? की नुसतीच उत्सुकता होती. मग त्यानं प्रेमासंबंधी, स्त्रियांसंबंधी मोघम असं बोलायला सुरुवात केली. पण त्याच्या त्या बोलण्यामागचा हेतू मात्र कोणाच्याच लक्षात आला नाही. फक्त त्याची पत्नी आपल्या काळ्या भुवया उडवत म्हणाली,

'दिमीत्री, तुला चंगीभंगी माणसाची भूमिका वठवणं नाही जमायचं !'

एकदा मेडिकल क्लबमधून रात्री आपल्या पार्टनर ऑफिसरबरोबर बाहेर पडत असताना त्याला राहवलं नाही आणि तो बोलून गेला,

'माझी याल्तामध्ये कोणत्या सुंदर, गोड बाईशी ओळख झाली होती ते माहीत आहे का तुला ?'

ऑफिसर बग्गीत बसून जायला लागला, पण का कुणास ठाऊक परत वळला नि म्हणाला,

'द्मीत्री द्मीत्रिच !'

'काय म्हणतोस ?'

'तुझं हे आजचं विधान बरोबर असणार आहे, सोन्याची अंडी देणारी कोंबडी असणार ती बहुतेक !'

हे शब्द तर त्यांच्या नेहमीच्याच वापरातले. पण का कोण जाणे आज गूरवला ते फार लागले. अपमानकारक, कुचकट असं वाटलं. किती पाशवी वृत्ती, कशा तऱ्हेची माणसं असतात एकेक! मग डोळ्याला डोळा न लागणाऱ्या त्या रात्री, उदासवाणे, कंटाळवाणे गेलेले ते दिवस, त्यांचं काय! आततायीपणानं खेळलेले पत्ते, अधाशीपणाचं खाणं, पिऊन तर्र होणं आणि त्याच त्याच रटाळ गप्पा! सटरफटर कामं आणि त्याच त्या निरर्थक गप्पा ह्यामध्ये माणसाचा मौल्यवान वेळ, सृजनशक्ती नुसती वाया जाते आणि हातांत काय राहतं शेवटी, तर अगदी थोडं, पंख तुटलेल्या पक्ष्यासारखं नीरस जीवन, नुसता चोथा. ह्यातून सुटका नसते माणसाची. घरात बसलास तर वेड लागेल नाहीतर चोर दरोडेखोरांची संगत मिळेल!

गूरवची सबंध रात्र बेचैनीत, डोळ्याला डोळा न लागता गेली आणि दिवसभर डोकं दुखण्यानं हैराण केलं. दुसऱ्या दिवशीपण शांत झोप आली नाही त्याला. अंथरुणात बसून राहिला. मधूनच खोलीत येरझारा घालीत होता. मुलं नकोशी झाली होती. बँकेचा कंटाळा आला होता. कुठं जावंसं वाटत नव्हतं, की कुणाशी बोलायला मन तयार नव्हतं.

डिसेंबरमध्ये ख्रिसमसच्या सणाच्या वेळी त्यानं प्रवासाचा बेत आखला आणि बायकोला म्हणाला की, एका तरुण मुलाच्या कामासाठी पिटरबर्गला जाऊन येतो. आणि गेला मात्र 'सी'मध्ये. कशाला? त्याला स्वत:लासुद्धा कशासाठी जातोय ते नीटसं कळत नव्हतं. आन्ना सेरगेयेवनाला पाहावंसं, तिच्याशी थोडं बोलावंसं आणि जमल्यास तिच्या सहवासात राहावंसं वाटत होतं त्याला.

तो 'सी'मध्ये सकाळी पोहोचला आणि त्यानं हॉटेलमधली चांगली हवेशीर खोली घेतली. खोलीतील सगळी फरशी खाकी सैनिकी कापडाने झाकलेली होती. टेबलावर टोपी हातात धरून वर हात केलेल्या, तुटक्या डोक्याच्या अश्वारूढ शिपायांचे चित्र असलेली, धुळीनं माखलेली शाईची एक दौत होती. हॉटेलमधल्या शिपायानं त्याला आन्नाविषयी पाहिजे असलेली सर्व माहिती पुरवली. फॉन दीदीरित्स जुन्या गनूचारनाया रस्त्यावर राहत होता. त्याचं स्वत:चं घर होतं. ते हॉटेलपासून जवळच होतं. तो एक श्रीमंत, सुखवस्तू मनुष्य होता. त्याचे स्वत:च्या मालकीचे घोडे होते आणि शहरात त्याला सर्वजण ओळखत होते. नोकरचाकर

' दीदीरित्स 'चा उच्चार ' द्रीदीरित्स ' असा करायचे.

गूरव सावकाशपणे जुन्या गन्चारनाया रस्त्यावर पोहोचला आणि त्यानं ते घर शोधून काढलं. घराच्या समोरच्या भागाला करड्या रंगाचं, खिळे बसविलेलं लांबच लांब कुंपण होतं.

' असलं कुंपण पाहूनच बाहेरून आलेला मनुष्य पळून जाईल. ' खिडकीकडे आणि कुंपणाकडे पाहता पाहता गूरवच्या मनात विचार आला,

गूरव तर्क करू लागला. आज सणाचा दिवस म्हणजे आन्नाचा नवरा घरी असणार. आणि काही झालं तरी घरात शिरून स्वत:ला अडचणीत आणणं म्हणजे मूर्खपणाच की. चिठ्ठी पाठवायची म्हटली तर नेमकी ती तिच्या नवऱ्याच्या हातात पडायची आणि सगळा बट्ट्याबोळ व्हायचा. त्यानं मघाशी पाहिलं होतं की एक भिकारी आत शिरला तेव्हा कुत्री त्याच्या अंगावर कशी धावून आली ते. सगळ्यांत उत्तम मार्ग म्हणजे योग्य संधीची वाट पाहत बसायचं. म्हणून तो कुंपणाजवळून फेऱ्या मारत बसला. तासाभरानं पियानोचे हलके, अस्पष्ट सूर त्याच्या कानावर पडले. नक्कीच आन्ना सेरगेयेवना पियानो वाजवीत असावी. इतक्यात पुढचं दार उघडलं आणि एक म्हातारी बाई बाहेर आली. आणि तिच्या मागोमाग त्याच्या ओळखीचं पांढरं पोमेरियन कुत्रं धावत आलं. गूरवला कुत्र्याला हाक मारावीशी वाटली पण छातीत धडधड व्हायला लागली आणि जीवाच्या झालेल्या तारांबळीनं त्याला नेमकं कुत्र्याचं नावच आठवेना.

तो फेऱ्या मारत होता. आणि त्या करड्या रंगाच्या कुंपणाला शिव्यांची लाखोली वाहत होता. त्रासल्यामुळं त्याला असं देखील वाटू लागलं की आन्ना सेरगेयेवना त्याला विसरली नसेल कशावरून किंवा दुसऱ्या कोणाच्या प्रेमात पडण्याची शक्यतासुद्धा नाकारता येणार नाही. सकाळपासून संध्याकाळपर्यंत असल्या घाणेरड्या कुंपणाकडे पाहत बसणं नशिबी आलेल्या तिच्यासारख्या तरुण स्त्रीच्या संदर्भात असं होणं साहजिकच होतं.

तो हॉटेलवरच्या खोलीत परतला. काय करावं ते कळत नसल्यामुळे कितीतरी वेळ दिवाणावर बसून राहिला. नंतर जेवण केलं आणि झोपून गेला. एकंदरीत झालं ते सगळंच मूर्खपणाचं, मन:शांती घालवणारं होतं. झोपेतून जागा झाल्यावर खिडकीबाहेर पडलेला अंधार पाहून त्याच्या मनात विचार आला, संध्याकाळ

झालेली दिसते. कशामुळे का असेना, मस्त झोप लागली होती. आता रात्री माझं काय होणार कुणास ठाऊक ?

त्याच्या पलंगावर स्वस्त, मळकट, हॉस्पिटलमध्ये असतं तसं बेडकव्हर घातलेलं होतं. तसल्या अंथरुणावर चिडून स्वत:लाच तो दोष देत बसला होता.

'तू आणि तुझी ती कुत्रेवाली बाई, बघ काय अवस्था झालीय ती ... केलंस मोठं धाडस ... बैस आता इथेच.'

सकाळी रेल्वेस्टेशनवर मोठ्या अक्षरातली एक जाहिरात त्याच्या डोळ्यांत भरली होती. शहरात प्रथमच 'गेयशा'चा प्रयोग होणार आहे. आता त्याला एकदम त्याची आठवण झाली आणि तो थिएटरवर गेला.

'ती ह्या पहिल्या प्रयोगाला येण्याची दाट शक्यता आहे.' त्याच्या मनात विचार आला. साधारणत: सगळ्या प्रादेशिक थिएटरातल्याप्रमाणे इथंही उंच टांगलेल्या झुंबरांभोवती धूसर वलयं दिसत होती. गॅलरीमधल्या प्रेक्षकांचा कोलाहल इतर लोकांना अस्वस्थ करीत होता. खेळ सुरू होण्याआधी पहिल्या रांगेतली गावातली पुढारी मंडळी हात पाठीमागे घेऊन उभी होती. पुढच्या गव्हर्नरच्या सोफ्यावर पहिल्या क्रमांकावर गव्हर्नरची मुलगी बसली होती. तिच्या गळ्यात फरचा गळपट्टा होता, मात्र अंग चोरलेला असा गव्हर्नर शालीनपणे पडद्याआड झाकला गेला होता. त्याचे हात तेवढे दिसत होते. पडद्याची सळसळ होत होती. ऑर्केस्ट्रामधल्या वाद्यांचं सूर लावणं चाललं होतं. सर्व प्रेक्षक आत येऊन स्थानापन्न होईपर्यंत गूरव भिरभिरत्या नजरेनं अधीरपणे आन्नाला शोधत होता.

एवढ्यात आन्ना सेरगेयेवना आत आली. गूरवनं तिच्याकडे पाहिलं मात्र, त्याच्या हृदयाचे ठोके जलद पडू लागले. ती तिसऱ्या रांगेत जाऊन बसली. त्या क्षणी त्याला तीव्रतेने जाणवलं की आपल्याला ह्या जगात अगदी जवळचं, परमप्रिय, अतिमहत्त्वाचं असं आन्नाशिवाय दुसरं कोणीही नाही. लहानखोर, कुठल्याच दृष्टीनं वैशिष्ट्यपूर्ण नसलेली, स्थानिक जनसमुदायात स्वत:चं अस्तित्व हरवून बसलेली, हातांत स्वस्तातले गॉगल घेतलेली ही बाई त्याचं जीवनसर्वस्व होती. त्याचं दु:ख, आनंद, एकमेव सौभाग्य होती आणि ते त्याला लाभावं म्हणून त्याची सर्व धडपड होती. अगदीच साधारण अशा ऑर्केस्ट्राच्या आणि

नवशिक्यांच्या व्हायोलिनच्या आवाजात त्याच्या मनात ती किती चांगली आहे याचाच विचार येत होता. तो आपल्याच विचारांत आणि स्वप्नरंजनात मग्न झाला होता.

आन्ना सेरगेयेवनाबरोबर एक खूप उंच, बेताचे कल्ले ठेवलेला, किंचित वाकलेला असा तरुण आत आला व तिच्या शेजारच्या खुर्चीवर बसला. तो पावलागणिक डोकं हालवत होता आणि असं वाटत होतं की तो कायम अभिवादनच करतोय. तो बहुतेक तिचा नवरा असावा. ज्याला याल्तात असताना त्याच्याविषयी कडवट भावना प्रकट करताना तिनं एक हुजऱ्या म्हणून संबोधलं होतं. आणि खरंच त्याच्या त्या उंचटांग शरीरयष्टीत, कल्ल्यांत, छोट्याशा टकलात काहीतरी हुजरेपणा दडल्याचा भास होत होता. त्याचं हसणं गोड होतं पण त्याच्या बटनहोलमध्ये चमकणारं युनिव्हर्सिटीचं पदक शिपायाच्या बकलासारखं दिसत होतं.

पहिल्या मध्यंतरामध्ये तिचा नवरा सिगरेट ओढायला बाहेर गेला आणि ती खुर्चीतच बसलेली होती. बॉक्समध्ये बसलेला गूरव तिच्यापाशी आला आणि चेहऱ्यावर बळेच हसू आणत कापऱ्या आवाजात म्हणाला,

'नमस्कार!'

तिनं त्याच्याकडे पाहिलं मात्र, तिचा चेहरा एकदम पांढरा फटफटीत पडला. डोळ्यांवर विश्वास न बसल्यासारखं तिनं पुन्हा एकदा भयभीत होऊन त्याच्याकडे पाहिलं आणि बेशुद्ध पडू की काय या भीतीनं स्वत:ला काबूत ठेवण्यासाठी तिनं आपल्या हातातला पंखा आणि गॉगल्स जोरात आवळून धरले. दोघांच्या तोंडून चकार शब्दही निघत नव्हता. ती बसलेली होती आणि तो उभा होता. तिचा कावराबावरा चेहरा पाहून तिच्या जवळच्या खुर्चीत बसावं की नाही अशी द्विधा मन:स्थिती झाली त्याची. सूर लावणं संपल्यानंतर व्हायोलिन आणि फ्ल्यूटचे आवाज यायला सुरुवात झाली आणि सोफ्यावर बसलेले सर्वजण आपल्याकडेच पाहताहेत असं वाटून त्या दोघांना अचानक अवघडल्यासारखं झालं. शेवटी एकदाची ती उठली आणि तरातरा बाहेर पडायच्या दरवाज्याकडे जाऊ लागली. तो पण तिच्या मागोमाग जाऊ लागला. दोघं झपाटल्यासारखी कॉरीडोरमधून, जिन्यावरून जाऊ लागली. घटकेत जिना चढत होती ती दोघं, जरा वेळानं खाली

येत होती. त्याचवेळी वकील मंडळी, शिक्षण क्षेत्रातले लोक, युनिफॉर्ममधले आणि बॅजेस लावलेले शासकीय अधिकारी, बड्या बड्या मंडळींच्या बायका वगैरे सर्व लोक त्यांच्या डोळ्यांपुढून झरझर सरकताहेत असं वाटत होतं. प्रवेशद्वाराच्या आत टांगलेले ओव्हरकोट दिसत होते त्यांना. आणि तंबाखूच्या धुरांनी भरलेला वाऱ्याचा झोत त्यांच्या अंगावरून जात होता. हृदय धडधडणाऱ्या गूरवच्या मनात आलं, 'कशाला उपटले हे लोक इथे आणि ऑर्केस्ट्राचा गोंगाट तरी कशाला...' आन्ना सेरगेयेवनाला त्या दिवशी संध्याकाळी स्टेशनवर पोहोचवायला गेला असताना त्याच्या मनाला विचार चाटून गेला होता की, आता सगळं संपलं. ह्यापुढे आन्नाची आणि आपली कधीच भेट होणार नाही. पण आता वाटतंय, की तसा शेवट आज तरी खूप खूप दूर आहे.

'ॲम्फी थिएटरकडे जाणारा रस्ता' अशी पाटी असलेल्या अरुंद अंधाऱ्या जिन्यापाशी ती थांबली. 'मला किती घाबरवलंत हो तुम्ही!' धाप लागलेली, फटफटीत चेहरा झालेली आणि भीतीमुळं थिजल्यासारखी झालेली ती म्हणाली. 'अरे बापरे, कसली घाबरले मी! जीव मुठीत धरून बसलेय मी नुसती! कशाला आला इथे तुम्ही?'

'अग पण आन्ना, माझं ऐक तरी, मला समजून घेशील का?...' तो शांतपणे हळू आवाजात म्हणत होता. 'तुला माझी विनंती आहे, माझा विचार तरी कर...'

ती त्याच्याकडे भीतीनं, आर्जवानं, प्रेमानं पाहत होती. त्याचा चेहरा आठवणीत राहावा म्हणून न्याहाळून बघत होती त्याच्या चेहऱ्याकडे.

'मी इतकं सोसलंय!' त्याचं बोलणं न ऐकताच ती पुढं म्हणाली. 'मी सदैव तुमचाच विचार करीत होते, तुमची आठवण काढत जीवन कंठत होते. सगळं, सगळं विसरून जावं असं वाटत होतं मला. तुम्ही कशाला, कशाला हो आलात इथे?'

दोन कॉलेज युवक सिगरेटी ओढत वरून खाली पाहत होते. पण गूरवला त्यांच्याशी काहीच देणं घेणं नव्हतं. त्यानं आन्ना सेरगेयेवनाला जवळ ओढलं आणि तो तिचा चेहरा, गाल, हात सगळ्यांची चुंबनं घ्यायला लागला.

'काय करता हे, काय करताय हे तुम्ही!' भीतीनं त्याला आपल्यापासून दूर ढकलत ती म्हणाली, 'आपल्या दोघांनाही वेड लागायची पाळी आलीय. आज

तुम्ही इथून निघून जा, आत्ताच जा इथून ... तुम्हाला मी विनंती करतेय, देवाला स्मरून तुमची विनवणी करतेय मी! ... कुणीतरी येतंय वाटतं इकडे!'

कुणीतरी जिन्यावरून खालून वर गेलं. 'तुम्हाला इथून जायलाच हवं ...' ती हळू आवाजात म्हणाली, 'द्मीत्री द्मीत्रीच, ऐकताय ना?' मी मॉस्कोला तुमच्याकडे येईन. मी कधीही सुखी नव्हते, आत्ताही नाहीये. आणि माझ्या नशिबी कध्धी, कध्धी सुख दिसत नाहीये. कध्धी सुद्धा! मला आणखीन दु:ख सहन करायला भाग पाडू नका! देवाशपथ, मी येईन मॉस्कोला. आत्ता मात्र आपल्याला निरोप घ्यायला हवा! माझ्या लाडक्या, प्रेमळ जीवलगा, घेऊ या ना आता एकमेकांचा निरोप?'

तिनं त्याचा हात हातात घेऊन दाबला आणि ती भराभर जिना उतरायला लागली. ती त्याच्याकडे वळून, वळून पाहत होती. आणि तिच्या डोळ्यांकडे पाहिलं की ती किती दु:खी झालीय ते स्पष्ट दिसत होतं... गूरव तिचा कानोसा घेत जरावेळ थांबला. मग सगळीकडे शांत झाल्यावर त्यानं आपला ग्रेट कोट शोधून काढला आणि तो थिएटरमधून निघून गेला.

४

आन्ना सेरगेयेवना 'सी'हून मॉस्कोला गूरवकडे महिन्यातून एकदा अशी २-३ महिने जात होती. तिनं नवऱ्याला सांगितलं होतं की, बायकांच्या दुखण्याविषयी स्वत:साठी डॉक्टरचा सल्ला घ्यायला मॉस्कोला जाते आहे. नवऱ्यानं तिच्या सांगण्यावर विश्वास ठेवला आणि नाहीपण ठेवला. मॉस्कोला आल्यावर ती 'स्लव्यान्स्की बझार' या हॉटेलमध्ये उतरली. लागलीच तिनं हॉटेलच्या लाल टोपीवाल्या निरोप्याला गूरवकडे पाठवलं. गूरव तिला ह्या हॉटेलमध्ये भेटत होता याची खबर मॉस्कोमध्ये कुणालाही लागली नाही.

हिवाळ्यात असाच एकदा तो तिच्याकडे गेला होता. निरोप्या आदल्या दिवशी संध्याकाळी त्यांच्याकडे आला होता. पण गूरवची आणि त्याची भेट झाली नव्हती. त्याची मुलगी त्याच्याबरोबर होती. जाता जाता तिला जिम्नाझियामध्ये सोडावं असा त्याचा बेत होता. त्याच्या जायच्या रस्त्यावरच तिचं कॉलेज होतं. जोरदार बर्फ पडत होतं.

'आता ३ अंश सेंटीग्रेड तापमान आहे आणि शिवाय जोरदार हिमवृष्टी होतेय. पण एवढी गरमी फक्त जमिनीच्या वरवरच्या भागात असते. वातावरणाच्या वरच्या स्तरात हवामान अगदी वेगळंच असतं.' गूरव मुलीला समजावून सांगत होता.

'पापा, हिवाळ्यात ढगांचा गडगडाट का नाही होत?'

त्यानं ते पण तिला समजावून सांगितलं. तो एकीकडे मुलीशी बोलत होता आणि त्याचवेळी विचारपण करीत होता की खरं तर आता एका बाईला खाजगीत भेटायला निघालाय परंतु कोणाही माणसाला त्याचा सुगावा नाहीये आणि कधी लागणार पण नाहीये. तो दोन आयुष्यं जगतोय. एक सगळ्यांना दिसणारं धोपटमार्गी. ह्यात कमी अधिक प्रमाणात सत्य आणि असत्य यांचं बेमालूम संमिश्रण असतं. अगदी हुबेहूब त्याची मित्रमंडळी आणि इतर ओळखीच्या लोकांसारखं. दुसरं म्हणजे गुप्तपणे चाललेलं. आणि कुठल्यातरी आकस्मित घडलेल्या प्रसंगामुळे किंवा अगदी सहजासहजी जमून आलेलं, जे त्याच्या दृष्टीनं महत्त्वाचं, अटळ आणि त्याला ज्याच्यात रस वाटतो असं आहे. ह्या जीवनाशी तो एकनिष्ठ आहे. स्वत:लाच फसवत नाहीये. ते त्याच्या जीवनाचा गाभा बनलेलं आहे आणि लोकांना पत्ता न लागता घडत गेलेलं आहे. हे खरं सत्य लपवण्यासाठी तो जे ढोंग करीत होता ते त्याच्या आयुष्याचं दिखाऊ बाह्यरूप होतं. उदाहरणार्थ, त्याची बँकेतली नोकरी. क्लबमधले वादविवाद, पुरुषी दुष्प्रवृत्ती, लग्नाच्या वाढदिवसासारख्या प्रसंगी पत्नीबरोबर मिरवणं वगैरे वगैरे. ह्या सर्व गोष्टी तो उजळ माथ्यानं करत होता. स्वत:च्या मनाशी तो दुसऱ्या लोकांबद्दल निष्कर्ष काढत होता. जसं त्याला दिसत होतं त्यावर त्याचा विश्वास नव्हता. तो कायम धरून चालला होता की रात्रीच्या अंधारात जशा अनेक गोष्टी छपलेल्या असतात त्याचप्रमाणे प्रत्येक माणसाच्या जीवनात महत्त्वाच्या आणि विशिष्ट आवडीच्या गोष्टी गुप्ततेच्या बुरख्याआड दडलेल्या असतात. गुप्तता ही प्रत्येक खाजगी जीवनाला पांघरूण घालीत असते. कदाचित म्हणूनच सुसंस्कृत माणूस दुसऱ्याच्या खाजगी जीवनाचा उचित आदर करावा असा आग्रह धरीत असतो.

आपल्या मुलीला जिम्नाझियामध्ये सोडून गूरव 'स्लव्यान्स्की बझार' मध्ये पोहोचला. आपला ग्रेटकोट खालच्या मजल्यावर काढून तो वर गेला आणि त्याने हळूच दारावर टकटक केलं. आन्ना सेरगेयेवनाने त्याच्या आवडीचा करड्या रंगाचा



ड्रेस घातला होता. प्रवास आणि मनाला लागलेली भेटीची ओढ ह्यामुळे आन्ना अगदी थकली होती. तरी आदल्या दिवशीच्या संध्याकाळपासून ती त्याची वाट पाहत होती. ती गळून गेली होती त्यामुळे न हसता तिने त्याच्याकडे एक कटाक्ष टाकला. पण तो आत शिरला मात्र, तिने त्याच्या छातीवर डोकं टेकलं. दोन वर्षांत त्यांची गाठभेट झाली नव्हती. म्हणूनच त्यांनी एकमेकांचे प्रदीर्घ चुंबन घेतलं.

'तुझं कसं काय चाललंय ?' त्यानं विचारलं. 'काही नवल विशेष ?'

'थांब जरा. सांगते सांगते... नाही यायचं मला सांगता!' ती काहीच सांगू शकली नाही. कारण तिला एकदम रडूच कोसळलं. ती त्याच्यापासून दूर झाली आणि तिनं डोळ्याला रूमाल लावला.

'तू रडायचं थांबव. मी बसतो तोपर्यंत.' त्यानं असा विचार केला आणि तो खुर्चीवर बसला.

त्यानंतर त्याने घंटा वाजवून चहा मागवला स्वत:साठी. तो चहा पीत होता तोपर्यंत ती खिडकीशी पाठमोरी उभी होती. भावना उचंबळून आल्यामुळे आणि दु:खावेगाने ती रडत होती. तिला वाटत होतं की त्यांच्या दोघांच्या जीवनात दु:खच दु:ख भरलंय. त्यांना एकमेकांची गुप्तपणे भेट घ्यावी लागते. एखाद्या चोरासारखं लोकांपासून लपत छपत वावरावं लागतं! त्यांच्या आयुष्याचे तीन तेरा झाले आहेत असंच म्हणावं लागेल.

'जाऊ दे, कशाला विचार करतेस नसत्या गोष्टींचा ?' तो म्हणाला.

त्याला स्पष्ट दिसत होतं की त्यांचं हे प्रेमप्रकरण इतक्या लवकर संपणार नव्हतं. आन्ना सेरगेयेवना त्याच्यात जास्तजास्तच गुंतत चालली होती. त्याची पूजा करत होती. आणि ह्या सगळ्यांचा कधीतरी शेवट होणार आहे असं तिला सांगणं पण शहाणपणाचं ठरलं नसतं. खरंच, तिनं ह्यावर कधी विश्वासच ठेवला नसता.

तो तिच्या जवळ गेला आणि तिच्यावर प्रेमाचा वर्षाव करता यावा, तिची थट्टा मस्करी करावी म्हणून त्यानं तिला विळखा घातला. नेमकं ह्याचवेळी स्वत:च्या आरशातल्या प्रतिमेकडे त्याचं लक्ष गेलं.

त्याचे केस चक्क पांढरे व्हायला लागले होते. आणि धक्का बसावा अशी दुसरी गोष्ट म्हणजे गेल्या काही वर्षांत तो वयस्क आणि उतरल्यासारखा दिसायला लागला होता. त्याचे हात ज्या खांद्यावर विसावले होते तो उबदार होता. पण

थरथरत होता. ह्या अशा उबदार आणि अतिशय सुंदर सहवासाबद्दल त्याच्या मनात अनुकंपा होती. पण कदाचित त्याच्या बाह्य रूपाप्रमाणेच त्याच्या ह्या खाजगी जीवनाचा रंग पण फिका पडणार आहे, त्याला उतरती कळा लागणार आहे, असं त्याला वाटलं. ती कशाला करतेय एवढं प्रेम त्याच्यावर ? आजपर्यंत सगळ्याच स्त्रियांना तो जसा होता तसा दिसला नाही. आणि त्याच्या बाह्य रूपावर त्यांनी कधीच प्रेम केलं नाही तर त्यांच्या कल्पनेत ज्या तऱ्हेच्या माणसाची प्रतिमा होती आणि स्वतःच्या जीवनात ज्याचा त्या आतुरतेने शोध घेत होत्या, अशा त्याच्यातल्या माणसावर त्यांनी प्रेम केलं आणि मग आपली चूक लक्षात आल्यावर देखील त्या त्याच्यावर प्रेम करीत राहिल्या. काळ पुढे पुढे सरकत होता पण त्याच्या सहवासातली एकही स्त्री सुखी झाली नाही. त्याची एखाद्या स्त्रीशी ओळख व्हायची, नंतर सहवास घडायचा आणि त्यांची ताटातूटपण व्हायची. पण त्यानं खरं प्रेम कोणावरही केलं नव्हतं. एक प्रेम सोडून सगळ्या गोष्टी असायच्या तिथे.

पण आता ह्या खेपेला त्याचे केस पांढरे व्हायला लागले असताना त्याने मनापासून खरं प्रेम केलं आयुष्यात पहिल्यांदाच !

आन्ना सेरगेयेवना आणि त्याने एकमेकांवर अगदी जवळच्या आप्तेष्टांप्रमाणे, पती-पत्नीप्रमाणे किंवा जिवलग मित्रांप्रमाणे प्रेम केलं होतं. प्रत्यक्ष ब्रह्मदेवानेच त्यांना एक दुसऱ्यासाठी जन्माला घातलं होतं आणि कळत नव्हतं की तो विवाहित होता आणि तिचं पण लग्न झालेलं होतं. ती दोघं म्हणजे जणू स्थलांतर करणारे दोन पक्षी. नर आणि मादी, ज्यांना पकडून दोन वेगवेगळ्या पिंजऱ्यांत राहायला भाग पाडलंय. आपल्या लाजिरवाण्या भूतकाळाबद्दल त्यांनी एकमेकांना क्षमा केली आहे आणि वर्तमानकाळातील अगतिकतेसाठी माफ केलंय. त्यांना असं वाटत होतं, त्यांच्या ह्या एकमेकांवरील अतूट प्रेमानी त्यांना पार बदलून टाकलंय.

पहिल्या पहिल्यांदा मनाच्या व्याकुळ अवस्थेत मनात येणाऱ्या वेगवेगळ्या विकल्पांच्या आधारे तो स्वतःला शांत करण्याचा प्रयत्न करीत असे. पण आता मात्र त्याला त्याची एवढी गरज वाटत नव्हती. त्याला तिच्याविषयी तीव्र अनुकंपा वाटत होती. त्याला तिच्याशी एकनिष्ठ आणि समर्पित व्हावं असं वाटायला लागलं होतं. 'थांब ना आता माझ्या लाडके !' तो म्हणाला. 'खूप रडून झालं. आता

थांबायला हवं ... चल, आपण एकमेकांशी मोकळेपणानं बोलू या. काहीतरी मार्ग काढूया यातून!'

मग त्या दोघांत खूप चर्चा झाली की ह्या लपंडावाच्या खेळातून, फसवाफसवीतून स्वत:ला कसं मुक्त करायचं. दोन वेगवेगळ्या गावांना राहायला न लागावं आणि वरचेवर भेटी व्हाव्यात यासाठी काय उपाययोजना करायची ह्याचा विचार झाला. या असह्य यातनांतून कसं मुक्त होता येणार? कसं, कसं करायचं?

मग त्याला वाटलं, थोडी कळ काढायला हवी. काहीतरी सोडवाट सापडेलच आणि तेव्हाच आपल्या नव्या, अप्रतिम जीवनाची सुरुवात होईल. दोघांचीही खात्री पटली होती, त्यांच्या ह्या सहजीवनाचा शेवट खूप खूप लांब आहे. खऱ्या अर्थानं गुंतागुंतीच्या आणि बिकट जीवनाची आत्ताच कुठं तर सुरुवात होतेय.

: ६ :

दुशेच्का

सेवानिवृत्त उच्चशिक्षणाधिकारी प्लेम्यानिकवची मुलगी ओलिन्का घराच्या बाहेरील छोट्याशा पोर्चमध्ये एकटीच विचार करीत बसली होती. कडक उन्हाळा होता. माशांनी अंगात आल्यासारखं नुसतं भंडावून सोडलं होतं. पण लवकरच संध्याकाळ होणार आहे, हा विचार सुखावत होता. पूर्वेला पावसाचे काळे ढग जमायला लागले होते. आणि त्याच दिशेने अधूनमधून दमट वारा वाहत होता.

प्लेम्यानिकवच्या पुढच्या अंगणातील घरकुलात राहणारा कूकीन अंगणाच्या मध्यभागी आकाशाकडे डोळे लावून उभा होता. कूकीन हा 'तिवोली' या मनोरंजन बागेचा मालक आणि व्यवस्थापक पण होता.

'आला पुन्हा हा पाऊस!' निराश होऊन तो म्हणाला. 'पुन्हा पडणार तो! दररोज पडतोय. अगदी दररोज. रतीब घातल्यासारखा! हेतुपुरस्सर! जणू माझ्या गळ्याला लागलेला तात, सर्वनाश! केवढं प्रचंड नुकसान होतं दिवसाला माझं!'

हातवारे करत ओलिन्काला उद्देशून तो पुढे म्हणाला,

'हे बघ, ओल्गा सिम्योनवना, असं आहे आमचं जीवन. माणूस अगदी रडकुंडीला येतो. लोकांची चांगल्यातली चांगली करमणूक करावी एवढ्या एकाच ध्यासानं कष्ट करायचे, प्रयत्नांची शिकस्त करायची, काळज्या करीत बसायचं, रात्र रात्र डोळ्याला डोळा लागत नाही. आणि शेवटी पदरात काय पडतं? एका बाजूला आहेत अज्ञानी पण तुम्हाला धारेवर धरणारे प्रेक्षक. त्यांना चांगल्या चांगल्या संगीतिका, परीकथा, सर्वोत्कृष्ट लोकसंगीत देण्याचा माझा प्रयत्न असतो. पण खरंच त्यांना हे हवंय का? त्यांना त्यातलं काही कळतं तरी का? त्यांना हवे असतात अभिरुचिहीन फार्स, पाचकळ विनोद! आणि दुसरीकडे ही हवा कशी पडतेय बघ. दररोज संध्याकाळी कोसळतोय हा पाऊस. १० मे पासून पावसाची सुरुवात झालीय. आणि नंतर सबंध मे आणि थेट जूनपर्यंत पडतोच आहे

आपला. वैताग आहे नुसता ! प्रेक्षक येत नाहीत, म्हणजे मी भाडं कुठून भरू आणि कलाकारांना द्यायला पैसे कुठून आणू ?'

दुसऱ्या दिवशी संध्याकाळच्या सुमारास पुन्हा काळे ढग जमायला लागले. तेव्हा विकट हास्य करीत कूकीन म्हणाला,

'अरे, कसला विचार करतोयस, पड जोरात ! इतकी की सगळी बाग वाहून जाईल आणि तिच्याबरोबर मी पण ! म्हणजे मग ना पृथ्वीवर ना स्वर्गात. कुठेच माझं नशीब फळफळायला नको ! लावू दे त्या कलावंतांना माझ्यावर फिर्याद, लावू देत ! अरे फिर्यादच कशाला, काळ्या पाण्यावर, सैबेरियात जन्मठेप होऊ देत मला ! नाहीतर फाशीचा फंदा गळ्यात पडू देत ! हा ... हा ... हा ... !'

आणि तिसऱ्या दिवशी पुन्हा तेच ...

ओलिन्का कूकीनचं सगळं बोलणं शांतपणे, गांभीर्याने ऐकायची. कधीकधी ऐकता ऐकता तिच्या डोळ्यांत अश्रू उभे राहायचे. शेवटी त्याच्या दुर्दैवाकडे पाहून तिचं मन हेलावलं आणि नकळत ती त्याच्यावर प्रेम करू लागली. कूकीन ठेंगणा, लठ्ठ, फिकट पिवळसर चेहऱ्याचा होता. त्याचे कल्ले कानशिलापर्यंत व्यवस्थित विंचरलेले असायचे. तो वरच्या पट्टीत पण कर्णमधुर आवाजात बोलायचा. आणि बोलताना मधूनच ओठ चावायचा. त्याच्या चेहऱ्यावर मात्र नेहमी दुःखीकष्टी भाव असायचे. तरीसुद्धा त्याच्याविषयीची शुद्ध, निर्मळ भावना तिच्या मनात खोलवर घर करून राहिली होती. कारण आजवर ती कोणा ना कोणावर सदैव प्रेम करीत आली होती. त्याशिवाय ती जगूच शकली नसती. आधी ती आपल्या वडिलांवर प्रेम करायची. आता ते अंधाऱ्या खोलीत, आजारी अवस्थेत, आरामखुर्चीत कष्टानं श्वासोच्छ्वास करीत बसलेले असतात. पुढे तिला तिची वर्षा-दोन वर्षांनी ब्र्यान्स्कहून त्यांच्याकडे येणारी आत्या खूप आवडायची. तत्पूर्वी चौथीपर्यंतच माध्यमिक शाळा होती. तेव्हा आपली फ्रेंच भाषेची शिक्षिका तिची लाडकी होती. ओलिन्का शांत, सहृदय, मनमिळाऊ, बारकेच पण मनाचा ठाव घेणारे डोळे असलेली रसरशीत अशी तरुणी होती. तिच्या गुबगुबीत गालांकडे, काळी जन्मखूण असलेल्या मऊसूत गोऱ्या मानेकडे, खुषीत असताना तिच्या गालावर पडणाऱ्या गोड खळीकडे पाहिल्यावर पुरुषमंडळींच्या मनात विचार यायचा, 'खरंच काही हातचं राखून ठेवलं नाहीये त्यानं ...' आणि स्वतःशीच हसायचे ते.

तिला भेटलेल्या स्त्रियांना तिच्याशी बोलताना झटकन तिचा हात हातात घ्यावासा वाटायचा आणि आनंदानं, उत्स्फूर्तपणे 'दुशेच्का' असं म्हटल्याशिवाय त्यांना राहवायचंच नाही.

तिच्या जन्मापासून ती ह्याच घरात राहत होती. आणि ह्यापुढेही वारसाहक्कानं ते तिलाच मिळणार होतं. त्यांचं घर गावाबाहेर अल्पसंख्याक जिप्सीवस्तीत 'तिवोली' ह्या मनोरंजन बागेच्या जवळच होतं. संध्याकाळी आणि रात्रीसुद्धा बागेतल्या संगीताचे, रॉकेट्सच्या स्फोटांचे आवाज तिच्या कानावर पडायचे आणि तिला वाटायचं की कूकीन आपल्या नशिबाशी लढतोय आणि त्याच्या नंबर एकच्या शत्रूंचे म्हणजे त्या अरसिक प्रेक्षकांचे वार अंगावर झेलतोय. अशावेळी गोड शिरशिरीनं तिच्या हृदयाचा ठोका चुकायचा. झोप उडायची आणि पहाटे पहाटे तो जेव्हा घरी परतायचा तेव्हा ती आपल्या झोपायच्या खोलीच्या खिडकीवर हळूच टक टक करायची. आपलं फक्त तोंड, एक खांदा त्याला दिसेल असा बाहेर काढायची आणि गोड हसायची ...

त्यानं तिला लग्नाची मागणी घातली आणि ते विवाहबद्ध झाले. त्यानं तिची मान आणि गुबगुबीत सशक्त असे खांदे जेव्हा जवळून पाहिले तेव्हा हात हवेत उडवत तो म्हणाला, 'दुशेच्का!'

तिच्याशी लग्न झाल्यामुळे त्याचं भाग्य उजळलं होतं. पण प्रत्यक्ष लग्नाच्या दिवशी आणि नंतर रात्रीही सारखा पाऊस पडत होता त्यामुळे त्याचा दु:खीकष्टी चेहरा उजळलाच नाही.

लग्नानंतर त्यांचं आयुष्य सुखात चाललं होतं. तिकीटविक्रीच्या खिडकीत ती त्याच्या शेजारी बसायची. बागेतील सर्व व्यवस्था जातीनं पाहायची, खर्च लिहून काढायची. पगार वाटप करायची. तिचे गुलाबी गाल आणि त्यावरील गोड, खट्याळ, लाली उधळणारं स्मितहास्य कधी तिकीटविक्रीच्या छोट्या खिडकीतून, तर कधी विंगमधून तर कधी बफेमध्ये झिळमिळायचं. आपल्या मित्रमैत्रिणींत तिनं कधीच सांगायला सुरुवात केली होती की जगात सर्वांत सुंदर, महत्त्वाचं आणि जरूरीचं असं काय असेल तर ते म्हणजे नाटक. निर्भेळ आनंद लुटायचा असेल आणि सुशिक्षित आणि सुसंस्कृत व्हायचं असेल तर नाटकाशिवाय तरणोपाय नाही.

पण लोकांना हे कळतं का ? ती म्हणायची. त्यांना अभिरुचिहीन फार्स पाहिजे असतात. काल आमच्याकडे 'फाऊस्त नइझनान्कु' चा प्रयोग होता. जवळजवळच सर्व खुर्च्या रिकाम्या होत्या. पण मी आणि वानेन्कानं एखाद्या बंदी असलेल्या खेळाचं आयोजन केलं असतं ना तर खात्रीनं सांगते, थिएटर खच्चून भरलं असतं. उद्या आम्ही 'अरफिया व आदु' हा दोन अंकी ऑपेरा दाखवणार आहोत, या पाहायला.'

कूकीन नाटकासंबंधी आणि कलाकारासंबंधी जे जे म्हणून बोलायचा त्याची पुनरावृत्ती तिच्या तोंडून ऐकायला मिळायची. लोकांची कलेविषयीची निर्विकार वृत्ती आणि अज्ञान ह्यावर कूकीनप्रमाणेच ती पण झोड उठवायची. तालमी चालू असताना लुडबूड करायची, कलाकारांना त्यांच्या चुका निदर्शनाला आणून द्यायची आणि संगीतकाराच्या वागणुकीकडे तिचं बारीक लक्ष असायचं. स्थानिक वर्तमानपत्रात नाटकाविषयी खोडसाळपणे वाईट साईट मजकूर छापून आला तर ती चक्क रडायची आणि नंतर त्याविषयी स्पष्टीकरण द्यायला स्वत: वर्तमानपत्राच्या कचेरीत जायची.

कलाकार तिच्यावर मनापासून प्रेम करायचे. आणि आम्ही वानेन्का आणि दुशेच्काच्या पाठीशी उभे आहोत असं म्हणायचे. कलाकारांविषयी तिला सहानुभूती वाटायची आणि अडल्यापडल्याला ती त्यांना थोडेफार पैसे उधार द्यायची. कधीतरी तिची त्यांच्याकडून फसवणूक झाली तर ती मुकाट्यामुकाट्यानं रडायची पण तिनं कधीही नवऱ्याजवळ त्यांच्याविषयी तक्रार केली नाही.

हिवाळा धंद्याच्या दृष्टीनं चांगला होता. त्यांचं नाट्यगृह थोड्या थोड्या दिवसांसाठी भाड्यानं गेलं होतं. कधी युक्रेनच्या 'लिटिल रशियन' नाट्यवृंदाला, कधी एखाद्या जादुगाराला तर कधी गावातल्याच प्रायोगिक कलाकारांना.

ओलिन्का आताशा थोडी जाड झाली होती आणि सुखासमाधानाचं तेज तिच्या चेहऱ्यावर विलसत होतं. ह्या उलट कूकीन मात्र रोडावत चालला होता. फिक्कट दिसायला लागला होता आणि धंद्यात येणाऱ्या तोट्याविषयी सारखा कुरकुरत असायचा. तसं पाहिलं तर धंद्याच्या दृष्टीनं सगळा हिवाळा बरकतीचाच गेला होता. त्याला रात्र रात्र खोकल्याची ढास लागायची तेव्हा ती त्याला रॉसबेरीचा नाहीतर लिंबाच्या फुलांचा चहा प्यायला द्यायची. युडीकोलन

शिंपडायची. आणि आपली मऊसूत शाल त्याच्या अंगावर लपेटायची. 'तू माझं सर्वस्व आहेस!' त्याच्या केसांतून बोट फिरवत ती अगदी मोकळ्या मनानं म्हणायची. 'मला तू खूप खूप आवडतोस!'

'लेन्ट'च्या सणाच्या सुमारास नाटक कंपनीशी बोलणी करायला तो मॉस्कोला गेला होता. तेव्हा तो नसल्यामुळे तिला झोप यायची नाही. खिडकीशी बसून ती ताऱ्यांकडे पाहत तासन्तास घालवायची. अशावेळी ती आपली तुलना कोंबड्यांशी करायची. तिला वाटायचं खुराड्यात तुरेवाला कोंबडा नसला तर कोंबड्या रात्रभर बेचैन असतात. आपली पण अवस्था त्यांच्यापेक्षा काही वेगळी नाहीये. कूकीनचा मॉस्कोचा मुक्काम वाढला होता. पत्रात त्यानं आपण 'होलीवीक'च्या सणाला परत येऊ असं लिहिलं होतं. शिवाय 'तिवोली' च्या व्यवस्थेसंबंधी सूचनापण दिल्या होत्या. पण सणाच्या आधीच्या रविवारी रात्री उशिरानं बाहेरच्या दारावर एक अशुभ टकटक ऐकू आली. कोणीतरी फाटकाशी आलं होतं आणि लोखंडी पिंपावर बुक्के मारल्यावर जसा बुम! बुम! बुम! असा आवाज येतो ना तसाच आवाज करीत होतं. झोपेतून जागी झालेली स्वयंपाकीण अनवाणीच मातीतून फट फट आवाज करीत धावत फाटक उघडायला गेली.

'उघड बरं जरा फाटक!' कोणीतरी भसाड्या आवाजात म्हणालं, 'तुमची तार आहे.'

ओलिन्काला नवऱ्याची तार ह्याआधी पण कितीदातरी आली होती. पण आता का कोणास ठाऊक, तिला चर्र झालं. कापऱ्या हातानं तिनं तार फोडली आणि खालील मजकूर लावून वाचला.

'इवान पित्रोविचचं आज अचानक निधन झालं. मंगळवारी त्याच्यावर होणाऱ्या अंत्यसंस्काराच्या संबंधीच्या सूचनांची आम्ही वाट पाहत आहोत.' तारेमध्ये काही उलटसुलट अक्षरं आणि न कळणारे शब्द छापले गेले होते. तारेखाली ऑपेरा कंपनीच्या व्यवस्थापकाची सही होती.

'माझ्या लाडक्या! वानिष्का!' ओलिन्का रडत रडत म्हणाली. 'माझ्या राजा! माझी आणि तुझी ओळखच कशाला झाली. मला तू भेटलास आणि मी तुझ्या प्रेमात तरी का पडले? कोणाच्या भरवशावर तू आपल्या या गरीब, दुर्दैवी ओलिन्काला सोडून गेलास?' ...

मंगळवारी मॉस्कोच्या ‘ वगान्कोवा ’मध्ये कूकीनचं दफन करण्यात आलं. ओलिन्का बुधवारी घरी परतली. आपल्या खोलीत पलंगावर पडली आणि तिनं जोरानं हंबरडा फोडला. तिचा तो आर्त आवाज रस्त्यावर, शेजाऱ्यापाजाऱ्यांच्या घरापर्यंत ऐकू आला.

‘ दुशेच्का,’ शेजारी हाताचा क्रॉस करून म्हणाले, ‘ दुशेच्का सिम्योनवना, पोरी, कसं होणार गं तुझं!’

तीन महिन्यांनंतर एक दिवस दुःखीकष्टी, शोकविव्हळ अशी ओलिन्का प्रार्थनेहून घरी येत होती. त्याच वेळी तिच्याजवळून तिचा शेजारी वसीलीय अन्द्रेईच पुस्तवालव पण चालला होता. तो पण चर्चमधूनच परत येत होता. तो बबकाओव या व्यापाऱ्याच्या लाकडाच्या वखारीत व्यवस्थापक म्हणून काम करीत होता. त्यानं गवती टोपी आणि सोन्याची साखळी लटकत असलेला पांढरा कोट घातला होता. तो व्यापारी वाटण्याऐवजी एखादा जमीनदारच दिसत होता.

‘ नशिबात असतं ना तसंच घडत असतं ... ओल्गा सिम्योनवना ’ तो दबकत दबकत सौहार्दपूर्ण आवाजात म्हणाला. ‘ विशेषतः आपल्या अगदी निकटच्या माणसाचं निधन झालं असलं तर समजायचं की देवाला तेच योग्य वाटलं म्हणून असं घडलं आणि मग त्यालाच शरण जाऊन सगळं दुःख गिळायला शिकायचं!’

ओलिन्काला त्यानं दिंडीदरवाज्यापर्यंत आणून सोडलं. तिचा निरोप घेतला आणि तो पुढे गेला. त्यानंतर सबंध दिवस त्याचा तो भारदस्त आवाज तिला ऐकू येत होता. तिनं डोळे मिटले तरी त्याची काळी दाढी दिसल्याचा तिला भास व्हायचा. तिला तो खूप आवडला होता आणि वाटत होतं की त्याला पण तिच्याबद्दल तसंच काहीतरी वाटलं असावं. कारण थोड्याच दिवसांनी विशेष परिचित नसलेली अशी एक वयस्क बाई तिच्याकडे सहज कॉफी प्यायला म्हणून आली. तिनं टेबलाशी बसल्याबसल्याच पुस्तवालवचा विषय काढला की तो कसा चांगला आहे, तरणाबांड आहे, आणि कोणतीही विवाहेच्छू मुलगी त्याच्याशी लग्न करायला अगदी एका पायावर तयार होईल म्हणून. तीन दिवसांनी प्रत्यक्ष पुस्तवालव तिला भेटायला आला. तो फार वेळ बसला नाही. दहा एक मिनिटं असेल फारतर. तसा तो कमीच बोलत होता. पण ओलिन्काला तो आवडला, इतका की ताप चढला की जशी झोप लागत नाही तशी ती सबंध रात्र जागीच

होती. दुसऱ्या दिवशी तिनं त्या वयस्क बाईला आपल्याकडे बोलावून घेतलं. थोड्याच दिवसांत त्या दोघांच्या लग्नासंबंधी बोलणी झाली आणि नंतर लग्नपण झालं.

'पुस्तवालव' आणि 'ओलिन्का' लग्नानंतर अगदी सुखात होती. नेहमी तो जेवणाच्या वेळेपर्यंत लाकडाच्या वखारीवर बसायचा आणि मग कामासाठी बाहेर पडायचा तेव्हा त्याची जागा ओलिन्का घ्यायची. ती मग संध्याकाळपर्यंत ऑफिसात बसायची, हिशोब लिहायची आणि मागणीनुसार माल पाठवायची.

'आताशा जंगली लाकडाची किंमत वर्षावर्षाला २० टक्क्यांनी वाढतेय.' ती खरीददारांना आणि ओळखीच्या मंडळींना सांगायची. 'गंमत आहे बघा. पहिल्यांदा आम्ही इथल्या स्थानिक लाकडांचाच व्यापार करायचो. आता वासिच्काला दरवर्षी लाकूड खरेदीसाठी मगील्योवस्कीय परगण्यात जावं लागतं. वाहतुकीचा खर्चच केवढा वाढलाय!' ती म्हणायची. आणि धडकी भरल्यासारखा चेहरा करून गालावर दोन्ही हात ठेवायची.

ओलिन्काला जणू वाटायचं की हा लाकडाचा व्यापार ती वर्षानुवर्षं करत आलीय. आणि आयुष्यात सर्वांत महत्त्वाची आणि गरजेची गोष्ट जर कोणती असेल तर ते म्हणजे लाकूड. आणि मग खालील शब्दात तिला काहीतरी आपलं स्वत:चं, मनाला स्पर्शून जाणारं असं ऐकल्याचा भास व्हायचा. तुळया, ओंडके, फळ्या, निनावी, कठडे, तोफा वाहून नेणारी गाडी, छत ... रात्री झोप लागल्यावर स्वप्नातसुद्धा तिला लाकडी फळे, फळ्यांचा डोंगर दिसायचा, गावापासून कुठेतरी दूर लाकडं वाहून नेणाऱ्या बैलगाड्यांची लांबच लांब, अंत न दिसणारी अशी रांग दिसायची. तिला स्वप्न पडायचं की १२ अर्शीन लांब आणि ५ वर्शोक रुंद अशी सैन्याची एक अख्खी पलटण वखारीवर चालून येतेय. त्यामुळे ओंडके, फळ्या, तुळया, धुडुम धुडुम आवाज करत एकमेकांवर आदळताहेत. रचलेला सगळा ढीग खाली येतोय आणि उशी घेऊन पुन्हा उभा राहतोय. स्वप्नात ती किंचाळायची तेव्हा पुस्तवालव तिला हळूवारपणे म्हणायचा :

'ओलिन्का, ए वेडे, काय झालं तुला? देवाची आठवण कर!'

जे विचार नवऱ्याच्या डोक्यात घोळत असायचे तेच तिच्यापण मनात यायचे. त्याला जर वाटलं की खोलीत खूप गर्दी होतेय किंवा धंद्यात सध्या मंदी आलीय

तर तिलाही तसंच वाटायला लागायचं. तिच्या नवऱ्याला कसलाच छंद नव्हता. आवड नव्हती. सणावारीही तो घरीच बसून असायचा. तर ती पण कुठे जायची नाही.

'तुम्ही दोघं एकतर घरी नाहीतर ऑफिसला बसलेले असता!' शेजारीपाजारी, ओळखीचे लोक म्हणायचे, 'कुठे नाटकाला नाहीतर सर्कशीला का नाही जात कधी बरोबर?'

'मी आणि वासेन्का नाटकाबिटकाला नाही जात कधी.' ती गंभीरपणे म्हणायची. 'आम्ही कामाची माणसं, आम्हाला असल्या फालतू गोष्टीत रस नाही. काय एवढं चांगलं असतं त्या नाटकामध्ये?' शनिवारी मात्र पुस्तवालव आणि ती संध्याकाळच्या प्रार्थनेसाठी जायची किंवा सणाच्या दिवशी सकाळच्या सेवेला जायची. परतीच्या वेळी दोघं हसत हसत हातात हात घालून येताना दिसायची. दोघं जवळून गेली की सुवास दरवळायचा आणि तिच्या रेशमी कपड्यांची सळसळ ऐकू यायची. घरी आल्यावर ते चहाबरोबर तऱ्हतऱ्हेचे ब्रेड आणि जॅम खायचे. आणि शेवटी केक खाण्याचा कार्यक्रम असायचा त्यांचा. दररोज दुपारी त्यांच्या अंगणात आणि फाटकाच्या बाहेरसुद्धा कोबीच्या सुपाचा, परतलेल्या मटणाचा, नाहीतर बदकाच्या सागुतीचा घमघमाट सुटायचा. आणि उपवासाच्या दिवशी मासे! फाटकाजवळून जाणाऱ्या प्रत्येकाच्या तोंडाला पाणी सुटायचं. ऑफिसमध्ये नेहमी 'समवार' खदखदत असायचा. गिऱ्हाईकांचा नेहमी डोनट आणि चहा देऊन पाहुणचार होत असे. आठवड्यातून एकदा ते जोडीनं सामुदायिक स्नानगृहात जायचे आणि तिथून हातात हात घालून लाल लाल होऊन घरी परतायचे.

'सर्व काही ठीक आहे. सुखात चालला आहे आमचा संसार!' ओलिन्का मित्रमंडळींना सांगायची. 'देवाची कृपाच म्हणायची. परमेश्वर आमच्यासारखंच सगळ्यांना सुखी ठेवो.'

पुस्तवालव जेव्हा लाकूड खरेदीसाठी मगील्योवस्कया परगण्यात जायचा तेव्हा ओलिन्काला खूप कंटाळा यायचा. रात्ररात्र झोप यायची नाही. ती अगदी रडकुंडीला यायची. त्यावेळी कधीकधी संध्याकाळी लष्करी सेवेत गुरांचा डॉक्टर म्हणून काम करीत असलेला स्मिरनव यायचा. हा तरुण त्यांच्याच आऊट

हाऊसमध्ये राहत होता. तो तिच्याशी इकडच्या तिकडच्या गप्पा मारायचा. कधी पत्ते खेळायचा. त्यामुळे तिचा वेळ जायचा. त्याच्या कौटुंबिक जीवनाविषयीच्या गोष्टीत ती विशेष रस घ्यायची. त्याचं लग्न झालं होतं आणि त्याला एक मुलगापण होता. पण बायकोला त्यानं सोडलं होतं. कारण ती त्याच्याशी एकनिष्ठ राहिली नव्हती. तिच्याविषयी त्याच्या मनात तिरस्काराची भावना असली तरी मुलाच्या पालनपोषणासाठी तो तिला दरमहा चाळीस रुबल्स पाठवायचा. हे सगळं ऐकल्यावर ओलिन्का हळहळली, चुकचुकली. त्याची कीव करत मान हलवत बसली.

'जाऊ दे, माझा देव तुझं रक्षण करील!' हातात मेणबत्ती घेऊन त्याला जिन्यापर्यंत पोहोचवताना ती म्हणाली, 'गप्पागोष्टींनी माझा कंटाळा घालवल्याबद्दल आभार! देव तुम्हाला दीर्घायुष्य देवो आणि स्वर्गीय देवता ...'

हे सगळं ती गंभीरपणे, हळूवारपणे अगदी हुबेहूब आपल्या नवऱ्यासारखं बोलत होती. डॉक्टर ह्या वेळेपर्यंत खाली उतरून दारापलीकडे दिसेनासा झाला होता. पण त्याला हाक देऊन, परत बोलावून ती म्हणाली,

'व्लदीमीर प्लतोनिच, एक सांगू का तुम्हाला, तुम्ही आपल्या बायकोशी जमवून घ्यायचा प्रयत्न केलात तर बरे होईल. मुलासाठी तरी तिला क्षमा करा!... माझी खात्री आहे, त्या लहान पोराला सगळं काही कळत असेल.'

पुस्तवालव गावाहून परत आल्यावर हळू आवाजात डॉक्टरविषयी आणि त्याच्या दुर्दैवाविषयीची सगळी माहिती तिनं त्याच्या कानावर घातली. दोघांनीही उसासे टाकले. त्याच्या नशिबावर ठपका ठेवत ते चुकचुकले आणि ते लहान बालक आपल्या बापासाठी किती झुरत असेल याविषयी बोलत राहिले. त्याच वेळी ह्या गोष्टीची आपल्या मनातील सुप्त भावनांशी सांगड लागल्यामुळे की काय ती दोघं जिझसच्या तसबिरीजवळ गेली. त्यांनी जमिनीवर डोकं टेकलं आणि आपल्याला मूल होऊ देत अशी मनोमन देवाची प्रार्थना केली.

अशा तऱ्हेने पुस्तवालव दांपत्याने तब्बल सहा वर्षे शांतपणे, एक विचाराने, आणि प्रेमाने जीवनाचा आस्वाद घेतला. पण एक दिवस हिवाळ्यात 'वसीलीय अन्द्रेईच' वखारीत गरम चहा पिऊन, लगेच टोपी न घालता माल बाहेरगावी पाठवण्यासाठी बाहेर पडला. त्यामुळे त्याला थंडी बाधली आणि तो आजारी

पडला. चांगल्या चांगल्या डॉक्टरांकडून त्याच्यावर औषधोपचार करण्यात आले. पण दुखण्यानं सर्व प्रयत्नांवर मात केली आणि फक्त चार महिन्यांच्या आजारानंतर तो मरण पावला. ओलिन्काला दुसऱ्यांदा वैधव्य आलं.

'कोणाच्या भरवशावर तू मला असा सोडून गेलास वासिच्का?' दफनविधीनंतर आक्रोश करीत ती म्हणाली. 'तुझ्याशिवाय मी आता जगायचं तरी कसं? किती कमनशिबी, अभागी आहे मी! सद्गृहस्थहो, संपूर्णतः पोरकी झालेल्या या बाईवर दया करा ...'

नवऱ्याच्या मृत्यूनंतर रिवाजाप्रमाणे ती पांढऱ्या पट्ट्या लावलेले काळे कपडे घालत होती. आणि तिने टोपी आणि हातमोजे घालणं कायमचं सोडलं होतं. चर्चमध्ये आणि नवऱ्याच्या थडग्याला भेट देण्याशिवाय ती कुठेही बाहेर जात नसे. ती घराच्या बाहेर न पडता एखाद्या संन्याशिणीसारखं आयुष्य घालवत होती ती. सहा महिने झाल्यानंतर तिनं काळे कपडे घालणं बंद केलं आणि खिडक्यांची तावदानं उघडली. कधी कधी सकाळच्या वेळी ती स्वयंपाकिणीबरोबर वाणसामान आणायला बाजारात जाताना दिसायची. पण एरवी ती घरी काय करते किंवा कसा वेळ घालवते यासंबंधी लोकांना नुसता तर्कच करायला लागायचा. उदाहरणार्थ लोकांना कळलं की ती आणि तो गुरांचा डॉक्टर तिच्या बगीच्यात एकत्र चहा पीत बसलेली असतात आणि तो तिला मोठ्यांदा वर्तमानपत्र वाचून दाखवत असतो. एका ओळखीच्या बाईला ती पोस्टात भेटली आणि असं असं म्हणाली :

'आपल्या गावात गुराढोरांची योग्य रीतीनं तपासणी केली जात नाही आणि त्यामुळे मोठ्या प्रमाणात रोगराई पसरते. आणि मग आपण ऐकतो की दुधाच्या सेवनातून माणसं आजारी पडताहेत. घोडे आणि गायींवरील जंतूंपासून माणसांना रोगाची लागण होतेय. जशी आपण माणसाच्या स्वास्थ्याची काळजी घेतो तशी पाळीव जनावरांची पण देखभाल करायला हवी!'

सध्या गुरांच्या डॉक्टरचा जो दृष्टिकोण होता, तोच तिचा होता. आणि तो जे मतप्रदर्शन करायचा, त्याचाच पुनरुच्चार ती करायची. हे मात्र खरं होतं की कोणावर तरी न विसंबता ती एक वर्षभरसुद्धा राहू शकत नव्हती. आणि म्हणूनच आऊटहाऊसमध्ये राहणाऱ्या डॉक्टरच्या रूपात तिला आपला नवा आधारस्तंभ

सापडला. दुसरं कोणी असतं तर यासंबंधी लोक नाही नाही ते बोलले असते पण ओलिन्काच्या बाबतीत कोणाच्याही मनात काळंबेरं आलं नाही. इतकंच नाही तर तिच्या आयुष्यात जे जे घडलं किंवा घडत होतं त्याचं सर्वांनी समर्थनच केलं. डॉक्टर आणि ओलिन्का यांच्या एकमेकांशी वागण्यात जे परिवर्तन घडत होतं त्यासंबंधी दोघंही एक शब्दसुद्धा बोलली नाहीत. गुप्तता राखण्याचा त्यांनी आटोकाट प्रयत्न केला. परंतु त्यात त्यांना यश आलं नाही. कारण कुठल्याही बाबतीत गुप्तता राखणं ओलिन्काला कधी जमलंच नसतं. डॉक्टरकडे त्याच्या पलटणीतील सहकर्मचारी कधी कधी यायचे तेव्हा त्यांना चहा देताना किंवा जेवताना हवं नको करताना ती जनावरांच्या प्लेगाविषयी, मोतीरोगाविषयी, नाहीतर गावातील कत्तलखान्याविषयी मोकळेपणानं बोलायला लागायची तेव्हा त्याला मेल्याहून मेल्यासारखं व्हायचं आणि पाहुणेमंडळी गेली की तो तिचा हात जोरानं पकडायचा आणि रागानं भडकून म्हणायचा,

'मी तुला किती वेळा सांगितलं आहे की तुला ज्या गोष्टीचं ज्ञान नाही त्यासंबंधी बोलत जाऊ नकोस म्हणून! आम्ही डॉक्टर मंडळी जेव्हा आपसांत चर्चा करत असतो तेव्हा कृपा करून तू लुडबूड करत जाऊ नकोस. मला अगदी संकोचल्यासारखं होतं.'

अशावेळी ती आश्चर्यचकित व्हायची आणि काकुळतीनं विचारायची,

'वलोदिच्का, मग मी कशाविषयी बोलत जाऊ?' डबडबलेल्या डोळ्यांनी ती त्याला मिठी मारायची. त्यानं रागावू नये म्हणून त्याची मनधरणी करायची आणि मग दोघांमध्ये पुन्हा एकदा समेट व्हायचा.

पण काय नशीब तरी? हे त्यांचं सुख फार काळ टिकलं नाही. कारण व्हेटरनरी डॉक्टरला पलटणीबरोबर गाव सोडून कायमचं जावं लागलं. त्याची अख्खी पलटण कुठेतरी खूप दूर म्हणजे जवळजवळ सैबेरियातच हलविण्यात आली होती. त्यामुळे ओलिन्का पुन्हा आपली एकटी राहिली.

ह्यावेळी मात्र ती एकटी म्हणजे एकटीच झाली होती. तिचे वडील केव्हाच देवाघरी गेले होते. त्यांची एक हात मोडलेली, धुळीनं माखलेली आरामखुर्ची तेवढी माळ्यावर अडगळीत पडली होती. ओलिन्का अगदी वाळली होती आणि अगदी लीन, दीन अशी झाली होती. रस्त्यांनी जाताना ओळखीची माणसं तिची

पूर्वीसारखी दखल घेत नव्हती की तिच्याकडे पाहून साधं हसतही नव्हती. साहजिकच आहे म्हणा. आयुष्यातले चांगले दिवस भूतकाळात गेले होते आणि आता कुठल्यातरी नवीन, अनभिज्ञ अशा आयुष्याची सुरुवात झाली होती, ज्याच्याविषयी विचार न केलेलाच बरा. संध्याकाळच्या वेळी ओलिन्का बाहेर ओसरीवर बसायची तेव्हा 'तिवोली'मधील संगीताचे सूर तिच्या कानावर पडायचे. रॉकेटचा धडाडधूम आवाज ऐकायला यायचा. पण त्याचं तिला आता काही देणंघेणं उरलं नव्हतं. ती आपल्या सुन्या अंगणाकडे निर्विकारपणे पाहत बसायची, कश्शाकश्शाचा विचार तिच्या मनात यायचा नाही की तिला कशाची इच्छा राहिली नव्हती. रात्र पडली की ती झोपायला जायची पण स्वप्नातसुद्धा तिला ओस पडलेलं अंगण दिसायचं. जगण्यासाठी म्हणून खायला प्यायला हवंच म्हणून ती खायची. एवढंच.

सगळ्यांत महत्त्वाची पण सगळ्यांत दु:खद गोष्ट म्हणजे तिला आता कुठल्याच बाबतीत स्वत:चं असं मत द्यायचं नव्हतं. तिचं सभोवताली सगळीकडे लक्ष होतं आणि कुठं काय घडतंय ते तिला सगळं कळत पण होतं. पण कशावरही ती आपला असा ठाम अभिप्राय देऊ शकत नव्हती. त्यामुळे कुठल्या विषयावर बोलावं ते तिला कळेनासं झालं होतं. माणसाला स्वत:चं असं काही मत नसणं म्हणजे किती भयंकर गोष्ट आहे नाही! उदाहरणार्थ ती पाहतेय की समोर एक बाटली आहे, नाहीतर पाऊस पडतोय किंवा गाडीवान बैलगाडी चालवत जातो आहे पण बाटलीचं दिसणं, पावसाचं पडणं किंवा गाडीवानाचं बैलगाडी चालवणं ह्याचा अन्वयार्थ तिला लागत नाहीये किंवा तिला त्यासाठी कुणी शंभर रुबल्स देऊ केले तरी तो सांगायची तिची इच्छा नाहीये. कूकीन, पुस्तवालव आणि नंतर तो गुरांचा डॉक्टर यांच्या सान्निध्यात ओलिन्काला सगळ्याचं स्पष्टीकरण देता आलं असतं आणि तिच्या मनात असेल त्या कुठल्याही विषयावर तिनं स्वत:चं मत दिलं असतं. पण आता मात्र तिच्या विचारशक्तीत आणि हृदयात एक प्रकारची पोकळी निर्माण झाली होती. तसंच तिच्या घरापुढचं आवार ओकंबोकं दिसत होतं. ही तिची कडवट आणि भयानक उदासीनता वाळवीनं पोखरून टाकलेल्या एखाद्या लाकडासारखी वाटत होती.

त्यांचं शहर हळूहळू सर्व दिशांना पसरत चाललं होतं. गावाबाहेरची बलुच्यांची

वाडी आता हमरस्त्यावर आली होती. 'तिवोली'ची बाग आणि लाकडाच्या वखारी होत्या तिथं आता घरंच घरं उभी राहिली होती. त्याबरोबरच गल्ल्याबोळांची संख्या झपाट्यानं वाढली होती. काळ काय झपाट्यानं धावत असतो! ओलिन्काचं घर काळवंडलं आहे, छपराला गंज चढला आहे, अंगणात सगळीकडे उंच उंच वेल, काटेरी जाळ्या माजल्या आहेत. स्वतः ओलिन्का वयस्क, किडकिडीत दिसायला लागलीय. आताशा उन्हाळा असल्यामुळे ती बाहेर अंगणात बसते. पण तिच्या मनाची मरगळ, शुष्कता आणि कटुता अजून आहे तशीच आहे. थंडीत खिडकीत बसून बाहेर पडलेल्या बर्फाकडे टक लावून बसते. वसंताची चाहूल लागली किंवा वाऱ्याबरोबर चर्चचा घंटानाद कानावर पडला की भूतकाळातील आठवणी एकामागून एक उसळून येतात. हृदयात गोड शिरशिरी उठते आणि पाठोपाठ डोळ्यांतून घळाघळा अश्रू ओघळायला लागतात. पण हे सगळं एक क्षणभरच. परत उदासीनता, रितेपणा आणि जगण्याच्या प्रयोजनाविषयी साशंकता अशी अवस्था येते. काळी मांजरी 'ब्रिस्का' तिच्याभोवती गोंडा घोळते पण तिचं हे प्रेम जतावणं ओलिन्काला स्पर्शून जात नव्हतं. हे का तिला हवं होतं? नाही, तिला असं प्रेम हवं होतं की ज्यानं तिच्या संपूर्ण अस्तित्वाचा, विचारशक्तीचा ताबा घेतला असता, तिला जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोण, जगण्याचा अर्थ समजावून दिला असता. तिच्या गोठलेल्या रक्तात परत गरमी आणली असती. तिनं काळ्या ब्रिस्काला आपल्या स्कर्टवरून हुसकावून दिलं आणि फणकाऱ्यानं म्हणाली,

'चल पळ... इथं तुझं काहीच काम नाहीये!' अशा तऱ्हेनं दिवसांमागून दिवस आणि वर्षांमागून वर्षं चालली होती. पण सुखाच्या क्षणालासुद्धा ती पारखी झाली होती. आणि जणू स्वतःलाच हरवून बसली होती. घरात 'मावरा' स्वयंपाकीण जे म्हणेल ते बाबा वाक्यं प्रमाणं असा प्रकार होता.

जुलै महिना चालू होता. हवेत खूप गरमी होती. एक दिवस संध्याकाळी मेंढपाळ गावच्या मेंढ्यांच्या कळपाला रस्त्यावरून वाहून नेत होता. त्यामुळे सगळं अंगण धुळीच्या लोटांनी भरलं होतं. अचानक दिंडीदरवाजा ठोकल्याचा आवाज आला. ओलिन्कानं स्वतःच दार उघडलं आणि पाहिलं मात्र तिचा स्वतःच्या डोळ्यांवर विश्वासच बसेना. दरवाज्याच्या पलीकडे केस पूर्ण पांढरे झालेला,

मुफतीच्या वेषातला गुरांचा डॉक्टर स्मिरनिन उभा होता. तिच्या सर्व पूर्वस्मृती जाम्या झाल्या आणि मनावर ताबा न राहिल्यामुळे तिला एकदम रडू कोसळलं. एकही शब्द न बोलता तिनं त्याच्या छातीवर डोकं टेकलं. खूपच भांबावून गेल्यामुळे तिला नंतर कळलंही नाही की ती दोघं घरात केव्हा आली आणि चहा प्यायला केव्हा बसली!

'माझ्या दोस्ता!' आनंदानं थरथरत ती पुटपुटली. 'व्लदीमीर प्लंतोनिच, कुठून देव तुला परत इथे घेऊन आला बाबा?'

'यापुढे इथेच कायमचा राहायचा विचार आहे माझा.' तो म्हणाला. 'मी सैन्यातील माझ्या पदाचा राजीनामा दिलाय आणि एक साधा नागरिक बनून नशिबाची परीक्षा पाहण्याचा बेत आहे माझा. मी आता स्थिर जीवन जगण्याचा प्रयत्न करणार आहे. शिवाय मुलाला शाळेत घालायची वेळ झालीय. छान वाढलाय तो. तुला माहीत नसेल, मी आता माझ्या बायकोशी समझोता केलाय.'

'मग ती कुठंय?' तिनं विचारलं.

'ती मुलाबरोबर हॉटेलमध्ये थांबलीय आणि मी जागेच्या शोधात हिंडतोय.'

'अरे बाबा, काय हे! माझंच घर घे की मग. माझं घर तुझ्या योग्य नाही का? अरे माणसा, मी तुझ्याकडून भाडं का घेणार आहे?' ओलिन्का अस्वस्थ झाली आणि पुन्हा रडायला लागली. तुम्ही इथं ह्या जागेत राहा. मला एकटीला ते आऊट हाऊससुद्धा पुरेसं आहे. आता तर खूष आहेस ना?'

दुसऱ्या दिवशी घराच्या छपराला रंग देण्यात आला. भिंती पांढऱ्या रंगानं रंगवल्या गेल्या. ओलिन्कानं कमरेवर हात ठेवून जातीनं सगळ्या आवाराची साफसफाई करून घेतली. तिचा चेहरा हसरा झाला पूर्वीसारखा. मरगळ जाऊन एक प्रकारचा हुरूप आला तिला. एखाद्या मोठ्या, लांबलचक स्वप्नातून जणू ती जागी झाली होती. दुसऱ्या दिवशी डॉक्टरची शिडशिडीत, आखूड केसांची, दिसायला साधारणच अशी बायको तिच्याकडे आली. तिच्याबरोबर वयाच्या मानानं ठेंगणा, (त्याला दहावं वर्षं लागून गेलं होतं.) गुटगुटीत, स्वच्छ निळ्या डोळ्यांचा आणि गालांवर खळ्या पडणारा 'साशा'पण होता. फाटकातून आत शिरल्याबरोबर त्यानं मांजरीच्या पाठीमागे धाव घेतली. आणि तत्क्षणीच त्याचं निरागस, खळखळणारं हास्य तिच्या कानावर पडलं.

'आत्या, ही तुमची मांजरी आहे?' त्यानं ओलिन्काला विचारलं. 'तिला तुमच्या घरी जेव्हा पिल्लं होतील ना तेव्हा आम्हाला त्यातलं एक पिल्लू देशील ना? माझ्या आईला उंदरांचं फार भय वाटतं.'

ओलिन्कानं त्याच्याशी गप्पा मारल्या. त्याला चहा प्यायला दिला तेव्हा तिला प्रेमाचा पान्हा फुटला. तिचं मन उचंबळून आलं. जणू तो तिचाच मुलगा होता. संध्याकाळी जेवणघरात बसून तो धडे वाचत बसला होता तेव्हा ती त्याच्याकडे मायेनं पाहत होती. हळू आवाजात त्याला म्हणाली,

'माझ्या लाडक्या, किती गोड दिसतोस रे बाळा तू... हा तुझा गोरेपणा, हुषारी सगळं काही जन्मत:च घेऊन आलेला दिसतोयस!'

'त्या जागेला बेट म्हणतात.' तो वाचत होता.

'जी मध्ये कोरडी असते आणि चारी बाजूंनी पाण्यानं वेढलेली असते.'

'त्या जागेला बेट म्हणतात.' तिने तेच वाक्य परत म्हटलं. कितीतरी वर्षांच्या मौनानंतर आणि विचारांच्या रितेपणानंतर तिनं ठासून केलेलं हे पहिलं विधान होतं.

आता तिला स्वत:चं स्वतंत्र असं मत आलं होतं. एक दिवस रात्रीच्या जेवणानंतर 'साशाच्या' आईवडिलांशी ती गप्पा मारीत होती. अलीकडे जिम्नाझियामध्ये शिक्षण घेणं कसं कठीण वाटतं. तरीसुद्धा 'लॅटीन' आणि 'ग्रीक' विषय शिकविल्या जाणाऱ्या जिम्नाझियामधली पारंपरिक शिक्षणपद्धती प्रत्यक्ष शिक्षणपद्धतीपेक्षा नक्कीच चांगली आहे. कारण जिम्नाझियामधून बाहेर पडल्यानंतर पुढील आयुष्याच्या सगळ्या वाटा मोकळ्या होतात. 'तुला डॉक्टर व्हायचंय तर होशील डॉक्टर. अभियांत्रिकीकडे जायचंय, सहज जाता येईल.'

'साशा' जिम्नाझियामध्ये जायला लागला. त्याची आई खारकोवला आपल्या बहिणीकडे गेली ती परत आलीच नाही. त्याचा बाप शेळ्या मेंढ्यांना तपासण्यासाठी कुठेकुठे जायचा तो दोन-दोन तीन-तीन दिवस घरी नसायचा. ओलिन्काला वाटायचं, की साशाकडे सगळेजण पूर्णपणे दुर्लक्ष करताहेत. घरात तो त्यांना नकोसा झाला आहे. भुकेनं कासावीस होतोय म्हणून तिनं त्याला आपल्याकडे आऊट हाऊसमध्ये आणलं आणि एका छोट्या खोलीत त्याची राहण्याची व्यवस्था केली.

साशाला तिच्याजवळ राहायला लागून आता जवळजवळ दीड वर्ष झालं होतं. दररोज सकाळी ओलिन्का त्याच्या खोलीत जायची तर तो आपला हात गालाखाली घेऊन शांत झोपलेला असायचा. त्याला गाढ झोपेतून उठवायचं तिच्या जिवावर येई.

'साशेन्का' – ती कळवळून म्हणायची, 'उठ बाळा, शाळेची वेळ झालीय.'

मग तो उठायचा. कपडे करायचा. देवाला नमस्कार करून चहा प्यायला बसायचा. तो तीन कप चहा प्यायचा आणि त्याबरोबर दोन ब्रेड रोल आणि लांबट आकाराचा अर्धा फ्रेंच पाव लोण्याबरोबर खायचा. ह्यावेळेपर्यंत तो पूर्ण जागा झालेला नसायचा त्यामुळे जरा अनवधानी वाटायचा.

'हे बघ साशेन्का, तू ती परीकथा नीट समजून घेतली नाहीस.' तो जणू काही लांबच्या प्रवासाला निघालाय आणि ती त्याला निरोप देतेय अशा तऱ्हेने काळजीच्या सुरात ती म्हणाली,

'मला तुझी काळजी वाटते. तू आतापासून प्रयत्न कर माझ्या राजा. मला तुझी काळजी वाटते ... शिक्षकांचं ऐकत जा.'

'हो, हो. सोड मला आता एकट्याला कृपा करून!' साशा म्हणाला.

त्यानंतर तो शाळेत जायचा. स्वत: एवढासा छोटा पण पिसांची केवढी थोरली टोपी त्याच्या डोक्यावर असायची आणि पाठीवर धोपटी. ओलिन्का त्याच्या मागोमाग आवाज न करता जायची.

'सा .. शे .. न्का!' ती हाक मारायची. तो वळून थांबायचा. ती त्याच्या हातावर खजूर नाहीतर चॉकलेट ठेवायची. ती दोघं शाळेच्या गल्लीत वळायची तेव्हा आपल्या पाठीमागे एक उंच, लठ्ठ बाई चालत येतेय ह्याची त्याला लाज वाटायची. तो मान वळवून म्हणायचा,

'आत्याबाई, तुम्ही जा आता घरी. मी इथून पुढे जाईन एकटा!'

ती मग थांबायची. पण तो शाळेच्या प्रवेशद्वारापलीकडे जाईपर्यंत एक क्षणदेखील दुसरीकडे पाहायची नाही. किती प्रेम करते ती त्याच्यावर! आत्तापर्यंत ज्यांच्या ज्यांच्यात तिचा जीव गुंतला होता त्यापैकी एकाही प्रेमाचा रंग आत्ताइतका गहिरा नव्हता. त्यापूर्वी कोणाहीपुढे तिच्या मनानं अशी शरणागती पत्करली नव्हती. इतकी आत्मीयता दाखवली नव्हती आणि इतका भरभरून

आनंद पण तिला मिळाला नव्हता. कारण आत्ता तिच्या अंत:करणात मातृप्रेमाची भावना दिवसागणिक जास्त जास्त उद्दीपित होत होती. ह्या कोण, कुठल्या मुलासाठी, त्याच्या गालावरच्या लोभस खळीसाठी, त्याच्या त्या पिसाच्या टोपीसाठी तिनं आपलं सगळं आयुष्य आनंदानं ओवाळून टाकलं असतं. कशासाठी ? कोण लागत होता तो तिचा ?

साशाला पोहोचवून ती समाधानानं, प्रसन्न चित्तानं, आनंदात मग्न होऊन हळूहळू घरी परतायची. गेल्या सहा महिन्यांत तिच्या चेहऱ्यावर पुन्हा एकदा तारुण्यातलं तेज झळाळत होतं. सगळ्यांना तिच्याकडे पाहून समाधान वाटायचं आणि ते म्हणायचे,

'दुशेच्का, ओल्गा सिम्योनवना नमस्ते ! कशी आहेस तू ?'

'जिम्नाझियामध्ये शिक्षण घेणं आता कठीण झालंय !' ती बाजारात कुणाला तरी सांगायची. 'चेष्टा नाही, काल पहिल्या वर्गात एक गोष्ट तोंडपाठ करायला सांगितली होती, अर्थ लॅटिनमध्ये असा तो गृहपाठ होता ... एवढ्याशा चिंट्या मुलाला हे सगळं फारच होत नाही का ?'

मग ती शिक्षकांविषयी, शिक्षण पद्धतीविषयी, पाठ्यपुस्तकांविषयी बोलायला लागायची. जे जे साशा तिला सांगायचा तेच ती इतरांना सांगायची.

दुपारी दोनच्यापुढे ती दोघं बरोबर जेवायची. संध्याकाळी बरोबर बसून अभ्यास करायची आणि शेवटी दोघंही रडकुंडीला यायची. त्याला अंथरुणात झोपवून ती त्याच्यासाठी हाताचा क्रॉस करून कितीतरी वेळ प्रार्थना करायची. आणि मग स्वत: आडवी होऊन दूरवरच्या भविष्याची धूसर स्वप्नं पाहायची, ज्यात साशानं आपलं शिक्षण पूर्ण केलंय, तो डॉक्टर नाहीतर इंजिनियर झालाय, त्याचं स्वत:चं घर आहे. गाडी-घोडे आहेत. त्याचं लग्न झालंय. त्याला मुलं झाली आहेत ... तिचा डोळा लागायचा. त्याच त्याच गोष्टीचा ती विचार करायची आणि तिच्या बंद मिटल्या डोळ्यांतून अश्रू ओघळत राहायचे. काळी मांजर गुर गुर आवाज करीत तिच्या जवळच लोळत पडलेली असायची.

एवढ्यात फाटक वाजवल्याचा जोराचा आवाज होतो. ओलिन्का जागी होते पण भीतीनं तिचा श्वास जड होतो. छातीत धडधड व्हायला लागते. थोड्या वेळानं परत दाराचा खडखडाट ऐकू येतो.

'बहुतेक खारकोवहून तार आली असणार— तिच्या मनात विचार आला आणि ती थरथर कापायला लागली. साशाच्या आईचा त्याला स्वत:जवळच ठेवण्याचा विचार असेल ... अरे देवा!'

ती सैरभैर होते. तिचं डोकं, हात, पाय सगळं गार पडायला लागतं. आणि वाटायला लागतं की ह्या जगात तिच्याइतकं कमनशिबी दुसरं कुणी असूच शकत नाही. अजून एखादं मिनिट जातं. आवाज कानावर पडतात, डॉक्टर क्लबमधून घरी आलेला असतो.

'परमेश्वराचीच कृपा रे बाबा' तिच्या मनात येतं. हळूहळू तिच्यावरचं दडपण कमी व्हायला लागतं. पुन्हा हलकंफुलकं वाटायला लागतं. ती साशाचा विचार करतच आडवी होते. साशा शेजारच्या खोलीत गाढ झोपलेला असतो आणि मधूनच झोपेत बरळत असतो.

'मी दाखवतो हं तुला आता! चल निघ! मला नको पकडूस!

❋

: ७ :

कशतानका

१

सगळाच आचरटपणा

डॅशहाऊन्ड आणि गावठी कुत्र्याची क्रॉसब्रीड, किरमिजी रंगाची, लांडग्याच्या चेहऱ्यामोहऱ्याची छोटीशी कुत्री फूटपाथवरून पुढे मागे, पुढे मागे पळत होती. घाबऱ्याघुबऱ्या चारी दिशांना वळून वळून पाहत होती. क्वचितच एका जागी स्थिर उभी राह्यची ती. ती आपले थंडगार पडलेले पंजे आळीपाळीनं वर करून रडत होती. जणू स्वत:लाच दोष देत होती की, असं झालं तरी कसं आपल्या हातून, आपण रस्ता कसा चुकलो ?

तिनं तो सबंध दिवस कसा घालवला आणि सरतेशेवटी ती या अनोळखी फूटपाथवर कशी येऊन पोहोचली ते तिला खडानूखडा आठवत होतं.

दिवसाची सुरुवात अशी झाली होती. तिच्या मालकानं म्हणजे मिस्त्री लुका आल्येकसान्द्रेइचनं आपली टोपी डोक्यावर ठेवली, तांबड्या कापडात गुंडाळलेला लाकडाचा कसलातरी तुकडा काखेत घातला आणि ओरडला :

'कशतानका, चल, बाहेर जाऊया आपण !'

रात्रभर लाकडाच्या भुशावर झोपलेली ती कुत्री आपल्या नावाची हाक कानावर पडल्याबरोबर मिस्त्रीच्या ठिय्याखालून मस्त आळोखेपिळोखे देत बाहेर आली आणि मालकाच्या पाठीमागे धावत सुटली.

लुकाची गिऱ्हाईकं खूपच दूर राहत होती. त्यामुळे एका गिऱ्हाईकाकडून दुसऱ्याकडे जायच्या आधी दरवेळी त्याला पोटपूजेसाठी कुठल्यातरी छोट्या हॉटेलात जावं लागत होतं. कशतानकाला आठवलं, रस्त्यावरून जाताना ती जरा जास्तच आचरटपणा करीत होती. मालकानं तिला भटकायला बरोबर नेलं ह्या आनंदात ती उड्या मारत होती. रुळावरून चालणाऱ्या घोडागाड्यांवर जोरजोरानं भुंकत धावून जात होती. लोकांच्या घरांच्या अंगणात घुसून कुत्र्यांचा पाठलाग

करीत होती. त्यामुळे ती मधून-मधून मिस्त्रीच्या नजरेआड जायची. मिस्त्री थांबायचा, रागानं तिच्यावर ओरडायचा. एकदा तर राग अनावर होऊन त्यानं तिचा केसाळ कान मुठीत पकडला, तिला गोल गोल फिरवलं आणि दातओठ खाऊन म्हणाला,

'काय ... का ... य चाललंय तुझं हे, मूर्ख कुठली !'

गिऱ्हाईकांकडचे काम संपल्यावर लुका अलेकसान्द्रेइच थोडावेळ आपल्या बहिणीकडे गेला. तिथं खायला, प्यायला. बहिणीकडून त्याच्या ओळखीच्या बुकबाईंडरकडे गेला. तिथून हॉटेलात, हॉटेलातून आणखी कोणाकडे तरी, असं चाललं होतं त्याचं. थोडक्यात काय, कशतानका जेव्हा त्या अनोळखी फूटपाथवर येऊन पोहोचली, तेव्हा संध्याकाळ झाली होती. मिस्त्री पिऊन तर्र झाला होता. हातवारे करत होता, उसासे टाकत होता नि बरळत होता. नाहीतर दुसऱ्याच क्षणी एकदम गोड गुलूगुलू बोलायला लागायचा. कशतानकाला प्रेमानं आपल्याजवळ घेऊन म्हणाला,

'कशतानका, तू म्हणजे किडामुंगीप्रमाणे एक कीटक आहेस बरं का. तुझी अक्कल त्यांच्याइतकीच. म्हणजे असं की मिस्त्रीपुढे जसा सुतार कोणी नाही तशी माणसाच्या तुलनेत तू अगदीच क:पदार्थ ...'

लुका कशतानकाशी असलं काहीबाही बोलत होता. एवढ्यात गाण्याचे कर्कश सूर कानावर आदळले. कशतानकानं मान वळवली तर तिच्या अगदी जवळून रस्त्यावरून सैनिकांची एक पलटण जात होती. संगीताचा तो आवाज तिला सहन न झाल्यामुळे ती अगदी बेजार झाली. मुसंड्या मारायला लागली नि भुंकायला लागली. घाबरायच्या, चिरचिरायच्या, भुंकायच्या ऐवजी मिस्त्री मोठ्यांदा हसतोय, पुढे पुढे घुसतोय, आपली पाची बोटं वर करून सलाम ठोकतोय. ह्या सर्व गोष्टींमुळे तिला आश्चर्याचा धक्काच बसला. मालकाच्या त्या वागण्यामुळे कशतानका अजूनच जोरात भुंकायला लागली आणि रस्ता ओलांडून ती पलीकडच्या फूटपाथवर जाऊन पोहोचली.

ती जेव्हा भानावर आली तेव्हा संगीत थांबलेलं होतं आणि पलटणीचा मागमूसही नव्हता. तिनं परत रस्ता ओलांडला आणि मालकाला ज्या जागेवर तिनं सोडलं होतं तिथे ती परत आली.

पण ! अरे देवा ! मिस्त्री तिथे नव्हताच. ती पिसाटासारखी पुढेमागे पळत

सुटली. परत रस्ता ओलांडून पलीकडे गेली पण मिस्त्री शब्दश: जमिनीत गायब झाला होता... मग तिनं फूटपाथ हुंगायला सुरुवात केली. ह्या आशेनं की वासावरून तरी धन्याचा माग लागेल. पण नुकताच कुणीतरी रिकामटेकडा नवे करकरीत गमबूट घालून फूटपाथवरून फरफटत गेला होता. त्यामुळे रबराच्या त्या उग्र वासात इतर सगळे मंद वास मिसळून गेले होते. कोणाचा कुठला वास याचा निवाडा करणं अशक्यच होतं.

कशतानका सैरावैरा पुढे मागे पळत होती. पण मालक काही सापडेना तिला! त्यातच अंधार पडायला लागला. रस्त्याच्या दोन्ही बाजूचे दिवे लागले. घरांच्या खिडक्याखिडक्यांतून प्रकाश दिसायला लागला. कापसासारखा बर्फाचा जोरदार वर्षाव व्हायला लागला. बर्फानं खडक, घोड्यांच्या पाठी, गाडीवानांच्या टोप्या सगळं सगळं सफेद रंगानं रंगवून टाकलं. जसा जसा अंधार वाढत होता तसतशा सर्व गोष्टी जास्त जास्तच पांढऱ्या शुभ्र दिसायला लागल्या. कशतानकाच्या जवळून, डोळ्यांपुढून कधी कधी तिला तुडवून गिऱ्हाईकं इकडून तिकडे, तिकडून इकडे जात होती. सगळ्या मानवजातीची कशतानकाने ढोबळपणे दोन भागांत विभागणी केली होती: मालक मंडळी आणि त्यांची गिऱ्हाईकं. त्या दोघांमध्ये मोठाच फरक होता. पहिल्या जातीच्या माणसांना तिला मारायचा हक्क पोहोचत होता. आणि दुसऱ्या तऱ्हेच्या लोकांच्या तंगड्यांचा लचका तोडण्याचा अधिकार तिला होता. गिऱ्हाईकं घाईगर्दीत कुठेतरी निघाली होती आणि तिच्याकडे ढुंकून सुद्धा पाहत नव्हती.

मिट्ट काळोख पडला आणि मग मात्र भीतीनं तिची पाचावर धारण बसली. तिनं कुठल्यातरी घराच्या पोर्चच्या खांबाला विळखा घातला आणि ती गळा काढून रडू लागली. लुका अलेकसान्द्रेइच बरोबरच्या दिवसभराच्या वणवणीनं ती खूप दमून गेली होती. तिचे कान आणि पंजे गारठले होते आणि त्यातच पोटात भुकेचा डोंब उसळला होता. सबंध दिवसात तिला फक्त दोनदाच काहीतरी चघळायला मिळालं होतं. बुकबाईंडरकडची थोडीशी पेस्ट आणि कुठल्याशा हॉटेलमध्ये गल्ल्याजवळ मिळालेली सॉसेजची पिशवी – बास एवढंच. ती जर माणूस असती तर आज, ह्या क्षणी तिच्या मनात विचार आला असता: 'नाही, नाही, एवढंच खाऊन जगणं अशक्य कोटीतलं आहे! गोळी मारून घेऊन आत्महत्याच करायला पाहिजे!'

२

रहस्यमय अनोळखी

कशतानकाला विचार करण्याचीसुद्धा ताकद राहिली नव्हती. सारखी रडत होती ती. तिच्या पाठीवर, डोक्यावर भुरभुरीत मऊ बर्फाचा जाड थर चढला होता, दमछाकीमुळे तिच्या डोळ्यांवर झापड आली होती नुसती. एवढ्यात घराचं फाटक किलकिलं झालं, करकरलं आणि त्यानं तिच्या अंगाच्या एका बाजूला धडक दिली. ती जोरानं किंचाळली. उघडलेल्या दरवाज्यातून कुणीतरी एक मनुष्य बाहेर आला. गिऱ्हाईकाच्या जातकुळीतला असावा बहुतेक. कशतानका जेव्हा भुंकायला लागली आणि त्याच्या पायाशी येऊन धडकली तेव्हा त्यानं तिच्याकडे दुर्लक्षच केलं. पण मग तो खाली वाकला आणि कशतानकाला विचारू लागला :

'ए चिमुरडे, कुठून आलीस इथं ? मी तुला इजा केली ना फाटक उघडताना ? अरेरे, किती गरीब, मुकं जनावर गं तू... पण रागावू नकोस हं, अजिबात रागवायचं नाही ... चुकलो म्हणतो न मी ! '

कशतानकानं पापण्यावरून लोंबणाऱ्या हिमकणांच्यामधून त्या अनोळखी माणसाकडे पाहिलं. तिला समोर एक बुटका, लठ्ठ, दाढी केलेला, गुबगुबीत चेहऱ्याचा मनुष्य दिसला. त्यानं गोल टोपी घातली होती आणि कोटाची बटणं लावली नव्हती.

'इतकं काकुळतीला येऊन काय गं ओरडतेयस ? ' कशतानकाच्या पाठीवरचं बर्फ आपल्या बोटानं साफ करीत तो म्हणाला, 'तुझा मालक कुठंय ? तू नक्कीच रस्ता चुकलीयस. हो ना ? ए भाबड्या पिल्ला, काय करायचं आता आपण तुझं ? '

त्याच्या आवाजातला प्रेमळपणा, आपलेपणा लक्षात यायला कशतानकाला जरासुद्धा वेळ लागला नाही. ती त्याचा हात चाटू लागली. आणि तक्रारीच्या सुरात आणखीनच जोरात भुंकायला लागली.

'किती सुंदर, लोभसवाणी आहेस तू' अनोळखी माणूस म्हणाला, 'थेट लांडग्याच्या मुखड्याची. पण आता पुढे काय ? करण्यासारखं काहीच नाही. चल, चल माझ्याबरोबर ! तुझाही काही उपयोग करून घेता येईल ...'

'चला बाईसाहेब !'

त्यानं तोंडानं चक्चक् करत हातानं खूण केली. जिचा एकच अर्थ होता: 'जाऊ या !'

कशतानका त्याच्यामागे चालू लागली.

अर्धा तास झाला असेल नसेल एवढंच, कशतानका एका मोठ्या उजेडाच्या खोलीत फरशीवर स्थानापन्न झाली होती आणि आपली मान वाकडी करून लाडीगोडीनं आणि अधीरतेनं टेबलाशी जेवायला बसलेल्या त्या माणसाकडे पाहत होती. तो माणूस एकीकडे खात होता आणि मधूनमधून कशतानकाला तुकडे टाकत होता ... पहिल्यांदा त्याने तिला ब्रेड आणि चीजचा पातळ तुकडा दिला. मग मटणाचा तुकडा, अर्धा केक, कोंबडीची हाडं, असं तो टाकत राह्यला आणि भुकेनं व्याकुळ झालेल्या तिनं ते इतक्या भराभरा मटकावलं की कोणत्या पदार्थाची कशी चव होती हेही कळलं नाही तिला. जितकं जितकं ती खात होती तितकी तितकी तिची भूक वाढतच होती.

'तुझी मालक मंडळी तुला बहुतेक पोटभर खायला देत नसावी !' तिचं ते हावरटासारखं न चावता, बकाबका खाणं पाहून तो म्हणाला, 'भुकेनं पोटाला कसला खड्डा पडलाय तुझ्या ! हाडन् हाड दिसतंय नुसतं ...'

कशतानकानं भराभरा खूप खाल्लं पण तिचं पोट काही भरलं नाही. खाण्यानं सुस्ती मात्र आली तिला. मग तिनं पाय लांब करून खोलीच्या मध्यावरच ताणून दिली. सगळ्या शरीरभर एक प्रकारची गोड शिरशिरी भरल्यामुळे तिची शेपटी उगाचच हालत होती. नवीन मालक जोपर्यंत आरामखुर्चीत बसून सिगरेटचे झुरके घेत होता तेवढा वेळ कशतानका शेपटी हालवत विचार करीत होती की कुठला पर्याय बरा– ह्या अनोळखी माणसाजवळ राहावं की मिस्त्रीजवळ? ह्याच्या घरातली अवस्था गरिबीची आणि सुमारच आहे. एक आरामखुर्ची, दिवाण, दिवे आणि गालिच्याशिवाय ह्याच्या घरात काही नाही. खोली कशी रिकामी रिकामीच वाटते. मिस्त्रीचं सगळं घर सामानानं भरगच्च भरलेलं आहे. त्याच्या घरात टेबल, मिस्त्रीचा काम करायचा ठिय्या, लाकडाचा भुसा, ढलप्या, रंधा हातोडा, करवत, पटाशी, चाळणी, वॉश टब ... ह्या अनोळख्याकडे कसला वास म्हणून येत नाही. पण मिस्त्रीकडे घरात सगळीकडे धूर कोंडलेला असायचा. सरस, लाख,

लाकडाच्या ढलप्या सगळ्यांचा मस्त वास यायचा. इथं राहण्यात एक मोठाच फायदा आहे. तो भरपूर खायला देतोय आणि आणखी एका बाबतीत तर त्याचं खुल्या दिलानं कौतुक करायला हवं की कशतानका जेव्हा टेबलाजवळ उभी राहून लाडीगोडीनं त्याच्याकडे पाहत होती तेव्हा त्याने एकदासुद्धा तिला मारलं नाही की जमिनीवर पाय आपटून घाबरवलं नाही. इतकंच काय, एकदाही तो 'चल, पळ इथून!' असं वसकन ओरडला नाही तिच्या अंगावर!

सिगरेट पिऊन झाल्यावर नवा मालक खोलीबाहेर गेला आणि हातात छोटीशी चटई घेऊन परत आला.

'ए लांडगे, ये इकडे!' दिवाणाच्या जवळ कोपऱ्यात चटई पसरत तो म्हणाला, 'पड हिच्यावर - झोप!'

मग दिवा मालवून तो बाहेर गेला. कशतानका चटईवर पडली आणि तिने डोळे मिटून घेतले. एवढ्यात रस्त्यावरून कुठल्याशा कुत्र्याच्या भुंकण्याचा आवाज आला. उत्तरादाखल भुंकावं असं तिच्या मनात आलं होतं. पण तिला दुःख होत होतं. उदास वाटत होतं. तिला लुका अलेक्सान्द्रेइचची, त्याचा मुलगा फ्योदुष्काची, ठिय्याच्या खालच्या उबदार जागेची खूप आठवण येत होती... तिला आठवलं, थंडीतल्या कंटाळवाण्या संध्याकाळच्या वेळी मिस्त्री रंधत बसायचा किंवा मोठ्यानं वर्तमानपत्र वाचायचा तेव्हा कितीदातरी फयोदुष्का तिच्याबरोबर खेळायचा. तिचे मागचे पाय धरून तो तिला ठिय्याखालून बाहेर ओढायचा आणि वेगवेगळ्या कसरती करून घ्यायचा तिच्याकडून. शेवटी तिच्या डोळ्यापुढे अंधेरी यायची आणि सांधान् सांधा दुखायला लागायचा. तो तिला मागच्या पंजावर चालायला लावायचा, तिच्याकडून घंटा वाजवायची नक्कल करून घ्यायचा, म्हणजे तिची शेपटी धरून तिला उंच करायचा. त्यामुळे ती किंचाळायची, भुंकायची. कधी तिला तंबाखू हुंगायला द्यायचा... ह्यापुढची कसरत तर फारच त्रासदायक वाटायची तिला, जीवघेणीच म्हणाना: फ्योदुष्का दोऱ्यात मांसाचा तुकडा अडकवायचा आणि तो कशतानकाला खायला द्यायचा. तिनं तो गिळला की फिदीफिदी हसत तिच्या पोटातून तो तुकडा ओढून बाहेर काढायचा. भडभडून आठवणी यायच्या तसतसं दुःख अनावर होऊन कशतानका जोरजोरात किंचाळायची.

थोड्याच वेळात थकवा आणि उबीनं तिच्या दु:खावर मात केली. आणि ती झोपेच्या अधीन झाली. तिच्या स्वप्नात कुत्री सैरावैरा पळत होती. तिला रस्त्यात भेटलेला मऊ मऊ केसांचा म्हातारा पुडल कुत्रा जवळून पळत गेला. त्याच्या डोळ्यावर पांढरा ठिपका होता आणि नाकाजवळ पांढऱ्या केसांचा एक पुंजका होता. फ्योदुष्का हातात पटाशी घेऊन पाठलाग करत होता, मग एकदम स्वत:लाच केसाळ लोकरीत झाकून घेतलं त्यानं. भुंकायची नक्कल करत होता आणि कशतानकासमोर येऊन उभा राह्यलं. कशतानका आणि तो एकमेकांची नाकं हुंगत होते, रस्त्यावर जात होते.

३

नवीन, पण आवडलेली गाठभेट

कशतानका जेव्हा जागी झाली तेव्हा चक्क उजाडलं होतं. रस्त्यावरून येणारा नेहमीचा आवाज कानावर पडत होता. खोलीमध्ये चिटपाखरू नव्हतं. कशतानकानं तंगड्या लांब केल्या, जांभई दिली आणि रागावल्यासारखी उर्मटपणे खोलीभर येरझारा घालायला लागली ती. तिने सगळे कोपरे आणि फर्निचरचा वास घेऊन पाह्यला, व्हरांड्यात डोकावून पाह्यलं पण मनाला भुरळ पाडणारं, आवडीचं असं काहीच मिळेना तिला. व्हरांड्यात उघडणाऱ्या दरवाज्याशिवाय आणखी एक दार दिसत होतं. तिनं दोन्ही पंजांनी ओरबाडून ते दार उघडलं आणि ती खोलीत शिरली. पलंगावर ब्लँकेट पांघरून नवा मालक झोपला होता. तिच्या लक्षात आलं, बरोबर हाच तो कालचा अनोळखी माणूस.

- र - र - र - र ... ती गुरगुरली. पण कालच्या जेवणाची आठवण होऊन ती त्याला हुंगायला लागली. शेपटी हलवायला लागली. तिनं त्या अनोळखी माणसाचे कपडे, मोजे हुंगले तेव्हा तिच्या लक्षात आलं की त्या सगळ्यांना घोड्याचा वास येतोय. त्या झोपायच्या खोलीतून बाहेर जाणारा आणखी एक दरवाजा होता. पण तोही बंदच होता. ते दार पण तिनं पंजानं ओरबाडलं. पोटानं धडक दिली त्याला, तेव्हा कुठे ते उघडलं. ती आत शिरली मात्र, एक विचित्र संशयास्पद असा वास आला. पुढं कुठल्यातरी संकटाला तोंड द्यावं लागणार आहे हे तिला आधीच कळलं. मळकट वॉलपेपर असलेल्या त्या छोट्या खोलीत ती

गुरगुरत, इकडे तिकडे पाहत शिरली. पण भीती वाटल्यानं पुन्हा चार पावलं मागे सरली. तिथं तिला कल्पनेपलीकडचं, भीतिदायक असं काहीच दिसलं नाही. पण मान आणि डोकं जमिनीवर घासून, पंख पूर्ण पसरवून त्यांची फडफड करत करड्या रंगाच्या एका बदकाने तिच्यावर झेप घेतली. त्याच्या पलीकडेच चटईवर एक पांढरं मांजर लोळत होतं. कशतानकाला पाहिल्यावर मांजरानं टुण्ण उडी मारली. पाठीची कमान केली. शेपटी खाली केली. अंगावरचे केस ताठ केले आणि त्यानंही गुरगुर फुस-फुस सुरू केली. कुत्री खरं तर खूप घाबरली होती. पण आपण भ्यायलो आहे हे तिला दाखवायचं नव्हतं. ती मोठ्यांदा भुंकायला लागली आणि त्या मांजरावर धावून गेली ... मांजरानं पाठीची आणखीनच कमान केली. गुरगुरणं चालूच ठेवलं आणि आपल्या पंजानं कशतानकाच्या डोक्यावर फटका मारला. कशतानका उडी मारून बाजूला सरली, चारी पंजे रोवून घट्ट बसली. आपली मान मांजराच्या दिशेला लांब करून कर्कशपणे मोठमोठ्यानं भुंकायला लागली. त्याचवेळी बदक पाठीमागून आलं आणि त्यानं तिच्या पाठीवर चोच मारली. कशतानकानं उडी मारून बदकावर झडप घातली ...

'काय चाललंय हे' रागावलेला भसाडा आवाज कानावर पडला आणि गाऊन घातलेला, हातात सिगरेट पकडलेला तो अनोळखी माणूस खोलीत शिरला - 'ह्याचा अर्थ काय ? चला, जा आपापल्या जागेवर!'

तो मांजराजवळ जाऊन त्याच्या कमान केलेल्या पाठीवरून हात फिरवीत म्हणाला :

'फ्योदर तिमफेइच, ह्या असल्या वागण्याला काय म्हणायचं ? लढाई सुरू केलीत ? ए मूर्खा, म्हाताऱ्या ! जा जागेवर जाऊन पड !' आणि बदकाकडे वळून ओरडला,

'इवान इवानिच, जा जागेवर तुझ्या!' मांजर मुकाट्यानं आपल्या चटईवर जाऊन पडलं आणि त्यानं डोळे मिटून घेतले. त्याचं तोंड आणि कान जर निरखून पाहिले असते तर लक्षात आलं असतं की त्याला स्वत:ला पण एवढं रागावणं, लढाईचा पवित्रा घेणं पसंत नव्हतं. अपमानित झालेली कशतानका भुंकू लागली आणि बदक पण भावनावेगानं, मान लांब करून भरभर पण ठसक्यात बडबडायला लागलं. त्याचा एक शब्द कुणाला कळला असेल तर शपथ !

'ठीक आहे, ठीक आहे.' जांभई देत मालक म्हणाला. एकमेकांशी समजुतीनं आणि मैत्रीनं वागायला हवं. त्यानं कशतानकाकडे एक कटाक्ष टाकला आणि म्हणाला : 'ए, किरमिजी केसवाली, घाबरायचं नाही... हे सगळे चांगले लोक आहेत. वाईट वाटून नाही घ्यायचं. उभी रहा बघू. तुला कुठल्या नावानं हाक मारायचं? नाव नसलं तर काही खरं आहे का?'

तो अनोळखी माणूस विचार करून म्हणाला,

'हां, हे बघ... सापडलं नाव... तू होशील त्योतका... समजलं? त्योतका!'

मग कितीतरी वेळा त्योतका, त्योतका असं म्हणून तो खोलीबाहेर निघून गेला.

कशतानका पाहणी करण्यासाठी खाली बसली. मांजर झोपण्याचं सोंग करून चटईवर बसलं होतं. बदक लांब मान करून जागच्या जागी नाचत, मनस्वीपणे अखंड बडबडत होतं. ते बदक खूप हुशार असलं पाहिजे. त्याच्या बोलण्याच्या लांबच लांब भडिमारानंतर प्रत्येकवेळी ते पाच पावलं मागे जायचं आणि असं दाखवायचं की ते किती छान बोलतंय... त्याचं बोलणं ऐकून घेऊन त्याच्याच र-र-र-र च्या भाषेत त्याला उत्तर देऊन, कशतानकानं कोपरे हुंगायच्या कामाला सुरुवात केली. एका कोपऱ्यात एक ब्रेडचा लहानसा तुकडा होता आणि त्याच्यावर एक भिजलेला मटारचा दाणा होता आणि ओटची भिजट सालं होती. तिनं मटारची चव घेतली - बेचव, मग सालं खाऊन पाहिली - चांगली लागली ती. बदक, एक अनोळखी कुत्री त्याचं खाणं मट्ट करतेय म्हणून थोडंसुद्धा चिडलं नाही. उलट आणखीनच अंगात आल्यासारखं बडबडायला लागलं आणि कशतानकावर आपला पूर्ण विश्वास आहे हे दाखवण्यासाठी सालं पडली होती तिथं ते गेलं, त्यातील थोडे मटारदाणे पण खाल्ले त्याने.

४

अद्‌भुत पिंजरा

थोड्या वेळाने तो अनोळखी मनुष्य फाटकासारखी दिसणारी, 'प' ह्या अक्षराचा आकार असलेली, कमानीप्रमाणे वाटणारी एक विचित्र वस्तू घेऊन खोलीत आला. त्या ओबडधोबड लाकडी 'प' वर एक घंटा टांगली होती आणि पिस्तुल

बांधलं होतं. घंटेच्या लोलकापासून ते पिस्तुलाच्या घोड्यापर्यंत दोऱ्या बांधल्या होत्या. त्यानं ती 'प' ची कमान खोलीच्या मध्यभागी उभी केली. कितीतरी वेळ तो गुंता सोडवत होता. पुन्हा गाठी बांधत होता. मग तो बदकाकडे पाहून म्हणाला,

'इवान इवानिच, ये बरं इकडे!'

बदक त्याच्याजवळ आलं आणि पुढील आज्ञेच्या प्रतीक्षेत उभं राहिलं.

'हं,' तो म्हणाला, 'अगदी पहिल्यापासून सुरुवात करायची हं. आधी सगळ्यांना वाकून अभिवादन कर! शाब्बास!'

इवान इवानिचनं मान लांब केली. सगळ्या दिशांना वळून पाहिलं आणि पंजानं जमीन खरवडली.

'छान, शाब्बास ... आता मरून दाखव.' बदक पाठीवर उताणं झोपलं आणि त्यानं आपल्या तंगड्या वर फडफडवल्या. अशाच तऱ्हेच्या आणखी काही सटर फटर कवायती करून घेतल्यावर त्या अनोळख्याने आपलं डोकं हातात धरलं आणि तोंडावर भीती वाटल्याचा भाव आणून ओरडला,

'धावा, धावा, आग लागलीय, होरपळतोय आम्ही!'

इवान इवानिचनं 'प' जवळ जाऊन चोचीनं दोरी धरली आणि घंटा वाजवली.

अनोळखी माणूस खूष झाला. त्यानं बदकाच्या मानेवर थोपटलं आणि म्हणाला,

'भले शाबास इवान इवानिच! आता समज, तू सराफ आहेस, सोन्याचा, हिऱ्यांचा व्यापार करतोयस. तू आपल्या दुकानात येतोस आणि आतमध्ये तुला चोर दिसतात. अशावेळी तू काय करशील?'

बदकानं दुसरी दोरी चोचीत धरली आणि ओढली. क्षणात बंदुकीचा दबलेला आवाज झाला. कशतानकाला तो आवाज फार आवडला आणि गोळीबारामुळे तिला असा चेव आला की ती 'प' भोवती फेऱ्या मारायला लागली आणि भुंकायला लागली.

'त्योतका, जागेवर बस!' अनोळखी तिच्या अंगावर खेकसला - 'गप्प बैस!'

इवान इवानिचचं काम, बार उडवला आणि संपलं असं नव्हतं. नंतर चांगला एक तास त्यानं त्याला फटकारून आपल्या भोवती पळायला लावलं. बदकाला

काठीवरून उड्या माराव्या लागत होत्या. दोन पायांवर बसावं लागत होतं. म्हणजे शेपटीवर बसून पंजे हलवायला लागत होते. गोलातून उडी घ्यावी लागत होती. कशतानका इवान इवानिचच्या कसरती एकटक पाहत होती. आश्चर्यानं किंचाळत होती. भुंकत भुंकत त्याच्यामागून पळत होती. बदकाबरोबर मालक पण खूप दमला. त्यानं कपाळावरचा घाम पुसला नि ओरडला :

'मारिया, खवरोन्या इवानोवनाला इकडे बोलाव बघू!'

एका मिनिटात 'घुरघुर' असा आवाज आला. कशतानकापण गुरगुरली. तिनं चेहऱ्यावर बिनधास्तपणाचा आव आणला पण खबरदारीचा उपाय म्हणून मालकाच्या जवळ जाऊन उभी राहिली.

एवढ्यात दार उघडलं, एक म्हातारी खोलीत आली आणि काहीतरी बोलून तिनं एका काळ्या, कुरूप डुकराला आत सोडलं. कुत्र्याच्या ओरडण्याकडे त्यानं किंचितही लक्ष दिलं नाही, आपलं लांब तोंड वर केलं आणि 'घुरघुर' आवाज करायला सुरुवात केली. असं दिसलं की आपला मालक, मांजर, बदक या सर्वांच्या भेटण्याचा त्याला खूप आनंद झालाय. त्यानं मांजराच्या जवळ जाऊन तोंडानं त्याच्या पोटाला हलकासा धक्का दिला. नंतर तो बदकाशी काहीतरी बोलला. त्याच्या हालचालीत, आवाजात, आपली छोटीशी शेपटी हलवण्यात खूपच प्रेमळपणा जाणवत होता. कशतानकाला ताबडतोब कळून चुकलं की ह्या असल्या प्राण्यावर गुरगुरण्यात किंवा भुंकण्यात काहीच अर्थ नाही.

मालकानं 'प'ची कमान हलवली आणि ओरडला :

'फ्योदर तिमफिइच, ये बाबा इकडे!'

मांजर जागचं उठलं. त्यानं आळशासारखे पाय ताणले आणि अनिच्छेनं असलं तरी आज्ञेचं तंतोतंत पालन करण्यासाठी ते डुकराजवळ आलं.

'हं, मग काय, इजिप्तचा पिरॅमिड करायला सुरुवात करू या ना?' मालक म्हणाला.

त्यानं बराच वेळ त्या सर्वांना काहीतरी समजावून सांगितलं आणि मग आज्ञा केली :

'एक ... दोन ... तीन!'

तीन हा शब्द कानावर पडल्याबरोबर इवान इवानिचनं पंख फडफडवले आणि

डुकराच्या पाठीवर झेप घेतली... आपल्या पंखांनी आणि मानेने तोल सावरत बदक जेव्हा डुकराच्या राठ पाठीवर घट्ट रोवून बसलं, तेव्हा फ्योदर तिमफिइच रेंगाळत, रडतखडत, उघड उघड उपमर्द करीत, आपल्याला शाबासकीची पर्वा नाही अशी ऐट दाखवीत डुकराच्या पाठीवर उडी घेऊन अनिच्छेने बदकाच्या पाठीवर चढला आणि मागच्या चवड्यांवर उभा राहिला. मालक ज्याला 'इजिप्तचा पिरॅमिड' म्हणत होता तो खेळ यशस्वी झाला. गंमत वाटल्यामुळे कशतानका केकाटली, त्याचवेळी म्हाताऱ्या मांजरानं जांभई दिली त्यामुळे असमतोल झाला आणि ते बदकावरून खाली घसरलं. तोल न सावरता आल्यामुळे बदक कापायला लागलं आणि ते पण खाली घसरलं. मालक ओरडायला लागला. हातवारे करीत पुन्हा काहीतरी समजावयाचा प्रयत्न करू लागला. तब्बल एक तास पिरॅमिडमध्ये घालवूनसुद्धा मालक दमला नाही. त्यानं नंतर बदकाला मांजराच्या पाठीवर चालवलं, मग मांजराला सिगरेटचा झुरका घ्यायला शिकवलं. वगैरे वगैरे.

मालक कपाळावरचा घाम पुसत बाहेर निघून गेला तेव्हा शिकवणी संपली. मांजर चिडून, गुरगुरत चटईवर जाऊन डोळे मिटून झोपलं. बदक साल, चुरा पडला होता तिकडे गेलं आणि म्हातारी डुकराला घेऊन गेली. ढीगभर नवनवीन अनुभव घेत घेत कशतानकाला दिवस कसा संपला ते कळलंच नाही. संध्याकाळी तिची पण चटईसह त्या मळकट वॉलपेपरच्या खोलीत रवानगी झाली. तिथंच बदकाच्या आणि मांजराच्या सोबतीत तिनं रात्र घालवली.

५

करामत! करामत!

एक महिना उलटला. कशतानकाला हळूहळू मालकाने दिलेल्या चवदार जेवणाची आणि त्योतका ह्या आपल्या नावाची सवय झाली. त्या अनोळखी माणसाचा आणि आपल्या नवीन सहचऱ्यांचा लळा लागला.

प्रत्येक दिवसाची सुरुवात एकाच तऱ्हेनं व्हायची. बहुतेक वेळा बदक सगळ्यांच्या आधी जागं व्हायचं आणि लागलीच त्योतकाकडे नाहीतर मांजराजवळ यायचं, मान खाली करायचं आणि आर्त स्वरात काहीतरी अखंड

बडबडत बसायचं. त्यांची ओळख झाल्यानंतर कशतानकाला वाटायचं की हे बदक इतका वेळ बोलत असतं म्हणजे ते खूप बुद्धिमान असलं पाहिजे. पण त्याच्याविषयीचा हा आदर थोड्याच दिवसांत फोल ठरला. एक दिवस बदक भाषण देत देत तिच्याजवळ आलं तेव्हा कशतानकानं शेपटीसुद्धा हलवली नाही. उलट डोळ्याला डोळा लागू न देणाऱ्या एखाद्या रटाळ बडबड्याला जसं आपण पिटाळून लावतो ना अगदी तस्सं ती त्याच्याशी वागली, तरीदेखील कसल्याही प्रकारचा राग न दाखवता भाबडेपणानं त्यानं आपल्या भाषेत उत्तर दिलं: 'पक्-पक्-पक्-पक्!' ...

आमचा फ्योदर तिमफिइच म्हणजे एक वल्लीच होती. जाग आल्यावर तो कसलाही आवाज करायचा नाही, फडफड करायचा नाही. इतकंच काय, डोळेसुद्धा उघडायचा नाही. त्याची झोप कधी पूर्ण व्हायचीच नाही. असं वाटायचं की त्याला जगण्यात काही राम वाटत नसावा. त्याला कशातच रस नव्हता. प्रत्येक बाबतीत तो आळशीपणा, बेदरकारी दाखवायचा. सारखी खुसपटं काढायचा. इतकंच काय, चविष्ट पदार्थ खायला सुरुवात केल्याबरोबर चिडून गुरगुरायचा.

झोपून उठल्यावर कशतानका कोपरे हुंगत हुंगत सगळ्या खोल्यांतून चकरा मारायची. फक्त तिला आणि मांजराला घरभर हिंडायची मुभा होती. बदकाला मात्र त्याचे घाणेरडे पाय घेऊन खोल्यांचा उंबरठा ओलांडायची परवानगी नव्हती. आणि खवरोन्या इवानवनाला तर बाहेर कुठंतरी अंगणात गोठ्यात ठेवलं होतं. फक्त शिकवणीच्या वेळेलाच त्याचं दर्शन व्हायचं. मालक थोडा उशिराच उठायचा. त्याचा चहा पिऊन झाला की लागलीच कसरतींना सुरुवात करायचा. दररोज खोलीत 'पी'ची कमान, चाबूक, गोल कडं आणण्यात यायचं आणि प्रत्येक दिवशी त्यान् त्याच कसरती केल्या जायच्या. तीन चार तासच शिकवणी चालायची. ह्यापेक्षा जास्त वेळ झाला तर फ्योदर तिमफिइचच्या एखाद्या दारूड्यासारख्या झोकांड्या जायच्या. इवान इवानिच आपली चोच उघडून उसासे टाकायचा आणि मालक लालेलाल व्हायचा आणि आपल्या कपाळावरचा घाम पुसायचंही त्याला भान राहायचं नाही.

तालमी आणि जेवण ह्या दोन गोष्टींत दिवस कसा मजेत जायचा. संध्याकाळच्या वेळी मात्र कशतानकाला कंटाळा यायचा. त्यावेळी बहुतेकदा

मालक बदकाला आणि मांजराला घेऊन हिंडायला जायचा. एकटीच राहिलेली त्योतका तेवढी कंटाळत चटईवर लोळण घ्यायची. अंधार जसा खोली व्यापून टाकतो ना तसा कंटाळा नकळत, हळूहळू तिला ग्रासून टाकायचा. काय झालं होतं की, कशतानकाची भुंकण्यातली, खोलीभर धावण्यातली, निरीक्षण करण्यातली अचूकता, नैपुण्य हळूहळू कमी कमी व्हायला लागलं होतं. तिच्या स्वप्नात कुठल्यातरी दोन अस्पष्ट अशा आकृत्या यायच्या. ती कुत्रीही नसायची नि माणसंही नसायची. शारीरिकदृष्ट्या दोन्हीही आकर्षक आणि प्रेमळ पण अनाकलनीय अशी वाटायची. ती दिसली की त्योतका शेपटी हलवायची आणि तिला वाटायचं की ती आपल्याला कुठेतरी भेटली होती आणि आवडलीही होती. झोपेतच तिला नेहमी जाणवायचं की त्या आकृती जवळ आल्या की खळीचा, लाखेचा नाहीतर भुशाचा वास येतोय.

नव्या आयुष्याशी पूर्ण समरस झाल्यावर आणि हाडन्हाड दिसणाऱ्या, उपासमार झालेल्या त्या केसाळ कुत्रीचं खाऊन पिऊन मस्त पण चपळ अशा प्राण्यात रूपांतर झाल्यावर एक दिवस रियाज सुरू व्हायच्या आधी मालकाची नजर तिच्यावर पडली आणि तो म्हणाला :

'त्योतका, आता आपल्याला कामाला लागायची वेळ झालीय. आळशीपणा करणं पुष्कळ झालं तुझं. तुझ्यातून एक कलाकार निर्माण करायचाय मला ... मग व्हायचंय ना तुला एक कलाकार ?'

मग मालकांनी तिला वेगवेगळ्या कसरती शिकवायला सुरुवात केली. पहिला धडा होता, मागच्या पायावर उभं राहून चालायचं. तो तिला कमालीचा आवडला. दुसऱ्या कसरतीत तिनं आपल्या मागच्या पायावर उभं राहायचं आणि तिच्या शिक्षकानं उंच धरलेला खडीसाखरेचा खडा उडी मारून पकडायचा. पुढच्या कसरतीत तिनं नाच करून दाखवायचा. बारवरून धावायचं, गाण्याच्या सुरावर भुंकायचं. घंटा वाजवायची. बंदुकीतून बार उडवायचा. एका महिन्याच्या आत 'इजिप्शियन पिरॅमिड'मध्ये फ्योदर तिमफिइचच्या ऐवजी काम करायची तिची छानदार तयारी झाली. सगळ्या कसरती ती अचूकपणे करायला शिकली. आपल्या या प्रगतीवर ती पूर्ण समाधानी होती. बारवरून जीभ बाहेर काढून चालायचं, गोल कड्यामधून उडी मारायची. म्हाताऱ्या तिमफेइचच्या पाठीवर

चढून चालायचं. ह्या कसरतींचा सराव करताना तर तिला खूपच मजा वाटायची. प्रत्येक यशस्वी झालेल्या कसरतीबरोबर ती आनंदानं सुरेल आवाजात भुंकायची. त्याचं शिक्षकाला आश्चर्यच वाटायचं. तो हात चोळत म्हणायचा :

'काय सफाई आहे कामात! शाब्बास! दैवीच देणगी म्हणायची. तुझ्या कामात तू नक्कीच यशस्वी होणार!'

त्योतकाला 'तलान्त' ह्या मालकाच्या शब्दाची इतकी सवय झाली होती की ज्या ज्या वेळी मालक हा शब्द उच्चारायचा तेव्हा तेव्हा कशतानका उडी मारायची आणि चारी बाजूला वळून पाहायची. जसं काही ते तिचंच टोपणनाव होतं. मालकानं तिला दिलेलं!

६

अशांत रात्र

त्या दिवशी त्योतकाला, कुत्र्याला जशी स्वप्नं पडतात ना, तसं एक स्वप्न पडलं. चौकीदार हातात झाडू घेऊन तिचा पाठलाग करतोय आणि खूप भीती वाटून ती जागी झाली. खोलीत शांतता पसरली होती, अंधार होता आणि घुसमटल्यासारखं होत होतं. त्यातच माश्यापण चावत होत्या. त्योतकाला ह्या आधी काळोखाचं कधी भय वाटलं नव्हतं. पण आज का कोण जाणे भीतीनं तिची घाबरगुंडी उडाली आणि भुंकावंसं वाटायला लागलं तिला. शेजारच्या खोलीत मालक जोरजोरात घोरत होता. थोड्या वेळानं पडवीत डुकरानं खुरखुर केली आणि पुन्हा सगळं शांत झालं. खाण्याचा विचार जेव्हा जेव्हा तिच्या मनात येतो तेव्हा तेव्हा तिच्या मनावरचं दडपण एकदम कमी होतं. त्योतकाला आठवलं, आज त्यानं मांजराजवळची कोंबडीची तंगडी कशी शिताफीनं पळवली आणि बसायच्या खोलीत भिंत आणि शेल्फच्या मध्ये जळमटं आणि धुळीनं भरलेल्या जागेत ती कशी लपवून ठेवली ते. सगळीच्या सगळी तंगडी त्या जागेवर अजून तशीच आहेत की नाही हे पाहण्यात कुठलाच अडथळा नव्हता. कदाचित मालकाला ती सापडली असेल आणि त्यानं ती खाल्लीही असेल. पण उजाडण्यापूर्वी खोलीबाहेर जायची मनाई होती - कायदाच होता तो. त्योतकानं लवकर झोप लागावी म्हणून डोळे मिटून घेतले. कारण तिचा असा अनुभव होता की जितक्या लवकर

झोपशील तितक्या लवकर सकाळ होते. इतक्यात जवळून कुठूनतरी तिला एक विचित्र किंकाळी ऐकू आली. तिचा थरकाप झाला नुसता. आणि ती चार पायांवर उड्या मारायला लागली. इवान इवानिच ओरडला वाटतं. पण ते ओरडणं त्याच्या नेहमीच्या बडबडीतलं नव्हतं. अजीजी नव्हती त्यात. तर भयानक, कर्कश, कधीच न ऐकलेलं, फाटक उघडल्यावर येणाऱ्या करकरीसारखं होतं ते. अंधारात काही दिसत नव्हतं की समजत नव्हतं. त्यामुळे त्योतका अधिकच गर्भगळित झाली आणि बडबडायला लागली :

-ररर...

असाच थोडा वेळ गेला. चांगलंसं हाड चघळावंसं तिला कित्ती कित्ती वाटत होतं. तशी ती किंकाळी परत ऐकू आली नाही. त्योतका पण हळूहळू शांत झाली आणि डुलक्या घेऊ लागली. तिच्या स्वप्नात पोटाच्या दोन्ही बाजूला आणि पृष्ठभागावर मागच्या वर्षीच्या केसाचे पुंजके असलेली दोन मोठी काळी कुत्री आली. ती भांडी विसळलेल्या मोठ्या टबमधलं मातट पाणी पीत होती. अधाशीपणानं प्यायल्यामुळे त्या पाण्यातून बुडबुडे निघत होते. एक खुमासदार वास दरवळला होता. मधूनमधून ती त्योतकाकडे पाहत होती. दात विचकत होती. आणि कुत्र्यांच्या भाषेत बडबडत होती. ' आम्ही तुला नाही देणार ' इतक्यात घरातून कोट घातलेला एक नोकर आला आणि त्यानं चाबकाचे फटके देऊन त्यांना हाकलून लावलं. मग काय त्योतका ते पाणी प्यायला लागली. नोकर दरवाज्याआड गेला मात्र ती दोन्ही काळी कुत्री किंचाळत तिच्या अंगावर धावून आली. परत एकदा केकाटण्याचा आवाज आला :

' क-रे ! क-रे-रे ! ' इवान इवानिच ओरडला.

त्योतका जागी झाली. तिनं चटईवरच जागच्या जागी उडी मारली आणि तिनं मोठमोठ्यानं भुंकायला सुरुवात केली. तिला वाटायला लागलं इवान इवानिच नाही ओरडला, दुसराच बाहेरचा कुणीतरी ओरडला बहुतेक. का कोण जाणे, डुकराने पण परत खुर्र खुर्र केली.

एवढ्यात चपला घासल्याचा आवाज आला. कोट चढवून आणि हातात मेणबत्ती धरून मालक खोलीत शिरला. प्रकाशाचे कवडसे वॉलपेपर आणि छतावर उड्या मारत होते आणि अंधार नाहीसा करीत होते. त्योतकानं पाहिलं की

खोलीत आणखी कोणी नाहीये. इवान इवानिच जमिनीवर बसला होता. जागाच होता तो. त्याचे पंख विस्कटलेले होते आणि चोच उघडलेली होती. एकंदरीत त्याच्याकडे पाहिल्यावर असं वाटत होतं की तो खूप दमलाय, तहानेनं व्याकुळ झालाय. म्हातारा फ्योदर तिमफिइच पण झोपला नव्हता. बहुतेक त्या किंकाळीनं त्याला जागं केलं असावं.

'इवान इवानिच, काय झालं तुला?' मालकानं बदकाला विचारलं, 'का आरडाओरडा करतोयस एवढा? बरं नाही का तुला?' बदक गप्पच बसलं. मालकाने त्याची मान चुचकारली, पाठ थोपटली आणि म्हणाला,

'चावट आहेस तू अगदी. स्वत: झोपत नाहीस आणि दुसऱ्यांना पण झोपू देत नाहीस.'

मालक खोलीबाहेर गेला. त्याच्याबरोबर प्रकाश पण गेला. पुन्हा अंधार झाला. त्योतकाला पुन्हा भय वाटायला लागलं. बदक आता ओरडत नव्हतं. पण अंधारात कोणीतरी परकं उभं आहे असं वाटत होतं, भास होत होता. भयानक गोष्ट म्हणजे ह्या अज्ञात व्यक्तीला त्योतका चावू शकत नव्हती. कारण ती स्पष्ट दिसत नव्हती आणि तिला कसला आकार नव्हता. का कोण जाणे त्योतकाला वाटत होतं की आजच्या रात्री नक्कीच काहीतरी वाईट घडणार आहे. फ्योदर तिमफिइच पण बेचैन झाला होता. त्योतकाला ऐकू येत होतं की तो आपल्या चटईवर कशी वळवळ करतोय, जांभया देतोय आणि डोकं हलवतोय ते.

कुठेतरी रस्त्यावरच्या फाटकावर कुणीतरी टकटक करत होतं आणि बाहेर पडवीत डुक्कर खुरखुरत होतं. त्योतका किंचाळली, तिने आपले पुढचे पाय ताणले आणि त्याच्यावर आपलं डोकं टेकलं. दरवाज्याची टकटक, कशामुळे तरी झोप न आलेल्या डुकराची खुरखुर, अंधार आणि नि:स्तब्धता ह्या सगळ्या गोष्टींमुळे तिला काहीतरी अद्भुत असं वाटलं. इवान इवानिच किंचाळला तेव्हा मघाशी जसा मनस्ताप आणि भय वाटलं होतं ना, तसंच तिला आत्तापण वाटत होतं. सगळीकडे दु:ख आणि अशांततेचं सावट आलं होतं. पण कशामुळे असं होत होतं? कोण हा परका प्राणी जो दिसू शकत नव्हता. इतक्यात त्योतकाच्या अगदी जवळ दोन हिरव्या रंगाची स्फुल्लिंगं अस्पष्टशी चमकली. ओळख झाल्यापासून आज प्रथमच फ्योदर तिमफिइच तिच्याकडे आला होता. त्योतकाने त्याचा पाय

चाटला आणि तो कशाला आला आहे वगैरे काही विचारपूस न करता ती हळूहळू तऱ्हेतऱ्हेचे आवाज काढत भुंकू लागली.

'क-रे!' इवान इवानिच ओरडला - 'क-रे!' परत दार उघडलं. मालक मेणबत्ती घेऊन आत आला. बदक आपल्या पहिल्याच पोझमध्ये, चोच उघडून आणि पंख पिंजारून बसला होता. त्याचे डोळे मिटलेले होते.

'इवान इवानिच' मालकानं हाक मारली. बदकानं काहीच उत्तर दिलं नाही आणि हालचाल पण केली नाही. मालक त्याच्याजवळ जमिनीवर बसला. एक मिनिट त्याच्याकडे पाहिलं त्यानं आणि म्हणाला :

'इवान इवानिच, काय रे असं झालंय तुला, मरतोयस की काय तू! अरे बापरे, आत्ता मला आठवलं, आठवलं हं!' तो ओरडला आणि डोकं धरून बसला - 'मला माहीत आहे कशामुळे हे असं झालं! आज सकाळी तुझ्यावर त्या घोड्यानं हल्ला केला ना? अरे ऽ देवा! देवा रे देवा!'

त्योतकाला मालक काय बोलत होता त्यातलं काऽही कळलं नाही. पण त्याच्या चेहऱ्यावरून काहीतरी भयंकर घडणार आहे हे स्पष्ट दिसत होतं. त्योतकानं अंधाऱ्या खिडकीकडे डोकं लांब केलं. त्याला वाटत होतं की त्याच खिडकीपलीकडून कुणीतरी विक्षिप्त प्राणी आत पाहतोय. तो भुंकायला लागला.

'त्योतका, तो मरतोय' मालक हताशपणे हात हलवत म्हणाला, 'हो, हो, मरतोय तो! तुमच्या खोलीत मृत्यू येऊन ठेपलाय. त्याच्यापुढे आपलं काऽही चालत नाही.'

उदासवाणा, पांढराफटक पडलेला मालक उसासे टाकत, डोके हलवत आपल्या झोपायच्या खोलीत निघून गेला. अंधारात एकट्याला थांबायची त्योतकाला भीती वाटली आणि ती पण मालकापाठोपाठ गेली. मालक पलंगावर बसून कितीतरी वेळा म्हणाला असेल :

'हे देवा! मला करण्यासारखं काहीच उरलं नाही!'

त्योतका मालकाच्या पायाजवळ फेऱ्या मारीत होती. तिला कळत नव्हतं की आपला एवढा गळाठा का झालाय. भोवतालच्या सगळ्याच गोष्टी आपल्याला इतक्या बेचैन का करताहेत ह्याचा उलगडा व्हावा म्हणून ती मालकाच्या प्रत्येक हालचालीचा मागोवा घेत होती. कधीतरीच आपली चटई सोडणारा फ्योदर

तिमफिइच सुद्धा झोपायच्या खोलीत येऊन मालकाच्या पायाजवळ अंग खाजवत बसला होता. तो सारखा डोकं हलवत होता. जणू मनाला विषण्ण करणारे विचार डोक्यातून बाहेर काढून टाकायच्या प्रयत्नात होता तो. शंकेखोरासारखं मधूनमधून पलंगाखाली डोकावून पाहत होता.

मालकानं एका बशीत पिंपातलं पाणी घातलं आणि तो परत बदकाजवळ गेला.

'पी, इवान इवानिच!' त्याच्यापुढे बशी ठेवत मालक हळुवारपणे म्हणाला, 'पी पाणी माझ्या लाडक्या!'

पण इवान इवानिचनं जराही हालचाल केली नाही की डोळे उघडले नाही. मालकानं त्याचं डोकं बशीजवळ आणलं आणि चोच पाण्यात बुडवली. पण बदक काही पाणी प्यायलं नाही. उलट त्याने आपले पंख अधिकच पिंजारले आणि डोकं मात्र बशीत तसंच पडून राह्यलं.

'नाही, सगळं संपलंय आता!' मालकानं उसासा टाकला. 'सगळे उपाय संपलेयत. इवान इवानिच गेला आपल्याला सोडून!'

त्याच्या गालावर तरळणारे थेंब खाली ओघळले, पाऊस पडताना खिडकीच्या तावदानावर पडतात ना तसे. काय झालंय ते कळलं नव्हतं तरी त्योतका आणि फ्योदर तिमफिइच मालकाला चिकटून बसले आणि दु:खित अंत:करणानं बदकाकडे पाहत राहिले.

'बिच्चारा इवान इवानिच!' मालक दु:खानं म्हणाला. 'मी तर स्वप्नं पाहत होतो की वसंतऋतूत तुला गावाला घेऊन जाईन आणि तुझ्याबरोबर हिरव्या गवतावर फेरफटका मारीन. किती प्रेमळ प्राणी तू, माझा जानी दोस्त, पण आता तू राहिला नाहीस! तुझ्याशिवाय मी आता कसा इकडे तिकडे हिंडणार?'

त्योतकाला वाटायला लागलं की तिलापण तसंच काहीतरी व्हायला लागलंय. म्हणजे असं पहा की का ते माहीत नाही. पण तिलापण डोळे मिटून घ्यावेसे वाटताहेत. पाय लांब करावेसे आणि तोंडाचा 'आँ' वासावासा वाटतोय. मग सगळेजण भयानक चेहरे करून तिच्याकडे पाहतील. असं दिसत होतं की, फ्योदर तिमफिइचच्या मनात पण तसेच विचार घोळत असावेत. ह्या आधी ते म्हातारं मांजर इतकं शोकाकुल आणि उदास कधीच दिसलं नव्हतं.

सूर्योदय व्हायला लागला. खोलीत त्योतकाला घाबरवून सोडणारा, न दिसणारा तो अद्भुत प्राणी नाहीसा झाला होता आता. पूर्ण उजाडल्यावर चौकीदार आला, त्यानं बदकाला तंगड्या धरून उचललं आणि तो त्याला कुठेतरी घेऊन गेला.

थोड्या वेळानं त्योतका बैठकीत आली आणि तिनं शेल्फाच्या पाठीमागे चाचपडून पाहिलं.

मालकानं कोंबडीची तंगडी खाल्ली नव्हती. ती तिथेच धुळीत आणि जळमटात पडलेली होती. तरीदेखील त्योतकाला अगदी कंटाळवाणं, उदास वाटत होतं आणि रडावंसंही वाटत होतं. तिनं ती तंगडी हुंगली देखील नाही. ती दिवाणाच्या खाली शिरली आणि अगदी हळू बारक्या आवाजात ' स्कू-स्कू-स्कू ' करत बसली.

७

अयशस्वी पदार्पण

एका सुंदर संध्याकाळी मालक आपल्या माती लागलेल्या पायतणांनी खोलीत आला आणि हात चोळत म्हणाला,

' त्याचं - काय - आहे ... '

त्याला आणखी काहीतरी बोलायचं होतं पण काहीच न बोलता तो खोलीतून निघून गेला. सरावाच्या काळात मालकाचे चेहऱ्यावरचे भाव, आवाजातला चढउतार हे त्योतकाला चांगलेच समजायला लागले होते. त्यामुळे तिला कळून चुकलं की मालक बेचैन आहे, काळजीत आहे आणि आता तो रागावण्याची चिन्हं दिसताहेत. थोड्या वेळानं मालक परत आत आला आणि म्हणाला :

' आज मी माझ्याबरोबर त्योतका आणि फ्योदर तिमफिइचला नेणार आहे. ' इजिप्शियन पिरॅमिड ' च्या खेळात त्योतका, आज तू इवान इवानिचच्या जागी काम करणार आहेस. काय होणार आहे ते देवालाच माहीत ! काही तयारी नाही, खेळ शिकवून पूर्ण झाला नाहीये आणि सराव तर नाहीच्या बरोबर आहे ! पूर्ण नाचक्की होणार आहे, तीन तेरा वाजणार !'

त्यानंतर मालक बाहेर गेला आणि एका मिनिटात ओव्हरकोट आणि टॉप हॅट घालून परत आला. मांजराजवळ जाऊन त्याने त्याचे पुढचे दोन पाय धरून त्याला उचललं आणि कोटामध्ये पोटाशी लपवलं. त्यावेळी फ्योदर तिमफिइच निर्विकार दिसत होता, त्याने साधे डोळेसुद्धा उघडले नाही. असं दिसत होतं की त्याच्या दृष्टीनं त्याला कशातच रस नाहीये. झोपणं, पायावर उभं राहणं, चटईवर लोळणं नाहीतर मालकाच्या कोटात दडून बसणं, सर्व काही सारखंच होतं.

'त्योतका, चल, जाऊ या' मालक म्हणाला.

काहीही कळलं नाही तरी त्योतका उठली आणि शेपटी हलवत मालकाच्या पाठीमागे चालू लागली. एक मिनिटाच्या आत ती बर्फावरून घसरणाऱ्या गाडीत मालकाच्या पायाशी बसली होती. मालक थंडीत कुडकुडत, विचलित मन:स्थितीत बडबडत होता,

'नाचक्की! अपयश!'

ती गाडी गडगडत खाली येऊन जमिनीवर उलट्या पडलेल्या स्पुटनिकासारख्या दिसणाऱ्या अवाढव्य, चित्रविचित्र घरासमोर थांबली. तीन काचेचे दरवाजे असलेला लांबच लांब प्रवेशमार्ग होता त्याचा. त्याच्यावर डझनभर झगमगीत दिवे प्रकाशत होते. घंटा घणघणली की तोंड वासल्याप्रमाणे ती तिन्ही दारं उघडायची आणि नव्याने जमलेल्या लोकांच्या लोंढ्याला जणू गिळंकृत करायची. खूप माणसं होती. मधून मधून प्रवेशद्वाराजवळून घोडे जायचे पण कुत्रं मात्र औषधालासुद्धा नव्हतं.

मालकानं त्योतकाला हातात घेतलं आणि कोटाखाली पोटाजवळ लपवलं. फ्योदर तिमफिइच होताच तिथे. कोटाच्या आत अंधार होता. घुसमटल्यासारखं होत होतं पण ऊब मात्र होती. क्षणात दोन अंधुक हिरव्या ठिणग्या उडाल्या. मांजराने डोळे उघडले होते आपले. शेजाऱ्याच्या थंडगार, कडकडीत तंगड्यांमुळे तो बेचैन झाला होता. त्योतकानं त्याचा कान चाटला आणि त्याला आराम मिळावा म्हणून जोरदार हालचाल सुरू केली. आपल्या थंडगार तंगड्यांखाली त्याला कोंबू लागली. हे सगळं करता करता न कळत तिचं डोकं कोटाच्या बाहेर आलं पण लगेच ती मागं फिरली आणि कोटात जाऊन बसली. तिच्या लक्षात आलं की तिनं जेव्हा बाहेर डोकं काढलं होतं तेव्हा तिला एक मोठ्ठी मंद मंद प्रकाश

असलेली अगदी अद्भुत खोली दिसली. दोन्ही बाजूला पसरलेल्या पार्टीशन आणि जाळ्यांच्यामधून भयानक, अक्राळविक्राळ प्राणी डोकावत होते. त्यातले काही घोड्यासारखे, काही शिंगवाले, लांब कान असलेले होते. एकतर भला मोठा, धिप्पाड प्राणी होता. त्याला नाकाच्या जागी सोंड होती आणि तोंडातून दोन लांबच लांब गुळगुळीत सुळे लोंबत होते.

मांजर त्योतकाच्या पायाखाली घोगऱ्या आवाजात म्यॉव म्यॉव करत होतं. त्याचवेळी फरकोट उघडला आणि मालकाने 'गॉप' म्हटल्याबरोबर तिमफिइचनं त्योतकाबरोबर जमिनीवर उडी घेतली. ते करड्या रंगाच्या लाकडी भिंती असलेल्या छोट्या खोलीत पोहोचले होते. तिथे आरसा बसवलेलं छोटं टेबल, स्टूल आणि कोपऱ्याकोपऱ्यांतून झटकणी टांगलेली होती. दुसरं काही फर्निचर नव्हतं तिथे. दिवे किंवा मेणबत्यांऐवजी पंख्यासारखी दिसणारी नळीमध्ये बसवलेली, भिंतीला ठोकलेली प्रकाशमान ज्योत जळत होती. फ्योदर तिमफिइचनं त्योतकानं चुरगळलेला आपला फरकोट चाटून चाटून नीट केला आणि ते स्टुलाखाली जाऊन लोळलं. मालक मनाची घालमेल झाल्यामुळे बेचैन होऊन हात चोळत होता. मग तो आपले कपडे उतरवू लागला. झोपेच्या वेळी ब्लँकेटमध्ये शिरताना जसे चड्डीखेरीज सगळे कपडे काढायचा ना तो, तसंच त्यानं इथंही केलं. तो स्टुलावर बसला आणि आरशात पाहत पाहत त्याने आपले सर्वांग वेगवेगळ्या गोष्टींनी रंगवायला सुरुवात केली. प्रथम त्याने भांग असलेला आणि शिंगासारख्या दिसणाऱ्या दोन बटा असलेला केसांचा टोप घातला. मग कुठल्यातरी पांढऱ्या द्रवाचा दाट लेप चेहऱ्यावर दिला आणि ह्या पांढऱ्या रंगावर भुवया, मिशा, कल्ले रंगवले, लाली लावली. त्याचं नटणं एवढ्यानं संपलं नाही. तोंड, मान बरबटल्यावर त्यानं कोणत्याही कपड्याशी साम्य नसलेल्या विचित्र कपड्यात स्वत:ला घुसवलं. हे असले कपडे त्योतकानं घरी, दारी कुठेही पाहिले नव्हते. कल्पना करा, बटबटीत फुलं असलेली ढगळच ढगळ सुती विजार. अशी कापडं सहसा कंजूष सनातनी लोकांकडे पडद्यासाठी किंवा फर्निचरच्या खोळींसाठी वापरली जायची. खाकेपासून पावलापर्यंत बटणं लावलेली पाटलोण. एक बाही चॉकलेटी रंगाची तर दुसरी पिवळ्याधमक रंगाची. तसल्या कपड्यात बुडून गेलेल्या मालकाने वरून आणखी एक मोठ्या वेलबुट्टीची कॉलर असलेलं,

पाठीवर सोनेरी चांदणी भरलेलं सुती जाकीट घातलं होतं. तऱ्हेतऱ्हेची फुलं असलेले लांब मोजे आणि हिरवे बूट घातले होते.

त्या व्यक्तीकडे पाहिल्यावर त्योतकाचे डोळे दिपले आणि आश्चर्याचा धक्काच बसला. पांढऱ्या तोंडाच्या, ढगळ कपड्यातल्या त्या आकृतीला माणसाचा वास येत होता. त्याचा आवाज पण ओळखीचा, मालकासारखा वाटत होता. पण एक, दोन मिनिटं गेली असतील, तिला संशयानं घेरलं आणि ती त्या रंगलेल्या आकृतीपासून दूर पळून तिच्यावर भुंकायच्या तयारीत होती. नवीन जागा, पंख्यासारखे दिसणारे दिवे, दरवळणारा वास, मालकाचा झालेला कायापालट ह्या सर्व गोष्टींमुळे एका जबरदस्त भीतीने तिला ग्रासलं होतं. आणि नक्कीच तिच्यावर कोसळणाऱ्या कोणत्यातरी संकटाची चाहूल लागली होती तिला. म्हणजे उदाहरणार्थ - त्या गलेलठ्ठ, नाकाच्याऐवजी सोंड असलेल्या प्राण्याच्या आक्रमणाची, भिंतीपलीकडून येणाऱ्या कर्कश संगीताच्या आवाजाची आणि मधूनमधून कानावर पडणाऱ्या अनोळखी डरकाळ्यांची. तिला सतावणारी आणखीन एक गोष्ट म्हणजे फ्योदर तिमफिइचची स्थितप्रज्ञता. तो नेहमीसारखाच स्टुलाखाली डुलक्या घेत होता आणि स्टुल डगमगलं तरीदेखील डोळे उघडण्याची तसदी घेत नव्हता.

लांब कोट आणि पांढरं जाकीट घातलेला एक मनुष्य खोलीत डोकावून म्हणाला,

'आता मिस आरावेलाचा प्रवेश आहे आणि त्यानंतर तुमचा नंबर हं.'

मालकानं काहीच उत्तर दिलं नाही. त्यानं टेबलाखालची छोटीशी पेटी बाहेर काढून त्याच्यावर बसून तो वाट पाहू लागला. ओठांच्या आणि हातांच्या हालचालींवरून त्याची बेचैनी कळत होती. त्योतकाला त्याचा भरभर होणारा श्वासोच्छ्वास पण ऐकू येत होता.

'मिस्टर जॉर्ज, कृपया बाहेर या!' दाराच्या पलीकडून कोणीतरी ओरडलं.

मालकानं उभं राहून तीनदा हाताचा क्रॉस करून प्रार्थना केली. स्टुलाखालून मांजराला पकडलं आणि पेटीत घातलं.

'त्योतका, ये इकडे!' तो हळू आवाजात म्हणाला.

काही न समजता त्योतका त्याच्या हाताजवळ गेली. मालकानं तिच्या डोक्याचं

चुंबन घेतलं. आणि तिलापण फ्योदर तिमफिइच जवळ पेटीत ठेवलं. मग सगळीकडे अंधारच अंधार झाला ... त्योतका मांजराला लाथा मारायला लागली. पेटीच्या पत्र्यांना ओरखडायला लागली. घाबरगुंडी उडाल्यामुळे तिच्या तोंडातून एक शब्द फुटत नव्हता. लाटेवरून जाताना जसं हिंदकळायला होतं ना, तशी ती पेटी हिंदकळत होती ...

'हं, ह्या इथं!' मालक मोठ्यांदा ओरडला. 'ही इथं माझी जागा आहे!'

त्योतकाला असं जाणवलं की मालकाच्या त्या ओरडण्यानंतर पेटी कसल्यातरी टणक वस्तूवर आपटली आणि हिंदकळायची थांबली. एक मोठ्या आवाजातली लांबच लांब डरकाळी ऐकू आली. कुणीतरी कोणाला तरी शाबासकी देत असावं. आणि हा कुणीतरी म्हणजे नक्कीच ते नाकाच्या जागी सोंड असलेलं जनावर असावं. ते इतक्या जोरानं डरकाळलं आणि हासलं की पेटीची कुलुपं कापायला लागली. त्या डरकाळीला उत्तर म्हणून मालकाचं कर्कश, खो, खो, खो हसणं कानावर आपटलं. घरी आजपर्यंत अशा तऱ्हेनं तो कधीच हसला नव्हता.

'हाऽऽ!' डरकाळीला प्रतिसाद देण्यासाठी तो ओरडला - 'आदरणीय प्रेक्षक हो! मी हा सरळ स्टेशनवरून इथं आलोय! माझी आजी स्वर्गवासी झाली आणि तिनं माझ्या नावानं ही पेटी ठेवलीय. ह्या पेटीत खूप जड असं काहीतरी आहे - उघडच आहे, सोनंच असणार त्यात ... हॅं, हॅं, हॅं ... ह्या पेटीतून लाखो रुपयांचा माल बाहेर येणार! आत्ताच आपण उघडू या ही पेटी आणि बघू या ... हातच्या कंकणाला आरसा कशाला? ...'

पेटीचं कुलुप खटखटलं. लखलखीत प्रकाश त्योतकाच्या डोळ्यांवर पडला, तिनं पेटीतून बाहेर उडी घेतली. ती दबक्या आवाजात गुरगुरली. लुटूलुटू करीत शक्य तितक्या भराभरा ती आपल्या मालकाभोवती फेऱ्या मारू लागली आणि किरकिऱ्या आवाजात भुंकू लागली.

'हँ, हँ, हँ!' मालक ओरडला. 'आजोबा फ्योदर तिमफिइच आणि प्रिय आत्या, माझे प्रेमळ नातलग तुम्ही! चोर तुम्हाला घेऊन गेला असता तर बरं झालं असतं! मालक खालच्या रेतीवर पोटावर पालथा पडला, मांजराला आणि कुत्रीला पकडलं आणि कवटाळू लागला. मालकाच्या मिठीत असतानाच त्योतकानं नशिबानं तिला आणून पोहोचवलेल्या त्या जागेचं ओझरतं दर्शन घेतलं. तिच्या

भव्यतेनं त्योतका स्तंभित झाली. आश्चर्य आणि आनंद अशा संमिश्र भावनेनं ती थिजून गेली. मालकाच्या विळख्यातून स्वत:ला सोडवून घेऊन अनुभूतीची तीव्र प्रतिक्रिया म्हणून की काय, ती लांडग्यासारखी जागच्या जागी गरगर फिरू लागली. काय मजा, जिकडे पाहशील तिकडे सगळीकडे, जमिनीपासून छतापर्यंत फक्त माणसं आणि माणसंच दिसत होती. दुसरं काऽऽही नाही.

'त्योतका, कृपा करून खाली बैस!' मालक रागावला.

मालकाच्या अशा ओरडण्याचा अर्थ काय हे माहीत असल्यामुळे त्योतकानं स्टुलावर उडी मारली आणि चुपचाप बसली तिथे. तिनं मालकाकडे पाहिलं. त्याचे डोळे नेहमीसारखेच गंभीर पण प्रेमळ दिसत होते पण त्याचा चेहरा आणि हात अक्राळविक्राळ अशा हसण्यानं विद्रूप दिसत होते. तो सात मजली हसत होता. वेड्यावाकड्या उड्या मारत होता. खांदे उडवत होता आणि असा आव आणत होता की हजारोंच्या उपस्थितीत त्याला आनंदाच्या उकळ्या फुटताहेत. त्योतकानं त्याच्या आनंदावर विश्वास ठेवला. एवढ्यात तिच्या सर्व शरीरातून अशी संवेदना जाणवली की ही सर्व हजारो माणसं तिच्याकडे निरखून पाहताहेत. तिनं आपला केसाळ मुखडा वर केला आणि आनंदानं भुंकायला सुरुवात केली.

'त्योतका, गप्प बैस बरं.' मालक म्हणाला. 'मी आणि आजोबा 'कमारीन' लोकनृत्य सादर करणार आहोत.'

फ्योदर तिमफिइच, जेव्हा त्याला विदूषकीपणा करायला भाग पाडलं जाई तेव्हा स्तब्ध उभा राहायचा आणि निर्विकारपणे चोहीकडे पाहायचा. तो आळसुड्यासारखा, निष्काळजीपणाने चिडून नाचत होता. त्याच्या हालचालीवरून, उंडारलेल्या शेपटीवरून, उभ्या केलेल्या कानावरून स्पष्ट दिसत होतं की तो प्रेक्षकांचा, प्रकाश झोताचा, मालकाचा इतकंच नाही तर स्वत:चा पण तिरस्कार करत होता. आपला ठराविक नाच पूर्ण झाल्यावर त्याने जांभई दिली आणि तो आपल्या जागेवर जाऊन बसला.

'हं, चला आता आत्याबाई,' मालक म्हणाला. 'आपण प्रथम गाऊ या आणि मग नाच करून दाखवू या, ठीक आहे?'

त्यानं खिशातनं फ्ल्यूट काढला आणि तो फ्ल्यूट वाजवायला लागला. संगीताचा आवाज सहन न झाल्यामुळे त्योतका हवालदिल झाली आणि

स्टुलावरच भुंकत भुंकत फिरू लागली. सगळ्या बाजूंनी आरडाओरडा आणि टाळ्यांचा कडकडाट ऐकू आला. मालकानं सगळ्यांना खाली वाकून अभिवादन केलं. सगळीकडे शांत झाल्यावर तो पुन्हा फ्ल्यूट वाजवू लागला ... बासरीचा आवाज टिपेला पोहोचला असतानाच वरच्या गॅलरीमधल्या सर्वांत उंच जागेवरल्या प्रेक्षकांमधून कोणीतरी मोठ्यांदा ओरडलं.

'बाबा!' लहान मालक ओरडला. 'अहो, ही आपली कशतानका तर नाही?'

'हो, अरे कशतानकाच आहे ती' एका दारूड्यानं हलक्या, किरकिऱ्या आवाजात पुष्टी दिली. 'फ्योदुष्का, ही कशतानकाच! देवानं तिला चांगली शिक्षा केली.'

गॅलरीमधून कुणीतरी शिट्ट्या मारत होतं. मग दोन आवाज आले. एक आवाज लहान मुलाचा होता. दुसरा पुरुषाचा. मोठ्यानं हाका मारत होते ते.

'कशतानका! कशतानका!'

त्योतका कापायला लागली आणि आरडाओरडा ऐकू येत होता, तिकडे पाहायला लागली. दोन चेहरे दिसले. एक केस पिंजारलेल्या दारू प्यायलेल्याचा, वेडपटासारखा हसणाऱ्याचा. दुसरा चेहरा गुबगुबीत लाल गालाच्या पण भ्यायलेल्या मुलाचा. पूर्वी एकदा झगझगीत प्रकाशानं जसं तिला दिपवलं होतं तसे ते दोन चेहरे जणू तिच्या डोळ्यांत घुसले ... तिला सर्व आठवलं. ती स्टुलावरून उडी मारून खाली आली पण खालच्या रेतीत फसली. मग मुसंडी मारून, आनंदानं चेकाळत तिनं त्या चेहऱ्याच्या दिशेनं धाव घेतली. शिट्ट्यांच्या आणि टाळ्यांच्या आवाजाला भेदून त्या लहान मुलाची कर्णकटू किंकाळी तिच्या कानावर पडली.

'कशतानका! कशतानका!'

त्योतकानं बॅरीअरमधून उडी घेतली आणि ती कोणाच्या तरी खांद्यावरून बॉक्समधल्या सोफ्यावर येऊन पडली. दुसऱ्या टप्प्यावर पोहोचण्यासाठी एक उंच भिंत ओलांडायला हवी होती. त्योतकाने उडी मारली पण तिची उडी वरपर्यंत न पोहोचल्यामुळे ती भिंतीवरून घसरत खाली आली. मग एका हातावरून दुसऱ्या

हातावर, कोणाचा तरी हात, कोणाचं तरी तोंड चाटत चाटत वर वर चढत गेली. आणि अखेरीस गॅलरीच्या वरच्या टप्प्यावर आली ...

अर्ध्या तासाच्या आत कशतानका माणसांच्या एक घोळक्या पाठोपाठ, खळीचा आणि लाखेचा मागोवा घेत घेत रस्त्यावर पोहोचली देखील! लुका अलेकसांद्रिच थरथर कापत, हेलकांडत, पण सवय आणि पूर्वानुभवाच्या जोरावर गटारं चुकवत चुकवत पुढे जात होता.

तो बडबडला 'पण तू मात्र कशतानका,... मिस्त्री सुतारापेक्षा जसा श्रेष्ठ असतो तशी तू नाही म्हटलं तरी माणसापेक्षा श्रेष्ठ आहेस.'

बापाच्या बरोबर त्याचेच, ढगळ होणारे कपडे घातलेला फ्येदुष्का चालला होता. कशतानका त्या दोघांना पाठमोरं पाहत होती. तिला असं वाटत होतं की ह्या दोघांच्या पाठीमागून ती खूप पूर्वीपासून असंच चालत आली आहे आणि तिला खूप आनंद झाला होता की तिच्या जीवनात मिनिटाचाही खंड पडला नाहीये.

तिला तिच्या खोलीतल्या मळकट वॉलपेपरची, बदकाची फ्योदर तिमफिइचची, चविष्ट जेवणाची, त्या शिकवणीची, सर्कशीची सगळ्या सगळ्याची आठवण येत होती. पण आज ह्या सर्व गोष्टी तिच्या दृष्टीनं एक लांबच लांब, भिववणारं दु:खद स्वप्नच होतं ....

❋

टीपा

सेंट आन्नाचे पदक

* आन्नाचे पदक (पान १९) : 'पवित्र' आन्नाच्या नावाचे दुसऱ्या दर्जाचे गौरव पदक. हे पदक इ.स. १७३५ साली स्थापण्यात आलेल्या चार दर्जांपैकी दुसऱ्या क्रमांकाचं पदक होतं. हे पदक एका रिबीनमध्ये बांधून गळ्यात अडकवण्यात येत असे.

कोषात गुरफटलेला

* जिम्नाझिया (पान ६१) : रशियन झारच्या काळात सरदार, जमीनदारासारख्या उच्चभ्रू नागरिकांच्या पाल्यांसाठी शास्त्रीय शिक्षण देणाऱ्या शासकीय शाळा. तिथे ग्रीक, लॅटिन सारख्या प्राचीन भाषा शिकवल्या जात.
* आंत्रोपोस (पान ६३) : म्हणजे प्राचीन माणूस (ग्रीक शब्द).
* अप्रोदिता (पान ६६) : ग्रीक वाङ्मयातील प्रेमदेवता
* मिनचिक (पान ६८) : रशियन भाषेत विशेषनामाचे लडिवाळपणे केलेले संक्षिप्त रूप वापरण्याचा प्रघात आहे. मिनचिक हे मिखाईलचे संक्षिप्त रूप.

दुशेच्का

* दुशेच्का (पान १०४) : दुशेन्काचे संक्षिप्त रूप.

अन्तोन पावलविच चेखव

(१८६० - १९०४)

जीवनरेखा

‘चेखव हा रशियन गद्य वाङ्मयाचा पुष्किन होय.’ — ल्येव तलस्तोय

‘नजीकच्या भविष्यकाळात चेखवची लेखनशैली ही कलात्मक साहित्याचा उत्कृष्ट नमुना म्हणून गणली जाईल.’ — जॉन प्रिस्टले

‘संपूर्ण व्यक्तिरेखा चित्रित करण्यासाठी चेखवला फक्त एक शब्दच पुरा पडत असे तर त्याच्या एकाच वाक्यात गोष्टीचं संपूर्ण कथानक सामावलं जात असे.’

— माक्सिम गोर्की

वरीलप्रमाणे अनेक बिरुदावलीत मानाचे स्थान मिळालेला जगविख्यात रशियन लेखक अन्तोन पावलविच चेखव याचा जन्म १७ जानेवारी १८६० साली रशियातील तगनरोग या गावी झाला. त्याचा परिवार म्हणजे आई, वडील, चार भाऊ आणि एक बहीण. ही सर्व भावंडे उच्चशिक्षित आणि बुद्धिजीवी होती. वडील भाऊ अलेकसांदर लेखक होता; निकलाय कलावंत, मिखाईल भाषातज्ज्ञ, ईवान शिक्षक तर बहीण मारिया कलानिपुण होती. त्याच्या वडिलांचे किराणा मालाचे दुकान होते. सर्व भावंडांना वडिलांना धंद्यात हातभार लावावा लागत असे. त्यांचे वडील कलाप्रेमी होते. ते चित्रकार होते आणि संगीताची त्यांना आवड व जाण होती. गावातील चर्चमधील समूहगानाचे ते आयोजन करीत. चेखव आणि त्याच्या भावंडांचा या गायनात नेहमीच सहभाग असे. तरीपण त्याचे वडील स्वभावाने अतिशय कडक होते. बायकोमुलांशी त्यांचे वागणे अरेरावीचे आणि दंडुकेशाहीचेच होते. आई मात्र सालस, प्रेमळ, समजूतदार अशी होती. त्यामुळे मुलांच्या मनात वडिलांविषयी तिरस्कार तर आईविषयी आदर होता. ‘आम्हा भावंडांना बुद्धिमत्तेचा वारसा वडिलांकडून तर सहृदयता आणि माणुसकी आईकडून मिळाली.’ असे चेखव म्हणत असे. वडिलांना अव्यवहारी स्वभावामुळे त्यांचा धंदा बंद करून बायकोमुलांसह मॉस्कोला जावे लागले. अन्तोन चेखव मात्र काही वर्षं तगनरोगलाच राहिला. त्याचे सुरुवातीचे शिक्षण

ग्रीक शाळेत आणि नंतर जिम्नाझियासारख्या पारंपरिक शिक्षणसंस्थेत झाले. येथील कडक शिस्त, चाकोरीबद्ध दिनचर्या, घोकंपट्टी आणि हेरगिरीचे वातावरण ह्या सर्व गोष्टी सलग ११ वर्षे अन्तोन चेखवच्या कोवळ्या मनाला विदारून टाकत होत्या. ह्या ठिकाणी त्याच्यातील सुप्त गुण प्रकट होऊ शकले नाहीत. तरीसुद्धा वाचनालय आणि तगनरोगच्या स्थानिक रंगमंचावरील नाट्यप्रयोगामधील वैयक्तिक सहभागामुळे चेखवच्या बौद्धिक आणि मानसिक जडणघडणीवर अनुकूल असाच परिणाम झाला. इथे त्याला रशियन पारंपरिक नाटके आणि शेक्सपिअरची नाटके पण पाहायची संधी मिळाली. ह्याच वेळी त्याने रशियन लेखक तुर्ग्येनेव, गंचारव, शेद्रीन बरोबरच व्हिक्टर ह्यूगो, तत्त्वज्ञ बोकल, ह्यूम बोल्ड ह्या सारख्या प्रसिद्ध लेखकांच्या पुस्तकांचे भरपूर वाचन केले. शिवाय विनोदी मासिके आणि संदर्भ ग्रंथ तो वाचत असे.

१८७९ साली चेखवने मॉस्को युनिव्हर्सिटीतल्या वैद्यकीय शाखेत प्रवेश घेतला आणि पाच वर्षांत डॉक्टरची पदवी संपादन केली. ह्या काळात कुटुंबाला हातभार लावण्यासाठी त्याने विनोदी मासिकांसाठी लघुकथा आणि नाट्यप्रवेश लिहायला सुरुवात केली होती.

१८९४ साली चेखव साखलीन बेटावरच्या कष्टमय आणि खूप दूरच्या प्रवासाला गेला होता. साखलीन बेट म्हणजे अंदमान बेटासारखे झारशाहीत काळ्या पाण्याची शिक्षा झालेल्या कैद्यांसाठीचा तुरुंगच होते. त्याच्या प्रवासाचा हेतू हा होता की तेथील माणसं कशा परिस्थितीत जगतात, त्यांना कोणत्या सोयी सुविधा मिळतात ते जवळून पाहावं आणि त्याचबरोबर आपल्यालाही त्यांच्यासाठी काय करता येईल ह्याचा विचार करावा. परतीच्या प्रवासात तो भारत, सिंगापूर, सिलोन, पोर्टसईद, कॉन्स्टॅन्टिनोपल वगैरे ठिकाणी पण जाऊन आला. त्याचे ह्या प्रवासातील अनुभव वैविध्यपूर्ण, किंचित गुंतागुंतीचे आणि विरोधाभासात्मक असे होते.

ह्या वेळेपर्यंत चेखव नवीन पिढीतील लेखकांमध्ये प्रथितयश साहित्यिक म्हणून गणला जाऊ लागला होता. १८८० ते १९०४ हा त्याच्या साहित्य निर्मितीचा काळ म्हणून गणला जातो. चेखव जरी कथावाङ्मयाचा प्रणेता म्हणून ओळखला जात असला तरी त्याची 'चायका' 'द्याद्यावान्या', 'त्री सिस्त्री',

'विश्न्येविय साद' ही नाटकंही तितक्याच तोलामोलाची आणि जगप्रसिद्ध आहेत.

चेखवच्या जवळजवळ पाचशे कथा प्रसिद्ध झालेल्या आहेत. त्याने लघुकथा, दीर्घकथांसारखा वाङ्मयप्रकार नव्यानेच साहित्यात आणला. त्याच्या एवढ्या कथांमधून उत्कृष्ट कथा निवडणे जवळ जवळ अशक्यच आहे. तरीपण वैशिष्ट्यपूर्ण, वेचक आणि जगातील इतर भाषांमधून अनुवादित झालेल्या कथा अशा आहेत. १) 'कशतानका' २) 'खमेलिऑन' (सरडा) ३) 'दामा स सवाच्कॉय' (कुत्रेवाल्या बाईबाहेब) ४) 'दोम स मेझोनिनम' ५) 'चेलवेक व फुतल्यारे' (कोषात गुरफटलेला) ६) 'तलस्तोय इ तोनकीय' (जाड्या आणि रड्या) ७) 'निवेस्ता' (नववधू) ८) 'पप्रिगुन्या' (टोळ) ९) 'स्मेर्त चिनवनिका' (नोकरदाराचा मृत्यु).

चेखवने आपल्या लिखाणात त्या काळच्या समाजीवनातील सर्व स्तरांतील असंख्य व्यक्तिरेखा उभ्या केल्या आहेत. वास्तवतेपासून तसूभरही दूर न जाता शेतमजूर, सावकार, जमीनदार, सरकारी अधिकारी, शिक्षक, धर्मोपदेशक, घरगडी, विचारवंत, साध्यासुध्या बायका, मुले, प्राणी, पक्षी इत्यादी त्याच्या गोष्टींचे कथाविषय झाले.

वरवर पाहता चेखव अतिशय सहृदय, कवी मनाचा असा वाटला तरी जेव्हा आपण त्याच्या साहित्याचा सखोल अभ्यास करू लागतो तेव्हा त्याच्यातला सडेतोड टीकाकार, विडंबनकार आपल्याला दिसतो. त्याला स्वत:ला ज्यांच्याविषयी मनस्वी तिटकारा वाटत होता अशा त्यावेळच्या रशियातील आत्मसंतुष्ट आणि संकुचित वृत्तीच्या मध्यमवर्गीय समाजावर त्याने घणाघाती हल्ला केला आहे. ह्या माणसांतील हपापलेपणा, दुष्टपणा, मूर्खपणा, अल्पसंतुष्टता, आत्मप्रौढी, स्वत:विषयीच्या भ्रामक कल्पना, लुटारूपणा इत्यादी वृत्तींवर त्याने न भूतो न भविष्यति अशा प्रकारचे ताशेरे मारले आहेत.

चेखव परिवर्तनवादी नसला तरी त्याच्या कथांतील काही पात्रांच्या बोलण्यावरून नजीकच्या भविष्यात येणाऱ्या तुफानाची त्याला चाहूल लागली असावी असे दिसते. चेखवने एके ठिकाणी नवोदित लेखकांना खालील संदेश दिला आहे: 'एकादा तरुण युवक, गुलामाचा मुलगा, वरिष्ठांशी खाली मान

घालून आदराने वागायचं अंगवळणी पडलेला, दुसऱ्याच्या मतांना बिनशर्त सहमती देणारा, उपकाराच्या ओझ्याखाली वाकलेला, शारीरिक आणि मानसिक अवहेलना सहन केलेला, छोट्या छोट्या गरजांसाठी देवापुढे आणि धनदांडग्या माणसांपुढे हात पसरणारा असा हा तरुण एका भल्या पहाटे झोपेतून जागा होतो आणि त्याला जाणवतं की आज त्याच्या शरीरातून गुलामाचं नव्हे तर विमुक्त माणसाचं रक्त वाहायला लागलंय. अशा माणसाची कथा तुम्ही लिहा.' चेखवने स्वत: पण ह्याच गोष्टीचा पाठपुरावा केला. ह्या एकाच ध्येयाने तो जगला आणि हाच त्याच्या लिखाणाचा मूलभूत विषय होता.

पुष्किनने रशियन कवितेला बोली भाषेच्या जवळ आणले त्याप्रमाणे चेखवने रशियन गद्य वाङ्मयावर बोली भाषेचा साज चढवला, त्याच्यात विविधता, सर्वस्पर्शीपणा आणि मुद्देसूदपणा आणला. ह्याचमुळे त्याची प्रत्येक व्यक्तिरेखा वैशिष्ट्यपूर्ण आणि आगळी वेगळी अशी वाटते.

१९०४ साली चेखव प्रकृती अस्वास्थ्यामुळे औषधोपचारासाठी जर्मनीत गेला आणि तिथेच त्याचे निधन झाले. त्याचे पार्थिव मॉस्कोमधील नवदेविच येथील सेमीटरीत जतन केलेले आहे.

□

प्राध्यापिक सौ. सुमती कानिटकर यांचा जन्म २६.५.१९२७ रोजी खानदेशातील चाळीसगाव येथे सहस्रबुद्धे घराण्यात झाला.

प्राथमिक व माध्यमिक शिक्षण चाळीसगाव येथे झाले. येथील आनंदीबाई बंकट हायस्कूलमधून १९४५ साली मॅट्रिकची परीक्षा दिली. १९४८ साली ना. द. ठाकरसी विद्यापीठातून G. A. ही पदवी संपादन केली.

१९५० साली पुणे येथील शिक्षणतज्ज्ञ कै. प्रो. शंकर रामचंद्र कानिटकर यांचे चिरंजीव माधव शंकर कानिटकर (B. E. Civil) यांच्याशी विवाह झाला.

१९५५ साली राष्ट्रभाषा सभेची राष्ट्रभाषा प्रवीण उत्तीर्ण.

१९५८ ते १९६१ ही चार वर्षे हिमाचल प्रदेशातील मंडी येथे वास्तव्य असताना समाज कल्याण मंडळाच्या मंडी जिल्ह्याच्या मानद कार्याध्यक्ष म्हणून काम केले.

१९६१ ते १९६३ बराऊनी (बिहार) येथील मुक्कामात रशियन पेट्रोकेमिकल शास्त्रज्ञांच्या १०० कुटुंबाबरोबर राहण्याची संधी मिळाली. तिथेच रशियन भाषेच्या अभ्यासास प्रारंभ. १९६४ च्या मे-जून महिन्यात मॉस्को येथील रशियन भाषेच्या प्राध्यापिका नतालिया गुसेवा पोयवेन्का यांनी पुणे येथे घेतलेला रशियन भाषेचा इन्टेन्सिव कोर्स पूर्ण केला.

१९६५ ते १९७४ या काळात पुणे विद्यापीठातील परकीय भाषा विभागात जर्मन व फ्रेंच भाषेप्रमाणेच रशियन भाषेचा एम्. ए. पर्यंतचा अभ्यासक्रम चालू

होण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले. पुणे विद्यापीठातील लोअर डिप्लोमा इन रशियन लँग्वेज (मे १९६६), डिप्लोमा इन रशियन लिटरेचर (नोव्हेंबर १९७१) आणि १९७४ साली एम्. ए. (रशियन) पहिल्या वर्गात उत्तीर्ण.

पुणे विद्यापीठात शिकत असताना भारत-सोविएत सांस्कृतिक मंडळाच्या पुणे शाखेतर्फे चालणाऱ्या रशियन भाषावर्गात ४ वर्षे अध्यापनाचे काम केले.

१९७४ ते १९७८ या काळात पुणे विद्यापीठात रशियन भाषा व वाङ्मय या विषयाच्या प्राध्यापक म्हणून काम केले. या अवधीत इन्स्टिट्यूट ऑफ आर्मामेंट टेक्नॉलॉजी गिरीनगर पुणे ४११०२५ येथील लष्करी अधिकाऱ्यांसाठी रशियन भाषेच्या मानद प्राध्यापक म्हणून एक वर्ष काम केले.

१९६८ साली भारत सोविएत सांस्कृतिक मंचातर्फे आणि १९७६ मध्ये पुणे विद्यापीठातर्फे मॉस्को येथील लुमुम्बा फ्रेंडशिप विद्यापीठात पाच आठवड्यांच्या रशियन भाषा शिक्षकांच्या रिफ्रेशर कोर्समध्ये सहभाग.

रशियन भाषेचे अध्ययन आणि अध्यापन चालू असताना १९७२ ते १९८२ या काळात 'सृष्टिज्ञान' मासिकामध्ये रशियन विज्ञानरंजन कथांचे मराठीत अनुवाद केले.

सकाळ पेपर्सच्या 'साप्ताहिक स्वराज्य'मध्ये आणि स्त्री, बायजा वगैरे मासिकांतून १९७८ ते १९८२ या वर्षांत अनेक रशियन कथांचे मराठी अनुवाद प्रसिद्ध केले.

१९७८ ते १९७९ या वर्षात बंगाली भाषेचा आंतरभारतीतर्फे चालणाला बंगाली भाषेचा अभ्यासक्रम पहिल्या वर्गात उत्तीर्ण.

१९८० मध्ये रशियन भाषा शिक्षकांच्या मदतीने पी. ई. एस. गर्ल्स हायस्कूल पुणे मधील नववी इयत्तेतील मुलींसाठी रशियन भाषेचा इंटेन्सिव कोर्स चालवला.

१९८२ मध्ये अन्तोन चेखवच्या 'विश्न्योविय साद' या नाटकाचा 'चेरीचा मळा' हा मराठी अनुवाद कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजयानगर पुणे ३० तर्फे प्रकाशित.

अलीकडे 'कलासक्त' पुणे तर्फे प्रकाशित 'केल्याने भाषांतर' या मासिकासाठी १९९९ ते २००१ या काळात रशियन लेखक व कवी यांच्या साहित्याचा गद्य आणि पद्य मराठी अनुवाद वेळोवेळी प्रसिद्ध.

प्रस्तुत ग्रंथात चेखवच्या सात कथांचा मराठी अनुवाद प्रसिद्ध होत आहे.

मराठीतून कॉन्टिनेन्टल विश्ववाङ्मयाकडे

शेक्सपीयर	राजमुकुट	वि. वा. शिरवाडकर
शेक्सपीयर	हॅम्लेट	परशुराम देशपांडे
शेक्सपीयर	सुनीते	परशुराम देशपांडे
शेक्सपीयर	ज्यूलिअस सीझर	अ. अं. कुलकर्णी
दस्तयेवस्की	जुगारी	जयंत दीक्षित
दस्तयेवस्की	कारमाझफ बंधू	भाऊ धर्माधिकारी
दस्तयेवस्की	शापित कोझाकीण	अशोक डांगे
समीक्षा	दस्तयेवस्की	अनिरुद्ध कुलकर्णी
टॉलस्टॉय	तीन दीर्घ कथा	पंढरीनाथ रेगे
फ्लोबेर	मादाम बोवारी	जयंत धुपकर
समीक्षा	इब्सेन	अनिरुद्ध कुलकर्णी
संकलन	विख्यात फ्रेंच कविता	मीरा गुणारी
चेखव	चेरीचा मळा	सुमती कानिटकर
ब्रेश्ट	माता धीराई	अविनाश बिनीवाले
स्टाइन	बिकट वाट	व्यंकटेश माडगूळकर
स्टीव्हन्सन	पळवलेला पोर	वि. कृ. श्रोत्रिय
स्टीव्हन्सन	गुप्त खजिना	द. भा. वाघोलीकर
डिकन्स	डेव्हिड कॉपरफील्ड	वि. कृ. श्रोत्रिय
फील्डिंग	टॉम जोन्स	द. धों. नगरकर
परिचय ग्रंथ	जर्मन वाङ्मयाचा इतिहास	न. का. घारपुरे
इब्सेन	कलाकार	विनायक राजगुरू